म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.
१९३१

REFBK-0004478

म. ग्रं. सं. ठाणें
निरीक्षण
392

दप्तरांतून निवडलेले कागद

वर्गीकरण 392
अभिलेख 392

छत्रपति रामराजाचें प्रकरण

[किंमत— २ रुपये २ आणे किंवा ४ शिलिंग]

REFBK-0004478

गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, मुंबई
१९३१

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

RAMRAJA'S STRUGGLE FOR POWER, 1750-53.

1. *Shahu's death and Ramraja's accession.*

King Shahu was undoubtedly a great personality, for though he did not personally figure in any operations, he could control the divergent elements in the Maratha State and make them all work for a common national purpose. His death on 14th December 1749 without leaving any heir started a series of dangerous intrigues and struggles for the succession, which would have ruined the leaderless kingdom, had not the Peshwa seized the helm and crushed all anti-national ambitions and attempts at succession. His preservation of the integrity and strength of the Maratha State by this bold personal assumption of responsibility and initiative, however, laid him open to the charge of usurpation commonly brought against the Peshwas by later historians as well as by his defeated rivals.

Absolute monarchy is successful only so long as there is a capable heir to succeed a deceased ruler. Otherwise, the needs of the situation inevitably bring to the surface the strongest man available. Ramraja, a youth of 23, was Shahu's nephew, brought up secretly in exile by his grandmother Tarabai. Shahu did not legally adopt him or bring him to Satara in his life-time for fear that he would come to some harm at the hands of Sakwarbai but on his deathbed signed a will naming him as his successor, under the regency of the Peshwa. A fortnight after the death of Shahu, Ramraja was ushered into Satara and placed on the *masnad*, when most of the prominent dignitaries were present. Ramraja is commonly supposed to have been an idiot, incapable of any sensible action and unfit to direct the serious concerns of an expanding empire.

2. *Transfer of the Government to Poona.*

But the papers here presented show for the first time that the young King was not given a real chance of learning his administrative duties or showing capabalities. The Peshwa after a bitter experience of the intrigues and factions at the capital, had made up his mind long before the late King's death to assume all power into his own hands. Ramchandra Baba and the Purandares were his chief advisers in working out this policy. He first secured the cordial support of that powerful chief, Raghuji Bhosle, and gradually removed all the offices of government to Poona, thus throwing Satara into the background and indirectly compelling both Ramraja and Tarabai to submit to his wishes both as regards their own personal needs and any details of the administration. Ramraja was crowned on 4th January 1750, and the Peshwa himself left Satara for Poona in the middle of the following April, using the interval for completing the arrangements at Poona.

3. *Tarabai's policy.*

Tarabai on the other hand had her own game to play. She coveted power, but when she found that neither Ramraja nor the Peshwa would

allow her a free hand, she went to Sinhgad about 20th March on the pretext of performing her dead husband's anniversary, but really with the intention of raising the standard of revolt there. The Peshwa tried to win her over by persuasion and inviting her to Poona entertained her with much deference and in a most ceremonious manner. But after prolonged discussion, she left for Satara entirely dissatisfied with the policy the Peshwa was pursuing. He, however, won over Raghuji Bhonsle, who had come to Satara for the coronation, and followed the Peshwa to Poona to settle with him his future plans. Thus Ramraja was left at Satara in isolation and impotence, with no influential supporter except his sister Daryabai Nimbalkar. His situation soon growing desperate for want of funds, he had to accept an invitation from the Peshwa to visit Poona and settle matters with him as best as he could. He had already fallen out with his grandmother Tarabai, who, finding him incorrigible, managed to keep him under arrest in Satara fort after his return from Poona, a position to which he had quietly to submit for the rest of his life. Thus, it will be obvious from the papers printed here that the Peshwa made no effort to form an administration and face the situation at Satara itself, in consultation with the various responsible members of the Maratha constitution who still looked upon the Chhatrapati as their legitimate master. This gave rise to endless trouble.

4. *What Ramraja thinks and says.*

There are not many incidents in this section. Most of the papers are news-letters sent from Satara to the Peshwa at Poona by his agent Purandare. They relate to the intrigues and doings of the various individuals at Satara and elsewhere. They reflect copious light on the character of Ramraja. Purandare thus writes on 6th June 1750: "The king does not care to secure the good graces of Tarabai. He has asked the Sachiv not to hand over to you the fort of Sinhgad. He is not straight and fair in his dealings. He tries to upset all your measures, and looks upon all your friends as his enemies." Another report runs thus: "The king asked Yeshvantrao Potnis to end the deadlock and pay off the salaries of the servants. 'If you can, do this at once,' said he, 'otherwise I can make my own arrangements. I am not afraid of anybody. I want to see what these Brahmins can do!'" Yeshvantrao tried to remonstrate with the king, but in vain. Purandare again writes to the Peshwa: "No reliance can be placed on Ramraja; he changes his mind every moment. He feels a bitter hatred for you. If you send Tarabai alone here, he is sure to keep her confined. You must therefore take strong measures at once. Otherwise there will be chaos. Ramraja is bent upon mischief. He has already plundered Shahu's daughters, Santubai, Gajrabai and others. Babuji Naik and Raghuji Bhonsle are both annoyed. He will doubtless assert his independence, if you don't take strong measures at once." In another place Ramraja is reported as saying, "This Peshwa now comes and begs these forts of me. I know that well. I am in no way under any obligations to the Peshwa. I don't owe him a farthing. I won't give him a single fort. I would rather go and make friends with Yamajipant. He is a good Brahman. He will

look after my affairs. I won't be afraid of any of you. I won't go and beg any favour of my grandmother. She is the root of all the mischief. If she comes to Satara I will keep her closely confined. Govindrao Chitnis has crossed me very much. I will depose him and give his office to another man." Sentiments like these which are copiously displayed in the papers show the spirit of the young king.

5. *Damaji Gaikwad's attack on Satara*

Tarabai did not remain quiet for long. She soon realized how the Peshwa had succeeded in his design of silencing every opponent and she contrived to intrigue from Satara with Dabhade, Damaji Gaikwad and the Nizam, with the result that when in the early months of 1751 the Peshwa was away in the Karnatak, Damaji Gaikwad came from Gujarat plundering and devastating the country with a view to put down the power of the Peshwa. Several letters give a vivid description of these events. Janoji Nimbalkar's letters to the Peshwa in this connection will be found full of interest. It will thus be seen that the Peshwa rose to the occasion, and mainly by means of his superior tactics soon got the better of all those who stood in his way so as thereafter to pursue the usual Maratha policy of expansion, unhampered by internal troubles.

Although the period covered by these incidents is very short, the whole situation, which was till now very obscure, can be clearly elucidated by means of the numerous papers here presented. We realize how the best man won and how his personal victory also saved the State.

व.ई. 392

No. 1] *[11-12-1748*

श्री

राजमान्य राजश्री माहादाजी अंबाजी यासी श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न मातुश्री जिजाबाई साहेब यांणी आज्ञा केली यैसी जे. सुा तिसा अर्बैन मया अलफ. पूर्वसंदर्भाच्या विचाराकरितां वारंवार येक संवछर वेदशास्त्रसंपन्न राजश्री दादंभट श्रौत्री यांस रवाना केले. तो सकलार्थ भावगर्भ तुम्हास संभवलाच आहे. यैसी गोस्ट असतां योजिला मनसबा साहेबांच्या निदर्शनास अद्यापवर न ये. तेव्हां तुम्हांसारखे कार्येकर्ते लोक प्रसंगी असोन लौकिक कोणे प्रकारीचा दिसोंन येतो हा अन्वयें याजउपरी तुंम्ही चितांत आणून राजश्री बालाजी बाजीराव पंडित प्रधान यासी सागावें. हुजूर त्यांची मध्यस्ती साहेबीं केली आहे ती यथायोग्य दिसोंन माारनिले येशास पात्र होऊन कार्येसिधी सत्वर होये तो पदार्थ करणें. येविसीचें पंडित माारनिले यांसी सविस्तर आज्ञापत्री लिहिले आहे व वेदशास्त्र-संपन्न राजश्री श्रौत्री सांगतां कलेल. साहेबाकडील मध्यस्तीचा सकलार्थ कलावा यास्तव राजश्री बावाजी भुजंग यांस आज्ञा करून पाठविले आहेत. त्वरेने योजिले कार्ये सीघ्रतेने घडे ते गोस्ट करणे. जाणिजे रा॥ छ १ मोहरम. बहुत काय लिहिणे. \ बार.

अस्पष्ट शिक्का.

¶Letter of Jijabai of Kolhapur to Mahadaji Purandare, written a year before the death of Shahu, evidently referring to the succession to the Satara Gadi, in most vague terms. Messengers were sent to communicate particulars personally.

No. 2] *[11-12-1748*

श्री

राजश्री बाळाजी बाजीराव पंडित प्रधान यांसी,

श्रीमंत सकलसौभाग्यादिसंपन्न मातुश्री जिजाबाईसाहेब. उपरी, पूर्वसंदर्भाच्या अन्वयानरूप तुम्हाकडे वेदशास्त्रसंपन्न राजश्री दादंभट श्रोत्री यांजबराबर आज्ञापत्रें सादर करून कितेक बोलीचालीचा प्रारंभ सदृढतेच्या प्रसंगाची आज्ञा सांगोन पाठविली, त्याप्रमाणें चित्तीं संभवून पूर्वसंकल्प सिद्धीस नेऊन, प्रामाणिक वचन

निदर्शनास साहेबाच्या यावें; तदोत्तर हुजूर संतुष्टता प्राप्त होऊन साहेबीं मध्यस्थी केली. त्या गोष्टीचा फलादेश घडावा, या विचाराकरितां विनंतीपत्राचा मार्ग लक्षिला. अविलंबें कार्यसिद्धि दृष्टीस पडावी, लौकिक उत्तम दिसोन येशास पात्र तुम्ही व्हावें, साहेबीं सर्वांविशीं येक्तयारी टाकावी, ऐसें कितेक मनोदये साहेबीं कल्पून गतवर्षापासून वेदशास्त्रसंपन्न राजश्री भटजीस लागोपाठ रवाना केले. ऐसें असतां साहेबांच्या प्रत्य(या)स गोष्ट न ये. तेव्हां साहेब मध्यस्थ होऊन हुजूर वचन गुंतविलें, त्याचा लौकिक कोणेप्रकारीचा होणार हा अर्थ चित्तांत पाहाणें. तदनुरूप याजउपरी तुम्ही पूर्वसंदर्भाच्या विचारांनुरूप अंगेज[1] करून स्वराज्य कर्तव्यार्थ पहिली बोली केली आहे, व करारदाज यादी लेहून दिल्या आहेत, त्याप्रमाणें निदर्शनास साहेबांचें यावें. हुजूर विनंती केली ती सत्यता होऊन राज्यउपयोगीं मनसबा घडे तें करावें. या गोष्टीचे तुम्हास अगाध कोणतें? येविशीचा कितेक भावगर्भ वेदशास्त्रसंपन्न राजश्री श्रौत्रियाजवळ आज्ञा सांगोन पाठविली आहे. सादंत आज्ञेप्रमाणें सांगतील. तुम्हाकडील मध्यस्ती साहेबांकडे तुमची निष्ठा दृढतर हा साहेबास संपूर्ण भरवसा. तदनुरूप तुम्हास कर्तव्याचें अगाध काय? हे गोष्ट साहेबीं चित्तांत आणून हुजूर विनंती करून तिनीं संस्थानचीं ताकीदपत्रें घेऊन पाठविलीं आहेत. साहेबांचा व तुमचा करारदाज कोणे प्रकारचा आहे? स्वराज्याविषयीं तुमचे मांडीचें उसें केलें आहे, हाहि अर्थ तुमचे ध्यानांत आहे. मुख (ख्य) गोष्ट पूर्वसंदर्भाप्रमाणें हुजूर निदर्शनास साहेबीं आणून द्यावें आणि येशास पात्र तुम्ही व्हावें हा अर्थ चित्तांत आणावा, सकलार्थ तुमचें चित्तीं संभवावा, येदंनिमित्य राजश्री बावाजी भुजंग यांसी आज्ञा करून साहेबीं पाठविले आहेत. साहेबांकडील मध्यस्थीचा अर्थ सांगतां कळेल. बहुत लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ आहां. बार.

¶Jijabai to Nanasaheb Peshwa, asking him to carry out the promises and pledges given by him to King Sambhaji. It seems, that before Ramraja was fixed upon as a successor to Shahu, the Peshwa had agreed to secure the throne of Satara for Sambhaji of Kolhapur. Jijabai is vaguely alluding to these promises and asking the Peshwa to act up to them. Why Sambhaji was abandoned in favour of Ramraja, is a question which requires solution. Possibly the Maratha Kingdom would have benefited by the union of the Satara and Kolhapur Gadis.

---

१ अंगीकार.

No. 3]

पो॥ छ ३० रजब

हरकारे याचे पत्र

श्री

सेवेसी विज्ञापना. ता॥ छ २७ रबिलाखर पावेतो साहिबाचे कृपाद्रिस्टी-कडोनी सेवकाचे वर्तमान येथास्थित आस. राजेश्री प्रतिनिधीपंतानी आज्ञा केली कीं साहेबास जावोनी विनती करण कीं राजेश्री प्रधानपताची बोली सांगितली ते सेवेसी लिहली आहे. सा(हे)वाच्या पायावेगळ आपणास काही दुसर दैवत काही नाही. साहेबाच्या पायासी येकनिस्ट सेवा करीतां कीं नाही हे साहेबास विदित आसल. त्यास राजेश्री प्रधानपतानी श्रीमंत जिजाबाईची भेट घेऊनी श्रीमंत राजेश्री संभाजी महाराजाची भेट घ्यावयाची केली होती तेहि आपणास कळल तैसे, परिहार करावयाच तैसे केल. पुढ त्याच मनोगत घेतल कीं साहेबाच्या पायावेगल काही दुसर नाही. त्यास साहेबी आज्ञा केलेवरी साहेबाच्या पायापासी याव. पुढ साहेब हुकूम करितील त्याप्रो वर्तणू(क) करावयाची ते करो, हे त्याच्या मनामधें आहे. कोणे गोस्टीचा काही महालमुलूख काही मागावयाचा नाही. त्यास राजेश्री महादाजी नाईक येतात म्हणोनी मार्ग पाहतात. आजवर जो मनसबा करावयाचा तो केला जाईल. याजप्रमाणे राजेश्री प्रतिनिधीपंतानी आज्ञा केली त्याजप्रमाणे सेवेसी विनती लिहिले आहे हे विज्ञापना.

¶*This letter seems to throw light on the Peshwa's intrigues with Sambhaji of Kolhapur, probably towards the end of Shahu's reign. It unfortunately bears no date.*

No. 4]

श्रीवरद

राजश्री पंतप्रधान

गोसावी यास.

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्षुमीअलंकृत राजमान्य श्नेहंकित गोपाळराव पांढरे, शेरीफनमुलुक, दंडवत विनंती उपरि, येथील कुशल जाणोन राउलीं आपले कुशळलेखन आज्ञा केली पाहिजे. यानंतर बहुत दिवस जाहाले. गोसावि(या)चें पत्र येऊन कुशळवृत्त कलत नाहीं, त्याजवरून चित सापेक्षित आहे. तरी येणारासमवेत साकल्य वृत लिहून परामृश करीत असावें. तेणें करून संतोषावासी होईल. तदनंतरे महाराज छेत्रपतीस देवाज्ञा जाली; समागमें

सौ. राणीसाहेब अग्निप्रवेश जाला म्हणून यैकिलें. त्याजवरून चित्ताचे ठायीं बहुतसे क्लेश जाहले ते पत्रीं लिहितां पुरवत नाहीं. बरें, ईस्वराच्या मर्जीसच आलें, येथें इलाज काये आहे? पूर्वी राजश्री सेखोपंत (शेषोपंत?) दिवाण सेवेसीं पाठविले होते, तत्समई कितेक आमचा साभिमान धरून राउलीं आज्ञापत्रें प्रेरिलीं होतीं. येसियासी सांप्रत सेखजी (शेषजी?) सेवमधें आहेत. कितेक आर्थ मुखोद्गते निवेदन करतील, ते ध्यानास आणून पूर्वीपासून जैसा अभिमान धरिला आहे तैसें चित्तावरी घेऊन आमचें ऊर्जित करून पदरीं घेतलें पाहिजे. गोसावी* * * जात नाहीं. सर्वाभिमान गोसावियास असिला पाहिजे. जेणेप्रमाणें आपले आज्ञापत्र येईल त्याजप्रमाणें वर्तणूक केली जाईल. आज्ञापत्र आलेनंतर आपण सेवेसीं येऊन पोहोंचतों. कलावें म्हणून लिहिलें आसे. बहुत काय लिहिणें, कृपा असों दीजे, हे विनंती.

¶*Gopalrao Pandhre to the Peshwa, offering condolences on Shahu's death and his services when occasion would require.*

No. 5] *[1749?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले तेथें आज्ञा जे. 'नूतन राजपुत्र पानगांवास आहे, या गोष्टीची चर्चा कसी आहे ते लेहून पाठविणे' म्हणोन आज्ञा. यैशास आज्ञेप्रमाणें गुप्तरूपे शोध केला. त्यास, स्वामीनी लिहिला मजकूर तोच प्रमाण. याप्रमाणें येथें बहुताजणास ठाऊक आहे. दरबारी या गोष्टीच्या शोधास चौहीकडे बातमी आहे. ये गोष्टीचे परम कठीण जाहाले आहे. परंतु वर्तमान तो खरेच. बाह्यात्कारी लटीक म्हणोन दर्शवितात. आंतरयामी परम चिंता प्राप्त जाहाली आहे. हे वर्तमान उपस्थित जाहाल्यापासून चौकसी फार जाहाली आहे. तीन चार कोसावर चौक्या ठेवून झाडाझुड्याची फारसी चौकशी केली आहे. हे वर्तमान तो खरेच म्हणोन सर्वत्र जाहाले आहे. याची पूर्वीच्या खुणा आहेत त्याचेहि वर्तमान मागाहून सेवेसी लि॥ पाठवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare to the Peshwa, writing to say that the succession of Ramraja is a topic of common talk at Satara and that strict enquiries are being instituted for all entering into and departing from that place.*

No. 6] *[19-12-1749*

श्री

सेवेसी केशवराव लक्षुमण पानसी विज्ञापना. येथील कुशल छ १९ मोहरम पावेतो मुा को पानगाव जाणून सवकाचे वर्तमान येथाछित आसे विशेष. येथील मजकूर तर श्रीमंत राजश्री नानासाहेबाची पत्रे आली की, 'राजश्री स्वामी कैलासवासी जाले. तर राजपुत्रास सत्वर घेऊन येणे.' त्यावरून राजश्री माहादाजी नाईक यानी सतरुसीस न्यावयाचा फार प्रयत्न केला, परंतु त्याच्या ध्यानास येत नाही. त्यानी अड घातली कीं 'मातुश्री ताराबाई याजकडील खूण मुद्रा बितामा

१ मोत्याच्या पाटल्या; १ निशाणाचा हती; १ ताराबाइंची पालखी; येणेप्रमाणे व श्रीमंत राजश्री नानासाहेबी यावे अथवा आपण यावें. त्यासिवाय एकंदर जात नाहीत' म्हणून त्यांनीं साफ सांगितलें. राजश्री इंद्रोजी कदम काल सोमवारी येथें दाखल जाले. बहुत काय लिहिणे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति. या प्रमाणे वर्तमान श्रीमंताकडे साताऱ्यास साडणी स्वाराबरोबर पत्रे गेली हे विज्ञाप्ति.

¶*Refers to Ramraja's accession on the death of Shahu.*

No. 7] *[20-12-1749*

श्रीराम

श्रीमंत माहाराज राजश्री भाऊ साहेबाचे सेवेसी.

श्रीमंत प्रोढप्रतापदिनकर ऐश्वर्यसंपन श्रीअंकित रंभाजीराव पांढरे साा दंडवत विनंती उपर, येथील कुशल तामा छ २० मोहरम आपले कृपेस्तव जाणोन स्वभ्योदयाभिवृधिलेखनाज्ञा केली पाहिजे विषेष. इकडील कितेक वृत्त पूर्वी सेवेसी पत्र पाठविले. असे यावरून श्रुत होईल. सांप्रत ससरुषीहून श्रीमंतांची पत्रे आली जे. 'येथील राजपुत्रास घेऊन यावे' व रासहि पत्र आले त्यावरून आजी छ २० बुधवारी डेरे दाखल होऊन गुरुवारी कूच होणार. वरकड कितेक वृत रा माहादाजी नाईक व रा चिंतोपंत व धोंडोपंतानी लिहिले असेल त्यावरून अवगत होईल. रा अंताजी सिवदे (व) सांगोले मंगलवेड्यात आहेत म्हणोन वर्तमान असे. आपण आपले जमावसुधा व रा बाबाजीआपा ढोणे व रा बाजीराव ढोणे स्वामीचे आज्ञेप्रमाणे असूं. विषेष लिहिणे शक्ती नव्हे. हे विनंती.

¶*Rambhaji Pandhare to Bhausaheb, informing him of his departure for Satara with Prince Ramraja.*

No. 8] *[23-12-1749 ?*

श्री

सेवेसी विनंती. राजश्री गणेशपंत व मी मातुश्री दर्याबाईच्या गोटांत मुकामास आलों. स्वारी अद्यापि आली नाही. आल्यानंतर आपलेकडे बातमी पाठऊ ते क्षणी निघोन यावे. चार गोष्टी बोलावयाच्या रीतीने बोलोन दिवस असता फिरोन जावे. आज यावयास अनमान करू नये. येतो असें उत्तर पाठवावें. ऐवज रुपये वीस हजार, निमे नख्त निमे होन अगर दोन हिसे होन एक हिसा नख्त याप्रमाणे आज देवावे. उत्तर येतांच आणावयास पाठवितो. श्रुत होय हे विनंती.

¶*News-letter to the Peshwa from Ramraja's Camp, when on his way to Satara.*

No. 9] *[31-12-1749*

श्रीम्हाळसाईश.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक हरी नारायण कृतानेक सां नमस्कार येथील कुशल तागाईत पौश शुद्ध ३ रविवार मुकाम वाफगाव जाणून स्वकीये लेखन करावयास आज्ञा केली पाहिजे विशेष. पूर्वी वर्तमान साकल्य लिहिले आहे त्याजवरून विदित जाले आसल. तूर्त रा बाबूजी नाईक पौश शु॥ प्रतिपदेस दिडा प्रहरा भेटी जाली. त्या तागाईत खिलबत होत होते. ते च्यार घटिका दिवस राहे तो परियेत होते. कितेक मजकूर मातुश्रीकडील केला. परंतु याचे भाषण याप्रकारे यासी जाले की "तुम्ही बिनबोलाविल्यावाचून येथे कशास आलेत? आम्ही घरात रुसो अथवा काही करू. परंतु लोकानी आम्हास फितवावे यैसे नाही. आम्ही तुमच्याने काही फितावत नाही. आम्ही आपल्या घरात रुसो अथवा काही करू; परंतु सातारा येथील गोस्टी काही आमचे कान यैकत नाहीत. आम्ही त्याचे घरचे खानाजाद आहो. तुम्ही काय समजोन ह्या गोस्टी सागायास आलेत." यैसे कितेक धिक्कारून शब्द बोलिला. आणि भेटीचे समई जोवर घरात बिछयाने परियेंत येत तोवर सामोरे गेले नाही. यैसे कितेक गोस्टीचा अनादर देखोन बहुत श्रेमी जाले. वस्त्रे देत होते परंतु घेतली नाहीत. यैसे वर्तमान यैकिले. ते सेवेसी लिहिले आहे. हे खिलबतचे वर्तमान यैसे

आहे. याजसिवाय केवल आंतस्त जिवाचे वर्तमान श्री ईस्वर जाणे. परंतु दृष्टीगोचर भाव काही आणखी दिसोन आला नाहीं. यासी बाबूजी नाईक तैसेच कूच करून खटे होऊन प्राथकाली शणवारी द्वितीयेस गेले. श्रुत होये. आणिखी मुजफरखान गाडदी याजकडील हिराचंद कायेत येथे आला आहे. त्यासी बीस हजार रुपये दिल्हे. हुंडी पुणियाचे सावकारावर दिल्ही. तेथून हुंडी मुजफर-खान जेथे आसल तेथे करून द्यावी आणि त्याजपासून गाडदी फिरंगी दोनसे आणवावे. यैसे वर्तमान आहे. हिराचंद कायेत येथेच आहे. दिलीकडील वर्तमान तरी वजिराची पत्रे आली होती की तुम्ही सत्वर येणे. तिकडून अटक-पार अहमदखान पठाण मातबर फौज घेऊन येणार. थोडीसी फौज अटकें अलीकडे उतरली आहे. मागून आपणहि येणार यैसे वर्तमान आहे. दिलीकडे पठाणाचे फौजेची आवाई पडली आहे. यैसे वर्तमान आहे. त्याचा जामदार खाना व तोफा वगैरे जिनस यैसा तयार जाला आहे. पुढें वाटे लावणार आणि मागून आपणहि सत्वर जायाची तजवीज आहे. जरी आपली पत्रे समाधानाचीं वरचेवर येऊन पोहोचली तरी टिकाव जाला तर होईल. नाहींतर हे येथून जाईल. यैसे वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होये. बहूत काये लिहिणे. कृपा वृ*धी कीजे हे विज्ञाति.

¶Hari Narayan writes to the Peshwa from Vafgaon to inform him that Babuji Naik has tried to take advantage of the disaffection of Malharrao Holker against the Peshwa, by winning him over to the side of Tarabai. Malharrao, however, proved obdurate. The writer further informs him of the money advanced to Mujfar Khan in return for the service of 200 Gadadis and finally asks the Peshwa to prepare for an imminent attack on the part of Abdali in the north.

No. 101 [*Prior to 1750*

श्री

राजश्री सिदोजी राऊत गोसांवी यांस

ऽ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नेहांकित बन्हानजी मोहिते रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे. विशेष श्रीमंत माहराज मातुश्रीचे व राजश्री स्वामीची पत्रें आम्हास हुजुर येणे म्हणोन आली आहेत. येथे हुजुरे येऊन बैसले आहेत त्यास हुजुरच्या पत्राच्या नकला व आम्हीं आपलें पत्र श्रीमंतास पाठविले आहे हें देऊन सालजाब घेऊन पाठविला पाहिजे. सातारेकडील मजकूर पाहतां उभयेताची चित सुध आहे ऐसा अर्थ दिसोन येत नाही. त्यास श्रीमंतास पत्र लिहिले. आज्ञा करतील तेणे

प्रमाणे वर्तणूक करूं. यानंतर आपल्या स्नेहाचा अर्थ कित्येक राजश्री वेंकाजी-पंती सांगितला आहे तर आपल्या व आमच्या स्नेहास दुसरा अर्थ नाहीं. पेशजी स्नेहाचा संकेत आपण कित्येक बोलिले आहेत तेणे प्रो चितांत आणावा. आम्ही आपल्या स्नाहासिवाय आहों यैसा मजकूर नाहीं. राजश्री त्रिंबकजी भोसले यानी श्रीमंतास पत्रे पाठविलीं आहेत म्हणोन वर्तमान ऐकितो. त्यांत राजश्री रघोजीबावा भोसले याजकडील संकेत कित्येक अर्थ लिहिला आहे त्याचा शोध ध्यानांत आणोन सविस्तर लिहिले पाहिजे. आपण ते प्रसंगी असता आम्ही कोणी कोष्टीचा अर्थ ध्यानात आणावा यैसा मजकूर नाहीं हे द्रढोतर ध्यानांत आणोन हे पत्र आपलेस लिहिले आहे. सर्व भरवसा तुमचाच आहे. बहुत काय लिहिणे हे विनंती.

¶*Burhanji Mohite to Sidoji Rawoot, asking him to get orders from the Peshwa whether he should accept the invitation from the King and Tarabai to go to Satara. The writer, however, complains that the King and Tarabai are not on good terms. The addressee is assured of the writer's friendship and is asked to supply information regarding Trimbakji and Raghuji Bhonsle.*

No. 11] [*Prior to April 1750*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री भाऊ साहेब
स्वामी राजाचे सेवेसी.

आज्ञाधारक व्यकटराऊ मोरेश्वर चरणावर मस्तक ठेऊन साा नमस्कार विनंती जे. माहाराजानी कृपा करून राजश्री रघोजी भोसले यांजकड पाठविले. त्यासी आपण आज्ञेवरून येथे आलो; तों नवाब नासरजंग याचे वकील येऊन बसले आहेत. दुसरे सैद शरीफखान आलजपूरचा सुभा याजकडून बालापूरचा फौजदार हाहि आला आहे. नवाबानी सरंजामानसी बलावले आहे. त्यासी हेहि नव-रात्रामधे डेरे बाहीर दिल्हे; त्यास मोहर्त पाहून बोहर आले; तो वाटेस येता जरिपटका निशानाचा होता, तो तुटोन पडला आणि आस्तमानी डेरियासी मोहाल लागले. मग तमाम डेरे पाडून गावात नेले. यांजपासी फौज पाच हजाराची वदंता आहे व याचे पुत्र राा साबाजी भोसले आहेत ते मकसुदाबादेकडे गेले, त्यासमागमे साता हाजाराची आवाई आहे. ते त्या प्रांतास गोलियावर यांची ठाणी पूर्वी आलाबिर्दी होते याणी घेतली होती; तेथे कित्येक लोक मारले. [पुढील बंद गाहाल] मी जे वर्तमान होईल ते लिहून पाठऊ. व यथे राजश्री

रघोजी भोसले यासी कर्जदारानी वहूत आडविले आहे. गोसावी वहुत हैरान करितात. पैका तो कोठे नाही. यैसे आहे. हिदायेत मोहिदीखान याकडील तों कोन्ही वकील आला नाही. इतकियावर जे होईल ते लिहून पाठविले आहे. भास्करपंताच्या वायेकोच्या चितांत आहे कीं, पैठणापासून घासदाणे घेत घेत नादेडापुढे जावे, यैसे यैकतो. सत्य मिथ्या ईश्वर जाणे. वहुत काये लिहिणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाती.

¶Vyankatrao Moreshwar to Bhausaheb, forwarding news from Raghuji Bhonsle, says that ambassadors from Nasarjung and Sayd Sharifkhan have approached Raghuji for help. The writer also gives the approximate strength of Raghuji's army. 'Raghuji,' he says, 'is much harassed by his creditors.'

No. 12] [*1750 ?*

श्री.

पुा सेवेसी विज्ञापना. राजश्री प्रतिनिधी व फत्तेसिग बावा व आणीकहि कोण्हाकोण्हाचे सूत्र करवीराकडेच आहे. त्यास मुख्य गोष्ट कीं, पर्वताचे अनुसंधान कसे आहे आणि काय आहे हे कांही कळत नाहीं. एखादे समई संदर्भ याचा कोण्हाचे हाते असिलियास बरी गोष्ट नव्हे. प्रतिनिधि तो सूत्र करावयास चुकत नाहीतच. यास्तव स्वामीनीहि पर्वताचे कारभारी यांस वरचेवरी रवेसीने आज्ञा करीत जावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶This letter, sent from Satara to the Peshwa at Poona after the death of Shahu in the end of 1749, mentions the activities of Tarabai, and advises keeping a proper watch at the fort.

No. 13] [*27-3-1750 ?*

श्री.

सेवेसी गणेश महादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. काल सिरगांवकर यांचे पत्र आले कीं, श्रीमंत महाराज करवीरकर वर्षप्रातिपदेस डेरेदाखल जाहाले. श्रीमंत महाराज सातारकर याजकडे फौज सुद्धा जावे यैसी वदंता आहे. व सातारियाहून राजश्रीची पत्रे गेली कीं, किल्ला[2] आमचे स्वाधीन आहे व फौजहि

---

१ रीतसर. २ सातारा.

कांहीं लगामी आहे; आपण यावे म्हणोन पत्र सातारियाहून गेले. सबब बाहेर डेरे दिल्हे यैसी बातमी आली. जाणोन सेवेसी निवेदन व्हावे यदर्थ विनंती सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News sent from Satara to Poona that Sambhaji of Kolhapur had started for Satara to help Ramraja.*

No. 14] *[March 1750?*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. प्रतिनिधी व येमाजीपंत रुसून किन्हेस गेले होते. त्यास थोरली मातुश्री फतेसिंगबावास निरोप द्यावयासी कोरेगांवास गेली होती. राजश्रीसहि नेले होते. देवराव, येशवंतराव व रघोजी भोसले हेहि होते. सांप्रत प्रतिनिधीचा व फत्तेसिंगाचा एखलास आहे. याजकरितां फत्तेसिंगबावानीं बाईपासीं मध्यस्ती करून प्रतिनिधीस पायावर घालावे, यैसा करार करून राजश्रीच्या कानावर घालून फत्तेसिंगबावा व सिवाजी हरि, येशवंतराऊ देवराऊ किन्हेस प्रतिनिधीकडे जाऊन प्रतिनिधीस घेऊन कोरेगांवास आले. बाईच्या पायावर नेऊन घातले. बाईनीं चादर अंगावर प्रतिनिधीच्या घातली. समजावीस जाली. (त) दोतर बाईनीं प्रतिनिधीस समागमे घेऊन सातारियास आली. कलले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Purandare to Bhausaheb, communicating the movements of the Pratinidhi, Yemaji Shivdeo and others.*

No. 15] *[6-4-1750*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बाबास्वामीराजाचे सेवेसी.

आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विनंती जे. येथील वर्तमान ता चैत्र सुध येकादशी मुकाम येरलवाडी नजीक कातरखटाव स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित आसे विषेश. स्वामींची आज्ञा घेऊन स्वार जालो ते * * * * आलो. तेथे तीन च्यार मुकाम जाले. राजश्री बाबूराव आलियाउपरी तेथून कूच करून मौजे मजकुरास आलो. त्यास राजश्री

---

१ मंत्री.

रघोजी बावा भोसले याची जोडी * * * * राजश्री त्रिंबकजी भोसले व राजश्री बुऱ्हानजी मोहिते यासी पत्रे घेऊन आले. त्याणी पंढरपुरापलीकडे बेगमपुरियावर आले. आज येकादसीस पंढरपुरावर येणार म्हणून पत्रे आली त्याजवरून राजश्री त्रिंबकजी भोसले याणी व राजश्री बुऱ्हानजी मोहिते याणी उदईक पंढरपुरास जावयाचा निश्चय केला आहे. व त्यांचा हेत कीं फौजेसुधा सप्तरुसीस यावयाचा आहे. मग तेथे आलियावर स्वामीच्या विचारे फौज वाटे लावयाची ते वाटे लावावी आणि श्रीमंत आज्ञा घेऊन जातील त्याणी लागली आज्ञा आपणास द्यावी आणि त्याजसमागमे पुणियासी जावे. तेथे लग्नें जालियावर कृपा संपादून द्यावी यैसा विचार आहे. स्वामीस श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar to Baba Purandare warning him that Trimbakji Bhonsle, Burhanji Mohite along with Raghuji will march towards Satara with their armies. He adds they are anxious to secure the Peshwa's favour.*

No. 16] [*9-4-1750*

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री भाऊ साहेब स्वामी राजाचे सेवेसी.

आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विनंती जे. चैत्र सुध १४ चतुर्दसी सोमवारी प्राथकाली प्रहरा दिवसाचे वर्तमान कीं, सडी फौज च्यार पाच हजारानसी यावे. राजश्री जाणोजी भोसले याचे लग्न करणे आहे, याजसाठी त्यासी समागमे घेऊन यावे लागते. आणि दुसरे राजश्री कासी भास्कर यासी राजश्री विसाजी वैद याची कन्येचा मजकूर आहे, त्यासी लग्नास यावयाचे जरूर आहे. त्याजसाठी हे सांगाते घेतले पाहिजेत. त्यासी राजश्री रघोजीबावा बोलले कीं, आपण तेथे येऊ. तेव्हा * * * * जमावनसी तेथे येऊ. आम्ही काही श्रीमंताच्या जिल्ह्यास उपसर्ग देणार नाही आणि आम्ही तेथे आलिया * * * * * * * * * सत्वर काहाडून द्याव आणि आम्हास लवकर वाटे लावावे. त्याजवरून राजश्री बुऱ्हानजी मोहिते त्यानी सांगितले कीं श्रीमंत तुमचे कार्यास आंतर करणार नाहीत यैसे वर्तमान यैकिण्यात आले आहे. पुढे जे होईल ते सेवेसी लिहित जाईन * * सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar to Bhau Saheb informing him that Raghuji is celebrating his son's marriage. The army accompanying him will in no way molest the country.*

No. 17] *[April 1750*

ग राजश्री रघोजीबावास सातारियासी घेऊन आले. सडेमात्र आले. आज जितीचा हातरोखा लिहून दिल्हा. बाकी दोन कामे (राहि)ली आहेत, तेहि करून देतो, यैसे राजश्री बोलले. व आता राजश्री बोलतात कीं, आऊ-साहेबास आणावयाची तजवीज केली पाहिजे. आणि मजला नेऊन आईचे चरणावर घालून, त्यासी येथे घेऊन यावे. आणि पेशव्याणी मजवर कां राग करितात ? माझे मायेबाप गणगोत जे आहेत ते तेच आहेत. त्यांजखेरीज आणिक कोन्ही नाही. आता बहूतसे * लीणतेत आले आहेत. आणिक बोलतात कीं, म्या त्यांच्या आज्ञाखेरीज * * * ते फजीत पावलो. पुढे काही आज्ञासिवाये करण * * * * * म्हणतात की, पाचा स्वारान(सी) * * * पासी येतो. आणि मजला घेऊन जा * न मातुश्रीस व पेशवियासी घेऊन यावे. यै(से) (म्ह)णतात व आणिक बाजार आफवा येथे बहूत (अपूर्ण)

¶*A fragmentary letter illustrating the submissive attitude of Ramraja towards the Peshwa.*

No. 18] *[April 1750*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना साहेब श्वामीचे सेवेसी.

आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. साहेबांची आज्ञा घेऊन श्वार जालो ते काा खटावास आलो. तेथें राजश्री गोविंदराव चिटणीस याचे भाऊ राजश्री बाबूराव येणार होणे म्हणून च्यार मुकाम जाले. ते काल तेथे आलियावर येकादसीस कूच करून येरलवाडीनजीक कातर खटाव येथे * * थे राजश्री रघोजी बावाकडून पत्रे राजश्री त्रिंबकजी भोसले व राजश्री बुन्हानजी मोहिते यासी आली त्या पत्री लिहिले कीं मुकाम बेंगमपुरानर्जाक पंढरपूर येथे आलो तर तुम्ही मंडलीसहवर्तमान सत्वर येणे. आपण उदईक पंढरपुरावर येतो. त्याजवरून राजश्री त्रिंबकजी भोसले व राजश्री बुन्हाणजी मोहिते याणी उदईक द्वादसीस पंढरपुरास जावे हा निश्चये केला आहे व जासूद जवानीने सांगत होते कीं आज येकादसीस पंढरपुरास येणार यैसे आहे व त्यांचा हेत कीं फौजेसुधा सतरुसीज यावे. तेथे श्रीमंत आज्ञा करतील त्याजप्राा फौज

रवाना करावयाची ते करू आणि ठेवणे ते ठेऊ व श्रीमंताच्या हाते आज्ञा घेऊन पुणियासी लग्ना * * तेथे (शु)भकार्ये संपादून स्वामीची आज्ञा घेऊन जावे. ज्याप्रमाणे आज्ञा करतील त्याजप्राा वर्तनूक करावी, यैसा अर्थ दिसोन येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar to the Peshwa to the effect that Trimbakji Bhonsle and Burhanji Mohite are encamped near Pandharpur where Raghuji Bhonsle will join them. The trio will march towards Satara after receiving orders from the addressee.*

No. 19] [*20-4-1750*

श्रीशंकर.

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील वर्त[1] चैत्र वद्य १० दसमी शुक्रवारपावेतो येथास्तित आसों. यैसियासी राजेश्री राघोजीबावा यांच्या घरास बाबूराव उपाध्ये वाडियांतील याणी येऊन येकांती सांगितले. तेथे त्रिंबकजी भोसले व * * राव चिटनिवीस रा। गोविंदराव यांचे भाऊ व विसाजी गोविंद व आपण यैसे होतो. तेथे बाबूराव उपाधे याणी सांगितले कीं, दर्याबाई यांच्या घरी राजश्री व फतेसिंगबावा व दर्याबाईचे कारकून व आणीकहि विप्र मंडलीचेहि कोन्ही होते, त्यांची नावे पुरती ध्यानास, आली नाहीत आणि त्यांनीहि सांगितले नाही, परंतु कुंफिया[2] वर्तमान सांगितले कीं, आम्हा रघोजी भोसले यांचा फारसा भरवसा होता कीं, येथे पेशवियांणी बाम्हनीं राज्य करू म्हणतात; रघोजी भोसले यासी आणावे आणि राज्याचा बंदोबस्त करावा. त्यासी रघोजी भोसले आले तों तेहि त्यांसच मिलाले. याजसाठी नवा मनसुबा ठरावला आहे की, जो फतेसिंगबावाचा सरंजाम आहे तों त्याचा त्यांस द्यावा आणि त्यापैकी पाच लाख रुपयांचा सरंजाम दर्याबाईच्या पुत्रास द्यावा आणि दाहा हजार फौज दर्याबाईकडून ठेवावी व दाहा हजार फौज फत्तेसिंगबावानी ठेवावी व मुन्हाजी घोरपड्यासी आणावे, त्याला सरंजाम करनाटक द्यावे वगैरे देशां * * काही सरंजाम द्यावा, यैसा मजकूर करार वांकई[3] त्याणी सांगितला कीं हा निश्चये जाला. आणीकहि विचार यैकिला कीं मल्हारबा व येशवंतराव पोवार यैसे उभयेतां पेशवियाकडील फोडावे, आपल्याजवल ठेवावे, म्हणून बोलले. तेव्हा तेथे कोन्ही ग्रहस्त

---

१ वृत्त. २ कुफिया – गुप्तपणे; अन्तस्थ. ३ वाकई = योग्य.

होता त्याने जाबसाल केला कीं, ज्याचे नाव मल्हारजी होलकर त्यांला पंचवीस लाख रुपयांची जागा सरंजाम पावत आसता तुम्हाकडे येऊन काये प्राप्त होणार आहे व येशवंतराव पोवार आपले घरी रुसून वसला आहे, तरी तीन लाख रुपयांचा मुलूक त्याजकडे आहे, यैसे आसोन रुसून वसला; परंतु यांजप्राा चालवणे, आणि काय जरूर आहे? त्यासी हे वर्तमान राा रघोजीबावानी यैकोन बहुत खटे जाले कीं, आम्हावर हा प्रयोग आरंभला आहे तर काये चिंता आहे? उदईक नवाव नासरजंगहि येतो, त्यासी कोन कोन त्याजपुढे टिकतात हेहि पाहतों. आणि ज्याणी आज येव्हडे राज्य भोपले (भोगले) त्यांच्या ह्या गती आहेत. आणखी त्यांची काये गत होईल हे कलत नाही. तर आपण उदईक लस्करात जाऊन राहूं. येथे वाडियांत राहणार नाही. तेव्हा राजश्री बन्हानजी मोहिते याणी सांगितले कीं, उतावली करावयाचे काही काम नाही. कैसे होते ते पाहिले कां नाही? उदईक कूच करून लस्कर आलीकडे वेणातीरास येणार व राा बावानी सांगितले कीं, श्रीमंत राा भाऊसाहेबांचें लग्नाचें कोणत्या तिर्थीस आहे हे तहकिकात वर्तमान आनवणे; त्याजसारखी तजवीज केली जाईल. येथे राजश्री जानोजी भोसले याची तीथ पंचमीची नेमस्त करणार आहेत. व राा गोविंदराव चिटनिवीस यासी राजेश्रीनी किला दिल्हा होता त्याचे हातरोखे दिल्हे होते ते फिरले; किलेदारानें मानले नाहीत. त्यासी राा बापूजी-बावा बहुत दरबारीहून खटे होऊन आले आणि राजश्रीनी ते हातरोखे होते ते त्यांज देखताच फाडून टाकले, यैसे वर्तमान यैकिल्यात आले ते माहाराजांचे सेवेत लिहिले आहे. पुढे जे यैकिल्यात येईल तें वरचेवर पाठवितों. आणि जासूद-जोडी हाताखाले नाहीत. इतकियावर माहाराज खावंद आहेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa of the attempts that were made on behalf of Ramraja to alienate some of the Sardars from the Peshwa's side by granting them inams and saranjams.*

No. 20] *[Before 21-4-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विज्ञापना येसीजे. स्वामी स्वार होऊन गेलियावर मागे राजश्रीनी रघोजीबावास चोबदार बोलाऊ पाठविले होते. त्यासी याणी त्यासी सांगितले कीं येथे लोकांचे गवगव्या-मधे आहेत. तिसरियाप्रहरी सेवेत येतो. त्यासी याणी तेथे बातमी ठेविली

होती आणि राजश्रीनी राजश्री गोविंदराव चिटनिसासी बोलाऊन नेले कीं आपल्या * * * (घे)ऊन येणे. त्यासी व सेखामिरा * * * * * * तर्नीस यासि बोलाऊन सांगितले कीं तुम्ही पेशवियाकड जाऊन त्यांसी सांगावे की आम्हास न पुसत जावे हे योग्य नव्हे. त्या(सी) आपण कृष्णातीरी मुकाम करावा, आपण तेथे येतो येसे म्हणून वाटे लावले. आणि मागे चौ घटकांत बोलले कीं, राजश्री गोविंदराव यासी त्यांचे आगत्यच आहे; त्यास जाणे जरूर आहे येसे बोलणे बोलले. हे वर्तमान रा। रघोजीबावास कळले. याणीहि आपल्यात आपण बोलले कीं ज्या श्रीमंतानी करोडा रुपये खर्चिले. (अपूर्ण)

¶*Vyankatrao Moreshwar reports to the Peshwa that Ramraja has sent for Raghuji Bhonsle and expressed his displeasure that the Peshwa should have gone without taking his leave.*

No. 21] [*23-4-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यकंटराऊ मोरेश्वर कृतानेक सा। नमस्कार विनंती. विज्ञापना यैसीजे येथील वर्तमान चैत्र वद्य १२ द्वादसी सोमवार साहेबांचे कृपे-करून येथास्थित आसो. यैसियासी राजश्री गोविंदराव चिटनिवीस आलियावर येक प्रहर राजश्री व हे यैसे येकांती बसले होते. त्यासी त्यांचीहि पन बनली. रागेसे उठोन आले. मग तेथून राजश्री रघोजीबावाकड आले. तों तेथे राजश्री येशवंतराव पोतनीस आले होते. मग ते त्रिवर्ग यैसे खलबतांत बसले होते. मग येशवंतराव यांला बावानीं वस्त्रे दिल्ही. परंतु त्रिवर्गाचें काये बोलणे जाले हे बाहेर फुटले नाही. व राजश्री रामाजी नाईक भिड व बालाजी नाईक भिड याणी येक दिवस कर्जासाठी धरणे देऊन बसले होते. त्यासी परिश्विन सांगितलें कीं आज आपणास रुपया मलत नाही. बाहेर जाईन तेव्हां जे देणे ते देईन. भिड्यानीहि बहूतसी सख्ती केली. याणी साफ सांगितले कीं येथे रुपया मिलत नाही. मग दोन प्रहर रात्री घरास गेले यैसे आहे. व रा। बावानी तमाम फौजेची रवानगी करितात. पतके बोलाऊन जे सांगणे ते सांगतात. दो चौ दिवसा कूच करून लस्कर बारामतीवरुन राक्षेसभुवन याच्या रोखे वाटे लावणार. पुढे जालनापुरावरुन वराड प्रांते जावयाची नेमनूक केली आहे. व रा। बावाची व रा। कोनेरपंताची समजाविसी होत आहे. आज दोन रोज सिदभटजी रा। बुन्हानजी मोहिते व सिवाजी मोहिते यैसे समजाविसीचे कारभारात पडले आहेत. आज गलेश्यकंटश होत आहे. साहेबास कलावे म्हणून लिहिले.

---

१ दाट स्नेह.

दरबारचे वर्तमान जे कलत जाईल ते वरचेवर माहाराजाचे सेवेत लिहित जाऊ व साहेबी आम्हास सा व च्यार जोड्या देविल्या त्या पैकी ४ जोडी आम्हापासी आहेत. त्या येथे राहू ना म्हणतात सबब कीं आवाजी नाईक हे सदंतर येथे आहेत, मग दुसऱ्या नाईकीचे आम्ही राहणार नाहीत, यैस म्हणतात. त्यासी साहेब काये आज्ञा करतील त्याजप्रो वर्तनूक केली जाईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶Vyankatrao Moreshwar reports that Raghuji is sending away his army to Berar. As for the news about the King there was a meeting within closed doors and nothing has so far leaked out as to what happened there.

No. 22] *[25-4-1750*

श्रीशंकर.

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. येथील वर्तमान ता. चैत्र वद्य ३० आमावशा पावेतो माहाराजांचे कृपे करून येथास्थित आसो. यैसियासी राजश्री गोविंदराव चिटनीस व राजश्री रामाजीपंत आपा या उभयेतानी राजश्री रघोजी भोसले याजकडील कागद साहेंबी नेमनूक करून दिल्हे होते कीं याजवर राजश्रीचे 'देणे' करुन देणे. त्यासी चतुर्दसी सोमवारी अस्तमानी कागदावर 'देणे' करुन आनून राजश्री बाबांचे स्वाधीन केले. त्याजवरुन बहुतसे खुशाल जाले कीं श्रीमंतानी आमचा आंगीकार बराच केला. आम्ही आकृत्रिम त्यांसी चालू; कधीहि अंतर करणार नाही. यैसे बोलले व राजश्री जानोजी भोसले यांचे लग्न वैशाख सुद ७ सप्तमीस नेमस्त केले आहे. साहेबा कलावे म्हणून लिहिले आहे. बहुत काये लिहिणे हे विज्ञाति.

¶The writer informs the Peshwa of the grant of money given by the King to Raghujibowa.

No. 23] *[27-4-1750*

श्री.

राजश्री बालाजी पंडित प्रधान
गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो राघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण राजश्री लंबोधर धुंडिराज यांसमागमे राजश्री स्वामीचा हातरोखा पाठविला तो राजश्री गोविंदराव व राजश्री रामाजी

माणकेश्वर यांचे विद्यमाने पोहचला; व माारनिलेनी आपणाकडील कार्याच्या व ममतेच्या गोष्टी सांगितल्या, त्यावरून सविस्तर अर्थ कळो आला. ऐसि-यासी[1] आम्ही आपणाविंतरिक्त किमपि नाहीं. आपली ममता स्नेहाची वृधि दिन प्रतिदिनी व्हावी हेच इछितों. दुसरा विचार जाणत नाहीं. येतद्विशईचा सविस्तर आर्थ माारनिलेपासी बोलिलों आहों, हे सविस्तर आपणास निवेदन करितील. त्यावरून कळों येईल. रा छ ३० (जमा) दिलोवल सूज्ञाप्रती (वि) शेस काये लिहिणे? लोभ असू दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle assures the Peshwa of his hearty co-operation.*

No. 24] [*27-4-1750*

*श्री.

राजश्री माहादाजीपंत गोसांवी यांसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत गेले पाहिजे विशेष. आपण राजश्री लंबोदर धुंडिराज यांसमागमे राजश्री स्वामींचा हातरोखा पाठविला ते राजश्री गोविंदराव व राजश्री रामाजी माणकेश्वर यांचे विद्यमानें पोहचला व माारनिलेनी आपणाकडील कितेक कार्याच्या व स्नेहाच्या गोष्टी सांगितल्या, त्यावरून सविस्तर अर्थ कळों आला. ऐसियासी आम्ही आपणाविंतरिक्त किमपि नाहीं. येतद्विशईचा कितेक अर्थ माारनिलेपासी बोलिलो आहो. हे आपणास सांगतील त्यावरून कळों येईल. रा छ ३० जमादिलौवल. बहुंत[+] काये लिहिणे, लोभ आसू देणे, हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle in writing to Mahadaji Pant acknowledges the receipt of the letter from the King. He further promises his help.*

---

१ या ठिकाणें रघोजीचा अष्टकोनी शिक्का.

* नं. २३ व २४ हीं पत्रें एका मजकुराचीं आहेत; परंतु एक पेशव्यांना व दुसरें पुरंदऱ्यांना लिहिलें आहे.

+ जंत्रींत या वर्षी ३० जमादिलावल ही तारीख वर्तविलेली नाहीं.

No. 25] *[27-4-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा्ा नमस्कार विज्ञापना येसीजे. येथील क्षेम ता्ा वैशाख सुद त्रितीया प्रहर रात्री पर्यंत येथास्थी(त) आसो विशष. येथील वर्तमान राजश्री रघोजी भोसले याणी तमाम माहालचा येवज घासदाणियाचा राजश्री येशवंतराव पोतर्नीस यांचे जावई महिपतराव खासनीस याजकड हावाले होते. त्याजपैकी बनसीपुरी महंत याजला तीन लाख रुपये देविले होते. वरकड लोकास नालबंदी व रोजमरे दिल्हे. त्यासी हे रुपये बनसीपुरीबावास देऊन त्याजपासून आणिक लाख रुपये घ्यावे येसे नेमस्त केले होते. त्याणीहि कबूल केले. त्यासी महिपतराव याणी येवज रोकडा असोन बनसीपुरीस साह महिनियाचा वाईदा करावयासी लागले. तेव्हां गोसावियाणी परिश्चिन सांगितले कीं मागील रुपये हिसेब करून देणे; मग देयाचे आसल तर देऊं. याजवरून रा्ा बावानी महिपतराव याजवर बहुत रागास आले की आधीच लग्नाची गोष्ट करू नये. च्यार दिवस लग्न राहिले आसता माझा विश्वासघात केला. त्यासी हे पहिलेच सांगावे होते कीं बनसीपुरीची निशा माझ्यानें होत नाहीं. तुमच्या चितास येईल ते कीजे यैसे सागावे होते. मग श्रीमंतास विनंती करून त्याजपासून लाख दोन लाख रुपये घेतो, आणि आपले लग्नाचे कार्ये करतो. यैसा तोडघसी पडल्याचा विचार जाला आहे. लोकात हसे जालेसे दिसते. त्यासी यासमई आपल्या हवेलीतून उठोन लस्करात गेला. उदई (क) लस्करची रवानगी करून पचमीस स्वार होऊन पुणियासी येतात. तमाम कारभारी जे आहेत त्याजवरहि रागे भरले. उदईक बनसीपुरीची धरणी येशवंतराव याचे घरी बसणार आहेत येसे वर्तमान याजकडल आहे. व रा्ा फतेसिंगबावाकडील वर्तमान तर रा्ा त्रिंबक हरीस बोलाऊन नेले की ज्याप्रमाणे तुम्ही पूर्वत प्रमाणे कारभार करीत होता त्याजप्रमाणे कारभार करणे. त्यासी याणी सांगितले की आता आपल्याच्याने कारभार होत नाहीं. श्रीमंतानी राजश्री पांडबा दिल्हे आहेत त्याच्या हाते कामकाज घ्यावे. त्याजवरून रा्ा फतेसिंगबावा बहुतसे खटे जाले. याजकडील सिलेदार जितके होते तितके आडून बसले आहेत की आज तागाईत चाकरी केली; आम्हास नालबंदी नाही ना रोजमरा नाही; तर आज आमची नालबंदी व समजाविसी चुकऊन देणे. त्यासी बहुतसे आडून

बसले आहेत. त्याची समजाविसी जाली नाही यैसे वर्तमान येकिल्यात आले आहे. साहेबास कलावे म्हणोन लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय, बहुत काये लिहिणे, हे विज्ञाति.

¶*Vyankatrao Moreshwar reports that Raghuji was severely displeased with Yeshwantrao's son-in-law for the latter's negligence to provide credit to the formers' creditor which would have enabled him to draw from him to meet the expenditure of his son's marriage.*

No. 26] *[28-4-1750*

श्रीशंकर

सेवसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक साष्टाग नमस्कार विनंती विज्ञापना येसजि. येथील वर्तमान ताा वैशाख सुद ४ चतुर्थी शनवार चतुर्थ प्रहर येथास्थित आसो. येसियासी राजदरबारचे वर्तमान तों आज राजश्री माहादाजी नाईक निंबालकर व पिराजी नाईक निंबालकर याणीं प्राथकालपासी तीन च्यारसे मानसे घेऊन सदरेस बसले आहेत. राजश्रीनी हा कालपरियेंत भोजन केले नाहीं. त्यासी राजश्री सिधंभटजीस व राजश्री बुरानजी बावास बोलाऊन सांगितले कीं राजश्री रघोजीबावास जाऊन सांगणें कीं या उभयेतास ताकीद करून उठऊन देणे. त्यासी बुरानजीबावानी आपला कारकून राा बावाकड पाठविला. त्यासी बावानी साफ जाब दिला कीं आपल्या (ला) खोल्या पाणियांत सिरणे नाही आणि ते आमच्यानी उठनार नाही. आपण त्याला समजावयासी गेलो आणि ते समजले तर उतम आहे. नाहीतर हकनाहक इरेस पडावे यांत जीव नाहीं. व राानी सेखमिराकडील व आणिक पठान लोक आणून देव्हडीवर बसविले आहेत व येशवंतराव पोत्रनीस तमाम मावले लोक व आणिक कितेक जमाव गोला करितात, वरचेवर देव्हडीकड पाठऊन देतात. आजकाल पंच्यायेत्नामधे येशवंतराव बहुतसे पेश आहेत व काल राजश्रीनी राजश्री गोविंदराव चिटनिवीस यांजकडे साहेबी किले देविले होते. त्या किल्यांची हकीकत पहिलेहि विनतीपत्र सेवसी लिहिले होते कीं हातरोखे फाडून टाकले आणि काल येसे केले कीं पहिले ज्याचे किले होते त्याला राजश्रीनी बोलाऊन च्यार हजार रुपये नजर घेऊन फिरून त्यांच्या हवाला केले. त्यासी राजश्री गोविदरावजी बहुतसे श्रमी होऊन दरबारीहून आले आणि दरबारासहि बहुतसे जात नाहींत, येसे वर्तमान आहे. व राजश्री बाबूजी नाईक आज प्राथकालीकडे येथून कोट जवल आहे तेथे गेले आहेत व राजश्री रघोजीबावानी राजश्री गोविंदराव यासी व राजश्री

रामाजीपंत आपास बोलाऊ पाठविले कीं तुमचे शहरात येसा जारा (राजा?) नाचतो तर आम्हास सत्वर आज्ञा देवणे. त्यासी रा॥ प्रतिनि(धि) व रा॥ येशवंतराव व दरयाबाईकडील कारकून येसे येकत्र जाले होते ते बोलले कीं श्रीमंत राजश्री पंतप्रधानेया राजश्री रघोजी भोसले यांचे काम काले पांढरे करून दिल्हे, हे काही जया जात (?) नाही आणि हे रघोजी बावाहि काये त्या कामावर भुलले आहेत. त्या गोष्ट याणी यैकिल्या. त्याजवर जाब दिल्हा कीं, त्यानी काले पांढरे जें करून दिल्हे तेच आम्हास प्रमाण आहे, आम्ही दुसरा विचार करीत नाहीं. मग कोन्हाच्या चितास काये येईल तो सुखरूप यो. त्या गोष्टीवरून तर निरोपाचे आधिकच छंद धरला आहे की आम्हास निरोप द्यावा. येथील वर्तमान याप्रकारचे आहे. जे सेवकास कलले ते विनती सेवेसी लिहिले आहे. व राजश्री जाणोजी भोसले यांच्या लग्नाचे राहिलेसे सहश्रप्रकारे दिसते; आणि होईल याह प्रकारे ज्यानी रुपये द्यावे त्यानी परिश्विन घालून बसले. त्यासी बनसीपुरी मंहत याणी रा॥ बावास सांगून पाठविले कीं तुझ्या पुत्राचे लग्न राहू न देणे. लग्नाकारणे जो पैसा व सामोग्री जे लागले ते घेऊन जाणे आणि लग्न करणे. हाहि येक विचार जाला आहे. मग पाहावे. जैसे होईल तैसे वरचेवर लिहून पाठऊन देऊ. बहुत काये लिहिणे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶Vyankatrao Moreshwar to Peshwa from Satara, reporting the conversations and plans of Ramraja, Raghuji Bhosle, Pratinidhi and others.

No. 27] *[29-4-1750*

श्री

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसावी यांसी

शिक्का.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रेा॥ रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशाललेखन करीत आसिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले प्रविष्ट होउन लिहिला अभिप्राय कळों आला लिहिले की सातारियाहून निघालों ते लोणदास आलो. तेथून मोरेश्वरावरून श्री जेजुरीहून पुणियास दाखल जाहलो म्हणोन लिहिले व चिरंजीव राजश्री जानोजी भोसले यांचे लग्नाची योजणा कधी आहे ते लिहावी म्हणोन लिहिले यैसियासी लग्ननिश्चय वैशाख शुध अष्टमीस केला आहे. आपणास

कलावें म्हणोन लिहिलें असें वरकड वर्तमान राजश्री वेकटराव मोरेश्वर लिहितील त्यावरून कळों येईल रा छ ३ जमादिलाखर सुज्ञाप्रति विशेस काये लिहिणें लोभ असू देणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle to the Peshwa giving the actual day on which Janoji's marriage was fixed.*

No. 28] *[29-4-1750*

श्रीशंकर.

सेवेसी आज्ञाधारक व्यकंटराऊ मोरेश्वर कुतानेक साा नमस्कार. विनंती विज्ञापना यैसी जे. येथील वर्तमान ताा. वैशाख सुद ५ पचमी रविवार त्रितीये प्रहर साहेबाचे कृपाअवलोकनेकरुन येथास्थित असे. विशष येथील वर्तमान तर राजश्रीनी पुण्यासी यावयासी डेरे दांडे लाऊन आज पुढे सिरालास पुढे वाटे लावले. उदईक सोमवारी प्राथकाली श्वार होऊन सिरालास जाणार यैसे वर्तमान आहे. तमाम कारखाने लादालाद जाले अहेत. साहेबास कळावे म्हणून लिहिले आहें. व राजश्री रघोजी भोसले यांचे पुत्रास आज हलदी लागली. अष्टमीचे लग्न आहें. सविस्तर वृत जासुदा बराबर विनंतीपत्रे सेवेसी लिहून पाठवितो. त्याजवरून साहेबास विदित होईल. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa that the King has made all preparations to proceed to Poona. He further writes that the marriage of Raghuji's son is coming off on the Ashtami (Vaishakh 2-5-1750.)*

No. 29] *[29-4-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक साा नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे येथील वर्तमान ताा वैशाख सुद ५ पचमी दीड प्रहर रात्र परियेत साहेबाचे कृपेंकरू येथास्तीत असो. येसियासी राजश्रीनी आपणासमागमे उदाजी चव्हान व पिराजी नाईक निंबालकर व संभुसिंग जाधवराव वगैरे समागमे घेऊन व रा बाबुजी नाईक यासीहि सांगून पाठविले आहे की तुम्ही पुणियासी येणे.

त्यासी यांच्या जाण्याची गडबड ज्या समई जाली त्या समई राजश्री रघोजी बावानी आपणास बोलाऊन सांगितलें कीं राजश्री पुणियासी जातात तर तुम्ही रा॥ रामाजी पंतास व रा॥ गोविंदराव यासी जाऊन सांगून आमच्या रवानगीची तजवीज करणे. त्यासी आम्ही व राजश्री सिदभटजी यैसे उभयेतां त्याजकडे जाऊन त्यांला वर्तमान सांगून त्याणी सांगितले कीं आज तुम्हास वस्त्रे देवितो. तुम्ही तयार असणें. मग बावांस येऊन वर्तमान सांगितलें. मग आऊसाहेब बावाच्या हवेलीस आली होती. मग राजश्री जाणोजी भोसले यासी हलद लागली. मग बावानीं आऊसाहेबास व अहिल्याबाईस वस्त्रे दिल्ही व येक हती आऊसोहवास नजर केला व त्यांजकडील जितकी विप्र मंडली होती त्यासी वस्त्रे दिल्ही. मग आऊसाहेब आपल्या माहालास गेली आणि राजश्रीनी रघोजी बावांस बोलाऊ पाठविले कीं तुम्ही सत्वर येणे. त्यासी हे तयार होऊन समागमें पुत्र बिंबाजी भोसले व रघोजी कराडे व त्रिंबकजी भोसले व माहादाजी भोसले व महमदखान रोहीला व कासीराव भास्कर व गिरमाजी खंडेराव वगैरे कारकून मंडली कोनेरपंत व विसाजी गोविंद व विसाजी वैद्य व सिदभटजी वगैरे तीसेक असामी वस्त्रे घ्यावयासी गेली. मग राजश्रीनी रघोजी बावास व याच्या पुत्रास व त्रिंबकजी भोसले यासी व बुऱ्हानजी मोहिते यांसी चवघाजनास बादली पोशाख दिल्हा; व वरकडास सेले तिवटे यैसी दिल्ही; व येक हती घ्यावयासी आनला आहे व येक घोडा यैसे करार जाला. हती व घोडा प्राथकाली घ्यावा यैसे वर्तमान आहे व राजश्री येशवतराव रघोजी बावासी बरी धर्ज[1] लाविली आहे कीं याणी येंदा आम्हाखेरीज कामकाज केले तर काये चिंता आहे हे याणी हा घाट घाटला आहे. हा सेवटास कैसा जातो हे पाहतों यैसे बोलला. त्यासी बावानी त्यांस जाब दिल्हा कीं आम्हास आपलें जे उत्तम दिसले ते आम्ही केले. आम्ही काही कोन्हाच्या भरवसियावर नाहीं. पुढें जे बरे दिसेल तेंच करून. त्याजवरून बहुतसे जड गेले आहे आणि येथे जे कोन्हे ग्रहस्त आहेत तितके रघोजी बावास सुबुध्य सांगावयासी आसल (आलस ?) करित नाहींत. परंतु हच त्याला सागतो की ह्या गोष्टी पुण्हा मागतेणे न सांगणे कीं पहिले आम्ही ज्याचे बले त्यासी वाईट होत होतो तो आमचा मेढा गेला. आता माहाराजाचे जागा श्रीमंत आहे. आम्हास काहीं दुसरा विचार नाही यैसे सर्व सांगतात. त्याजवरून खटे होऊन उगेच बसतात. साहेबी रा॥ बावांस व त्रिंबकजी भोसले व बुऱ्हानजी बावास लग्नपत्रिका पाठविल्या. त्यासी येथून रा॥ सिदभटजीस साहेबाकडे रवाना समागमे आहेर देऊन पाठवितात. आम्हास

---

१ नेट.

म्हणतात कीं तुम्ही आहेराबाार समागमे जाणे आणि मागतीन भटजीबाार फिरोन येणे. त्यास साहेबांची आज्ञा होईल तर आहेराबाा येऊं. नाही तर आपण काही येणार नाही. ज्या प्रमाणे आज्ञा करावयाची असिली ते कृपा करून डाकेबाार आज्ञा पाठविली पाहिजे. त्याजप्राा वर्तनुक करु. आम्ही तर त्याला सांगितले कीं आम्हास खावंदाची आज्ञा नाही. तेथू (न) आज्ञा आलियावर मग जावयाचे आसल तर जाऊ व राा रघोजी बावाहि येथून कूच करून दसमी इतके येथून कूच करणार आहेत. साहेबास कलावे म्हणून लिहिले आसे व राजश्रीनी तीन मुकाम नेमले आहेत कीं तिसरे दिवशी बुधवारी पुणियासी जावे. उदईक वेलदाचा मुकाम आहे. मगलवारी मधे राहावे; आणि बुधवारी पुणियासी यावे. व आऊसाहेबाचा व राजश्रीचा कजिया बहूत जाला कीं राजश्री म्हणत मी जातो आणि आऊसाहेब म्हणतात की आम्ही जातो; यैसे एक प्रहरभर बोली होत होती. मग राजश्री म्हणाले की आपण जातोत; मग चितास येईल ते करणे. यैसे वर्तमान आहे. साहेबास कलावें म्हणून लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar writes to Poona of news from Satara. He says Ramraja is preparing to leave for Poona. A farewell ceremony was held between him and Raghuji Bhonsle. Every attempt is made to incite him against the Peshwa. But R. is in no mood to oppose the Peshwa's claims and has acquiesced in the situation.*

No. 30] [*29-4-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यकंटराऊ मोरेश्वर कृतानेक साा नमस्कार विनंती प्रार्थना यैसी जे येथील वर्तमान ताा वैशाख सुद ५ पचमी रविवार प्रथम प्रहर पावतो साहेबांचे कृपा अवलोकने करुन येथास्थित आसो. यैसियासी आज राजश्रीनी गोविंदराव चिटनीस व रामाजीपंत व येशवंतराव व पायेदल माणसे दोनेकसे घेऊन सतरुसी परवतावर श्रीमंगलाईच्या दरशनास गेले. त्यास गडकरी याणी राजश्री व आणिक वीस आसामी वरती घेतली. बाकी जितके लोक गेले होते तितके बाहेर राहिले. व गडकरी यासी द्यावयासी राजश्रीनी तिवटे ५० व सेले ऐसे नेले आहेत. राजश्री गडावर आलियावर गडकरी याणी तोफा सोडल्या. आगोधर दरवाजियाच्या वरलाकडल्या बुरुजावरील तोफ व त्याज आलिकडल यैस्या दोन तोफा इकडील व श्रीमंगलाईच्या बुरजाकडील तोफ यैस्या तीन तोफा सोडल्या आहेत. अद्याप खाले उतरले नाहीत.

व कालचे वर्तमान जें आडलले ते वरचेवर बातमी जासुदाबराबर पाठविली आहे. ते साहेबास कागद पावते होतील. त्याजमधे साकल्य लिहिले आहे, व काल आस्तमानी पिराजी नाईक निंबालकर याणी राजश्रीला आडविले होते. त्यासी त्यांला गोविंदराव व रामाजी पंत व येशवंतराव या त्रिवर्गानी समजाविले कीं आज आपण जावे. उदईक तुमची समजाविसी करु; तर कोन्हे गोष्टीची चिंता नाही. तुम्ही उठोन जाणे. मग पिराजी नाईक निंबालकर समस्त मंडली घेऊन आपल्या डेरियासी गेला व उदाजी चव्हानहि कूच करुन जात होता, यैसे वर्तमान आहे. हे पत्र संकलित लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये. हा कागद डाकने जलदीने पावल म्हणून हे वर्तमान लिहिले आहे. बहुत काये लिहिणे हे विज्ञाति.

¶*Vyankatrao Moreshwar writes that the King has entered the fort of Satara. The King was obstructed by Piraji Naik Nimbalker who was afterwards pacified by the intercession of Govindrao, Ramajipant and Yeshwantrao.*

No. 31] [*30-4-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना यैसी जे, येथील वर्तमान तागा. वैशाख सुध ६ शष्टी प्रहर दिवसपरीयेंत येथास्थित आसो. यैसियासी येथील वर्तमान तर राजश्रीनी प्रातिनिधीच्या घरी चौकी बसविली. से दिडसे माणूस बसविले आहे की बोर पुसल्याखेरीज हे किन्हीस गेले आहेत. अद्यापि तेथून आले नाहीत; व येमाजीपंताची माणसे जे येथे होते तें किल्यावर घातली. बहुत रागांत आहेत व रा रघोजीबावास सिरपाव रात्री दिल्हा. वरकड सिरपावाचा तपसील पहिले विनंतीपत्र लिहिले आहे, त्याहून विशष पदक १ व जडावाची कलगी यैसी दोन अधिक सनगे दिल्ही; व अडीच प्रहर रात्री आपल्या घरास आले, आणि यासीहि राजश्रीनी सांगितले कीं तुम्हीहि पुणियासी येणे. काये बोलणे चालणे ते तेथे बोलू व रात्री रघोजीबावा व येशवंतराव व गोविंदराव व रामाजीपंत यैसे येकांती खलबत बात करी(त) होते. मग काये जाले हे न कले. जें वर्तमान ऐकिल्यांत येईल ते वरचेवर विनंतीपत्र सेवेसी लिहित जाऊ. बहुत काय लिहिणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

---

१ परवानगी.

राजश्री आज भोजनउतर कूच करणार. तमाम लोक वाहेर येऊन तयार होऊन उभे राहिले आहेत. दो चौ घटकात कूच होईल. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar reports to the Peshwa that guards are being kept over Pratinidhi's residence and robes of honour have been bestowed on Raghuji by the King.*

No. 32] [*After 21-4-1750*

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. किले सातारियाचा विचार तर रा गोपाळबा नित्य आम्हाकडे येतच आहेत. स्वामीनी ऊर्जिताचें अभये दिल्हान रूपरांत अद्यापि काही होऊन येत नाहीं यास्तव मात्र श्रमी होतात. वरकड अंतरंग पाहातां स्वामीच्या पायांसी आरंभापासून जे निष्ठा आहे तीच आहे. त्यांत अंतर किमपि नाहीं. ये गोष्टीचे निदर्शन राजश्री नाना येथे असतां पर्वतावर येक ग्रहस्त आपला विस्वासू पाठऊन शोध आणिलाच होता. पोटासाठी मात्र हाका मारितात. त्यांस आम्ही जाबसाल करितच आहों. 'तुम्हीं काहीं चिंता न करणे. श्रीमंतास तुमचें अगत्य सर्वांपेक्षां बहूत आहे. वरकड बंदोबस्त होतां. आधीं तुमचा कारभार करून देतील. बेफिकीर असणे' असें बोलतच आहों. राजश्री स्वामीची स्वारी तेथें आली तर गडकरीहि सेवेसी येतीलच. मुख्यार्थ स्वामीच्या पायासी दुसरा अर्थ नाहीं. विदित जालें पाहिजे सेवसी शृत होये हे विज्ञापना.

¶*The writer intimates to the Peshwa from Satara that Ramraja was fully in accord with the Peshwa's policy. Gopalrao is the agent of the Pratinidhi.*

No. 33] [*May 1750*

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. राजश्री गोविंदराव, येशवंतराव येथे आले नव्हते तेव्हा लोक पोटापाण्याचा अर्ज करीत. तेव्हा लोकास राजश्री जाबसाल करीत कीं गोविंदराव, येशवंतराव आलियावरी पोटास देवितो. त्याउपरी उभयेता येथे आलियानंतर लोक अर्ज करू लागले. त्यास आणखी उतर करू लागले की श्रीमंत राजश्री पंतप्रधान व देवराव आलियावरी तुमची खर्चावेचाची बेगमी करून देवितो. यैसे जे कोण्ही अर्ज करितात त्यास बतावणी याप्रमाणे बोलतात. खरें दुसरेच. म्हणून श्रीमंत मातुश्रीचे भेटीस सिवापुरास आले आहेत. ते इकडे

सत्वरीच येतील आणि तुमचा निकाल करून देवितो यैसे धातुपोषणार्थ लोकांसी जाबसाल करितात. दुसरी गोष्ट काल राजश्री येशवंतराव याजपासी बोलले कीं, राजश्री पंतप्रधान यांजकडील दरमाहाचा यैवज राहिला आहे, येत नाही, म्हणून बोलतां. तरी श्रीमंताकडील यैवज उचापत मोघम सवा लक्ष दीड लक्ष खर्च उगवला असतां यैवज दरमाहाचा दिल्हा नाही यैसे काये नि(मि)त्य म्हणत होतां म्हणून येशवतरायासी भाषण केलें. रा चितामण थोरात याजला राजश्री बोलले कीं तुम्ही पंचविसा हजाराचा सरंजाम खाता, यैवज काये करितां? तरी सदरहू पंचवीस हजार रुपये सरकारात देणें. तुम्हास जातीने येक हजार रुपये खर्चास देत जाऊ. वाकी काही देणार नाही, याप्रमाणे बोलले. + सेवेसी श्रृ[त] होय हे विज्ञापना. [हस्ताक्षर रामाजीपंत].

¶*Ramraja tries to obtain money.*

No. 34] [*13-5-1750*

श्री

राजश्री सदासिवपंत गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. राजश्री पंत प्रधान यांणी लग्नाचा अहेर वस्त्रे राजश्री नरसिंगराव विठल यांसमागमे पाठविली ते पातलियाउपरी आम्ही कराराप्रमाणें सत्वरीच येतो. आपणास कलावे म्हणोन लिहिले असें. रा छ १७ माहे जमादिलाखर आम्हीहि सत्वरीच येतो. विशेस काये लिहिणे? लोभ असू दिजे हे विनंती.

रावोजीचा शिक्का.

मोर्तब सुद.

¶*Raghuji Bhonsle to Sadashivrao acknowledging the receipt of the wedding dress sent to him by the Peshwa.*

No. 35] [*June 1750*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री भाऊ साहेबाचे सेवेसी.

आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विन्नापना यैसी जे. आपणास राजश्री रघोजी भोसले यांजकडे रवाना केले तेव्हा पाच जोडी जासुदाच्या समागमे साहेबी दिल्हे. त्यासी चऊ जोडी याणी वरचेवर * मीस येत गेले. त्यासा रोजमरा पावता केला आणि आम्ही आपणाजवल त्रिंबकजी लांघ्या व जानजी यैसे दोघेजन ठेऊन घेतले होते. त्रिंबकजी लांघ्या बहूत शाहणे माणूस म्हणून आपणाजवल ठेवला होता. त्यासी या दोघाजनास रोजमरा पावला नाही. जाते समई च्यार रोजमरे साहेबी दिल्हे तेच पावले. पुढे काही पावले नाही. तर त्रिंबकजी व जानजी याच्या रोजमरियाची आज्ञा द्यावयाची केली पाहिजे. आपण कर्जे याला काहडून दिल्हे आहे तर यांच्या रोजमरियाची आज्ञा केली पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विन्नाति.

ताजा कलम रा॥ येमाजीपंत यांची आनावयाची बहुतसी आवई आहे. सेवेसी श्रुत होये हे विन्नाति.

¶Vyankatrao Moreshwar requests Bhausaheb to pay two messengers their wages.

No. 36] [*June 1750*

नकल.

श्री

राजमान्य राजश्री बालाजी पंडित प्रधान यासी आज्ञा केली यैशीजे. किले सिंहगड तुम्हास द्यावयाचा करार स्वामीनी केला आणि सनदहि सादर जाहाली आहे. त्यास अलिकडे किला स्वाधीन व्हावयांसी दिवसगत लागली याजमुळे तुमचे चितात अन्यभाव भासला म्हणून विदित जाहाले. यैसियासी स्वामीनी तुम्हासी करार केल्यावरी दुसरा आहे की काये. हे गोस्ट सहसा घडणार नाही. किला तुमचे स्वाधीन करणे म्हणून राजश्री चिमणाजी पंडित सचिव यास किले मजकूरकरास आज्ञापत्र सादर केली आहेत. किला आपले स्वाधीन करून घेणे. स्वामीची सर्व इमारत तुम्हावरी आहे. तुम्ही दुसरा विचार चिंती न आणणे. आपले समाधान असो देणे. मातुश्री आईसाहेब यास जाऊन बहुत दिवस जाहाले त्यास विनंती करून सत्वर येत ते गोस्ट करणे. सूज्ञ असां.

¶Ramraja to Peshwa Balajirao, agreeing to hand over Sinhgad to the addressee.

No. 37] *[June 1750?*

श्री.

पुा॥ सेवेसी विज्ञापना. राजश्री बोलिले कीं राजश्री संभाजी माहाराज याजकडे पनाला आहे: तो आपणास पाहिजे ऐसे पत्र राजश्री संभाजी माहाराजास लिहिणार. आपणास फार जाचणूक केली आहे ती बोलता न ये. राजश्री रघुनाथपंत दादा व राजश्री नाना व राजश्री गोविंदराऊ व राजश्री येसवंतराव हे अद्याप येत नाहीं म्हणऊन नित्य स्मरण करीत असतात. राजश्रीनी आज्ञा केली कीं वाघाची गाडी अद्याप का येत नाहीं? रथाच्या घोडियास रतीब काये आहे व रथाचे चाकरास रोजमुरा दरमाहे काये आहें व कुचाचे दिवसीं रतीब काये व मुकामीचा रतीब काये आहें व चंदी घोडेची काये आहें ती लिहून पाठवणार स्वामी समर्थ आहेत. सेवसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare's clerk to Peshwa, informing the latter that Ramraja has asked Sambhaji of Kolhapur to hand over the fort of Panhala to him.*

No. 38] *[June 1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यकंटराऊ मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती विज्ञापना यैसीजे. माहाराजानी रा॥ रघोजीबावास पत्र पाठविले ते त्यांजला प्रविष्ट केले. त्याणी सांगीतले कीं राजश्री त्रिंबकजी बावा भोसले गेले आहेत, त्याचे उत्तर आलियावर ज्याप्रमाणे पत्र येईल त्याजप्रा॥ भेटीस जावयाचे केले जाईल. व रा. बावास कोन्हे ग्रहस्तानी तीन पत्रे रात्री पाठविली कीं श्रीमंत राजश्री पंत प्रधान यांची स्वारी तुम्हावर छयापा घालावयासी येतात; तर पत्रदरशनी तुम्ही फौज तयार करून बंदोबस्तीत राहणे. यैसी तीन पत्रे आली. येक दोन प्रहर रात्री व येक अडीच प्रहर रात्री व येक तिसरा प्रहर यैसे तीन पत्रे आली. ते बजिनस आम्हास दाखविली. वरकड वर्तमान रा. माधवराऊजीनी सेवेसी लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa that secret warnings have been received by Raghuji Bhonsle to prepare himself against a sudden attack from the addressee.*

No. 39] [3-6-1750

श्री

तीर्थरूप राजश्री नाना तथा राजश्री
भाऊ स्वामीचे सेवेसी.

आपले त्रिंबक सदसिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान तागायेत छ ९ रजब पावतो स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशास. दरमाहाच्या खर्चास यैवज स्वामीनी तीस हजार रुपये पाठविले, त्याचा खर्च जाहला. पुढे जेष्ठ मासचे नेमणुकेस तूर्त यैवज पाहिजे. तिसा हजारापैकी पोतास यैवज राहिला नाही. वरचेवर स्वामीची सिलेदाराच्या वरांताची व मातुश्री आईसाहेब वगैरे देणे याची रवासुदगी होती व दरमाहाचा खर्चास यैवज नाही. तरी तूर्त यैवज रवाना करावयासी स्वामी खावंद असेत. मागाहून जेष्ठमासची नेमणूक लेहून सेवेसी पाठवितो. इमारतीस व स्वारी मजकूरच्या खर्च व आईसाहेबाची बाकी राहिली त्यास यैवज द्यावयासी नाही. पोतास तो हजार दोन हजार रुपये राहिले. तरी तूर्त रवानगी यैवजाची करावी. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Trimbak Sadashiv Purandare asks the Peshwa from Satara for funds to meet the expenses of Ramraja.*

No. 40] [4-6-1750

पो. छ १२ रजब.

श्री

तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी. अपत्यें त्रिंबक सदासिव कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता. छ १० रजब मंगलवार मध्यरात्र जाणून स्वकीय कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. दरबारचे मजकुराचे अर्थ आलाहिदा पुरवण्या वरून विदित होतील. अतःपर येथें काही बाकी राहिली नाही. स्वामीनी याची पैरवी करणे असेल तसी करावी. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Trimbak Sadashiv Purandare communicates to the Peshwa that matters have come to a head at Satara.*

---

१ वरात – हुण्डी. २ रवासुदगी = पावती ;

३ व्यवस्था; विचार.

No. 41] *[6-6-1750*

श्री

+तीर्थरूप राजश्री दादा स्वामीचे सेवेसी.

आपलें त्रिंवक सदासिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा. छ १२ रजब पावेतो स्वामीच्या कृपे करून येथास्थित असे विशेष. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले ते पावोन बहुत संतोष जाहला. याच प्रकारे निरंतर पत्र पाठ-ऊन सांभाल करणार स्वाम समर्थ आहेत. मल्हारबास अणावयासी सुभेदार पाठविले होतं. मल्हारबानी जयापाची आट धरली. जयापा तर येतच नाहीत. ताराबाईचा गुंता उरकालियावर तिकडे जावयाचा विचार आहे. बाबाचे मनात जावयाचे नाही म्हणून लिहिले. यैश्यास जयापा मल्हारबा आपली कांबू[1] केल्या खेरीज काही यैकत नाहीत. त्यानी पुर्तें वजन घातले आहे. कसे होईल ते हो. येथील मजकूर तर राजश्री, ताराबाईस अणावयासी येत नाहीत. समजाविसी करीत नाहीत. सिंहीगड न द्यावा म्हणून राजे सचिवास व सिंहीगडकऱ्यास वरच्यावर लिहित असतात. राजश्रीची बुधी सुधी नाहीं. सर्व तीर्थरूपानी केला कारभार मोडतात. ज्याचे आगत्य तीर्थरूपास तितके दुसमान राजश्री जाणतात. याप्रो माार आहे. येमाजीपंताची मुले मनुष्ये सातारियावर आहेत. तूर्त काही उपद्रव नाही. येमाजीपंतानी मिरज प्रांती धामधुम मांडली आहें. गुरे वळून नेतात. बाबदेभट येथे आणले आहेत. अतःपर काये होईल ते पाहावे. बाबदेभट बाहेर घातले होते ते पुन्हा आणले आहेत, उदाजी चव्हाणास निरोपाची वस्त्रे जाहाली. एका दो रोजा जातील. रघोजीबाबाही दो चौ रोजानी निरोप घेणार. होईल वर्तमान वरच्यावर लिहीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶A letter disclosing Ramraja's intrigues with Yamaji Shivdev against the Peshwa. Malhar Rao Holkar and Jayappa Shinde were displeased with him.

No. 42] *[6-6-1750*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना ताा

राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. आजी भृगुवारी राजश्री उदाजी चव्हाण यांस राजश्रीची आज्ञा देवावयास्तव राजश्री गोविंदराव व रामाजीपंत[2] यांस दरबारास पाठविले.

+ नाना पुरंदऱ्याचें रघुनाथरावास पत्र. १ संधि साधणें, डाव साधणें.

२ पोतनीस, पुरंदऱ्यांचे पोतनिसीचा कारभार करणारा. याचा मुलगा व्यंकाजीराम, देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण, रा. वडगांव, सं. भोर.

उदवास तरवार व आंगावरील सेला देवऊन निरोप दिल्हा. तदनंतर राजश्री स्वामी उभयेतांस बोलिले कीं, नानास उदईक दरबारास घेऊन या आणि राजश्री संभूसिंग व पिराजी नाईक व पानगांवकर व जिवराव सिंदे वगैरे यांस राजश्री प्रधानपंतानी ज्याप्रो सरंजामाच्या यादी पहिलें करार केल्या आहेत त्याप्रो हातरोखे घेऊन कारभार विल्हे लावा. वरकडहि कारभाराविषईं तुम्हांखेरीज आपण नाहीं. तुम्ही कराल त्यांत मी आहे. दरबारास येऊन सर्व कारभार करीत जावा. दर्याबाई व बाबाजी जाधव आदिकरून पुण्यास यादी करार जाल्याप्रो हातरोखे घेऊन ज्यांचे त्यांस देणे. आम्हाकडे अतःपर गुंता नाहीं असें बहूत बहूत नरम येऊन बोलले. मग उभयेता उठोन येऊं लागले; तो राजश्री संभूसिंग जाधवराव, यांस पायेऱ्याजवल भेटले. उभयेतानी संभूसिंगास सांगून आले. तुम्ही राजश्रीच्या मुजरियास जातां. तुम्हांसी राजश्री प्रसंगानसार बोलेले तर समर्पक जाबसाल करावें, म्हणून बोलून आले. त्याजवरी जाधवराव यांचे राजश्रीचे दर्शन जालियावर राजश्रीनी त्याजवल कारभाराचे मजकुराचे उल्हाणे[1] दिल्हें कीं, कारभार करा म्हणत असतां कोणी रुसतांत, कोणी घरीं बसतात. राजश्री नानानी केल्या करारप्रो कारभार करून विल्हे लावा म्हणत असतां येत नाहींत. मीं तर नावाकीफ, यैसे बोलिले. त्याजवरी जाधवराव बोलले आम्ही येक दर्याबाईच्या मजकुरास मात्र वाकीफ आहों, वरकड दुसरे कारभारास वाकीफ नाहीं जे, तुम्हांसी जाबसाल करावा. वाकीफ जालियावर उतर प्रत्योतर करूं. त्याजवरी राजश्री बोलिले आतां रात्र जाली प्रातःकाली यावे. दोन गोष्टी बोलणे आहेत म्हणून बोलून डेरियास जावयास निरोप दिल्हा. राजश्रीचा भाव सांप्रत या येका दों दिवसांत दिसोन येतो कीं, स्वामीचे लक्ष धरून सर्व कारभार करावा असे आहे. परंतु शास्वतबुधी नाही. क्षणभंगूर विचार आहे. कारभारास बोलावितात. जावे न जावें, स्वामीचे लक्ष धरून कारभार करूं लागल्यास करावा न करावा, ती काये आज्ञा ते लिहिली पाहिजे. सांरांष[+] दर्याबाईला नवा सरंजाम द्यावयाचा आहे तो आधी द्यावा म्हणजे जाहाले. हा मतलब आहे. याचा पुर्ता विचार करून ल्याहावे, त्याप्रमाणे करू. संभूसिंग दोनदा आमच्या घरास आले होते. बोलावयाचे रीतीने आम्ही व रांऊ[2] माारनिलेसी बोलोन निरोप दिल्हा. कलले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Ramraja accepts the policy dictated by the Peshwa. But Purandare writes that he cannot be relied upon on account of his unsteady temperament.*

---

१ तक्रार सांगणें. + पत्र नाना पुरंदऱ्याचें. २ गोविंदराव चिटणीस ?

No. 43] *[June 1750*

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. काल राजश्री फतेसिंग बावाकडील मजकूर लिहिला. त्यास रा शामरायानी सागितला त्यावरून लिहिला. परंतु भगवंत नाईक पुरंदरे राजश्री गोविदराव व रा येसवंतराव याचे घरास जाऊन खलबत करितात. त्यास मातुश्री दर्याबाई फतेसिंग बावाचे घरास गेली होती. तेव्हां भाषण जाले कीं राजश्री कांहीं नजर द्यावी व दर्याबाईसहि आशा दाखविली. त्यावरून दर्याबाईनी उतर केले की राजश्री पंतप्रधान यानी केले आहे ते कांही मोडवत नाही. परंतु राजश्रीस पुसोन पाहातों, त्यासारिखे तुम्हांसी बोलोन उतर करूं. व येशवंत रायानीहि फतेसिगबावाचे कारभाराविसी कान पाडिले आहेत. राजश्रीची मर्जीचा प्रसंग असा आहे कीं स्वामीनी जो कारभार केला आहे, त्यामध्ये आपले कार्यायोग्य उतम आहे तो करारच कार्याचाच आहे. जो कार्यायोग्य राजश्रीचे मर्जीचा नाहीं तो काही ध्या(ना) स येत नाही. त्याची घडमोड करावी यैसे दिसोन येत आहे. सांप्रत स्वामीनी केल्या कारभारांत राजश्री घनवा मंत्री यांची दोन खेडी खरांडे व सेनगाव दूर करून खासगीस ठेविली. याजमुले मंत्री खटे जाले आहेत व राजश्री महिपंतराव सुमंत याचे कारभाराविसीं त्याजकडील लिहिणाराचे कानूकायदे राखितात आणि डोलहि राजश्रीचा मुनसीकडेच आहे. सुमंताकडे कांहीं ममता दिसत नाहीं व भा(व)गर्भ यैसा दिसोन आला कीं मुनसीनी व गोपाळ नारायेण यानी राजश्रीस नजरेचा आशये दाखऊन बोलले असतील कीं आम्हीं साहेबांचे गरीब चाकर, येकनिष्ट सेवक, आणि ते आहेत ते राजश्री पंत-प्रधान याचे मायेममतेचे आहेत. त्यास श्रीमताचा आश्रये आहे. आम्ही निखालसपणे स्वामीसेवा करितो. येणेप्रमाणे राजश्रीपासी येकांती नारोजीचे विद्यमाने बोलत असतात व काही नजरेचा विचार त्यानी नारोजीचेच विद्यमाने करणे तो करितात. व राजश्री विष्णुपंताकडील कारभार रा माहादजी सालोखी यानी राजश्रीस सात हजार रुपये नजर करार केले होते. त्यापैकी तीन हजार तूर्त रोख घेतले. त्यास शामराव बोलले कीं राजश्रीस अर्ज केला कीं राजश्री पंतप्रधान यानीं केले आहे त्याप्रमाणें विष्णुपंताचा कारभार चालवावा. त्यास राजश्रीनी उतर केले कीं दिवाणजीने माहादजी सालोखी व संतु खेडकर याचे अनुमते करणे ते करावे. यांजखेरीज तिलतुल्य कारभार करू नये व सिवाजी हरी यास कायें पावत होते व गावखेडे काये आहेत त्याची यादी लेहून देणे म्हणून राजश्री बोलले. त्यावरून रा रामाजीपंतानी सिवाजीपंताचा आर्वजा[1]

---

१ हिशेबी वही.

आणून दाखविला. येणेप्रमाणे मौजे चिंचणी निमे व बेदरी निमे पुनवडी १ येक व जमीन काडोली पैकी बिघे ८२२ व आपासिंगेपैकी पावचावर येणेप्रमाणे याद दाखविली. यावरी राजश्री यादीवरी करार करून दिल्ही व सोनई सिवाजीपंताकडे होती ते खासगीकडे ठेविली. याजकरितां शामराव व रामाजीपंत राजश्रीस अर्ज करितात कीं सोनई गाव. आपला पूर्वीचा आहे तो पूर्ववतप्रमाणे द्यावे व वतनी गाव तांबवे आहे तेहि करार करून द्यावे; याखेरीज पांच हजार रूपये तैनात व पालखीचे बेगमीचे नवसे रुपये यैसे करार करून द्यावे, यैसी मर्जी दिसत आहे. येविसीं राजश्रीस नजर काहीं दाहा हजार पर्यंत रामाजीपंती कबूल केली आहे, यैसी वदंता आहे. व वरचेवरी किल्याचे मजकुराविसीं सचिवपंतास सांगोन पाठवितात कीं, श्रीमंत राजश्री पंतप्रधान यास किला येकंदर न देणे व लोक बोलतात की मातुश्री आईसाहेबास गडकरी किल्यावरी येत नाहींत. त्यावरून राजश्री बोलतात कीं आम्ही पुणियास जाते समई गडावरी जाणार होतों तेव्हा आम्हासहि गडावरी न घेऊ यैसे गडकरी बोलत होते. गडकरी हरामजादे आहेत यैसे बोलले व येशवंतराव बोलले कीं मातुश्री आईसाहेबास खासा येका पालखीनसी मात्र गडावरी घेणे जालेच तरी बहूतसें प्रयासें घेऊ. दुसरे येक माणूस घेणार नाहीं, यैसे वर्तमान आहे म्हणून येशवतराव बोलले. त्यावरून राजश्रीची मर्जी गडकरियावरी खूष आहेत. गडकरियास सचिवपंत खर्चावेचास काही देत नाहीत. तरी गडकरियास खर्चावेचास देऊन त्याची बेगमी करावी यैसे बोलतात. रा॥ विसोबा वैद्यापासीं येकांती बोलतात कीं गडकरी यास तूर्त दोन तीन हजार रुपये खर्चास देणे. पुढेहि लागेल ते देऊ व हुजरातीस किरकोली पैका जमा होतो तो नारोजीकडे जमा करवितात. येशवतरायाकडे काही पोता जमा हिसेब नाहीं. परभारेच यैवज येईल तो नारोजीकडे ठेवितात व खर्चाच्या लोकांच्या देणियाच्या यादी आहेत त्यामध्यें करारदाद यैसे करितात, त्यावरून लोक खासगीचे राजश्रीस आर्ज करितात की जे काये करणे ते साहेबी करावे व घेणे तेहि साहेबी घ्यावे. आम्हापासोन नजरहि घ्यावी परंतु आमचे सुदामतप्रमाणे करावे व प्रतिनिधी कांहीं आपले कारभारांत नाहींत. गोपालराव मात्र दरबारास येऊन राजश्रीचे मर्जीमाफक कारभार करणे ते करितात. राजश्रीने जे बोलावे ते यानी होये म्हणावे. याप्रमाणे गोपालराव कारभार करितात. त्या कारभारास काही जीवसा दिसत नाहीं. हुजराती लोक व सिलेदार बारगीर अर्ज करितात कीं आम्हास पोटास रोजमुरा देत जावा. जे मागील राहिले असेल त्याचाहि हिसेब पाहोन आमचे देणे निघेल ते द्यावे. राजश्री बोलले पेसजीचे आपणास कांहीं ठावके नाही. ते आम्ही जाणत नाही. हाली मृगसालापासोन तुम्ही चाकर

आमचे. जे आम्ही करार करून द्यावे तें तुम्ही घ्यावे ह्याप्रमाणे ज्यास पुरवेल त्याणे राहावे. ज्यास न पुरवे त्याणे जावे. सेवेसी श्रुत हाये हे विज्ञापना.

¶*The writer Purandare gives a true picture of the conditions prevailing at Satara, especially the troubles that had arisen in the administration of Ramraja owing to the interference of many people.*

No. 44] [पेा *7-6-1750*

छ १३ रजब

श्री

पुा तीर्थरुप राजश्री नाना व ताा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती. राजश्री घनवा मंत्री यानी रा शामरायांसी अनुसंधान करून दर्याबाईचे घरास जाऊन राजश्री स्वामी व शामराव व आपण मिळोन आपले कारभाराविसी बोली केली कीं आपलीं गावखेडी सरंजाम जो आहे तो पूर्ववतप्रमाणे चालवावा. आपले कारभारांत किमपि तफावत करू नये. जे करार करावें ते सेवटास न्यावे. यैसे बोलोन दर्याबाईकडून शपतप्रमाण करून घेऊन राजश्रीस व दर्याबाईस नजर नजराणा कबूल करून शामरायास काही देऊन आपला कारभार गावखेडी [व]गैरे जे होते ते करून घेतले. जाला कारभार वर्तमान सेवेसी लिहिले असे. इमान प्रमाण चांगले जाहले. हे विज्ञापना.

¶*Ramraja and his sister Daryabai Nimbalkar work in league with Ghanashyam Mantri.*

No. 45] [*9-6-1750*

श्रीशंकर.

आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ताा छ १५ माहे रजबू रविवारपावेतों साहेबांचे कृपा-आवलोकनेकरून येथास्तित आसो विशेष. येथील वर्तमान तों राजश्रीनी सिंहगडाकडे दोनसे माणूस रवाना केले आणि आठ हजार रुपये व पनास जिजाला यैसे रवाना केले आहेत. आणि गडकरी यासी हातरोखा लिहिला कीं, तुम्हास

+ पत्र पुरंदऱ्याचें. १ शामराय दर्याबाईचे तर्फेनें उद्योग क णारा एक गृहस्थ.

खर्चास वरचेवर आणिक पाठवितोंत, परंतु गड त्याचे हाती न लागे तें करणें. नाहीतर तमाम येकून येकाच्या गर्दना मारू. वकील यैसे बोलले. या कामात नारूकाका बहुतसे पडले आहेत. आणि राजश्री आवघ्या गोष्टी प्राक्तनावर घातल्या आहेत. आणि ज्याजवर त्यांजवर तोंड टाकितात. आणि भलत्यास भलतें बोलतात. मागे पुढे काही विचारीत नाहीत की, कोन मनुश कोण्या पध्दतीचे आहे, यासी काये बोलावे ? परवा राजश्री रघोजीबाबा, येशवंतराव यांच्या घरास गेले होते. त्यासी येशवंतराव बोलले कीं, बहुत दिवस दरबारास गेले नाहीत तर आज येतां कीं काये ? तेव्हा हेहि दरबारास गेले. त्याणी रघोजीबाबास म्हणाले कीं आज येथेच भोजन करणे. त्यासी भोजनास रघोजीबाबा व त्रिंबकजी-बाबा व बुऱ्हानबाबा यैसे तिवेजन राहिले. भोजन जालियाउपरी सत्वरच आले. परंतु दर्याबाई तर बहुत याजवर कुंट[1] आहेत. मग सुक्रवारी राजश्री नानांकडे रा॥ बाबा गेले होते, त्यास श्वामीनी राजश्री नानांस पत्र लिहिलें होते. ते पत्र बजिनस रघोजीबाबास दाखविले. त्यास बाबानी हस्तअक्षर विनंतीपत्र लिहिले आहे आणि रा॥ नानास वचन आनभाश दिल्ही कीं, श्रीमंत ज्याप्रो॥ आज्ञा करितील त्याजप्रो॥ आपण राजश्रीसी जाबसाल करू. आणि रा॥ रघोजीबाबानी परिश्चिन सांगितले कीं ज्या काही फितव्या फांदोड्या मधे आहेत त्यांजला शहर-बाहेर करून द्यावे. नाहीतर आम्हास आज्ञा करावी, आपण हे काम करितो. त्यास राजश्री बापूजीबाबास काल शनवारी रात्री सिव्याका(गा)ली केली. त्यासी ते घरी बसले होते. मग आज प्राथकाली राजश्री श्वारीचे मिसे बाहेर निघाले ते पालीकडे गेले. थोरातावर जातेत. तमाम लोक मागून बोलावले आहेत. त्यासी मागे राजश्री नानानी रघोजीबाबास व गोविंदराव व उदाजी चव्हान व येशवंतराव यासी बोलाऊन मसलत केली. त्यासी राजश्री नाना बोलले कीं यास काये तजवीज आहे ? तेव्हा समस्त मिळून मसलत ठराविली कीं समस्तानी जाऊन त्याजला पुढे घालून घेऊन यावे. त्यासी राजश्री नाना बोलले कीं आम्हास आज्ञा नाही. मग उदाजी चव्हान व गोविंदराव बोलले कीं, तुम्हा-वेगले ते काही परतून येणार नाहींत. त्यासी मग जरूरीस जाणे लागेल. त्यासी तेथे गेलियावर काये वर्तमान होईल तें विनंतीपत्र सेवेसी लिहिले जाईल. व उदाजी चव्हान यांचे भाऊ रतोजी चव्हान व येसाजी सिंदा मातबर माणूस आणिक येक तिवेजने सरदारासी व येमाजी सिवदेव याच्या पुतण्या त्रिंबकराऊ यासी लढाई जाली. सिंदा कामास आला आणि मातबर माणसे मेली,

---

१ कूड —Evil-minded.

यैसे वर्तमान आहे. यामुले उदाजी चव्हान बहुत आजुर्[1]दा आहेत. उदईक आज्ञा घेऊन जाणार आहेत. येविसी उदाजी चव्हान याणीहि पत्र लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये, बहुत काये लिहिणे हे विज्ञाति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa of the despatch of a contingent to Sinhagad by Ramraja with precise orders to the Killedar that the fort should not be handed over to the Peshwa. The king's departure to Pali and a skirmish between Chavan and Mutalik are other items in the letter.*

No. 46] *[10-6-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती. प्रार्थना यैसीजे ता॥ जेष्ट वद् दितीया घडी साह रात्र जाणून साहेबकृपेकरून येथास्थित आसो. विशष येथील वर्तमान समस्त मंडलीनी राजश्रीकड जावेसा निश्चये केला. त्यासी राजश्री परतले म्हणून बातमी आली. त्यासी रा॥. रघोजी-बानी राजश्री नानांस सागून पाठविले कीं राजे आले, आपण न येणे. त्याजवरून गोविंदराऊ व येशवतराव हेहि राहिले. मग रा. रघोजीबावा उरमोडीच्या वाटेने जाऊन माथ्यावर वसला. तो राजश्रीची स्वारी आली. तों राजश्री बुन्हानजी-बावा पुढें येत होते. बावांची व त्यांची भेटी जाली. मग त्यांणी साकल्य वर्तमान सांगितले कीं राजे जे समयी सिकारीस गेले ते समयी रा. गोविंदराव याचे दोघे जन कानडे प्यादे जलदीने येत होते. त्यांजला पुसले कीं तुम्हीं कोठून आलेत? त्याणी सांगितले कीं आम्ही गोविंदराव चिटनिवीस याचे चाकर आहों. किला घ्यावयासी गेलो होतो. त्यास किला घेतला. मग राजे बहुत ताई भरले. आणी सिव्यागाली करूं लागले. तेव्हां बापुजीबावा समागमीच होते त्यासीहि सिव्या दिल्हा. तेव्हां परस्परेहि सिव्याचे गौरव जाले, ते कोठवर ल्याहावे. तेव्हां बापुजीबावा पेट कटारी करून घेत होते. मग खडराव जाधव व बुन्हानजी मोहिते या उभये-तानी सांगितले कीं हे काये करितात. तेव्हां हातची कटारी हिराऊन घेतली आणि राजश्रीच्या पाया पडता पडता समजावले कीं जे आपण आज्ञा करतील त्याजप्रो वर्तनूक करतील. तेव्हां राज म्हणाले जे माझा किला याणी द्यावा. तेव्हां बापुजीबावा बोलले कीं तर आम्हास विडे द्यावे; आपण काही राहणार नाही. उदईक दिवस उगवतो आणि किल्यावर नेऊन घालतो. त्यासी त्या

---

१ अजुर्दा – दुःखी; कष्टी

किल्याचे जामीन खंडेराव जाधव व बुन्हानजी मोहिते हे दरमियान आहेत कीं उदईक किला सरकारात देवितो. स्वामीकडील बहुतसे मुख आले आहे कीं ब्राह्मण आणि परभु येक जाले आहेत. आणि तिसरा मराठे यासीहि आपल्यात सामील केले. आणि माझ्या राज्याचा खेलच केला आहे. जर मी शाहू राज्याचा लेक होईन तर यांजला तमाशा दाखऊ (अपूर्ण).

¶*The high words that passed between Ramraja and Bapuji Bawa are reported to the Peshwa by Vyankatrao Moreshwar.*

No. 47] *[12-6-1750*

छ २० रजब.

जाबसुा.

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना यैसी जे, येथील वर्तमान ताा जेष्ट वद्य ४ चतुर्थी मंगलवार दोन प्रहर-पावेतों साहेबांचे कृपे करून येथास्तित असो. विशेष राजश्री गोविंदराव व बापूजीबावा यैसे घरी बसले आहेत आणि चिटनिसीचे वडिलकीचे धणी जें मुले आहेंत ते राज्याकड पाठऊन दिल्ही. त्याणी मुले माघारी वाटे लावली कीं आम्ही ज्यास सांगो तोच कार्य करील आणि गालीप्रधानास तर कर्मा नाही आणि बापूजीबावाहि काही चुकत नाहीत. उतरास प्रतिउतर चांगले देतात आणि राजश्री सिदभटजी राजश्री बावाचे कारभारी आज तीन च्यार दिवस राजश्रीच्या आणि यांच्या मध्यस्तीत आहेत आणि आमचे दरबारचे इतबारी आहेत आणि राा रघोजीबावास म्हणतात कीं, राजा बहुत शाहणा आहे. ज्याणे काही पेशवियांचे पाये भोईस लागू दिल्हे नाहीत कीं ज्याणी या पदवीस बसविले तैसेच चिटनिसास बाहेर काहडून द्यावे हा विचार केला आहे. त्यासी त्यांच्या विचारांत आपण असावे आणि राज्याभाराचे कामकाज मनावर धरून आपण राजश्रीस मिलून करावें. त्यासी हे गोष्टी त्यांच्या तोंडातून यैकताच परिश्चिन त्रिंबकजी भोसले हेहि बसले होते याज देखतांच बोलले. त्यासी याणी जाब दिल्हा कीं ह्या गोष्टी तुम्ही बोलता इतकियावर ह्या गोष्टी मुखावाटे काहडू नका आणि आम्ही यैकणार नाही आणि याणे तुमचीहि प्रतिष्टा राहणार नाही कीं ज्या पेशवियांच्या मुळें आम्ही या पदवीस आलो आणि त्यांणी आमची आमचा सर्वेश्वर

आंगिकार केला असता त्यांची आमची क्रियाप्रमाण जाली आणि आगोदर त्याचा आमचा विरूध्य वाहडला. आता कधीहि मित्रत्व तुटत नाही मग काही हे आमचा प्राण जावो अथवा दौलत जावो परंतु आम्ही त्यांच्या पांयासी आंतर करणार नाही. तेव्हा उभेच राहिले आणि त्रिंवकजी भोसले याणी जाब दिल्हा की जें इष्टत्वे मिलवावयासी श्रम लागले ते आम्हास ठाऊक आहेत यैसे आसोन आपण मधे विश कालवावे यैसे नाही. तेव्हढे रात्री आम्हा बोलाऊन सांगितले कीं या प्रकारे वर्तमान आहे आणि आज प्राथकाली या कार्यासाठी येशवंतराव याणी बोलाऊन नेले होते. तेथे त्रिंवकजी भोसले व भटजी उभयेता गेले होते. त्याणी ह्याच गोष्टी सांगितल्या. त्रिंवकजी भोसले याणी जाब दिल्हा कीं आमची येकच गोष्ट आहे कीं पेशवे जितके पाणी पाजतील तितकें आपण पिऊ आणि ज्याप्रेाा श्रीमंत आज्ञा करतील त्याजप्रेाा आपण वर्तनूक करून; आणि दुसरियाचे आम्ही यैकनार नाही यैसे पष्ट सांगितले. त्यासी ते म्हणाले कीं आम्ही इतके दिवस आपली वस्तभा लांबविली नवती परंतु आता लांबवणे लागली. मग राजश्री रघोजीबाबाजवळ हे वर्तमान आम्हा देखता सांगितले. त्यासी आम्ही रघोजीबाबास परिश्विन सांगितले कीं भटजी दुतरफा नाहनायाचे धणी परंतु आपल तुमचे ढुंगी आहे. पोहा पोहा. (?) जाल तेच म्हणल परंतु पलिकडे नेणे कठीण आहे. त्यासी आम्हास व त्रिंवकजी भोसले यासी येकीकडने सांगितले कीं आपण श्रीमंतासी वचन दिल्हे आहे त्यासी अंतर करून तर आपणास शपत आहे आणि जे शपत वाहू ने ते वाहिली. आणि बोलले कीं आमचा प्राणहि जावे परंतु अंतर करणार नाही. यांची निष्टा स्वामीचे ठिकानी बहुतसी आहे आणि उघड उघड यांला अनुर्गह करितात परंतु यैकत नाही हे वर्तमान आहे. हा कागद कोन्हास न दाखवणे आणि आमर्यादा करुन बेआदाई करून लिहिले आहे. माहाराजानी रागास न यावे. आम्ही लेकरे आहोत. आपराध क्षेमा करीत जाणे आणि रा रघोजीबाबास व त्रिंवकजी भोसले यासी व सिदभट यासी त्रिवर्गास तीन कागद लिहिणें कीं वृती ठिकानी असोन देणे. बहकल्याने उतम नाही, यैसे उगच लिहून पाठविले पाहिजे. इतकियावर माहाराज धणी मायेबाप आहेत. बहुत काय लिहिणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति. येथे जे वर्त होते ते वरचवर रोज जाऊन राजश्री नानाचे सेवेसी जाऊन नित्य दोन वख्त जाऊन विनंती करितो ते सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*The letter gives the result of an interview between Ramraja and Sidhbhat on behalf of Raghoji. Ramraja was reluctant to oppose the wishes of the Peshwa.*

628

No. 48] *[After 13-6-1750*

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. राजश्री उदाजी चव्हाण यांजकडील सांप्रत वर्तमान तर सिदोजी थोरात यानी उदबास मेजमानी करून याचे त्याचे बोलणे चालणे खलबत काये जाले ते काही कोठे प्रगट अद्यापि जाले नाही. उदबा आष्टियावरी अहेत. याउपरी वारणा उतरोन जाणार अहेत. तदनंतर काये मनसबा होईल ते पाहावे. हे वर्तमान राजश्री आपा चिटर्नीस याजकडे तिकडोन आले त्यावरून सेवेसी लिहिले असे. राजश्री प्रतिनिधीची पत्रे अंताजी सिवदेव यांजकडे जातात की, जमावसुधा सतरुसीस येक वेल येणे म्हणून बोली आहेच. तेहि जमाव आणखी धरितच आहेत. प्रतिनिधीनी येथोन दोनसेपर्यंत स्वार व प्यादे मिलोन कोलेंयास रवाना केले असेत. +सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

¶*News-letter from Satara to Poona about the development of situation against the Peshwa.*

No. 49] *[13-6-1750*

श्री

+तीर्थरूप राजश्री नाना व ताा

राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी,

आपत्ये त्रिंबक सदासिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १९ रजब बुधवार दीड प्रहर दिवसपरियेंत येथास्तित असें विशेष. स्वामीनी पत्रे पाठविली ती पावली. उतरे पुर्वण्यावरून विदित होतील. सिदोजी थोरातानी अष्टे घेतले. कालच त्याचे पत्र आम्हास आले. येसाजीच्या मुलकांत धामधूम करीत जावी याप्रो केले आहे, होतच आहे. स्वामीनी पत्राची उतरे येकच विचार करून लौकर पाठवावी. राऊत आधी दोन च्यारशे सत्वर पाठविले पाहिजेत. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare asks for military help from Poona.*

---

१ मौजे कोळे, जिा सातारा. + रामाजी माणकेश्वर, पुरंदऱ्याचा कारकून, याचें पत्र असावें.

No 50] *[14-6-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यकंटराऊ मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता॥ छ २० माहे रजबु गुरुवार प्रहर रात्र जाणून सोहबांचे कृपे करुन येथास्तित आसों विशेष. राजश्री रघोजी भोसले यांकडे बाबू भट उपाध्य पाठविले. त्यां समागमे राजश्रीनी सांगून पाठविले कीं तुम्ही वडील आहात. आमचा परामृश करीत नाहीत. आणि वाडियांत येत नाहीत. येथे ब्राम्हणानी बहूतसा राडा केला आहे. तमाम माझ्या राज्यामधे खेल केला आहे. हे तुम्हास बरे दिसतें कीं काये ? यावे आमच्या मिलनीत मिळावें, आणि या गोंष्टीचे पारपत्य करावे यैसे आहे. त्यासी तुम्ही नाही येत हे गोष्टी काही उतम नाही. त्यासी याणी जाब दिल्हा कीं तुम्ही कोणते आमचे म्हटले ऐकणार. ज्या पेशवियाणी तुम्हास या पवतीस आनले त्यांचा विचार या प्रकारचा केला. मातुश्रीचा विचार त्याप्रकारें जाला. चिटनिसाचा खेल जाला. आता आम्ही चवथे राहिलो आहोत. त्यासी पेशवियाणी आमच्या गोष्टी तुमचे कानावरून घातल्या कीं जितीचे हातरोखे व कडीवलीतची देशमुखी व वायेदेशी गाव व श्वदेशी माहाल येसे द्या. ते आऊसाहेबानी मान्य करून व तुम्हीहि मान्य केले व पेशवियानीहि मान्य करून आमच्या कामाकाजाचा निकाल करुन दिल्हा. त्यासी आम्ही येथे असताच कडवलीतची देशमुखी वहिरोपंतास दिल्ही व जितीस हातरोखे व हुजरे पाठविले. गावांस आणि परगणियासी वावच नाहीं. येक्या गोष्टीचे शाश्वत नाही. आणि आपण काही तुम्हाकड येणार नाही. जे पेशवियानी केले ते मोडे. तेव्हा आणिक राहिले काये ? आम्हास सुखरुप निरोप देत असला तर उतम आहे; नाहीतर पेशवियाची रजा घेऊन जाऊ, यैसे परिश्चिन सांगितले. मग बाबुभट उपाध्ये राजश्रीकड गेले. मग त्याचे उतर पुण्हा आले नाही. मग तिसरे प्रहरा राजश्री फतेसिंगवावा रा॥ रघोजी बावाचे घरास आले. त्यासी खलबतास जाऊन बसले. तेथे उभयेतां मुख्य व बुन्हानजीबावा व सिदभट आणि पाच साह जन होते. तेथे आपणहि होतों. त्यासी फतेसिह बोलले कीं आपण रविवारी श्वार होऊन जातात. येथे तर खूल माजले आहे. आमची काये गत्य करून जातात ? त्यासी तुम्ही पुणियासी जातांत; आज्ञा होईल तर समागमे आपणहि येऊ अगर ज्याप्रा॥ सांगाल त्याज प्रा॥ वर्तनू करू. तेव्हां बाबानी सांगितले कीं आपण पुणियासी जातोंत. तेथे तुमचे वर्तमान पेशवियांचं कानावरुन घालून त्यांच्या विचारे जे आज्ञा करतील त्याजप्रा॥ वर्तनूक करणे. तेव्हां समागमे रा॥ त्रिंबक

हरी व रामाजी नाईक पुरंधरे हे उभयेतांस मागे देणार यैसा निश्चये करून ठेवला आहे. मग रा रघोजी बावानी त्यांसी वस्त्रे दिल्ही. मंदील पैठणी १ व दुपटा पैठणी व किमखाप व महमदी झग्यास दिल्ही. यैसी वस्त्रे दिल्ही. मग उठून गेले; व येमाजी सिवदेव यांसी आनावयाची तजवीज केली. येथून गुत्-रुपे मल्हारपंत पानगावकर गेला आहे व आताजी सिवदेव खानापुरावर आला आहे. फौज दीड हजार आहे. उदाजी चव्हानावर येतो आणि प्रतिनिधीनी आपल्या हवेलीमधे मोठी खबरदारी मांडली आहे. तमाम जिजाला पसरल्या आहेत आणि लोक वसविले आहेत. बावगे माणूस जाऊ सकत नाही. आता दोन वख्ता दरबारास जातात. फारसा जायायावयाचा विचारहि आहे. त्यासी चव्हानाजवल तों पावणेकसे श्वार आहेत. त्यास भये निर्मान जाले आहे. अताजी सिवद्यांची फौजहि जवल आहे. कोणे समयी काये होईल ते पाहावे. त्यासी राजश्री नानांकड चव्हानाने विनंतीपत्र पाठविले होते कीं फौज तुमचे सरकारची आहे. तीस आज्ञा करून आम्हापासी येऊन उतरेत तो अर्थ करणे. त्याजवरून राजश्री रघोजी भोसले यासी सांगून पाठविले कीं तुम्ही आपली फौजेस आज्ञा करणे कीं उदबाजवल जाऊन उतरेत ते करणे त्याज वरुन याणी मकाजी पांढेर वगैरे फौजेस आज्ञा करून ते क्षणी पाठविली. त्याजवरून उदबाचा कारभार श्वस्त जाला. त्यासी रघोजी बावाचा येथून जावयाचा निश्चये आदितवारी प्रहरा रात्री जाला आहे. तमाम सरंजाम बाहेर काहडला आहे. लोकास रोजमरे दिल्हेत; व राजश्रीनी गावामधे धामधूम मांडिली आहे. जाणोजी सेवाले याचे हवेलीजवल येक बसवी राहत होती. तिचे घर लुटुन आनले. तमाम यादद्दास्त धरली. सुमार सतावीस हजारांचा जाला. यैसे लालची कारभार पडला आहे. पुढे पाहावे कोणे प्रकारे वर्तनूक होईल ते न कले. काल आस्तमानी राजश्रीनी बुऱ्हानजी मोहिते व सिदभट व खंडेराव जाधव यासी बोलाऊन नेऊन गोविंदराव यांजकडील जामीनगतीच्या जाबसालासाठी नेले होते तों जाबसाल आज कलल. कोने प्रकारे जाला ते श्वामीस विनंतीपत्र लिहून पाठवितों. जे वर्तमान आढलेल ते वरचेवर विनंती सेवेसी पाठवितों. सत्य मिथ्या ईश्वर जाणे की माहाराजाचें पाये जाणत असतील. बहूत काय लिहिणे ? लोभ आसो देणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*The writer Vyankatrao Moreshwar informs the Peshwa how Ramraja tried to persuade Raghuji and win him over to his side and how Raghuji frankly placed before him the real state of things there, especially the absence of unity in the administration. The scuffle between Chavan and Mutalik is also reported by the writer.*

No. 51] *[16-6-1750*

श्री.

राजश्रिया विराजित राजश्री जिवाजीपंत आणा स्वामी गोसांवी यासी सेवक त्रिंबक सदासिव कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान छ २२ रजब मंदवार दोन प्रहर जाणून स्वकी [य] लिहित आसिले पाहिजे विशेष. माहाराजांची सिधता होत आहे. क्षणेक पुणें म्हणतात, क्षणेक तुलजापूर म्हणतात, परंतु कोणेकडे जाणार हे न कले. तुम्ही आपलें ठाईं खवरदारीने राहोन लोकांस सर्वास खबरदार करणे. उदैक स्वार होऊ म्हणतात. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Purandare to Jivaji Pant Khasgiwale, intimating the intended departure of Ramraja from Satara.*

No. 52] *[16-6-1750*

छ २४ रजब.

श्रीशंकर.

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ता॥ जेष्ठ वद्य नवमी मंदवासर प्रहर रात्रपावेतों येथास्तित आसो विशष. येथे आज दोन प्रहरा दिवसांत राजश्री बनसीपुरीच्या घरास गेले होते. त्यांसी म्हणो लागले कीं, आम्हास दहा सहश्र रुपये कर्ज देणे. त्यासी ते पुसू लागले कीं, तुम्हास रूपया कोने गोष्टीस पाहिजे? त्यासी जाब दिल्हा कीं, सिंहगडच्या बंदोवस्तीसाठी पाहिजे. तर हे गोष्टी बेहसांब[1] आहे. पेशवियांसी सिंहगड द्या. आधीच देऊ नये आणि हातरोखा दिल्हा तर आंतर करू नये. तर त्याणी माझी बुध्य चोरली. कीं, गुराखी खेलायाचा किला आहे, काही मातवर नाही, यैसे म्हणून हातरोखा घेतला. तर मी काही सिंहगड देणार नाही. याजमुळे जे होईल ते हो. त्यासी रूपयाविसी गोसावीबावानी जाब दिल्हा कीं, माझे रूपये रवोजीबावाकडे वगैर तुझ्याच राज्यांत आहेत. आता मजपासी येक रुपया नाही. यैसे परिश्निन सांगितले. ते क्षेणी उठोन माघारे माहालास आले. उदई(क) बाहेर निघतात. दोन वदंता आहेत कीं, सिंहगडाची बंदोवस्ती करावयासी जातो म्हणून वदंता बहुत आहे; दुसरी बोलतात की, पुणियासी आऊसाहेबांस आणावयासी जातात म्हणून हे येक आहे. परंतु

---

१ बे-हिसाब – अयोग्य.

सिंहगडास जावे हे फारसे आहे. व आणी येक वर्तमान आहे कीं, आज रा॥ रघोजी भोसले हे त्रितीये प्रहरी आज श्रीयेवतेश्वरास दरशनासि गेले होते, तेथे श्रीनारायेणबावा श्वामीचे दरशन जाले. तेथून येतेसमई बनसीपुरीच्या घरास गेले, तों रघोजीबावा पश्चमेच्या दरवाजियाने वाड्यांत गेले व उत्तरेच्या दरवाजियाने राजश्री प्रतिनिधि आले. त्यासी, प्रतिनिधि कांहीं बनसीपुरीकडे गेले नाहीत; तेथे दुसरा महंत राहात आहे त्याजकडे मेले होते, तों जैसे यांजला देखले तैसे माघारे जावयास लागले, तों च्यार नजरा जाल्या. मग बावानी रामराम केला. मग पालखीतून उतरून खाले बावास घेऊन वेगले बसले. आपणहि तेथेच होतों. त्याणी गोष्टी काहाडल्या कीं, कां, बावा, आम्हास धरितात आणि मारू म्हणतात ? आम्ही तुमचे काये घेतले आहे ? आम्ही घरी बसून राहिलो आहोत, आता कां आमची पाठ पुरविली, यैसे बोलू लागले. तेव्हा बावा म्हणाले कीं, आम्ही सिपाई; आम्हास तुमच्या कारभारियांच्या गोष्टी काये ठाऊक ? आणि आम्ही या कारभारात येत नाहीत. मग दुसरे बोलले कीं, तुम्ही पेशवियांच्या घरास जातांत आणि आमचे घरास यावयासी गाठ पडत नाही की काये ? येक दिवस तरी यावे होते. तेव्हा हे म्हणाले कीं, आपण तेथेहि जात नाही आणि कोठे गेलो नाही. आणि आम्हासी मनसुब्यात पडने नाही. येखाद्या ठिकानी चाकरी पाठवावे तेथे जावे. दुसरे काही उमजत नाही. मग त्यासी गुह्यार्थाची गोष्टी काहाडली कीं, ज्या समई तुम्ही बाहेर होता तेव्हा आम्हास भरवसा होता कीं, आमच्या मिलनीत आहेत. आणि येथे आलियावर फुकाचे भेटीस गेलेत. त्यासी राजश्रीचा हेत फारसा आहे कीं, तुम्ही आम्ही येकचिते आसो, येक विचार करावा. त्यासी राजश्रींचे व आमचे व फतेसिंग-बावा या तिघाजनांचे येकचित आहे. आणभाश क्रियाप्रमाण गोवर जोंधले जाले आहेत. त्यासी तुम्ही या मिलनीत मिलावे हें उतम आहे. त्यासी याणी जाब दिल्हा कीं, आपणास येखाद्या मोगंलावर पाठवा आगर लांबसे येखादे ठिकानी सिपायेगिरीच्या कामावर पाठवावे, तेथे जाऊ. परंतु ह्या गचगचीत आम्हास न घालणे. आपण उदईक आदितवारी श्वार होऊन जातों, येथे काही राहात नाही. ज्याने येथे राहावे त्याने मनसुब्यात पडावे. याजवाचून काये गरज आहे ? तेव्हा सुन्न होऊन गेले. पुन्हा बोलले नाहीत. तैसे पालखीत बसून गेले. त्यासी मग हे बनसीबावाचे मठी च्यार घडी होते. तेथून घरास आले. त्यासी उदईक डेरा दाखल होणार आहेत. व दुसरे वर्तमान यैकतोत कीं रतोजी चव्हान याणे खानापूरपावतो येऊन येमाजीपंतांची पनास घोडी नेली व उंटे नेली व मानसेहि मारली म्हणून वदंता आहे. व प्रतिनिधींचे वाडियांत बहुतसी

खबरदारी करितात. तमाम जिजाला ठाई ठाई लावल्या आहेत. बंदोबस्ती फारसी करितात की, उदाची चव्हान घरावर चडाई करून येतात म्हणून खबरदारी करितात यैसे आहे. आणि उदाजी चव्हान याच्या खबरदारीस चौकीपाहरियासी आपल्या सरकारचेहि श्वार जातात आणि रघोजीबावाकडीलहि जातात यैसे आहे. यैकिले वर्तमान तें माहाराजांचे सेवसी लिहिले आहे. सत्यमिथ्या ईश्वर जाणे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶Vyankatrao Moreshwar to the Peshwa, informing him of a loan which Ramraja wanted to take from Banasipuri for the equipment of Sinhagad. Further on the conversation between Raghuji and the Pratinidhi is reported.

No. 53] [*16-6-1750*

नकल.

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

श्रीपतराव बापूजी स्वामी गोसावी यांसी.

पो त्रिंबक सदासिव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ताा छ २२ रजब जाणून स्वकीय लिहिणे विशेष. राजश्री स्वामीनी अजी कूच करावयाचा विचार केला. क्षणभर पुणियास जातो म्हणतात, क्षणभर सिहीगडास जातो म्हणतात, क्षणभर तुळजापुरास जातो यैसे बोलतात. त्यास तुम्हास वर्तमान कलावें यास्तव पत्र लिहिले अहे ; तरी तुम्हीं सिरवलाजवली पिंपरियाजवल माणसें चौकीस ठेवणें आणि बातमी राखीत जाणें. गडावरी राजश्री येशवंतराव लक्ष्मण सबनीस अहेत त्यासहि खबर करून खबरदार राहात ते करणे. श्रीमंताचे राजश्रीचे चित्त शृध नाही. आमचाहि रुसवा अहे. येथे खेल मांडिला अहे. तरी खबरदार असणें. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶Shripatrao Bapuji to the Peshwa: writes news of Ramraja's movements.

No. 54] [*17-6-1750*

श्री

पुा सेवेसी विज्ञापना. राजश्री स्वामी - उदईक इंदुवारी प्रस्थान ठेऊन भोमवारी येथून पुणियास यावयास्तव कूच करणार तें वृत पूर्वपत्रीं सेवेसी लिहिलेंच अहे. आम्हास आज्ञा करितात कीं येथे माहाल आहेत त्यांचे रखवालीस व

शहरचे रखवालीस तुमची फौज ठेवणे यासिवाय सेखमिरा व रा॥ अंबाजी सिवदेव व आणिक किरकोल हुंजरातचीं पथके ठेवितों असी आज्ञा केली. त्यास आम्ही विनंती करीतच आहो कीं श्रीमंतास ल्याहावे. तेथून जाबसाल येईल तदनरूप करणे तो विचार करावा असे बोलतच आहो. परंतु ध्यानात भरत नाहीं. चैन पडत नाहीं. परवांचे दिवसीं फार करून कूच करितीलसे दिसतें. त्यात पाहावे. उदईक कसा मजकूर होईल तो न कले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Purandare to Peshwa, communicating to him Ramraja's intention to start from Satara on the following day.*

No 55] *[18-6-1750*

छ २९ रजब.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री
भाऊ स्वामिचे सेवेसी.

विनंती उपरी. काली माहराज राजश्री स्वामीनी राजश्री विष्णुपंताकडे परवानग्या भोयांच्या रोजमुरियाविसी व कुणबिणीची मोइनी लुगडी वगैरे परवानग्या जाहाल्या. त्याउपरी येजमानाचे बलावणे माानुलेस आले. सेदरेस[2] गेले. मग याणी आर्ज केला की, मजकडे कारभाराचा गुंता काये ? सात महिने आम्ही आपल्या घरी बैसलो. जे कारभार करीत आसतील त्याणी परवानग्या कबूल कराव्या. आपण कोणाचा कारभार विचार किमपि जाणत नाहीं. हिसेब पहिला समजाविला. पुढे आपल्या चितात काये आहे ते आज्ञा करावी म्हणून बोलिले. त्याजवरी येजमानाही आज्ञा केली की, तुम्ही आपला कारभार करणे. त्याजवरी विष्णुपंत बोलिले कीं, तुम्हाजवल पाजी माणसाचा व गुलामाचा च्याहा. पाच रुपये नजर मान्य केली म्हणजे कानी लागून गोष्टी सांगता. दरबार या रितीचा जाहाला. त्यांत आम्हा लोकाचे कैसे विकते ? आणि शाहाणपणास कोण पुसतो ? यैसे बहुता प्रकारे येजमानास छंडून[3] काईल केले ते सेवेसी पत्री कोठवर ल्याहावे ? येजमान हासत राहिले. मग त्यास आज्ञा केली की, तमाम गावगनाचे हिसेब आणावयास सांगितले. त्याजवरून हिसेब घेऊन आलियावर येजमानास विष्णुपंती आर्ज केला की, हिसेब तयार आहे. येकीकडे आपले कारभारी व

---

१ विठ्ठल शिवदेवाचा भाऊ. २ राजसभामण्डप.

३ छळणे.

आणखी इतेबारी स्वामीकडील ग्रहस्त असतील ते बलाऊन स्वामीनी स्वस्त चिते चितास येईल तैसा हिसेब समजोन आपणाजवल ठेवावा, म्हणून त्याणी अर्ज केलियावरी येजमान उठोन येकांती गेले. जात्येसमई माहादजी सालोखी यासी कानी सांगितले की तू येगें. हे विष्णुपंताने यैकिले. येजमान व राजश्री शामराव व रा॥ बाबुराव यासी खलबतात बलाविले. माहादजी सालोखी व माहादजी पाटिलाचा पुत्र संताजी व राजश्री नागोरावजी यैसे हिसेब पाहावयास बैसले. तेथे विष्णुपंत बोलिले की, माहाराजाचे कारभारी आहेत त्याणी व स्वामीचे आणखी विस्वासू ग्रहस्त आसतील ते आसावे. वरकडास येथे बसावयासी गरज काये म्हणून साफ विष्णुपंती सांगितलियावर माहादजी सालोखी ढई देऊन बैसला. मग विष्णुपंत बोलिले की, माहादजी सालोखी यासी बसावयासी येथे प्रयोजन काये? कैलासवासी माहाराज राजश्री स्वामीनी बाईसाहेबाच्या माघारे कारभार आपल्या स्वाधीन केला. तेव्हां इतलें[1] दुसरीयाचा नाही. हिसेब ज्या रितीने समजावयाचा त्या रितीनें खरा करून कारभाऱ्यांच्या विद्यमाने समजोन आपल्याजवल ठेवावा. मग चितास येईल त्याप्रमाणे पुरसीस[2] करून द्यावी म्हणून साफ भापणे केली. यावरी माहादाजी सालोखी यास विष्णुपंत बोलिले की कैलासवासी स्वामीनी गांडीवर काठ्या देऊन बाहीर घालविले त्याची काही याद आहे किंवा नाही? त्याजवरी बोली बहुत वाढणार होती. मग येजमानाही माहादजी सालोखी यासी व संताजी माहादजी पाटलाच्या पुत्रास यैसे दोघा जणास उठऊन बाहीर बैसविले. मग विष्णुपंती येजमानाच्या मर्जीप्रमाणे गावगनाचा हिसेब जैसा पाहिजे तैसा व खिलारे बैल म्हसी वगैरे दरोवस्त समजाविला. यजमान बहुत संतोषी जाहाले. हिसेब वाचून माघारे विष्णुपंताजवल देत होते; परंतु त्याणी आपणाजवल घेतला नाही. माहाराजास अर्ज केला की याउपरी हिसेब आवघा स्वामीनी पाहिला तितका स्वामीनी आपणाजवल ठेऊन चौकसी करावी. यैसे बोलोन हिसेब समजाऊन विष्णुपंती माहाराजाजवल दिल्हा. विष्णुपंत निरोप घेऊन आपल्या घरास आले. तदनंतर माहादजी सालोखी यासी बलाऊन आणून कार्य कारण त्याकडे पाच गाव देतो म्हणून बोलिले. कमाविसीने पाच गाव करावे, खेडी मिरज प्रांतीची आहेत, तितकी कमावीस करून मजवल यैवज देणे, मी विष्णुपंतास ऐवज देईन. तेव्हा महादजी व संताजी बोलिले आम्हांकडे व त्याकडे मिलोन कारभार होता. त्यास राजे बोलिले सर्वाघरी विष्णुपंतास वरिष्ट माहाराजानी केले आहे. त्याप्रो हालींहि कारभार करितील. विष्णुपंतासहि फार मायेचे बोलणे बोलिले. त्यावरी विष्णुपंती विनंती

---

१ विश्वासू. २ संबंध, वार्ता. ३ विचारणा; विचारपूस.

केली की, मी निराले वाटेने विनंती करीन यैसें बोलून टाला देऊन आले. इतके माार काली छ २३ रजबी रविवारी जाले. त्यावरी आजी आंम्ही दरबारीहून आलियावरी राा गोविंदराव बसले होते त्याजवल राजश्री बोलिले कीं, विष्णुपंताचा हिसेब कुंली[1] पाहिला. त्याचा कारभार त्याजकडे करार करून किल्यादेखील त्याकडे देविल्या. ऐसें बहूत ममता लाऊन बोलिले, राा विष्णुपंताचे विचारे, मान्य पुरुषपणे आंसावें[2], सिलकी धंद्यात पडू नये, राजश्रीचे वचनांत वचन नाहीं, माहादजी व संताजी हेहि जडले आहेत. अंतर्भाव व बाहेरभाव यांचा अंत लागत नाही. राजश्री वेंजीद[3] फार आहेत. तूर्त याच्या मनोगता-प्रमाणें आवघे दूर केले, ऐसेंहि म्हणतील, परंतु याचे चित प्रशस्त होत नाही. आम्ही भरोसा देऊन धंदा करा म्हणावें तरी आम्हासहि थांक[4] पुरत नाहीं. मर्जी स्वामीस आद्यंत विदीत आहे. सारांष गोष्टी वडिलाची आज्ञा प्रमाण. जैसी आज्ञा होईल त्याप्रमाणें विष्णुपंतास सला देऊ. विष्णुपंताचा भार मनोवाचाकाया स्वामीच्या पायांपासी आहे. तरी ये गोष्टीची काये आज्ञा कर्तव्य ते करावी, त्याप्राां यांस सांगू. याचे चित धंदा करावयाचा नाही. स्वामीचे पत्र यास येईल त्याप्राा हे वर्तणूक करितील. सारांष माारनिलेचा कारभार उजल होता त्याप्रमाणे स्वामीचे कृपें करून हिसेब वारून दिल्हा. आतःपर माारनिलेनी याजवल चाकरी करावी ऐसे नाही. सर्व प्रकारे स्वामीच्या पदरचे आहेत. स्वामीची आज्ञा यास शिरसा आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Nana Purandare to the Bhau, commenting on the vacillating disposition of Ramraja as regards the management of private lands. One Vishnupant, who appears to be in charge of this work with the late Rani Sakwarbai, has an altercation with Ramraja and refuses to go on unless he is fully trusted.*

No. 56] *[18-6-1750*

छ २९ रजब

श्री

तीर्थरूप राजश्री बाबा[5] स्वामी वडिलांचे सेवेसी आपल्यें त्रिंबक सदाशिव कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २४ रजबपर्यंत स्वामीचे कृपेकरून

---

१ सर्व; एकंदर.

२ विष्णुपंताचा विचार असा कीं आपण आपला मान राखून कारभार करावा.

३ बजीद = आग्रही; दीन; श्रमी; रुष्ट.

४ भरंवसा.

+ पत्र नाना पुरंदऱ्याचे.

५ महादोबा पुरंदरे.

यथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र पाठविले ते काल संध्याकाली पावले. लेखनार्थ अवगत जाला. तेथील कारभार नासला. राजश्रीनी येमाजीपंतास बोलावणे पाठविले. सिंहिगडाकरिता राजश्री पंतप्रधान यासी विरूध तरी सचिवाचे हातून किला आलियास काही कलेना. परंतु याचे हातून येता दिसत नाही. जबरदस्तीने वेतील अथवा राजश्री देतील, हेहि थोर आणि तेहि थोर समजतीलच. तुम्ही हांवभरी[1] होऊन कोणते भरवसियावर आहा कलत नाही. बऱ्या वाईट गोष्टी भलत्याजवल बोलता त्याचा विश्वास काय ? तुम्ही गोविंदराव मात्र वाईट व्हाल. तरी हे गोष्टीत सहसा न पडणे. याउपरी गोविंदराव याणी मुले माणसे तेथे ठेवावी असे नाही. तिकडे थार(?) होत असेल तरी ठेवावी नाही तर पुण्यास पाठवावी उचित आहे म्हणोन कितेक विस्तारे लिहिले ते कलले. ऐशी-यास उचित अर्थ सुजला तो लिहिला. येथेहि बहुतासी बोलोन नासले नाही. भलती गोष्ट तेथील विचारावर तोच नाही, मग आम्हास वृथा धावत कां ? याउपरी स्वामीचे आज्ञेप्रमाणेच वर्तणूक होईल. राजश्री गोविंदराव मुले माणसे पुण्यासच रवाना करीत आहेत. +दुसरा विचार कोठे तरी चाकरी केली पाहिजे. ज्या खावंदापासी राहावे त्याची मर्जी मिलवावी हा साधकपणाचा विचार आहे. त्यास राजश्रीच्या मर्जीत राहावे, अर्जव करावे, फारसे मान महत्व पाहू नये, च्यारदा जावे यावे, रंगात मिलावे, मोठ्या कारभारांत फारसे पडू नये, ऐसे करावे, असी आज्ञा असली तर या गोष्टीस अंतर करीत नाही. आठा दिवसात मर्जी राजश्रीची मिलऊन घेतो. मर्जी मिलऊन इतके करून घेतो कीं हे भले माणूस कोणाच्या कजियात नाहीत, बऱ्यात नाहीत, असेहि होईल. मग आपले वजन, शाहणपण, सरूप[2] याची इछा कऱ्यास धरावी ? असो. भलती येखादी उमदी गोष्ट येका खावंदाच्या नेटावर करणे तर चाकर लोकानी आपले हिमतीने बुधीने करावी; नाहीं तर करून नफा काय ? सर्व व्यर्थ. असो. स्वामीनी आज्ञा केली आहे त्याप्रमाणे वर्तणूक करीन. बुवाजी येथे आज्ञेप्रो ठेविला. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Trimbak Purandare to Mahadoba : asks how he should behave in order to gain the favour of Ramraja.*

---

१ हांवभरी होणे = To be lost in wild wandering, be greatly confused and bewildered.

२ सरूप=नक्ष, अभ्र.

No. 57] *[19-6-1750*

नकल.

श्री

श्रीमत्सकल तीर्थस्वरूप मातुश्री आईसाहेब वडिलांचे सेवसी अपत्ये रामराजे कृतानेक साष्टांग दंडवत प्राा विनंती. अत्रत्य कुशल जेष्ठ वद्य येकादसी इंदुवार जाणून वडिलांच्या असीरवाद वर्तमान येथास्तित असे. यानंतर किले सिंहिगड राजश्री पंतप्रधान यास द्यावयाचा करार पेसजी जाला आहे त्यास दिवसगत लागली याजमुल त्याच्या चितात शवसये निर्माण जाला. यैसियास वडील तेथ असता त्याच्य चिती दुसरा विचार यावा यैस नाही. वडिलांच्या आज्ञेसिवाये अन्न विचार कोणतां आहे. वडिलांच्य चितास आले म्हणजे आमच्यहि आले. किला पंडित मोरनिलेच्ये हवाला करणे म्हणोन राजश्री पंतसचिव यासी व किल्येकरास पत्रे सादर केली आहेत. किला पंडित मोनिल्येच्या स्वाधीन करून वडिली सत्वर आले पाहिजे. वडिलांच्य दर्शनाचा निजध्यस रात्रीदिवस लागला आहे. अथःपर दिवसगत लागो न देता अति सत्वर आल पो हे विनंती.

¶*Ramraja to Tarabai, giving written orders to Sachiv and others to hand over the fort of Sinhgad to the Peshwa.*

No. 58] *[19-6-1750*

श्रीशंकर.

सेवसी आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक साा नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ताा छ २९ माहे रजब बुधवार अस्तमानपावेतो साहेबाचे कृपेकरून येथास्तित आसो विशेष. येथे आज राजश्रीकडे राजश्रीनाना व राजश्री गोविंदराऊजी व राजश्री येशवंतराव व राा रघोजीबावा व रा बऱ्हानजी-बावा व रा सिदभट यैसे गेले होते. त्यासी राजश्रीस रघोजीबावाकडील मजकूर हटकिला. त्यासी मतलब कीं जिंतीचा हतरोखा व गाव कोणता नेमून देतात तों व येशवंतराव याजकडील हिसेब व रवानगीचे विचारले, तेव्हा तीन कलमाचा जाब दिल्हा. जिंतीविषई तों गला पुढे करितात. हा गला आणि जिंती लागली आहे. ज्याने गला कापावा त्याने जिंतीची पाटिलकी करावी. गावाविसी तों जाब दिल्हा नाही. आणि येशवंतरायांविसी येशवंतरायांस सांगितले कीं हिसोनें[1] करून कागद करून घेणें. त्यासी जिंतीसाठी आड पडली आहे. काहीसा

---

१ हिसोब.

रुसवा रा॥ रघोजीबावाहि करून आले आहेत. दरबारीहून येऊन सरकारच्या वाडियांत राजेश्री नाना व समस्त मंडली व रघोजीबावा यैसे येऊन बसून येशवंतराव यांजकडील हिसोब केला. आणि बाकी निघाली त्याचा रोखा लिहून दिल्हा. आणि पहिले रोखे जितके आहे ते घेतले. हकनी * * * आता दोन राहिली. जिंती वे गाव त्यासी बावा म्हणतात कीं गावाविशी आम्ही फिकीर करित नाही. जिंतीचाच मात्र कोने प्रकार भेटी उतरेल तें पाहावे. प्रतिनिधीहि फौज ठेवितात म्हणून वदंता आहे. व नवाब नासरजंगास रा॥ रघोजीबावानी वस्त्रे पाठविलीं. समागमे देवराव विठल वकील पाठविले आहेंत. वस्त्रे बितपसील पोशाखा तीन.

सब्जे[1] पोषाख	सफेद.
१ चीरा बुटेदारी	१ चीरा बुंटेदारी
१ जामेवार बुटेदारी	१ जामेवार बुटेदारी
१ पटका बुटेदारी	१ पटका बुटेदारी
१ किनखाप	१ किनखाप
१ दुपटा	१ दुपटा
५	५

पश्मी पोशाख	सिवाये महमुदी
१ मदीलजरी	सुमार दिलीची सफेद
१ जामेवार	४
१ पटका अमदाबाद	
१ किनखाप	
१ पश्मी दुपटा	१९
५	

येणे प्रमाणे सनगे पाठविली आहेत. साहेबास कलावे म्हणन लिहिले आहे. व येथून रा॥ रघोजी बावाचें मोहर्त आशाड सुध द्वितीयेचे आहे. आता काही राहात नाहीत. जरूरीसाठी राहिले यैसे आहे. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणे हे विज्ञप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar explains to the Peshwa how the affairs of Jinti village proved a very knotty point to certain people at Satara. Ramraja was very strong on it. He would suffer his head to be cut off rather than sign the deed of grant of the village. Just towards the end of the letter a list of the robes of honour sent by Raghuji to Nasirjung is given.*

---

१ हिरवा.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ सोरेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार. विनंती प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ताा जेष्ठ वद्य ११ द्वादसी मंगलवार आरुणोदये पावेतो साहेबांचे कृपे करून येथास्तित असो विशेष. काल सोमवारी राजश्री रघोजीबावा राजश्री नानांकड जाऊन राजश्री गोविंदराव यासी बोलावले. त्रिवर्ग बसून मनसुबी ठरावली कीं बुऱ्हनजीबावास व सिधभट यासी राजश्रीकडे पाठवावे आणि त्यास परिश्विन पुसांवे कीं रघोजीबावा तुम्हाकडे दोन गोष्टी विचारावयाच्या येणार आहेत. त्यासी जर काही त्यांच्या गोष्टी यैकने असतील तर त्यांसी घेऊन येऊन दोन गोष्टी विवेकाच्या व राज्यभाराच्या सांगतील. तुम्ही यैकिल्या तर बरे. न यैकिल्या तर मुजरा करून उठोन जातील. तुम्हीं कस्याचे आणि ते चाकर कस्याचे? तेव्हा राजश्री म्हणाले कीं आम्ही पाच सात वेल बोलावले तेव्हा आले नाहीत ; आता ते आम्हाकडे कशास येतील? मग बोलले कीं कां येतात? तेव्हा उभयेता म्हणाले कीं तुमचा व पेशवियाचा व चिटनिवीसांचा व आऊसाहेबांचा मनोभंग जाला आहे आणि तुम्ही भलत्याच्या बोले भलतें करितात आणि सिंहगड देतांत कीं नाही व दातेगड देतात कीं नाही अगोदर हातरोखे कां दिल्हे. आगोदर द्यावयाचे नवते यैसे(अ)सोन देऊन मग दुसरियाच्या बोले हा खेल आपल्या राज्यांत करावा हा काही योग्य नाही. तेव्हा राजे म्हणाले कीं पेशवियानी व चिटनिसानी माझी आजी फोडली आणि मला धरावयासी जपतात. मारू म्हणतात. दुसरा राजा उभा करू म्हणतात आणि जें काही थोरले आबासाहेब होतें त्याणी दिल्हे नाही ते आम्हापासी मागतात. ते काही मीं देणार नाही. जे आबासाहेबी दिल्हे आहे ते तुम्ही घ्यावे. त्यासी काही मीं उजूर करीन तर मग वरी म्हणावे कीं हा बेयेमान आहे. आधीक म्हणतांत तर मीं काही देणार नाही. मग याजमुले माझा प्राणहि गेला तर जावे परंतु देणार नाही. यैसे परिश्विन बोलले. मग बुऱ्हानजीबावा व सिधभट याणी येऊन येथें सांगितले कीं या या प्रमाणे राजे बोलतात. तेव्हा अवघियानी मसलत केली की रघोजीबावानी येकदां जावे आणि च्यार गोष्टी बऱ्या उमजोन सांगाव्या कीं आसे करता आसे आहे. जर यैकिले तर उतम आहे. नाहीं तर त्याजसारखीं तजवीज केली जाईल. तेव्हा राा रघोजीबावा व सिधभट व बुऱ्हानजीबावा यैसे तिघेजन गेले. तिसरा प्रहरपरियेंत तेथे होते. यांसी त्यांसी बहुतसी हुबरीतुबरी जाली. कजिया जाला आणि याणि परिश्विन सांगितले कीं चवघेजन ज्या गोष्टी सांगू तुजलाच व्हावतात आणि तुझ्या राज्यांत खेल करितात आणि म्हणसील कीं आम्ही तुमच्या कार्यास

येणार नाही. आमचा भरवसा न धरणे. ज्याप्रो पेशवियांणी करार मदार करून दिल्हा आहे त्याजप्राा तुम्ही निकाल करून देऊन चालवावे. नाही तर तुमचे कोन्ही नाही. खिजमतगारहि तुम्हाजवल राहणार नाही आणि धुलीचे दिवे खात जाल. यैस्या रगडून दोन गोष्टी सांगितल्या. तेव्हा समजोन हातरोखा सिंहगड व दांतेगडचा दिल्हा आणि हुजरें दिल्हे कीं पेशवियासी किला खाले करून देणे आणि राजे बोलले कीं माझे चालीस हजार रुपये किल्यास गेले आहेत ते द्यावे. ते कबूल केले आहेत कीं देऊ. मग राजश्री नाना व राा गोविंदराव यासी दरबारास नेऊन उभयेतांची गोडी करून दिल्ही. मग च्यार घडी दिवस असता रघोजीबावा जेवण्यासी आले यैसे वर्तमान आहे. जाले वर्तमान तें महाराजांचे सेवेसी विनंती पत्र लिहून पाठविले आहे. सेवेसी श्रुत होये. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa of Ramraja's obstinacy to the intercessions of some men at Satara, how he was brought round by a severe reprimand from Raghuji Bawa and how he was finally forced to hand over the fort of Sinhagad to the Peshwa.*

No. 60] [पो *19-6-1750*

छ २९ रजब

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. राजश्री रघोजीबावास गेलियापासून स्वामीनी येकही पत्र पाठविले नाही. तरी येक पत्र बहुत समाधानाचे पाठवावें. बावा बहुत बहुत स्वामीच्या विचारात आहेत. दुसरे जाणतच नाही. येथून निरोप घेऊन येतील तेव्हा पुण्यास येतील. राजश्री उदाजी चव्हाण यांचे येसाजी शिंदे मृत्य पावले. परंतु स्वामीनी त्यास फुकाचे येक पत्र लिहिले नाहीं हे उचित की काये? तरी त्यास समाधानपत्र ममतापुर्वक लेहून पाठवावया आज्ञा करावी. +दोन पत्रे उदबास दो प्रकारची पाठवावी. हे विज्ञापना.

¶*Purandare requests Bhau to send two letters, one to Raghuji Bawa and another to Udaji Chavan, expressing condolence for the death of Yesaji Scindia.*

+ पत्र पुरंदऱ्याचें.

No. 61] [पा *19-6-1750*

छ २५ रजब.

श्री.

पुा तीर्थरूप राजश्री नाना व ताा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती. दिनचर्येचे वर्तमान : प्रनिनिधीकडून काही कापड येमाजी सिवदेव याजकडे जात होते. बराबर तीन च्यारसें राऊत होते. त्याची पालत रा रताजी चव्हाण यांजकडून होती. त्यास खानापुराजवल गेले तों रताजी चव्हाण पनास पाऊणशा-नसीं जाऊन राऊतास गाठले. यांचा त्यांचा युध्यप्रसंग तेथे जाला. त्यांजकडील दाहापांच जखमी होऊन दोन च्यार ठार पडिले आणि त्यांजकडील चव्हाणानी तीस चालीस घोडी आणून पाडांव केलीं व खानापुरचे जमीदार धरून आणून गावची काही वस्तभाव लुटिली. कापड त्याजकडे रवाना केलें ते काही हाती लागले नाही. ते त्याजकडेस गेले. हे विनंती.

¶*Purandare to Bhausaheb reports an encounter between Rataji Chavan and Pratinidhi's men.*

No. 62] [पो *19-6-1750*

छ २५ रजब.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. राजश्रीनी रा बन्हानजी मोहिते व सिदभट याजवल दाहावीस वेल मजकूर केला की, राजश्री रघोजीबावाजवल आपणास बोलणे आहे. त्यास बोलाऊन आणा म्हणतों, परंतु ते का येत नाही? व तुम्ही का आणित नाही? हे जांबसाल[1] करीतच होत निदान या चहूं दिवसात नेट फारच लावलें व काहीसें विरूधहि बोलो लागले की, प्रधानपंताचे मिलतोऊ[2]; ते का येतील? सारेच तुम्ही येक होऊन मजला मारता तरी मारा म्हणोन बोलो लागलें. हे वर्तमान आम्हास पुसिले. आम्ही, रघोजीबावानी तर न जावे, उभयतानी जाऊन राजश्रीजवल बऱ्या पैरनिष्ट[3] गोष्टी बोलाव्या म्हणून सांगितलें. त्याजवरून उभयता काल रात्रीचे दरबारास गेलें. प्रहरपर्यंत खलबत जालें. सिदभट बोलणार चांगले. राजश्रीनी जितके आडे-वेडे घेतले तितक्याची निराकरणे केली. भयहि दाखविले. निदान तुम्ही वेडेपणच करू लागला तरी आम्ही करू देणार नाही. राज्य आम्हावर आहे.

---

१ प्रश्नोत्तर; संभाषण.

२ मिळताऊ—One that readily accommodates himself to another's views.

3 Rigidly impartial or just.

तुम्ही नाश पावाल. दर्याबाईस बदलाम[1] केलेत, तिचे घर बुडविलेत. आईसाहेब रुसून जातील आणि दर्याबाई तुम्ही येथे वसून कारभार कराल हे कसे घडेल? रघोजीबावा बऱ्याचा सोबती आहे. तुम्हाजवल येऊन काय करावें? ऐकाल तरी यावे, नाहीतर प्रयोजन काये? जो वाईट वर्तणूक करील त्यास नीट चाला असे म्हणावयास माणूस तोच आहे, म्हणून बहुत बहुत बोललें. निदान काहीसे नरम पडिले; आणि माझा पका गेला याची गत काये म्हणून बोलले. याणी जाबसाल केला की, रुपये तुमचे असतील ते देतील. खर्च जाले असतील ते ज्याणी घेतले असतील त्याजवलून देवितील, म्हणोन बोललें. यावर काहीसा आशय यास सापडला. बरे, उदैक रघोजी बावास बोलाऊन आणा, काये बोलणें ते बोलों, म्हणोन सांगितलें. त्याजवरून आज प्रातःकाली राजश्री रघोजीबावा व बऱ्हानजी मोहिते व सिदभट आले. रात्रीचे वर्तमान सांगितले. त्याउपरी आम्हीं सला दिल्ही कीं, जावें. जरी होईल तरी उरकावें. त्यांजवरून त्रिवर्ग दरबारास गेले. आईसाहेबाचे कोठडीत प्रहर दीडप्रहर पर्यंत मागती रात्रीप्रो ऊहूं[2] जाले. बोलणे फारच जाले. निदान[3] राजश्रीनी कबूल केले. राजश्री गोविंदराव यांजविशीहि मध्ये मध्यें जेथे मजकूर निघें तेथे बोलोन दातेगड द्यावासा करार करून घेतला आणि हातरोखे करून घेतले. राजश्रींनीं या या प्रमाणें करावें म्हणोन मजकूर सांगितले, तो तपसील आलाहिदा पुरवणीत लिहिला आहे त्याजवरून कलेल[+].

¶*Purandare reports to Bhausaheb, Ramraja's plans and conversations with leaders at Satara, Burhanji Mohite, Sidbhat, and Raghuji Bhosle.*

No. 63] [पो *19-6-1750*

छ २९ रजब

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे

सेवेसी

विनंती. उपरी, राजश्री रघोजीबावा दरबारास जाऊन बोलीचाली जालियाचा सविस्तर अर्थ अलाहिदा पुरवणीत लिहिला आहे त्याजवरून विदित होईल. त्याउपरी राजश्रीनी येणेप्रमाणे करार करून पत्रे दिल्ही:

सिहिगडकरी व हवालदार याचे वाईट न करावें. पूर्ववतप्रों चालवावें. हुजरून पैका गेला आहे त्यांस जो तेथे असेल तो द्यावा. ये गोष्टीस

---

१ बदलामी—Blame, censure (esp. undeserved). २ ऊहू—A scheme, plan; खलबत.

३ शेवटीं. + पुढें कागद मोकळा असून पत्र अपुरें कां ठेविलें?

तुंग तिकोना दोही किल्यावर येथून लोक पाठवितों, ते किल्यावर चढवावें. आधी हे लोक चढवावे मग सिंहिगडावर चढवावें.

मातुश्री आईसाहेबाची आपली समजावीस करून द्यावी. आण आईसाहेबास येथे पाठवावे. आपण येत नाहीत. सचिवपंतास हुजूर पाठऊन द्यावें.

याप्रकारे बोललें आणि हातरोखे करून दिलेहें.

१ मातोश्री आईसाहेब.
१ राजश्री पंतसचिव.
१ सिंहिगडचे हवालदारास.
१ स्वामीचे नावें.

—

४

च्यार हातरोखे करून दिल्हे, त्याच्या नकला करून पाठविल्या आहेत. हातरोखे आम्ही बऱ्हानजी मोहिते याचे घरीच ठेविले आहेत. स्वामीचे उतर येइल त्याजप्रमाणें घेऊन पाठविले जातील. दातेगडचाहि हातरोखा दिल्हा. त्याचीहि नकल पाठविली आहे, त्याजवरून विदित होईल. सदरहू कलमाप्रमाणे स्वामीनी मान्य केले तर हातरोखे घेऊन उतर सत्वर पाठवावे. त्याप्रा वर्तणूक करूं, हे विज्ञापना.

¶*Purandare to Bhausaheb referring to the written undertakings given by Ramraja regarding the forts of Sinhgad, Tung, Tikona, etc.*

No. 64] [पो *19-6-1750*

छ २९ रजब.

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती. उपरी, राजश्रीनी सिंहीगडचे हातरोखे[१] करून दिल्हें हे भीडेने. व सारा कारभार तटला; जिकडून

१ निकडीचा हुकूम.

तिकडून दबा बसला; रघोजीबावा राजश्रीचे कारभारात मिलेनात; स्वामीकडील फौज घाटापर्यंत आली, येथेहि जमा होत चालली, याजमुळे दिल्हे आहेतसे वाटते. चितशुधीने मनापासून नाहीत. असो. हरकसे हातरोखे आलें ते कार्यावर पडतील की नाही? आज आम्ही गेलों. उद्यापासून कारभारास बोलावणे येईलच. जावेच लागेल. कारभार चालता करा म्हणतील. करावा की न करावा, पुढील विचार कसकसा, याची सविस्तर मनन करून आज्ञा करावी. त्याजप्रमाणे वर्तणूक केली जाईल, हे विज्ञापना.

¶*Purandare to Bhau, says that Ramraja gave a written undertaking to hand over Sinhgad, only under compulsion : he is not doing it willingly.*

No. 65] [पा *19-6-1750*

छ २९ रजब.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती. उपरी, राजश्री फतेसिंगबावाकडील मजकूर स्वामीनी लिहिला की, त्याजकडील कोण्ही विश्वासू पाठऊन देणे. त्यासी बोलोन त्यांस समाधान पत्र पाठविले जाईल म्हणून. तरी राजश्री बाबूजी नाईक याजवळ तीर्थरूप राजश्री नाना स्वामीनी आज्ञा केली की, तीन लक्षाचा सरंजाम आमचे लगतें आम्हास द्यावा व तीन लक्षाचा सरंजाम आम्ही देवऊ त्यांस द्यावा. आमचे विचारात चालावें. त्याप्रमाणे नाईक जाऊन त्यास सांगितले. आम्हास बोलाऊन नेले. नाईकानी सांगितल्याप्रमाणें राजश्री बावा मान्य होऊन करार केला, शफत केली, सर्वथैं सरदारीचा बंदोबस्त देखील करून द्यावा. फतेसिंगबावास सांगावे ते त्यांणी ऐकावे याप्रमाणे करार जाला असता मग त्याजकडील मातबर विश्वासू माणूस येऊन कायें बोलावे आहे? फतेसिंगबावाकडील निभावणी जसी पाहिजे तसी करून घ्यावी. नाईक मध्यस्त जाले आहेत. मग गुंता काये आंहे? * आम्हासी बोलून चालून करारमदार जाहला. स्वामीचे आज्ञेसिवाय नाहीत. येक समाधानपत्र मात्र बावास निशा होईसे पाठवावे म्हणजे जाहाले. आपले लगामी लागतो. गरीब आहे. यास का हातचे सोडावे? पत्र पाठवावे, अनमान करूं नये, हे विज्ञापना.

¶*Purandare writes to Bhausaheb that affairs regarding Fatesingbowa have already been settled through the intercession of Babuji Naik and that it is no use displeasing him again ; and further assures that Fatesing is completely agreeable to the Peshwa.*

No. 66] *[June 1750*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना व
ता राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. राजश्रीनी सिंहिगडचे हात रोखे दिल्हे म्हणून सर्व कारभार आपल्याकडील जाहाला व अतःपर करू तसा होईल; राजश्री निकालस जाहाले; ऐसे स्वामीच्या चितात येईल तर असा भाव काही नाहीं. हातरोखे दिल्हे, परंतु मागे आपण चितास येईल तसे बोलतात. हातरोखे दिल्हे; परंतु तुंग तिकोना माणिकगड हातास येईल, रुपये घेईन, आईसाहेबास येथे आणून घालवितील, तेव्हा सिंहीगड येईल. नाही तर कसा येतो? असे मोठ्या फुंदाने बोलत असतात. येमाजीपंताकडील सूत्रे खेलतच आहेत. विसो मोरोकडे सूत्र आहेच. लोकांचे इमानप्रमाण घेतच आहेत. प्रतिनिधीला फौज ठेवा म्हणतच आहेत. खासबारदार ठेवितच आहेत. ऐसे नाना प्रकारें खेल खेलतच आहेत. सारांष याचा इतबार तिलमात्र नाहीं. क्षणात येक गोष्ट, क्षणात येक गोष्ट, या प्रकारचा स्वभाव आहे. स्वामीचे ठाई द्वेशुबुधी आहे, तीस अंतर होत नाहीं. सारांष आईसाहेब जर येकली याजपासी स्वाम पाठऊ म्हणतील, तर हे राजश्री काराग्रह आईसाहेबास करतील. यास्तव जो मनसबा करणे तो चांगला थोर करावा. येतद्विशईचे पर्याये हमेश लिहित गेलो, त्याप्रमाणे जाहाले तरच च्यार दिवस स्वस्त होऊन, राज्यभार चालेल; सातारा शहरहि नांदेल; नाही तर शहरांत कोणी राहत नाही. सर्वास भय निर्माण आबरूचे व लुटणाचे जाहाले आहे. राजश्री तो लुटावे, निमित्य * * ठेऊन पैका मिलवावा; याप्रा करीत आहेत. पाचा साता * * प्रमाणे जाहालें. कलावें. संतूबाई, गजराबाई, याजविसी पूर्वी लिहिलेच होते. उतर आले नाहीं. त्यास संतूबाईस उलगडावे; जवाहीर नगवंज[1] घ्यावे; हा विचार त्याचा आहे. परंतु थोडेसे स्वामीच्या भयाने दबले आहेत. परंतु लोभी आहेत. येके दिवसी काम करतील. मग स्वामीचे काहीं चालणार नाही. यासाठीं या मुलीला तिकडे नेऊन, येके जागा च्यार दिवस ठेवावी. पुढे लग्न करून दिल्हे म्हणजे स्वामीचे इमान थोरल्या माहाराजासी दिल्हे होते, ते उगवले. या गोष्टीची उपेक्षा केली तर या पोरीची गत सुधी नाही. यांत स्वामीची मर्जीस येईल ते स्वाम करतील.

---

1 A comprehensive term for jewels and ornaments.

असलेले वर्तमान लिहिले असे. बाबूजी नाईकास काही वस्त्रे देत नाहीत. पैका मागतात. याचाहि भाव कीं, स्वामीनी केले ते मोडावे हा प्रकार. तसेच त्रिंबकजी भोसल्याचे जिंतीचेहि कागद देत नाहीत. रघोजीबाबा खटे होतात. निरोप राजश्रीनी न दिल्हा तर ज्याप्रमाणें स्वाम उठान गेले याप्राा उठोन जातील. फतेसिंगबाबाचे मजकुराविसी दोन पत्रें पाठविली. त्याचे उतर समर्पक फतेसिंगबाबास खामाखा पाठविले पाहिजे. यांस हातचे न सोडावे. स्वामीचे म्हणतात. गरीब आहेत. यांसी अंतर न द्यावें. स्वामीच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक कराव्यासी तयार आहेत. अंतर नाहीं. यैश्यास येक पत्र समाधानाचे पाठवावे. येथे स्वामीनी लोक पाठविले, त्यांची याद आलाहिदा पाठविली आहे त्याजवरून कलेल. या पत्राचे उतर पाठविले पाहिजे. सेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Purandare advises the Peshwa not to trust Ramraja and to befriend Fatesing Bhosle.*

No. 67] [*13-6-1750*

श्रीशंकर

आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक साा. नमस्कार विनंती. प्रार्थना ऐसी जे विशष. येथील वर्तमान तााा छ १९ माहे रजबू बुधवार साहेबाचे कृपे करून येथास्तित असे. यैसियासी राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा काल तिसरे प्रहरी यासी घेऊन राजश्री नानांकड गेलो होतो. त्यासी तेथे राजश्री गोविंदरावाकडील आनले. त्यासी साहेबीं कृपापत्र राजश्री नानांस पाठविले होतें, ते पत्र वाचून त्याचे मुनसिफीसाठी त्रिवर्ग वेगले वाटेन बसले होतें. त्यासी मग खंडेराव जाधव व बुऱ्हानजी मोहिते व त्रिंबकजी भोसले व सिदभट यैसे आले व रााा बापूजीबाबाहि आले. त्यासी सिधांत ठरला कीं ज्याप्राा श्रीमंतानी व आऊसाहेबानी तह करून दिल्हा आहे त्याचप्राा राज्यानी चालावे आणि आम्ही आवावियानी चालावे आणि कदांचित गड मागत असले तर आम्हास विड द्यावे. जितके शाहू माहाराजांचे चाकर असतील त्याणी आमचे सोबती व्हावे. नाही तर कोण राहतो हेहि पाहतों. यैसी बोली जाली. तितक्यात राजश्रीनी

हे बसले आहेत तोच येकावर येकं तीन च्यार चोबदार गोविंदरायांकड पाठविले कीं तुम्हास बोलावले आहे. याणी सांगून पाठविले कीं आम्ही लक्ष प्रकारे येऊ. परतु चितापासून आम्ही नसावे यैसे आहे; मग कैसियासी बोलावणे वेर्थ आहे. त्याजवर राजश्रीनी विष्णुपंत व दवलतराव पाठविले की रा॥ नानास व गोविदराव यांस उभयेतांस म्हणावे की दरबारास आज तुम्ही येणे. उदईक न येणे. यैसे सांगून पाठविले. त्यासी ते समयी रामाजीपंत दरबारी होते. त्याणी ततक्षणी सांगून पाठविले. ते बसले आहेत तोच कीं तुम्ही न येणे येशवंतराव व नागोराव आले म्हणजे त्याजसारखी तजवीज ध्यानास आनून यावयाचे असले तर येणे यैसे सागून पाठवले मग विष्णुपंत व दौलतराव तैसेच माघारे गेले. मग येशवंतराव वगैरे घेऊन परंतु न आले त्यासी रा॥ रघोजी-बावानी साफ सांगितले कीं श्रीमंतास हे वर्तमान ल्याहावे ते आज्ञा करतील की उगेच दरबारास जाणे तर जावे नाही तर न जावे. त्या समयी राजश्री प्रतिनिधीस बोलाऊन नेऊन सांगितले कीं येमाजीपंतानी हे धामधूम मांडिली हें काये आहें? त्यासी प्रतिनिधी बोलले कीं हे धामधूम काही येमाजीपंत करित नाहीं. हे धामधूम दादोबा प्रतिनिधी करितो इतकियावर साहेवी काये करणें ते करावे. नाही तर पूर्ववत प्रा॥ माझी ठाणीठुनी माहाल गड जे आहेत ते द्या. नाहीतर मी हजर आहे. माझ्याहि पायामधे बेडी घालून टाकावे यैसे बोलले. मग फतेसिंग-बावांस बोलाऊन आनले. आणि त्याला पुसले कीं या बाम्हणानी राज्यामधे माझ्या खेल केला आहे यासी काये करावे. दादा, सांगाना कां. हो? त्यासी ते म्हणाले कीं आपणास जें उतम दिसल ते करावे. याविसी आम्ही काये सांगावे. ज्या गोष्टी राज्यभार चाले तो अर्थ करावा. त्यांसी राजे बोलले कीं तुम्ही वडील; आम्हास कितेक विचार आचार आम्हास सांगावा. तुम्ही मागे वर्तीत पाहिला आहे. त्यासी आता वडील तुम्ही आहांत, जे तुम्ही आज्ञा कराल त्याजप्रा॥ आम्ही चालू. यैसे बोलणे. जो फतेसिंगबावाणी जाब दिल्हा कीं अस्या गोष्टी साहेब आम्हास पुसतात त्यासी आम्ही काये सांगावे. आम्हास यैसियामधें दोन दिवस देवास जावयासी आज्ञा दिल्ही पाहिजे. मग राजे उगेच राहिले. उदाजी चव्हानास राजे म्हणाले की माहाराजांची पागा घेऊन जाणे आणि त्या बाम्हणास धरुन आनने. दाहा घोडे पागेचे देतो. तुम्ही फौज ठेऊन त्याजला मारुन काहडने. यैसे बोलले. आज तर काही या गोष्टीचा जाबसाल आढलला नाही. उदईक जें वर्तमान ध्यानास येईल तें माहाराजाचे सेवेसी विनंती लिहिली जाईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*The letter gives a glimpse into the complicated situation at Satara and tells how harassed the King felt at his helpless position.*

No. 68] *[20-6-1750*

श्रीशंकर.

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान ता॥ छ २६ रजबू गुरूवार साहेबांचे कृपेकरून येथास्तित आसों. यैसियासी राजश्रीनी आजं गंगाजी म्हणून संतूबाईकडील आहे, त्यासी आनून खूब मार दिल्हा आणि बोलतात कीं, तुजपासी काये काये वस्तभा (व) आहे ते सांगणे आणि त्याचे घरची वस्तभाव संतूबाईची कुल आनली. आणि आणीकहि मागतो. त्याजविसी राजश्री नानानी व रा॥ रघोजीबावानी व रा॥ गोविंदराव याणी रा॥ रामाजीपंत व नागोराव व दौलतराव यैसे तिघेजन पाठविले कीं, हे गोष्टी बेहसाब[1] आहे. आणि यैसी धामधूम करणे उचित नाही. शाहू माहाराजानी केले नाही ते तुम्ही करू म्हणता हे बर नाही. त्यासी त्याणी सांगून पाठविले कीं, आमचे चितास येईल ते करू. आपण या कामात न बोलावे. यैसे म्हणून संतूबाईस आनून वाडियात बसिवले आहे. आणि राजे बोलले कीं, जो कोणी येईल त्याने माझी गरदन कापील तेव्हा इला नेईल. यैसे जाले आहे. याजवरून राजश्री नानाहि बहुत खटे जाले आणि रा॥ बावाहि बहुत खटे जाले. तितकियांत रा॥ रायाजी भोसले आले, त्यांजकडे सामोरे गेले. करंज्याच्या आलीकडेच भेटी जाल्या. मग सवच माहालास आले. समस्त मंडलीचा हेत कीं, जितके गरीबगुरिब शाहू माहाराजांच्या हातचे आहेत तितके उदईक आशाड सुध १ प्रतिपदेस पुढे घालून रा॥ नानानी व रघोजीबावानी काहाडन घेऊन जावे. नाहीतर तमाम लोकांची घरे लुटील. नजर बदनजर आहे. यैसे आहे. जाले यैकिले ते सेवेसी लिहून पाठऊन दिल्हे आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar reports to the Peshwas the repressive measures adopted by Ramraja against Santubai. Gangaji, her attendant, was put to torture. Purandare and Raghujibowa interceded to no purpose. He placed Santubai in confinement in his own palace.*

No. 69] *[पौ॥ 23-6-1750*

छ २९ रजब.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री नाना व ता॥
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. संतूबाई गजराबाई यांची स्थित हे राजश्री राहू देत नाहीत. यास पुण्यास न्यावे म्हणौन सविस्तर पूर्वी सेवेसी लिहिले होते. स्वामीनी उतर न

---

१ बे-हिसाब – अयोग्य.

पाठविले, उपेक्षाच केली. यैश्यास गंगाजी संतूबाईचा माने अम्हीहोऊनी करून सांगितले की, वस्तभाव मुलीची राजे नेतात, चौकी बसविणार यांची तजवीज करावी. नाहीतर मला जसी आज्ञा करील तसे वर्तन. त्याजवरून आम्ही गंगाजीस सांगोन मुलीच्या वस्ता आणून आपल्या सरकारच्या जामदारखान्यांत ठेविल्या. त्यास येक दिवस जाहाला. आजी प्रातःकाली राज्यानी संतूबाईवर चौकी बसविली. हे वर्तमान आम्हास कललियावर रामाजीपंताबाा राजश्रीस अर्ज सांगोन पाठविले की, या मुलीस माहाराजानी आमचे हाती दिल्ही आहे. इचे पालणपोषण आम्हास केले पाहिजे. इला पुण्यास पाठवितो. साहेबी कृपा करावी. चौकी उठवावी. अशा गोष्टी केल्या न पाहिजेत म्हणून वहुत गरिबीने अर्ज रामाजीपंत व राजश्री नागोराव याजबाा सांगून पाठविले. त्यावरून राजश्री बहुतच क्रोधे होऊन गंगाजीस मार दिल्हा आणि बशविला. मुलीला पहिले जागाहून येक वटकीसुधा उचलोंन मुतपखांत वटकींत ठेविली. वस्तभाव सर्व मुलीची, तिजवर चौकी ठेऊन बंद केली. याप्राा संतूबाईची गत जाहाली. स्वामीनी शाहू माहाराजाचे इमान उतम प्रकारे राखले. असो. होईल वर्तमान ते ल्याहावे लागते. अद्यापि तरी डोले उघडावे, बदोबस्त करावा, उचित आहे. गजराबाई, लक्ष्मीबाई, गुणवंता यांची हेच गत. वटकी करीन म्हणतात. थोड्याच शाहू राज्याच्या पोटाच्या आहेत? अशा वल्गना करतात. मुलींचे हाल मांडले आहेत. स्वामीस पत्रे लिहितो, त्याची उतरेहि न पाठविली. कलले पाहिजे. केसरकराची मजमू स्वामीकडील; यास्तव मजमू काढली पाहिजे. मी मजमू देणार नाही, राजे म्हणतात; केसरकरासच दूर करतो, ऐसे बोलतात. काल भवानजी केसरकरास रुबरू आणून आद्वातदवा भाषण त्याला केले. त्याचा हती वेतला. सारांप मजमूकरिता त्याची सरदेशमुखी काढावी, मजमू काढावी, ऐसे आहे. आज उद्या त्याचे दारी चौकी बसविणार आहेत. कसे काय करावे हे ल्याहावे. आईसाहेबास पाठऊन हा बंदोबस्त केला तरच उतम आहे. काल संध्याकाली राजे बोलले कीं, म्या सिहिगडचे हातरोखे दिल्हे तर काय? माझा गड अझूण जुजतो की नाही? असे बोलून मिशावरे ताव दिल्हा! दुसरे साताऱ्यात दाहा पाच ठाई उग्याच चौक्या बशविल्या आहेत. च्यार पाच लुटली. दोघा सोनारानी गलफास देऊन जीव दिल्हा. याप्रो साताऱ्यांत धूम मांडली आहे. केसरकर आम्हास नित्य येऊन वर्तमान सांगतात. त्यास ही मजमू थोरल्या नानानी राज्याजवलून कोणे प्रकारे घेतली होती, हे स्वामीस विदित आहे. म्या काय ल्याहावें? संतूबाईची आप्रतिष्टा केली. लोक आम्हास

मात्र सर्व म्हणतात कीं, भले इमानास जागलेत. फतेसिंगबाबानी चिठी पाठविली तीच सेवेसी पाठविली आहे. कलेल, हे विज्ञापना.

¶*Nana Purandare to Nana and Bhau at Poona : writes about the high-handedness of Ramraja and the consequent hardships that many have to suffer, especially Shahu's daughters Santubai and Gajarabai.*

No. 70] [*June 1750*

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ

स्वामीचे सेवेसी,

विनंती उपरी. राजश्री बाबूजी नाईक यांनी सांगोन पाठविले कीं, इंदुवारी आपणास मुहूर्त आहे. त्याजवरून आम्ही राजश्री नागोजीराव व दौलतराव याजसमागमे राजश्रीस सांगोन पाठविले. याणी मजकूर केला. राजश्रीनी भाशण केले कीं, 'लक्ष रुपये नजर, येक हाती, दोन घोडे व पदक याजप्रमाणे आपणास द्यावें आणि वस्त्रें द्यावी.' याणी विनंती केली कीं, 'प्रधानपंतासी तुम्ही बोलला काय, नाईकास बोलाविले काय आणि हे म्हणता काय?' तेव्हा राजश्री बोलले, 'प्रधानपंताची व बाबाची माझी बोली या प्रमाणेच आहे.' याणी उतर केले की, 'असी बोली कधी नसेल. असते तरी सांगते, लेहून देते. अशा गोष्टी बोलो नयेत.' तेव्हा राजश्रीनी ते सोडले. बाबूजी नाईकाची बोली निराळी मजकडे आली होती. मध्यस्ताचा तुमचा मुकाबला करून देतो. पनास हजारपर्यंत परभारे बोलत होते. मी लाख रुपये, एक हाती, घोडे दोन व पदक घेतल्या-खेरीज कधी वस्त्रे देत नाही. पेशवेयाचे गांडीखाली सिरोन मामला करीन म्हणतो. याप्रमाणे जो देईल त्यास मी मामला सांगेन म्हणोन धमकावणीने बोलले. याणी उदंड जाबसाल सांगितला परंतु न मानले. याप्रकारचा मजकूर जाला. पुढे होईल तो लेहून पाठविला जाईल. सारांश हेच कीं, स्वामीची निसबत अथवा ज्याची सिपारस स्वामीनी केली असेल त्यास फिरोन गोष्ट सांगावी. स्वामीनी केले करू नये, हा सिधांत विदित व्हावा म्हणून वारंवार लिहितो. +सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Purandare to Bhau : describes how Ramraja is bent upon defeating policy of the Peshwa.*

+ पत्र नाना पुरंदऱ्याचें.

+ पत्र पुरंदऱ्याचे.

No. 71] *[23-6-1750*

श्रीशंकर.

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा्ा नमस्कार विनंती. प्रार्थना यैसी जे. येथील वर्तमान ता्ा छ २९ माहे रजबू जाणून येथास्तित आसो विशेष. राजश्रीनी काल राजश्री नानास सागून पाठविले कीं संतूबाईस सोडून देतो. ज्याप्रा्ा पूर्वी सेर देत आला त्याजप्रा्ा आताहि देणे. त्यासी याणी सांगून पाठविले कीं तुम्ही खावंद आहात. ज्याप्रा्ा चितास येईल ते करणे. आणि सांगून पाठविले कीं दरबारास येणे. याणी जाब सागून पाठविला कीं, आम्ही विनंती करावी आणि तुम्ही मान्य न करावी. याजसाठी चितास येईल तैसा तुमचे तुम्ही कारभार करणे, यैसे सागून पाठविले. याउपर काल आस्तमा(नी) जिंतीच्या मजकुरा-साठी बुऱ्हानजीबावा व सिदभटजी यैसे गेले होते. त्यासी यैकत नाही. साम दामहि जे सांगावयाचें तें जाले. पुढे खावदाची आज्ञा ज्याप्रा्ा येईल तेणे प्रा्ा वर्तनूक करतील. आज रा्ा रघोजीबावा जाऊन बसनार आहेत. समागमे रा्ा नानास व रा्ा गोविंदराव यासी व रा्ा येशवंतराव यासी घेऊन जाऊन तीन च्यार गोष्टीचा निर्गम करून घेऊन उठावे हा येत्यर्थ केला आहे. येक जिंतीचा हातरोखा व कडवलीतची देशमुखीचा हातरोखा व रा्ा बाबूजी ना्ा यांची वस्त्रे व आपले रुकसतीचा प्रसंग आज करून घ्यावासा निश्चये समस्तानी केला आहे. जर ह्या गोष्टी राजश्रीनी यैकून केल्या तर उतम आहे; नाहीतर समस्तानी मंडलीसुधा उठोन साहेबापासी यावे, हा मजकूर आडलतो आणि उदईक रघोजीबाबा येथून कूच करावयाची तजवीज आहे; मग रुणानबंद. शहरामधे तमाम जितके राजश्री कैलासवासी त्यांच्या बटकी चाकर नफर व गरीब गुरुब जे आहे ते नित्य उठोन, राजश्री नानाकड व राजश्री रघोजीबावा याजकड येऊन गवगवा करितात की आमची काये गत्य करितात? आणि रघोजीबावास म्हणत आहेत की तुमचे कूच ज्या समई होईल तेव्हा आम्हास समागमे घेऊन जाणे, नाहीतर आपल्या हाते मारून जाणे, यैस्या बटकी बोलतात. प्रतिनिधी नित्य जातात व प्रतिनिधीकडले गोपालराव यासी वालीत पडले. घरामधे विनंती. न निघाली यैसे वर्तमान आहे! माहाराजास कलावे म्हणून विनंती करावयास राजश्रीं सेवेसी श्रुत होये, हे विज्ञप्ति.

पत्र रात्रीं आले कीं, मोरेश्वर *describes to the Peshwa the disordered state of* उतरीत तें करणे, म्हणून *quent upon the regime of Ramraja. The attendants of* जाबसाल करीत नाही. उपर *th male and female—approached Raghuji Bawa with affair of maintenance. Ramraja has expressed* दर्याबाईच्याच सरंजामाचे बोलू लागे. *dare to release Santubai.*

653

No. 72] *[26-6-1750*

श्री

आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक साा नमस्कार विनंती प्रार्थना ये(सीजे). छ २ रोज मगलवार दीड प्रहररात्र * * * * (य)थास्तित आसो विशष. ये(थील) सेवेसी राजश्री वाबूरावजी पाठविले आहेत. ते भोयेंजवर येऊन उतरले आहेत. त्यासी समस्त पचायेत्न मिलाले व रघोजी-बावाहि होते. त्यासी चवघाचे मते यैसे ठरले कीं श्रीमंतास कागद ल्याहावे. त्यांचे उतर आलियावर ज्याप्राा आज्ञा करतील त्याजप्राा वर्तनूक करावी. त्यासी राा बाबूरावजीकड कागद लिहून पाठविला कीं तुम्ही भोयेजवरच दोन दिवस आसणे; आणि राजश्रीनी येका दोघाजणास * * * रावजी व रामाजीपंतास येकांती नेऊन वहुत * * * * केला कीं नानास जाऊन * * * * * * * वी यासी पत्र लिहून पाठ * * * * * * (आ) ईसाहेव व तुम्ही ज्याप्राा आज्ञा (क)राल त्याप्राा वर्तनूक करून म्हणून सांगितले आहे व राजश्री गोविंद [पुढील एक बंद गहाळ] त उडाली आहे की पेशवियाणी संभाजी राजे यांचा पुत्र नेला म्हणून बहुत हुलड उडाली आहे. हे वर्तमान राजश्री * * * * * ले आहे त्याजवरून वहुत * * * * * वर्तमान यैकतो या * * * * * * * हेत म्हणून वदंता आहे. यैकिले वर्तमान ते महाराजांचे सेवेसी विनंती पत्र लिहीले आहे. सत्यमिथ्या ईश्वर जाणे व राजश्री रघोजीबावास आज्ञा देत नाहीत. म्हणतात कीं आईसाहेवास आणलियाउपरी मग तुम्हास निरोप देऊ. त्यासी राा रघोजीबावाची ता.....आहें येथे राहावयासी हैराण आहेत आणि बाहेर त्या.....आहे चादे येथील राजा.....याची जलदी आहे आणि खर्चा..... .....आहे यैसे वर्तमान आहे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहीणे. हे विनंती.

¶*A fragmentary letter describing the disturbed state of things at Satara.*

No. 73] [पौ 27

छ २ शाबान. अथ+ स्वामीनी +सेवेसी श्रुत

श्री

पुा तिर्थरूप राजश्री नाना ता राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. उपरी, राजश्री बाबूजीनाईक यांस काल *bent upon defeating* येऊन बसोन कारभार करावा, राजश्री संभुसिंग + पत्र पुरंदऱ्याचे.

बाबाजी जाधव व दर्याबाई वगैरे ज्यांस स्वामीनी सरंजाम जो नेमला आहे त्या यादीप्रमाणे तमाम हातरोखे करून द्यावे व राजपत्रांची परवानगी द्यावी, घरकडहि बारीक मोठा सर्व कारभार करावा, पांच सात महिने वखेडियाखालीं गेले, याउपरी दिवसगतीवर न नेतां निकडीने कारभार करावा, वरचेवरी येक येक मजकूर उरकीत जावा, ऐसे राजश्रीचें मानस. आजी दोनतीन बोलावणीं आम्हांस पाठविलीं. राजश्री गोविंदराव व राजश्री रामाजीपंत यांसच पाठऊन दिल्हे. यां उभयेतांजवल सदरहू मजकूर बोलिले. दुसरा मजकूर बोलले कीं, दर्याबाई रुदंती करीत येऊन बसली आहेत. बिडाहून त्यांचे मामलेदाराचा कागद आला कीं, अमल बंद केला म्हणून. त्याजवरून श्रमी होत आहेत. तर त्याची वाट कसी काये करणे असेल तसी करा. बयाचा नवा सरंजाम आधी करून द्या. देत नसाल तर तसेच सांगा. आपण बयासमेत तुलजापुराकडे उठोन जाऊ, असें केवल त्रासयुक्त भाषण केलें. सारांष, दर्याबाईचा सरंजामाचा आग्रह फार फार आहे. याचे उतर स्वामीनी पाठवावे त्याप्रो करूं. स्वामीनीं याद पाठविली ती अद्यापि राजश्रीस श्रुत नाही केली व पत्रहि गुजरानले नाहीं. अतःपर आज्ञा जाहाली तर यादीचा मजकूर बोलू. बेरंग होईलसे दिसते. कलले पाहिजे हे विज्ञापना.

¶*The letter narrates the state of things at Satara. The King has given the robes of honour to Babuji Naik. He also wants to pass orders regarding the grants of inams to Jadhav, Pangaonker and Daryabai. The King is very particular about the grant of inam to Daryabai. If it is not passed by the Peshwa, he says he will go back to Tuljapur along with his sister.*

No. 74] [पौा *27-6-1750*

छ ३ शाबान.

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना

ता राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. उपरी, राजश्री येमाजीपंताचे मुले माणसांचे मुक्ततेचा अर्ज राजश्रीस करावयास राजश्री रामाजीपंतास पाठविले. यानी जाऊन अर्ज केला कीं, श्रीमंता पत्र रात्रीं आले कीं, माहाराजांस अर्ज करून येमाजीपंताचीं मुलेंमाणसे खालीं उतरीत तें करणे, म्हणून बोलिले. त्याजवरी बोलिले, श्रावणमास या गोष्टीचा जाबसाल करीत नाही. उपरांतिक काये तो जाबसाल सांगू. इतके बोलून दर्याबाईच्याच सरंजामाचे बोलू लागले. तो मजकूर अलाहिदा लिहिलाच आहे.

त्याजवरी मागती रामाजीपंतानी अर्ज केला की, त्याचे मुलामाणसास बरे वाटत नाहीं, खालतीं उतरावीं. त्याजवरी बोलिले, मुलकांत धामधूम केली; लट नागावा नेला; ठाणी द्यावीं तीं देत नाही; याची वाट काये? त्याजवरी यानी जाबसाल केला कीं, सर्व गोष्टींस आम्हीं खावंद आहोच. त्याची चिंता काये आहे? मुलास बरे वाटत नाहीं, त्यांची उतरावयाची तजवीज करावी. त्याजवरी राजश्री बापूजीबावा व गोविंदराव हे उभयेता जवल होते, हेहि बोलले, त्यांची मुलेंमाणसे उतरावयाचा हुकूम द्यावा. नाहीतर आम्हांवर अपेश येत आहे. त्याजवरी राजश्री बोलिले, तुम्हावर अपेश काये? तुम्ही त्याचे काये केले? त्याणे तुमचे काये केले आहे? आम्ही गडावर गेलो होतो, ते दिवसी त्याची आमची गांठ पडलीच होती. त्याणे आम्हास पुसिले, खालीं आम्हांस उतरावे. त्यास आम्ही जावसाल केला कीं, तुम्ही खालते असिलेस तर सारखेच, वरते असिलेस तरी सारखेच, असे बोलले. तो आजारी नाही. बरा आहे. इतका मजकूर जाला. राजश्रीची मर्जी! दर्याबाईचा जुना नवा सरंजाम व पानगांवकरांचा सरंजाम आधी करून द्यावा. तरीच संतोष. नाही तर सर्व कारभार व्यर्थ आहे. तर दर्याबाई व पानगावकर व वरकडांची करारी आपण केल्याप्रा। उरकावयाची आज्ञा दृढोतर विचार करून ल्याहावी. यास आपण कदांचित सरंजामाचेविषीं परियाये लिहितील तर राजश्री आइकणार नाहीत. दर्याबाईस व पानगांवकरांस हातरोखे करून देतील, असा भाव दिसतो. कलले पाहिजे, हे[+] विज्ञापना. येमाजीपंताची माणसें सोडीत नाहीत. कदाचित दर्याबाई व पानगावकर यास सरंजाम करून दिल्हा तरी आमचे हवाला माणसे करतील तर न करले. करावे हे विनंती.

¶*Ramraja refuses to set free Yamaji Shivdev's family from the fort of Satara.*

No. 75] [*After 22nd June 1750*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना ना।

राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, राजश्रीचे कर्ज बारावयाचा यैवज स्वामीनी मान्य केला. त्या यैवजी कैलासवासी राजश्रीनी राजश्री सुकानंद यांस सात हजारांची वरात

+ पत्र नाना पुरंदरे याचे.

आपणाकडे दिल्ही, ती आपण येथें असतां घेऊन मुदतीप्रो पैका द्यावयाचा सावकारचा हवाला घेतला आहे. त्यास सदरहूपैकी चहू हजारांची मुदत जेष्ट अखेर होऊन गेली. ज्याचा सावकाराचा हवाला घेतला तो नित्य मागावयास येतो. ढालढकल करून येक महिना रेटला. याउपरी सदरहू यैवज द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. विदित जाले पाहिजे.

¶*Purandare urges Nana to pay off the instalments of the debts of Ramraja.*

No. 76] *[June 1750*

श्री

पु॥ सेवेसी विज्ञापना. दिनचर्येचे वर्तमानः राजश्री स्वामी आजी त्रितीये प्रहरी राजश्री रघोजी भोसले यांचे घरास गेले. त्यानी राजश्रीस पोशाक व पदक व सिरपेच व हती नजर केला. येणेप्रमाणे देऊन बहुमान केला. तेथोन बनसी-पुरीस समाधान नव्हते म्हणून समाचारास त्याचे घरास गेले. तेथोन रूपपुरी गोसावी पुसेसावलीकर याचे मठास गेले. त्यानी राजश्रीस घोडा नजर केला. विदित जाले पाहिजे. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Ramraja pays a visit to Raghuji Bhosle at Satara and befriends him.*

No. 77] *[June 1750*

श्री

पु॥ सेवेसी विज्ञापना. राजश्री भुइंजेस आईसाहेबाकडे गेले होते, तेव्हा रा॥ गोपालराव यांचे दंगियामध्ये रा॥ भवानीशंकर याजकडील शामजीपंत तेहि त्यामध्ये सामील जाले, तेहि दंग्यामध्ये सापडले. यास्तव मा॥रनिले रुसोन घरास आले. यास्तव राजश्री रघोजी भोसले याचे घरास जातेसमई मा॥रनिलेचे घरास राजश्री गेले होते. त्यानी राजश्रीस चोवीस मोहरा व घोडी येक व पोशाक यैसा नजर केला. विदित जाले पाहिजे. राजश्री फतेसिगबावाचे घरास समाचारास गेले होते. बावास बहुतसें बरे वाटत नाही. आजी पनास ढाल जाले. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Ramraja goes to Raghuji's quarters and receives Nazar from him. Fatesing Bawa is ill.*

+ पत्र नाना पुरंदरे.

No. 78] *[June 1750?*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना ताा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती. उपरी, राजश्री गोविंदराव यानी वर्तमान सांगीतलें कीं, राजश्रीनी येकांती हातरोखा राजश्री येमाजीपंतास पाठविला कीं, लाख दोन लाख रुपये कर्ज जालें तर चिंता न करणे, हिमत न सोडणे, तुमचे अवश्येक आहे, तुम्ही खामखा जुंझणे, म्हणून. राजश्री प्रतिनिधीनी अर्ज करून हातरोखा घेऊन पाठवून दिल्हा व प्रतिनिधीनी येमाजीपंतास सांगोन पाठविलें कीं, तुम्हाकरिता हती घोडी सर्वस्व दौलत भरीस घालून तुमचे साह्ये करूं. तुम्ही काहीं चिंता न करणे, हिमत न सोडणे, असेंहि सांगोन पाठविलें म्हणून आइकलें. हे विज्ञापना.

¶*Purandare to Nana and Bhau at Poona, communicating Ramraja's encouragement to Yamaji Shivdeo to fight (the Peshwa ?)*

No. 79] *[June 1750*

[पहिला बंद मिळाला नाहीं.]

२

—अन्वयें काही उदास नरम गरम रामाजीपंताहाती वोलविलें. याजवरहि राजश्रीनी पाठीमागें भाषण केले ते कोठवर काय ल्याहावें ? सारांश राजश्री परिछिन्न चिताचा खोटा कपटी. स्वामीच्या लक्षावर न चालावे हेच चिताची वासना हे पुर्तें कलो येते. नवे प्यादे आरब ठेवितात; ठेवले (त्यांस) आपल्या जवलून पैका देतात. 'जुने माझे येक कामाचा नाहीं. चट दूर करीन. माझ्या खातरेस येईल त्यास ठेवीन' असे वोलतात. वरकड जितके शाहूमाहाराजाचे आहेत त्यास म्हणतात की 'तुम्हीं ब्राम्हणाचे मंडलीत मिलला. माझे कामाचे नाहीत. माझे असला तर क्रिया द्या;' असे लाहानापासून थोरास चौकीदारासदेखील म्हणतात. कोणी कोणी इमानप्रमाण राजश्रीस देतात. नवे लोक ठेवतात त्याजवलूनहि इमाने घेतात. वाड्याभोवत्या चौक्या वाटून देतात. बंदोबस्त करतात. काल आम्हास राजश्रीनी सिदभट व शामराऊ व चिंतोपत याजबो सांगून पाठविले की माझा वंदोबस्त करणे तर करा; नाहीतर मी पुण्यास जातो. नाना मी येकच आहें. मी आपला कारभार करून घेईन. दर्याबाईचा सरंजामाच्या यादी करार करून देणे तर द्या, नाहीतर काय ते सांगा, यैसे सांगून

पाठविले. आम्ही उतर माारनिलेसी केले कीं जसी खावंदाची मर्जी असेल तसें करावें. आम्ही चाकरलोक आहो. वारंवार असे करा तसे करा म्हणावे, हर्दम[1] खावदासी जीत[2] करावी, माहाराजास आम्ही सांगतो बोलतो हे वाईट यैसें भासतें; तेव्हा कोणे प्रकारे अर्ज करावा? जसी मर्जी असेल त्याप्रमाणे करावे असे बोलला. आणिक काय बोलावे? बोलून काय होतें? साफ कपटविषय; तेथें आम्ही चांगले बोललो तर कोठे मानते? मानत नाहीं. याप्रकारचा विचार आहे. राजे दर्याबाईस घेऊन पुण्यास येणार आहेत; कलले पाहिजें. फतेसिंगबावा सर्व प्रकारे स्वामीचे म्हणवितात. दुसरा अर्थ किमपि नाहीं. दो चो दिवसा पुण्यास येणार. येतील. जसी स्वाम आज्ञा करतील तसी वर्तणूक करावयासी राजी आहेत. स्वामीनी सर्व प्रकारे कृपा करावी; उचित आहे. हे विज्ञापना.

¶*Purandare to the Peshwa: says that Ramraja is playing false and is self-willed; that he intends visiting Poona with Daryabai and upsetting the plans of the Brahmins.*

No. 80] [*June 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना
व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी,

विनंती. उपरी, स्वामीनी लिहिले की पेशजी आम्ही व राजश्री बाबा[3]नी हावं[4]भरी न होणे म्हणौन लिहिले होते, त्याजवरून तुम्ही मलमलीत भाव धरला आहे, तरी ती गोष्ट कामाची नाही. तेणेकरून बहुत लक्षात अंतर पडते; यास्तव ठासाची सूत्रे राखून ठेवणे म्हणौन आज्ञा. ऐशियास उभयेतांचे आज्ञेवरून मलमलीत भाव धरला होता. परंतु राजश्रीनी कारभार तुमचे विचारें करतों, वसोन कसे करणे तसे * * * याप्रो बोलले. तो अर्थ स्वामीस लिहिला की, राजश्री नरम येऊन बोलतात. हाच विचार करणे असेल तरी राजश्रीसी कसे बोलावे, सलूक कसे करावे, ते ल्याहावे. त्याप्रो बोलोन करू. हे करणे नसेल तरी तैसेच ल्याहावें. राजश्रीच्या मुली व बाईका घेऊन येऊ. त्याचे उतर स्वामीनी लिहिलें की, असेच राजश्री बहुत वेल बोलले आण शफत केली ते प्रमाण कोठे जाली जे[5] आता होणार? जर राजश्रीनी आमचे विचारें कारभार करणे तरी दर्याबाईस लाऊन द्यावी, पानगावकर कुल काढावे

---

१ प्रतिक्षणी. २ आग्रह.
३ महादोबा पुरंदरे. ४ महत्वाकांक्षी. ५ जे = ते.

तरीच प्रमाण, नाहीतर प्रमाण नाहीं. त्याजवरून राजश्री गोविंदराव व रामाजीपंत याजसमागमे याप्रो सांगोन पाठविले. त्याउपरी राजश्री बोलले. पुण्यास जावयास निघाले. रघोजी भोसले याजवर मध्यस्ती येऊन त्याणी आपला निकाल काढला, हेहि लिहिलेच आहे. सांप्रतचे पत्रात तरी मलमलीत प्रकार कामाचा नाही म्हणोन साफच स्वामीनी लिहीले. तरी उतम आहे. राजश्रीस आधीच बुधीचा प्रकाश नाही! त्याजमध्ये क्षुलकाची प्रेरकता!! आज सात महिने राजश्री[1] लेंग धरून करू लागले लागले. येक दुसरा दिवस चाललें. काही कारभार केला. मागती तिसरे दिवसी फिरला. याजप्रमाणें आज सात महिने होत आले. पुढे निरंतर तोच भाव. यात स्वामीचे मात्र स्वरूपास हान की, येवढे मातबर व सर्व गुणें पूर्ण आणि बंदोबस्त न होय. दुसरे ज्या ज्यासी करार बोलणे जालें ते येऊन काय म्हणून पुसतात. त्याजवल खाली पाहावें, इतकाच अर्थ जाला. राजश्रीस, मी होतो कोठे, आणून कोण्हा पदावर बसविलें, हे भानच नाही. जी अवस्था पूर्वाश्रमची, तेच अद्यापि कल्पितात. लजेचा त्याग असता, तरी शरम येती ते गोष्टच नाही. ऐशियास आम्ही मलमलीत भाव बोललो. राजश्रीनी बोलले ते लेहून स्वामीस पाठविलें. परंतु सूत्रे राखून ठेविलीच होती व उतम प्रकारे आहेत. आणि स्वामीनी करणे तरी उतम प्रकारे करावेच करावें. कृष्णेवर आले त्या दिवसापासून जाले असते तरी बहुत उपयोगात पडते. तेव्हा सेणाचे होते, आता मेणाचे आहे; पुढे लोखंडाचे होईल! हे[+] विनंती.

¶*Purandare to Nana. Being asked to deal firmly with Ramraja, Purandare says that the latter is fickle and vacillating: that he must be quickly restrained or he may grow more troublesome soon.*

No. 81] *[June (?) 1750*

श्री

पु॥ सेवेसी विज्ञापना. सांप्रत पुणियास स्वारी होत आहे. या निमित्यें-करून राजश्री स्वामी राजश्री येशवंतराव व राजश्री गोविंदराव व राजश्री नागोराव यांचे व आमचे गला पडोन, खर्चास मागतात. आम्हांजवल दाहा हजार रुपये मागत होते. आम्हीं साफ उतर केले, श्रीमंताचे आज्ञेविना आंम्ही कोठून द्यावे? आम्हाजवळ येक रुपया नाहीं. येशवंतरायांस लाख पनास हजार द्या म्हणतात. त्यानी जावसाल केला, लाख पनास हजार कोठून द्यावे? तेव्हां राजश्री बोलिले,

---

१ कोणत्याहि पक्षाचा संबंध. + पत्र नाना पुरंदऱ्याचें.

कर्ज घेऊन द्या. काम चालवा. त्याजवरी यशवंतरायानी पागा, पीलखाना व गीर्दी[1]च्या लोकाचा रोजमरा, माहाराज पुणियाहून येत तोंपर्यंत चालवितों, आणिक कांहीं नाहीं, असे कबूल केले. गोविंदराव बोलले आम्हाजवल यैवज कोठील? आम्ही कोठून द्यावा? तसेच नागोरायाकडील जाबसाल, वरात चिठी पाहिजे. ज्यास देवाल त्यास वरात करून देऊ. रोख रुपयाचा मजकूर आम्हांकडे नाहीं. वरात द्यावी घ्यावी तर रुपया येणें हे विदितच आहे. त्याचाहि जाबसाल याप्रों शुष्कच उरकला. येशवंतरायाचा गला धरितच आहेत. पंचवीस पनास हजार कर्ज मेलऊन द्या म्हणतच आहेत. कसे होईल तें पाहावें. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramraja at Satara being in great straits for want of funds to pay his establishment and current expenses, presses several prominent persons at court to lend him money.*

No. 82] [*June (?) 1750*

श्री

पु॥ सेवेसी विज्ञापना. आजी दोनच्यार घटका रात्र जालियावर आम्हांस व त्रिवर्ग कारभारियांस राजश्रीनी बोलाऊन नेऊन घेऊन बसोन खर्चावेचाच मजकूर बोलिले. राजश्री येशवंतराव व राजश्री नागोराव यांजवल बहुतच गलां पडिले. कर्जवाम यावर तजवीज करून पैका मेलऊन द्या म्हणून बोलिले. तेव्हां येशवंतरायाजवल राजश्रीचाच काहीं यैवज होता तोच वीस हजार रुपये कर्ज द्यावयास कबूल जाले. तसेच नागोरायाजवल इंदापूरपैकीं पांच हजार रुपये यैवज जमा होता ते व विठोबा नाईक वांकडेपैकीं पांच हजार व किरकोल लोकांकडील नजरेच्या यैवजी असे मिलोन वारा पंधरा हजारपर्यंत नागोबानी द्यावेसे केले. त्यापैकीं येक हजार रुपये केसरकराकडील नजरेचे, ते तुम्ही द्या म्हणून आम्हांस म्हणो लागले. आम्ही साफ सांगितले, आम्हास येक रुपया म्हटले तर मिळत नाहीं! इतका मजकूर जाला. विदित जाले पाहिजे. सेवसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Ramraja presses several persons to pay him funds.*

---

१ चौकीच्या.

२ नागोराम लपाटे देशमुख, याचा भाऊ देवराव मेघश्याम–कुंगावकर—दे. ऋ. ब्रा. नागोराम भागवत हा इसम वेगळा. तो वामोरीकर व कोंकणस्थ. + रामाजीपंताचें हस्ताक्षर.

No. 83] *[June 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी,

विनंती. उपरी, सिहीगडकरी हवालदार व सेदीडसें माणूस खेरीज करून वरकड सर्व सलुखात आले. शामजीपंत वगैरे गडावरून आले. सरनोबत व नाईकवाडी येणार. मातुश्री आईसाहेबानीं जावें, राजश्रीकडील लोक उतरावें, आपले चढवावें, याप्रो अनुसंधान आले. यास्तव तीर्थरूप राजश्री नाना चांभारगोद्यांस गेलें. आम्ही व राजश्री बाबा याच मुकदम्याकरिता राहिलों आहों, म्हणोन लिहिले होते. त्याजउपरी काहीच वर्तमान लिहिले नाही. तेच राजकारण वलावले किंवा फिरले हे सविस्तर ल्याहावयास आज्ञा करावी. तीर्थरूप तिकडून कितीका दिवसांत येणार ? सरदाराचे समजाविसीचा विचार कसा जाला हे ल्याहावे. येथील विचाराची उपेक्षा न करावी. रघोजीबाबास आज रविवारी मुहूर्त उतम म्हणोन निरोप घेऊन बाहेर खेडाजवल जाऊन राहू म्हणत होतें. आम्ही आमवास्येपर्यंत राहाविलें. शहराबाहेरून तुमचे आज्ञेखेरीज पुढे जात नाही, परंतु घरातून वोढ पाडू द्या म्हणतात. आम्ही तरी राहाविलेच आहेत. स्वामीनी जर या मनसब्यास हाताचे पायावर घातले तरी मग येथे आम्ही तरी उगेच सारे वोढून उगेच सेवटी फिके पडावे ! ऐसे आसेल तर साफ ल्याहावे. उगेच राहू. हे विज्ञापना.

¶*Purandare inquires whether the settlement of Sinhagad has stood or failed,—Ramraja evacuating and Tarabai occupying it. He also asks whether he should allow Raghuji to proceed to Poona.*

No. 84] *[30-6-1750*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नानासाहेब व ताा राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक साा नमस्कार विनंती. प्रार्थना ऐसीजे. येथील क्षेम ताा आशाड सुद अष्टमी शनवार प्राथकाल जाणून स्वामी-कृपेकरून यथास्तित आसो विशय. येथील वर्तमान राजश्री बाबूराव फडनीस येथे जे समयी ते समयी मोठी शहरात आवई जाली कीं आता शहर लुटले

+ पत्र नाना पुरंदऱ्याचें.

जाईल. आणि राज्यास धरावयासी आले म्हणून वर्तता. जितेक[1] तितके पुसावयासी येत कीं कैसे करावे ? तेव्हां राजश्री नानानी अवघियांची दिलदारी केली कीं तुम्ही काही चिंता न करणे. अद्यापि तरी राजश्रीस दहसंत आहे. ये तमाम लोकास रोजमरे आपल्या रोबरो देतात. आणि हजिरी गैरहजिरी आपले रोबरो पाहतात यैसे वर्तमान आहे व राा रघोजीबावा स्वदेसी व ये देशात गाव राहवयासी पाहिजे यास्तव दरबारास गेले होते. त्यासी याणी बावधान अगर वाघोली दोहीतून एक देणे. त्यासी राजे बोलले कीं विचारून गाव देतो. रघोजीबावा उठोन घरास आले. त्यासी याचे कबिले लस्करात आले होते तेहि जेउरास गेले. जातीनसी येक्या पालखीनसी येक घोडा यैसे हवेलींत आहेत. आज्ञेसाठी बहुत हैराण आहेत. येथून आज्ञा कधी होईल ते पाहावे यैसे आहे. राजेश्री रायाजी भोसले जे आले आहेत ते उपवासी मरतात. हैराण आहेत. याजला खर्चास नित्य उठोन मागतात. [+] व श्वारी न आल्यावर उदाजी चव्हानासी बोलले कीं उदईक आपण तुम्हासांगाते संरजाम देतो आणि येमाजीपंताच्या पुतण्यास मारुन काहाडणे. नाही तर आपण येतो. त्यास उदबानी जाब दिल्हा की आपणास काही संरजाम लागत नाही. साहेबी येथे राहावे आणि तमाशा पाहावा व येथे कितेक प्रकारे खूल माजले आहे आणि बुधीस भ्रौश रकारपूर्वकाच्या करितात. परंतु म्हराटा होऊन हा काल परियेत बावगी गोष्ट बोलवत नाही. त्या कुचिंध्यांत[2] पडत नाही. जर आज्ञा होईल तर मागाहून त्याचे नाव लिहून पाठऊन देऊ. त्रिंबकजी भोसले बावांस ठुमा देतात कीं वचनचलन होऊ द्या व त्यांला बावानी जाब दिल्हा कीं ते कागदी लिहिता न ये. सतरा जने सतरा गोष्टी सांगितल्या त्या काहीं मला ऐकने नाही. थोरले कैलासवासी राजश्री होते त्यांच्या जागे श्रीमंत आहेत यैसे बोलतात. आज आदितवारचे मोहर्त होते, परंतु काही आडतला पडला याजमुले मोहर्त टलले. पुढले रविवारी पाहिले आहे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar reports to the Peshwa the news from Satara, the principal items of which are, that there was some possibility of trouble arising from the arrival of Baburao Fadnis, but it was averted by Nana Purandare who put courage into the people ; that Raghuji demanded a village as a place of residence on this side, which was subsequently promised to him.*

---

१ जितके तितके = सर्व, सगळेजण, जो तो, + निराळा बंद.

२ गैरगोष्टींत, भानगडीत, वाईट मसलतींत.

No. 85] *[June-July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना

व तथा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी,

विनंती. उपरी, दर्याबाईकडील वातमीचे वर्तमान: राजश्रीचा व आपला जिवास जीव संकल्प आहे. पुण्यास राजश्रीस जावयाची सलाह त्यांणीच दिल्ही होती की रुवरू बोलावे म्हणजे पहिलील गोष्टी काढाव्या. यास्तव राजश्रीनीहि निघावयाचा सिधांत केलाच होता. मग ती गोष्ट राहून राजश्री रघोजीबावास मध्यस्तीस पाठवावयाचा विचार जाला हे वर्तमान पूर्वी लिहिलेच आहे * * * * * * * (सांप्रत ?) फारच ठास वसाविला, तन्मुळे शामरायाचे भाशण की, आम्हीं कधी जात नाही. आहों येवढियानसीच मरून वरे म्हणऊ. असेहि असोन आज बल त्याचे आहे. लाऊनच देतील तरी, आम्ही निंबाळकर आहो, जाधव आमचे सोइरे आहेत, सरलस्करावर दाहा हजार फौज ठेवितों. या राज्याचे जिवासाठी पंचवीस हजार फौज जथों. पेशवे काये आहेत ? श्रीमंताचे मनात हे काही नाही. करतात ते बाबा व गोविंदराव करतात. बरें, कसे करितों ते पाहा. अखेर श्रीमंत आम्हाप्रमाणेच करितील. याचे मात्र पारपत्य श्रीकृपें उतम प्रकारे करू. चिंता काये आहे ? येमाजीपंत हजार दीड हजार फौजेनसी आहे. उद्या त्यांसच आणितों म्हणोन वलगना करीत आहेत. त्याचे चितात सुप्रयुक्त किमपि नाहीं. सातारियावरील हवालदार आमचा मामा आमचे विचारास लागला म्हणोन सारे गडकरी व हर्कीम याणी त्यासी सतत लाविली आहे. अश्या समयात राज्यास घेऊन गडावर जाऊ लागलो तरी घेणार नाहीतसे दिसतें. असे सारे खेल याचेच आहेत, म्हणोन बोललें. याहिपेक्षा नाना प्रकारच्या गोष्टी बोलतात. दोनतीनसे राऊत आणिले होतें ते दोन तीन मजलीवर आलें आहेत. मारून कंडे[1] वेघवितो. (त्यानी) काये करणे आहे, म्हणोन लाहाने तोंडे थोर घास घेऊ लागले आहेत. काहि लिहिता गाठ पडत नाही. हे[+] विज्ञापना.

¶*Ramraja's obstinate measures against the Peshwa are reported to Poona by Purandare. Some men upon whose support Ramraja relied are mentioned.*

---

१ 'कंड वघितो' अशीं अक्षरें दिसतात. + पत्र नाना पुरंदऱ्याचें.

No. 86] *[June-July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व
तथा राजश्री भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती. उपरी, राजश्री काल बोलता बोलत की, डेरे बाहेर देतो. प्रतिनिधी ! तू भिऊ नको. माझे डेरेयाबराबर डेरे दे. याचा भाव रात्रौ बातमीने निघाला. डेरे बाहेर द्यावे, प्रतिनिधीनी फौज मेलवावी असे कबूल केले होते, त्याजवरून म्हणत होते. त्यास प्रतिनिधीचा निरोप राजश्रीस गेला की, असी फौज आपणास जमा होत नाही. आपणास निरोप द्यावा. खटाव प्रांती जाऊ. तिकडे फौज जमा करून इकडील बंदोबस्त करू. सिहीगडाकडे आपणास नेऊ नका म्हणोन, त्याजवरून राजश्री रागे भरले सिव्यागाली दिल्ह्या. राजश्रीचा भाव तोंडी मात्र पुण्यास जावयाचा. परंतु सिहीगडास जावे हा सिधांत. मातुश्री आईसाहेबास आणावयास दिनानाथपंत पेशजी पाठविलेच आहेत. हाली काल बाजीराव यादव याची रवानगी केली की, गोपालराव याजवर हात टाकला म्हणोन तुम्ही वाईट मानू नका. तुमचे ऊर्जित करीन. मातुश्रीसि ह र ता ने(हरतरेने ?) सांगा. इमान प्रमाण देऊन सिरवल अथवा सिवापुरास घेऊन या. तुमचे पत्राची वाट पाहातो. आपण तेथपर्यंत येतो, पुण्यास येत नाहीं. याणी जाबसाल उदंड केले की, माझे व गोपालरायाचे म्हटल्याने कसी येतात ? परंतु उकालच घेतला. सेवट आम्हास येऊन बाजीरावानी पुसिले. आम्ही सागितले की, जावयाचे कबूल करा. येतील तर घेऊन येईन; न येत तरी जाबसाल पाठवीन म्हणोन बोला. त्याजवरून बाजीराव सदरहूप्रो बोलले. त्याजवरून याची रवानगी जाली असें. आज स्वार होऊन येतात. रायाजीपंतास दोनसे प्यादा चाकर ठेवा म्हण [त] होते. ज्या त्यास फौज ठेवा म्हणतात. याप्रो येथील विचार आहे. कुलंकुला[1] नारोजी व माणकोपंत मिरवत आहेत. आज तरी जावयाची गरमी दिसत नाही. राजश्री गोपालराव माहादेव याणी सांगोन पाठविले होते की, आठ रोज राहिले. तहकीक होईल ते मागाहून लेहून पाठऊ. काल रात्री येशवंतराव व नागोजीराव उदंड बोलले. परंतु काही अनुमात्र पश्चाताप नाही. साबाजी नाईक निंबाळकर घरास आले म्हणोन कोण्ही वर्तमान सागितले. त्याजवरून त्यास यावयाविसी पत्र लिहिले आहे. आज प्रात:काली मुदबखाचा बोभाट आला, त्याजवरून रायाजीपंताकडून दोन खंडी दाणे देविले.

---

१ सर्वाधिकारी.

दौलतराव यासी बोलले, तुंम्ही कारभार तटा, किती दिवस तटता तो पाहातों. दगडास पान्हव येईल परंतु मजला येणार नाही. राजश्रीचे मते, सिंहीगडावर आपले लोक चढले आहेत. किल्यानी बल धरले आहे. आपण पाच सात हजार फौजेनसी जावे. वीसपंचविसाचे नाव घेतात. फतेसिंगबाबास म्हणतात की वीस हजार ठेवा. प्रतिनिधी दाहा. (असें) तोंडे माप आरंभिले आहे. आपणाकडील सरदाराकडेहि अंतस्ते माणसं पाठविली आहेत. ते हिंग लाऊन पुसणार नाहीत. परंतु स्वामीसी बंद बाधावयाच्या युक्ति मात्र करीत आहेत. कळले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Purandare to the Peshwa: says Ramraja is struggling to gather an army; that he is issuing orders to several of his Sardars to collect their forces ; and is trying to prevail upon the Peshwa's Sardars also to join him with their men.*

No. 87] [*June-July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरुप राजश्री नाना
व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी,

विनंती. उपरी, कैलासवासी राजश्रीच्या बाइका व मुली काढून लाऊन द्यावयाची आज्ञा. त्यास येथे सर्वांचे विचारें की, थोरला कारभार करणे, तरी यासच न्यावेसे काये आहे? यास्तव आजपर्यंत काढल्या नाहीत. पुढे जसी आज्ञा होईल तसी वर्तणूक करून. दुसरे येके पत्री स्वामीनी लिहिले कीं, दर्याबाईस त्यांचे जाहागिरीचे माहाल आहेत ते घेऊन त्याणी जावें. अथवा सरलस्कर सोमवंसी याबाबत सरंजाम घेऊन सुखरूप सरलस्कर करावें. तरी दर्याबाईनी सातारियास हवालदारासी नाते लाऊन राजकारण केले. हजार दोनतीन सरलस्करची फौजहि जमा करितील. ते, राजश्रीची इतबारी फौज, राजश्री धणी इतक्यानसी सर्वावर आक्रमसा[1] दाखऊन राज्यभार करितील. परंतु स्वामीचे हातचा लगाम जाईल. जरी स्वामी समूल वृक्ष काढतील तरीच ह्या राज्याचा लगाम स्वामीचे हाती राहातों. नाहीतर राहात नाही. हे बरे चितात आणावे. हे[2] विज्ञापना.

¶*Purandare writes that Ramraja tries to collect armed forces and conduct his administration on his own responsibility. The Peshwa is asked to take strong measures against him.*

+ पत्र नाना पुरंदऱ्याचें.

२ पत्र नाना पुरंदऱ्याचें.

१ जोर, धाक, जिंकण्याची इच्छा.

No. 88] *[June-July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व
तथा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी,

विनंती. उपरी, राजश्रीनी पिराजी नाईक यांस बोलाऊन आणिलें होते. आमचे मरणाचे सोवती आहा की नाही म्हणून पुसिले. त्यासी पिराजी नाईक यांणी जाबसाल उतम प्रकारें केलें. परंतु राजश्रीचे संभाराणाचा मजकूर, सिहीगडचे मजकुराप्रमाणें, मारावे मरावें, हाच भाव जाला. यास धाकटेबाईचे वाडियात येऊन राहावयास सांगितले. हे बोलले उगेच येऊन राहू. परंतु मरणाचे सोबती आम्ही नाही, ऐसे म्हणोन उठोन आले. आमचे घरास येऊन वर्तमान सांगितले. बसापाचे घराकडे व पुढें व थोरले देवडीकडे डेरे उभे करून तमाम लोकास चौकीस येऊन राहा म्हणून सांगतात. कोण्ही कोण्ही जाऊनहि राहातात. याप्रो करीत आहेत. डेरेयात व जवल जाऊन लोक राहिले तऱ्ही स्वामीचे लक्षात आहेत. परंतु स्वामीनी मात्र येक निश्चय केला पाहिजे. याउपरी बाकी काही राहिली नाही. काये तो विचार करून उतर ल्याहावें. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Purandare to Nana. Describes how Ramraja was struggling to assert himself.*

No. 89] *[June-July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. पेशजीचे पत्री स्वामीनी लिहीले की, राजश्री बोलतात ते प्रमाण होणे कलतच आहे. अविस्वासी कारभारात, कैलासवासी राजश्रीनी ज्याची निरवणूक करून दिल्ही त्या मुली व माणसें तेथे ठेवावी हे उतम नाही. यास्तव त्यास लाऊन देणें म्हणोन. त्यावरून फौज भुईंजेवरी होती ते सातारा काल रविवारी आणिली. तों दुसरी पत्रें संध्याकाली येऊन पावली. त्यात

+ पत्र नाना पुरंदऱ्याचें.

ठासाचाच भाव लेहून आला. राजश्रीस तरी नित्य कारभार करण्याची त्वरा. दोन च्यार बोलावणी पाठऊन रामाजीपंतास बोलाऊन नेऊन कारभार करावयास लावावे. करीत बसावें, तरी स्वामीची आज्ञा या प्रकारची. न करावे तेव्हा ठांस[1] बसवावाच बसवावा याप्रो करणे प्राप्त जाले. त्यास आज प्रातःकालीच राजश्री बापुजीबावा व रामाजीपंत या समागमे राजश्रीस विनंती करावयास पाठविलें. याणी पष्ट भाव राजश्रीस सांगितला की, माहाराज कारभार करावयास सांगतात; करावा तरी तेथील आज्ञा नाही. न करावा तरी साहेब करीत नाही म्हणतात. ऐशियांस जर दर्याबाई व नारोजी वगैरे काढाल तरी कारभार चालेल, नाहीतर चालणार नाही. आमचा रुसवा असोन कोण तुम्हाजवल बसतो? कारभार साहेब आणि ते कसा करतो पाहू म्हणून बहुत बोलोन, उठा, कोण्ही वसू नका, ऐसे बोलोन जवल होते ते सारे उठविले. त्रिवर्ग कारभार बापुजीबावा दौलतराव आदिकरून सर्व आणिले. कोण्ही जाऊ दिल्हे नाही. गोपालराव महादेव याणी दाणा बंद तरी केलाच होता. वराडचे यैवजी काही रुपये देऊन रोजमरा राजश्री वाटणार होतें, ते देखील बंद करविले. परंतु अनुमात्र क्षित नाही. देवढीपुढे डेरे उभे करून तेथे चौकीस लोक बसवणार. रात्रीच्या चौकी पाहाऱ्याची बंदोवस्ती करावयांस लागले आहेत. फौज येऊन जवल उतरली. ठास दोन तीन वेल बोललो. याजउपरी काही बाकी राहिली नाही. याउपरी च्यारी सूत्रे लागू करून जिकडील तिकडे ठास वसऊन करता उतम. नाहीतर दोघी बाईका व दोघी मुली व येक दोघे कारभारी व जे येतील ते आम्हावरावर घेऊन आम्ही उठोन यावे इतकेच होईल. स्वामी म्हणतील की येवढे काय थोडे? तरी हे काहीच नाही. दरमाहा बंद केला आहे. चरितार्थ कसा चालेल? तरी आम्ही उठोन आलो, येथे राहणार ते राहिले, त्यांस राजश्रीची मर्जी रक्षणेच लागेल. येक स्वामीचा दरमाहा खेरीजकरोन जो असेल येवज तेवढियातच संपादून राजश्री घेतील. सातारियाचे राजे होऊन बसले तऱ्ही यास क्षित नाही. परंतु स्वामीचा लौकिक काये राहिला तो स्वामीनीच पाहावा. हे[+] विज्ञापना.

¶*Purandare is asked by the Peshwa to be very firm with Ramraja. Purandare has given Ramraja definitely to understand that he will manage his affairs and pay attention to his administration provided he (Ramraja) sends Daryabai and Naroji away from his court.*

---

१ धाक.

+ पत्र पुरंदऱ्याचें.

No. 90] [*June-July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना
व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दर्याबाईस काढावयास पिराजी नाईक व जानराव व तुकाराम नाईक मुतेवजे[1] आहेत. म्हणतात की, तुम्ही पाठीवर असा. बोलोन अथवा हाती धरून त्यांस आम्ही लाऊन देतों. नारोजी वगैरे काढावयाचा मजकूर तरी हुजरातीपैकी मोगलिये अन्नास अजीजे[2] जालें आहेत. पोटासाठी गलाच पडणार. त्यास लाऊन दिल्हे तरी आज हाती धरून बाहेर काढतों. मागील बाकी आम्हास द्यावी. राज्यास दरकार नाहींच. हर कोठे पोट भरू. त्यास आश्वासन दिल्हास आज करतात. राजश्रीचे मायेचे सेखमिरा व त्रिंबकराऊ त्यांस दरबारचे वर्तमान कलल्याउपरी आम्हाकडे आले होते. आम्ही वर्तमान सांगितल्यास, या कामात काये चिंता आहे? आम्ही करतों, असे म्हणतात. बरकड पेशजी लिहिल्याप्रो॥ उदाजी चव्हाण वगैरे सिध आहेतच. याप्रकारें हे सिधता करून ठेविली आहे. आपले विचारास आलियास पत्राची याददास्त लिहिली आहे, त्याजप्रमाणे पत्रे लेहून पाठवावी. करणे असेल तरी करावें. नाहीतर साफ लेहून पाठवावें. आम्हास यावयाविसी ल्याहावें. आम्ही जे आपले मायेचे असतील त्यास घेऊन येतो. त्याचा सर्व भार आजवर स्वामीवर आहेच. कैलासवासी माहाराजानी चालविले त्याजप्रमाणें स्वामीनी त्याचे चालवावें. सुखरूप असतील. दर्याबाइचे सरंजामाची जप्ती स्वामीने करविली आहेच. त्याच प्रकारावर देहावर येऊन स्वामीची गरज आहे असे कल्पून स्वामीसी बोलावयास येणे तेव्हा येऊन बोलतील. स्वामी व राजश्री येक होतील, हे[+] विज्ञापना.

¶*Purandare submits to Bhausaheb for his approval, his plan for removing Daryabai from the affairs of Satara. Piraji Naik, Janrao and Tukaram Naik have, he says, undertaken to do this. Shaikh Mira and Trimbakrao have also joined. If the plan is not approved, the writer is prepared to go back to Poona with his men.*

---

१ उद्युक्त.

२ दीन ; लीन.

\+ पत्र पुरंदऱ्याचें.

No. 91] *[June-July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. सूत्रें आम्हाजवल आहेत तीं उतम प्रकारची आहेत. राखून ठेवावयाचा विचार तरी, (सूत्रें) राखून ठेवणें हे फौज आली नव्हती तोंपर्यंत होती. फौज आली. स्वामीनी राजश्रीजवल बोलावयांस सांगितल्याप्रमाणें बोललों. कर्तव्यभाव जवन्य जाला. याउपरी त्वरेने करता उतम. नाहीतर सूत्रे कसी राहातील ? गोष्टीची फायर्श[1] जाली, काही बाकी राहिली नाही. आपणाकडील विचार कलल्यावरून तिकडील विचाराचे आपलाले विचार पाहू लागलें आहेत. तेव्हा अर्थातच गोष्ट करणे प्राप्त जाली. नाहीतर बाजी हातची जातें. राजश्री आपले विचारें करू(न) चालो म्हणतात, परंतु परिणाम नाही. आईसाहेबानी पुराणिक व अहिल्याबाई काढावी, आपण दर्याबाई व पानगावकर काढतों म्हणतात. हे सर्व मृशा आहे. प्रलापावर घालावें. कां की, आजपर्यंत आसेच होत आलें. आम्हीं कावा करावा त्याणी पड घ्यावी. मागती हे राजश्री, यांस काय करावें, याचे प्राक्तनी असेल तसें होईल, आपण च्यार कामें थोक थोर्के[2] करून निकाल पाडावा या लक्षे स्वामी करीत गेलें, तेंच त्यांस पाप वाटलें आहे. येणेकडून ते शाहाणे जालें. आपलाच कारभार निराला पडला तोच भाव यांचा आहें. स्वामीनी पुर्ते नेट धरून करावयाचा विचार लिहिला हा युक्त आहे. परंतु अद्यापिहि तेणेप्रमाणे जर जाला तरी उतम, नाहीतर काही नाही. हा राजा परिछिन्न स्वामीचे विचारें चालत नाही. किंचित बल जालियास स्वामीस स्वतंत्र असे जाणतों. स्वामीकडील सिलेदारापैकी बरें मर्द माणूस धनाजी थोरात, मुंले[3], दुसरे तिसरे जे कोणही येतील ते फोडावे, आणावे, चाकर करून ठेवावें ही वासना आहे. हे विज्ञापना.[+]

¶*Nana Purandare advises Peshwa to take strong measures against Ramraja: otherwise he says, he will soon assert his independence.*

No. 92] *[2-7-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती. प्रार्थना यैसीजे येथील क्षेम ता॥. आशाड सुद ९ नवमी रविवार अरुणोदयें

---

१ फायश = प्रसिद्धि, जाहिराणा.
२ थोक = मोठीं ? निश्चित, पूर्ण ?
३ मुळे ? आडनांव असावे.
+ पत्र नाना पुरंदरे याचें.

पावेतो येथास्थित असो विशय. येथील दरबारचा मजकूर तों राजश्री काल दोन प्रहरा राजश्री नानांकडे आले होते. त्यासी म्हणो लागले कीं आपण पुणियासी जातों व तुम्ही शकरची 'रदवळी (?) करणे आणि आम्हाखेरीज काही आऊसाहेब येत नाही. आम्हीं जाऊन आउसाहेबी पायावर डोई ठेऊन आणि राजश्री पेशवियासी येकूच गोष्ट सांगणे आहे ते सांगू आणि आईसाहेबास घेऊन येऊ. त्याजवरून राजश्री नानानी जाब दिल्हा कीं आपण जावे यैसे काये आहे. आम्ही अंसोन काये करावे. आम्ही व गोविंदराव समस्त मिळून मसलत करून आपणास विनंती करून; मग त्याजप्राा साहेबी करणे ते केले पाहिजे. जलदी न करावी. तेव्हा बोलले कीं मीं तर जाईन. मग हे म्हणाले कीं तुम्ही जाल, परतु वाटेत आईसाहेवानीं फौज बसविली आहे आणि हूकूम केला कीं कोन्हास येऊ न देणे आणि आपण जातील. परतु साहेबासमागमे जे कोन्ही आबरूचे माणूस जातील त्याच्या जीवास घात कराल यैसे सांगितले. मग राजे म्हणाले कीं मी दाहा माणसासी जातों मग कोन्हास मारतील. तेव्हा याणी जाब दिल्हा कीं आपण माहालास जावे. आपण राा रघोजीबावास बोलाऊन आनून व गोविंद-राव यैसे बसतो आणि साहेबास विनंती करतों ते मान्य केली पाहिजे. तेव्हा राजे माहालास गेले. मग समस्त मंडली मिळून मसलत केली कीं राा रघोजी-बावांस आज्ञा देववावी आणि राजश्री गोविंदराव व राजश्री नानानी व राा नागोराव याणी त्याचे समागमे जावे. श्रीमंत राजश्री पेशवियासी व आऊसाहेबास विनंती करावी. ते ज्या प्रो आज्ञा करतील त्याज प्रो राजश्रीस विनंती करून पाठऊन मग राजश्री बोलावयाचें असल तर बोलऊ; यैसा निश्चये केला मग दोन प्रहर रात्री मंडलीनें मिळून राा रघोजीबावांस रुकसत केले, येक दुपटा निंबोली पाघरविला. साहेबास कलावे म्हणऊन लिहिले आहे. मंगलवारचे मोहर्त आहे. माहाराजास कलावे म्हणून लिहिले आहे. सेवेसी श्रृत होय + बहुत काय लिहिणे हे विज्ञाति.

¶*Vyankatrao Moreshwar describes to the Peshwa how Ramraja was prevailed upon to cancel his plan of going to Poona with Tarabai. The writer further reports the departure of Raghujibowa from Satara.*

No. 93] [*3-7-1750*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. प्रार्थना येसिजे. येथील क्षेम ताा छ ९ माहे शाबान मंगलवार त्रितियेप्रहर पावेतों साहेबांचे कृपेकरून येथास्तित आसो विशय. दरबारचा मजकूर तो

कालपासून राजेश्रीनी दर्याबाईस वाडियात वेऊन आले आहेत आणि तमाम जितकी हुजरात होती तितकियासी ताकीद करून तमाम वाडियाभोंवती चौकी देवविली * * * * * * * * येक डेरा तो राज * * * दरवाजियाचे पुढे चबुतरे आहेत, त्या चबुतऱ्यावर दिल्हा आहे व दुसरा डेरा जेथे काला वाघ जेथे होता ते ठिकानी दिल्हा आहे. माणसे पटाईत व वरकंदाज वगैरे कैक वसविले आहेत आणि रात्री आपण च्याऱ्ही प्रहर रात्र जागतात. बरे वाटत नाही आणि जागतात. हाका आणि आरोल्या मारितात. वहुतसी खबरदारी करीतात आणि दर्याबाई(स) म्हणूं लागले कीं तुम्ही काही चिंता न करणे, माझा प्राण जेव्हा जाईल तेव्हा तुझ्या कोन्ही वाटे जाईल यैसे म्हणू लागले. आणि दर्याबाई म्हणती कीं पेशवियाणी माझी इकडे याप्रकारची गल्य जाली आणि मोगलाईत तो जागिरीपासून चेवलो यैसे दुतरफाहि बुडालो यैसे.

¶*Vyankatrao Moreshwar writing from Satara says that the King has brought his sister Daryabai into the palace and has taken precautions to post guards all round. Ramraja assures her that no one will harm her while he is alive.*

No. 94] [पो *5-7-1750*

छ ११ शाबान.

श्री[1]

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व तथा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. आजचे दरवारचे वर्तमान तरी कालपासून ठास उतम रीतीने वसला. त्याजवरून मल्हारपंत बाहेर राहात होता तो वाडियातच जाऊन राहिला. कालपासून हुजरातचे जमातदार सेखमिरा वगैरे व बाबाजी जाधव, पिराजी नाईक आदिकरून बोलाऊन नेऊन राजश्रीनी पुसिलें. सर्वानी येकवाक्यताच जाबसाल केला की, तुम्ही उतम रीतीने चालल्यास तुमचे सोबती. पानगावकर व दर्याबाईस रवाना करा, याप्रों बोललें. तेव्हा राजश्री फारच नरम पडलें. लाहानसानाचे तोंडची गोष्ट की, जर हे लौकर जातात तरी उतम; नाहीतर मारले जातात. दर्याबाईस हाती धरून लाऊन देतात. पिराजी नाईक तर हात घालून पालखीत वसवावयांस सिध आहेतच. असें चहुकडून काऊर उठलें. तन्मुलें दर्याबाईनी निघावयाचा निश्चय केला. शामराऊ बाबूराव यास मरणप्राय जालें. उभयेता पुढे येऊन किंचित राजश्रीजवल येकांत व निरोपाचा मजकूर केला, तों दर्याबाईहि वाडियात आली. मग हे उभयेता पडद्यावाहेर निघालें. मग बहीण-

---

१ ही पुढील नं. ८५ चे पत्राची पुरवणी आहे.

भाऊ येकमेकाचे गला हात घालून बहुत रडली. त्यामध्यें दर्यावाईनी वहुत ग्लान व कारभारियास सिव्या व स्वामीस दिल्हा. 'आपणास दौलत नव्हतीसी नाही. राज्या, तुझे वरे व्हावे, तुजला सिकवावें, म्हणोन मी आलों. सेवट माझीतुझी तूट पाडली,' म्हणोन बोलली. दोघी राण्याहि आल्या. असी चौघेजणें मागती रडली. असी घटका येकदोनपर्यंत अवस्था जाली, तो नारोजी आला. तोहि त्यातच मिलाला. त्याचेहि रडे पाहून मागती सारीच रडू लागली. नारोजीचा जप की, मी घरदार वर्ज करून तुजवल बसलों तुझे बरे व्हावे म्हणून. ते गोष्ट राहिली. याउपरी तुझी काय गत होईल कलत नाही. राजश्रीनी उतर दिल्हे की, माझी काही त-ही गत हों. परंतु तुम्ही सारे जा. मजवल राहू नका. येक बया मात्र मज[व]ल असो द्या. बया तुजला निरोप देत नाही म्हणून. त्याजवरून दर्याबाई बोलली की, याउपरी मजला राहाणे व तुजला ठेवणें उचित नाही. जर ठेविसील तरी तूहि जिवानसी जासील व मजलाहि गाढवावर बसोन फिरवितील म्हणून बोलोन उठली. पडदेयात गेलियावर शामराव व बाबूराऊ पडद्याबाहेर वैसोन रडत होतें तेहि राजश्रीजवल गेलें. मागती बोललें की, आता निरोप द्यावा, ठेऊ नये. राजश्री बोलले, तुम्ही सर्व जा. बयास निरोप (न) देत नाही. याणी उतर केलें की, तुम्हीहि ठेऊ नये आणि त्याणीहि राहू नये. त्याजउपरी राजश्रीनी सर्वास निरोप वस्त्रे देऊन रवानगीचा प्रारंभ केला. दर्याबाई व त्याकडील बाईका वगैरे यास वस्त्रें दिल्ही व नारोजी वगैरे यांसहि दिल्ही. दर्याबाईस येक हती दिल्हा. मागती राजश्री रात्रीचे दर्याबाईचे घरास गेले होतें. तेथेहि येकमेकें रडली. उदैक दर्याबाई निघोन जाणार. बुधास जाऊन च्यार दिवस राहावें असे केले आहे. स्वामीकडें भोजावा नाईक म्हणून त्याचा पोतदार आहे. त्याजबराबर पत्रें पाठविली आहेत. काय लिहिले असेल न कलें. त्याचे उतराचा मार्ग पाहावासी त्यांची वासना आहे. मग येथं पाहातील किंवा बुधास जाऊन पाहातील न कलें. जाले वर्तमान लिहिले आहे. पुढे होईल ते लिहिले जाईल. या कामास ठास बसलियास कसे होईलसे स्वामी चितात आणित होतें, ते स्वामीचे पुण्येंकडून अल्पायासेच घडोन आले आहे. याउपरी स्वामी पां कें[1] लू क चितात आणून विचार करितील तरी आमचा इलाज नाही. स्वामी तर थोर आहेत. परंतु येथे बहुतांची घरे बुडतील, यास्तव भोजावा नाईक याजवलहि जाबसाल उतम रीतीने करावा. +सेवेसी श्रृत होये, हे विज्ञापना.

¶*A pathetic farewell-scene between Daryabai and her brother Ramraja is described in this letter. The King was helpless before the peremptory measures of the Peshwa and his agents.*

---

१ दयार्द्रता(?)

+ पत्र पुरंदऱ्याचें.

No. 95] [पो॥ *5-7-1750*

छ ११ शाबान.

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना
व तथा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. दर्याबाई व राजश्री व इत्यादिकांचे रुदनप्रसंग व निरोपाचा अर्थ जाला तो तपसील अलाहिदा पुरवणीत लिहिला आहे त्याजवरून कलेल. त्याचमध्यें दर्याबाई राजश्रीजवल बोलली की, माझें सरलस्कराची काये वाट? राजश्रीनी उतर केले की, तुझे सरलस्कर कोण काढीसा आहें पाहातो. सरलस्कर माझें असू दें; म्हणजे मी तेथे तू येथें वरचेवरी खबर वर्तमान कलत जाईलच पुढे तुझें सर्वा कारभारियांचे विचारे होईल तरी मीहि येईन, याप्रों बोलली. याचा भाव, सरलस्कर आपणास आहेच तरी पाचसात हजार फौज जथोन मागती येथें यावें. प्रधानपंत काही घरी राहाणार नाहीत. हरकोठे मनसुब्यावरी जातील. मग आम्हास अडवा कोण येतो? राजश्री आम्ही तर येक आहोच. सातारियातील सर्वांची पारपत्ये करू, राज्यभार आटोपू, असा दिसतों. राजश्रीनी निरोपाचे समई राजश्रीनी यास सात वेल म्हटले की बया, तू जाऊ नको, तुजला कोण काय करतों ते पाहीन. तुझी मान खालती माझी वरती आहे म्हणोन बोलले. परंतु दर्याबाईनीच निकाल काढला. येथून हे माया सोडून जातील तेव्हा खरें. परंतु जातील. याउपरी राहात नाहीसे दिसतें. रायाजीपंत याणी चहू घटिका रात्रीस त्रिबकजी भोसले यास बोलाऊन आपले घरास नेले होतें आणि बोलला की, राजश्री परम दिलगीर आहेत. मन्हाठे अगदी मेले. रघोजीबाबाचा भरवसा मजला फार होता, परंतु तेहि ब्राम्हणाचे गांडीखाली सिरलें म्हणोन राजश्री म्हणतात. तरी तुम्ही व बाबानी या समई येक करावे की, प्रातःकाली दरबारास यावें आणि राजश्रीस विनंती करावी, दर्याबाईस निरोप देऊन रवाना करू नका; राहावा. आम्ही पुण्यास जातों. मातुश्री आईसाहेब व प्रधानपंत यांजवल बोलतो आणि दर्याबाई राहात ते करितो असे बोला आणि दर्याबाईस राहवा म्हणजे बाबावर राजश्री बहुत संतोशी होतात व तुमचाहि जिंतीचा[1] पेच चुकतो म्हणोन बोललें. त्रिंबकजी भोसले याणी जाबसाल केला की, दाहाबारा वर्षांचा वैरसंमध यासमई चुकोन येकात्मता रघोजी बावाची व प्रधानपंताची जाली आहे. ज्या मनसुब्यात ते तिकडें हे आणि या समई

१ भोसल्यांचे वतनी गांव.

रघोजीबावा अश्या कर्मात पडिले तरी जी या सर्वांची गत तेच रघोजीबावाची होईल, म्हणोन त्रिंबकजी भोसलें याणी जाबसाल केला. तेथें शामरावहि आले होते. रायाजीपंतहि त्याच कुटातील. लाहानसान कजियाचा उत्पात पहिले-पासून त्यास आहेच. शामराऊ याचे मंत्री रायाजीपंत होतें. यास्तव रायाजीपंतासहि हे राजकारण जरूर आहे. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*At last Ramraja's sister Daryabai was compelled to leave Satara. Purandare describes the scene that took place when Daryabai departed. The King was actually in tears. He said he would defy the Peshwa and compel her to remain. His advisers Trimbakji Bhosle and Rayaji wondered Raghuji Bhosle, the constant opponent of the Peshwa, suffered this without a word of protest.*

No. 96] [*6-7-1750*

छ १४ साबान.

श्री

तीर्थरूप राजश्री नाना व ताा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी. अपत्ये त्रिंबक सदासिव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ १२ माहे साबानपर्यंत येथास्तित असे विशेष. दिनचर्येच्या वर्तमानाच्या पुरवण्या आला-हिदा लिहिल्या आहेत त्याजवरून सेवेसी श्रुत होईल. येमाजीपंताच्या पोथ्याचा मजकूर तरी येमाजीपंत गेले ते समई सर्व पोथ्या आपलियाबरोबर घेऊन गेले. येथे कोठे ठेविल्या नाहीत याचा आम्ही पुर्ता शोध केला. अंताजीपंतास बोलाऊन आणून त्यास पुसिले. त्याणीहि शोध केला. परंतु कोठे ठिकाण नाही. जे समई गेले तेव्हाच बरोबर घेऊन गेले. सेवेसी कलावे. येमाजीपंत कडेगावास गेले ते समई पोथ्या बरोबर घेऊन गेले. तेथून सांगवलियास गेले तेव्हा बरोबर नेल्या. येथें कांही नाहीत. ×जुन्यानव्या पोथ्या अणानी नेल्या. वरकड कोठे कोणी पोथ्या नेल्या नाहीत. ठीक शोध लावला असे. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Trimbak Sadashiv to the Peshwa, reports that Yemajipant has taken away with him all the manuscripts (pothis). They could not be traced at Satara.*

+ पत्र पुरंदऱ्याचें.

× येथून पुढील अक्षर त्रिंबक सदाशिवाचें.

No. 97] *[6-7-1750*

पेा छ १४ सावान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजेश्री नाना व तथा राजेश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. आज सुक्रवारी तिसरे प्रहरी रा॥ इंद्राजी कदम व सुभानजी बोरगे फौजेनसी येऊन थोरले वाडियापुढें दर्याबाईचे घराकडे जावयाचे गलीपर्यंत उभे राहिले. मकुंदपंत व हरबा संतूबाईपर्यंत जाऊन मुलीस कडे घेऊन बाहेर आलें. घोडियावर घेऊन मागती बाजारातून गोटात गेले. हे फौज तयार होऊन येऊ लागली. तेव्हा तमाम शहरात माड्यावरून लोक तमासा पाहावयास उभे राहिले होते. तसेच किल्ल्यावरही लोक उभे राहून पाहात राहिले. राजश्रीचे चितात, आपणावर येतात, दर्याबाईस काढतात, असे जाणून तमाम पायचे लोकास दारू वाटली, जमा केले. तैसेच हुजरातचे जमातदारहि जमा जालें. आपले घरातील माणसे काढून नेली. याउपरी बाकी काय राहिली म्हणोन राजश्रीनी बहुत पावा केला. मारावे जुझावे म्हणालें. सेखमिरा, खंडेराव जाधव, बन्हानजी मोहिते, गोपालराव माहादेव, यांची त्यांची बोली फार जाली. अविवेके म्हणाल तरी आम्ही कोण्हीहि तुमचे नव्हें. विचारे वर्ताल आणि राजश्री प्रधानपंत गैरवाजवी म्हणतील करतील तरी आम्ही तुम्हापुढे मरू. तुमचे शरीक[1] आहों, अन्यथा नाही. ते काही तुम्हास दगा करीत नाही. कैलासवासी राजश्रीनी त्याचे हाती दिल्ही माणसें ते घेऊन जातात, तुम्ही का वाईट मानता, म्हणोन च्यार साहा घटका भाशण जालें. राजश्री राहून राहून फारच फुंद आणीत. मागती हे सारें याचप्रकारे बोलोन राहावीत. असें करून च्यार घटका रात्रपर्यंत बसले होते. निदानी सर्वानी वाडियात भोजनास म्हणोन उठऊन वाडियात लाऊन देऊन सारे आपले घरोघर गेले. गोपालराव व खंडेराव जाधव आमचे घरास येऊन वर्तमान सांगितलें. राजश्रीनी यास सांगितले होते की नानास जाऊन पुसा, असीच जबरदस्ती आणखी काही तुम्हास करणे आहे की काय ? याणी उतर केले की याउपर कशास ते सोखी करितील ? तुम्ही मात्र विचारे करून चालावें. आम्ही जाऊन त्यास सांगोन घरास जातों. याप्रो वर्तमान जालें. गुणवंताबाईचे घरास पालखी पाठऊन चिमणाजी बापूजीचे राऊत पाठविताच निघाली. लक्ष्मीबाई व गजराबाई यानी वोढून आणिले होते की, आम्हास च्यार दिवस लागतील. मग त्यांचे कारकुनास ताकिदीनें सांगून तीहि काढली.

---

१ शरीक–साथीदार; दोस्त.

याउपरी यांस बराबर राऊत देऊन वाटेचे साहित्यानसी पुण्यास रवाना करितों. या धुमेत राजश्री गडावर जाऊ म्हणत होते. परंतु जवलचे लोकानी वर्जिले. वंलगना फारच दरबारी राज्यानी केल्या. कलले पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Purandare writes to the Peshwa how Santubai, Gunavantabai, Laxmibai and Gajrabai were removed from the custody of Ramaraja, who did his best to prevent it, but was helpless as his own men flatly refused to obey his orders.*

No. 98] [पो॥ *8-7-1750*

छ १४ साबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. राजश्री रघोजी भोसले सेनासाहेब सुभा आज प्रातःकालापासून दोन प्रहरपर्यंत आमचे घरी येऊन बसले होते. राजश्रीचा निरोप घेऊन स्वार होऊन जावयाचा मजकूर केला. आम्ही उतम म्हणोन निरोप दिल्याउपरांतिक राजश्रीकडे जाऊन, पुण्यास जातों, मातुश्री सा (आ ?)ईसाहेबासी व राजश्री प्रधानपंतासी बोलोन जाबसाल पाठवितों, म्हणोन निरोप घेऊन दोन प्रहरानंतर सदरेहून परभारेच माहुलीस गेले. आज [मा]हुलीस राहातील अथवा जेऊरास जातील. आमचे घरी बसले असतां विष्णुपंत व नागोजीराव यांची देण्याघेण्यामुले कलागत होऊन येकमेकाचे आंगावर चालोन जाऊन हस्तव्यापार जाला. शब्दाषब्दी तर काही बाकीच राहिली नाही. देवराव याचा यैवज रघोजीबावाकडे येणे त्याचे खत देवराव यानी विष्णुपंताचे नावे करून देऊन विष्णुपंताजवलून ते खत विकोन पैका घेतला होता. रघोजीबावापासून निकाल न पडे. आम्ही देवराऊ यासच रुपये देऊ म्हणताच खत नागोबाजवल माघारे दिल्हें. पैका खरा करून द्या, नाहीतर तुम्ही निकाल करा म्हणतां कलागतीस येऊन याप्रकारे मजकूर जाला. विष्णुपंत बहुत दुखी. बहुता रीतीने आम्ही समाधान केले. ×सेवेसी श्रृत होय, हे विज्ञापना.

¶*Purandare informs the Peshwa of Raghuji's departure for Poona and also of an altercation that had arisen between Vishnupant and Nagojirao over some money affair.*

+ पत्र पुरंदऱ्याचे.

× येथून अक्षर निराळ्या वळणाचें.

No. 99] [गो*10-7-1750*

छ १६ शाबान.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व ताा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी विनंती. संतूबाई, लक्ष्मीबाई व गजराबाई व गुणवंताबाई गेलियावर दर्याबाईस भये उत्पन्न होऊन त्या दहशतीने दर्याबाईने आम्हाकडे आजी शामराव व बाबूराव व चिंतोपंत पाठविले की, तुम्ही सांगाल त्याप्रमाणें आपण ऐकतो. पानगावकर जितके आहेत त्या सर्वांस बाहेर घालिवितो. कोण्हा येकास राहो देत नाही. त्या सर्वांस मिलोन मांडव परगणा फतेसिंगबावाचा आहे तो द्यावा. तान्हजी सावतांस येका किल्याची हावलदारी सांगावी. नारूकाकास पालखी द्यावी. तो पानगांवास जाईल. आमचे सरलस्कर काईम राखावे. आम्हावरी सर्व प्रकारे कृपा करावी. सरंजाम पुणियांत देऊ केला आहे तो आमचा आम्हास द्यावा आणि पांच हजार रुपये पानगांवकराचे रवानगीस द्यावे. खर्चास देऊन त्याची रवानगी करावी म्हणजे राजश्री तुमचे ऐकतील, तुमच्या विचारांत राहतील, यैसे बोलिले. त्यावरी आम्ही त्यांसी उतर केले की, पानगांवकर सर्व आवघे लाऊन द्यावे आणि तुम्हास जोपर्यंत आम्ही राहा म्हणू तोपर्यंत तुम्ही राहावे. कारभारांत एकंदर मन घालू नये. जैसे चौघे सरदार राहतील त्याप्रमाणें राहावें. सर्व शाहू माहाराजांचे वेलेची मंडली आहे त्याणी कारभार करावा. त्याही मधे आमचे विचारे ठेवावयाचे असतील त्यास ठेवावे. निरोप द्यावयाचा असेल त्यास निरोप द्यावा, आणि आम्हासी सरलतेने चालावे. चाकरी घ्यावी, उमेद वाढवावी. कोणेविषी प्रतर्णा करु नये. कारभार येकमते करावा. दुसरी पोती करू नये. ज्याचा कारभार त्याचे हाते घ्यावा. फावंड करू नये. यैसे आम्ही व गोविंदराऊ व येशवंतराऊ त्रिवर्ग मिलोन बोलिलो. त्यावरून शामराव बोलिला जे, आम्ही कांही कारभारांत पडणार नाही. पानगांवकर आवघे तुम्ही बाहेर काढणे. दर्यावाईस डेरा देऊन लस्करांत राहातील अगर तुमचे हवेलीस येऊन राहातील. तुम्ही दरबारास जाऊन पानगांवकराची रवानगी करून कारभार करावा. कोण्ही फितवा आमचे निसबतीने करणार नाही. राज्याचा बंदोबस्त सर्व करणे म्हणोन बोलिले आणि आम्हीहि त्यासी फारच बोलिलो. आम्हासारिखे चाकर धण्यास ; खावंदानी तख्तावर वसोन आम्हास बोलाऊन आणून जो कारभार लाहानथोर करणे तो आमचे विचारें करावा जे लागेल ते आम्हा जवल मागावे. कोण्हास नतिजा पोहचवणे तो आम्हास.

पुसोन करावा. आम्हा खेरीज कांही येक कारभार करु नये. मधे कोण्ही येका लुच्याचे ऐकों नये. लागेल ते मागावे, आम्ही द्यावे. त्यावरी शामराव बोलिला जे राजश्री बोलिले की, दोही देवढ्याचे कारकून नानानी (अपूर्ण.)

¶*Purandare describes the departure of Shahu's daughters from Satara and the consequent uneasiness caused to Daryabai. The definite terms that were offered to Daryabai by Purandare on the Peshwa's behalf for the continuance of her stay at Satara are given. The letter is incomplete.*

No. 100] [*21-7-1750*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना

ता राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. राजश्री उदाजी चव्हाण व राजश्री चिमणाजी बापूजी रहिमतपुरानजीक मुकाम करून राहिले आहेत. त्यास राजश्री अंताजी सिवदेव फौजसुधां मायेणीनजीक मुकाम करून राहिले आहेत, यांस त्यास दाहा कोसाचे अंतर म्हणून चिमणाजीबाबाची चिठी आजी मंदवारी आली. उदबा त्यास तांतड घाट चढून पुढे जावयाची करितात. यांजवल भांडवल आहे ते विदितच आहे. आम्ही चिमणोबास लेहून पाठवितच आहों कीं, जमाव जाल्याविना पुढें न जाणे, असे लिहितच आहों व येथें आम्हांजवळ से दोनसे लोक आहेत त्यांस चिमणोबाकडे जाणे म्हणून सांगत असतां जात नाहींत. माने, पाष्टे खाशा निशाणाबराबर चाकरी करावयाचे लोक ते ताबीनांती[1] चाकरीस जाऊ ना म्हणतात. तर चिमणाजीबाबानी काये तजवीस, कसी वर्तणूक करावी? उदबाची नेटणी जबरदस्त कीं, पुढें जाऊन गांठ घालावीच घालावी असी आहे. परंतु चाकर लोकांचे पदरी धण्याचें नाव आहे. जावयास विचार केला पाहिजे. लोक तर अद्यापि जमा जाले नाहींत, पर्ज्यन्यकालचे दिवस; लोक सीघ्र बाहेर पडत नाहींत. हे[+] विज्ञापना. रा॥ महिपतराव धायेगुडे व खंडोजी सेलके हे उभयेता मात्र आठदिवसांचे बोले जावयास रजावंद केले आहेत. आठ दिवस भरले म्हणजे माघारे येऊ असा उभयेतानी करार केला. तेव्हां जाणार ते

---

१ हुकमी.

+ पत्र नाना पुरंदऱ्याचें.

उदईक अमावाशा होऊन परवां जाणार. वरकड बोधे, बरगे, सुलतानराव जाधव व सालपेकर हे कोणी जाऊ ना म्हणतात, तर काये ती आज्ञा ल्याहावी. परकाेंलेहि जाइनात, हे विज्ञापना.

¶*Purandare solicits orders from the Peshwa as to what he should do and how he should collect forces when men like Mane, Pashte, Jadhao and Salpekar showed their unwillingness to proceed.*

No. 101] [*24-7-1750*

सुा ईहीदे.

राजमंडल

सा॥ राजश्री पंतप्रधान
माहे रमजान श्रावण मास.

१/२

तेरीख २ रोज शुध त्रितीया
भोमवासर सुा॥ शाहूनगर

फेरीस्त खास दस्तके

राजमान्य राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यासी कीं तुम्ही स्वामी कारणे नजर वदुखा ४ च्यार व ढाल गेड्याची १ येक येकून पांच दागिनें पाठविले ते पावले. वरकड तुम्हाकडील कितेक अर्थ राजश्री सदासिव दीक्षित व त्रिंबकजी भोसले यानी विदीत केला. आज्ञा करणे ते उभयेतास केली आहे. स्वामीच्या आज्ञेप्रो तुम्हास सागतील त्यावरून कलेल. जाणिजे छ २ रमजान सु॥ ईहिदे खमसैन खा॥ सुज्ञ असा.

१

रा॥ माहादजी सालोखी यास कीं तुम्ही पत्र पाठविले ते प्रविष्ट जालें. लिहिलें विदित जाले. रा॥ येमाजीपंताचे शहा करितां येतां न ये म्हणून तर त्याजवरी चव्हाणाची फौज रवाना जाली. तुम्हास तसदी लागणार नाहीं. तुंम्ही देखत पत्र हुजूर येणे. उजूर न करणे जाणिजे छ २ रमजान सुा. ईहीदे खमसैन खा॥ बहूत काय लिहीणे.

ता॥ माहादजी गायेकवाड.

¶*Ramraja's letters from Shahu-Nagar to Raghoji Bhosle and Mahadaji Salonkhi.*

---

१ परकाळें हें आडनांव.

No. 102] [*25-7-1750*

सुा ईहीदे

राजमंडल

सा राजश्री पंतप्रधान

माहे रमजान श्रावणमास

मुा शाहूनगर

तेरीख २ रोज खा दस्तके

[किरकोळ दोन दस्तकानंतर]

राजमान्य राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यास की तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदित जाला, कितेक वृत राजश्री सिवाजी मोहिते यानी विदीत केले. कितेक आज्ञा करणे ते मशारनिलेस करून पाा आहेत त्यावरून कलेल. मातुश्रीस विनती करून जाबसाल सागोन माा रवानगी करणे * * सुज्ञ असा.

ताा धोडजी सिदा निाा सिवाजी मोहिते.

राजमान्य राजश्री बालाजी पंडित प्रधान यांसी आज्ञा कीं तुम्ही विनंती पत्र पत प्रविष्ट होऊन लेखनार्थ विदीत जाला. कितेक वृत सिवाजी मोहिते यानी विदित केले. कितेक आज्ञा करणे ते माारनिलेस करून पाठविले आहेत सांगतील.

१ सा सुज्ञ असा.

१ येणे प्राा मातुश्री आईसाहेब माार-निलेस आज्ञा करणे ते सत्वर करून माघारा पाठवणे.

ताा धोडजी सिदा.

इहिदे खमसैन मया व आलफ श्रावणमास, रमजान तेरीख ६ रोज सुध सप्तमी रविवार मुा शाहूनगर.

[हा मुकाम छत्रपति रामराजाचा आहे].

¶*Ramraja's letters to Raghuji Bhosle and the Peshwa.*

No. 103] [*30-7-1750*

सुा ईहीदे [खमसैन मया व आलफ]

राजमंडल

सा राजश्री पंतप्रधान

माहे रमजान छ ७ रो

मुा शाहूनगर खा

[रामराजाचे ताराबाईस पत्र]

यानंतर वडिलानी आसीर्वाद पाठविले ते पावोन श्रवणे सुधादृष्टीतुल्य भास जाहाला. ऐसेच निरंतर पत्र पाठऊन साभालास आविस्मर आसावे. वडिलाचे शरिरास समाधान वाटत नव्हते हे काहीच लिहिले नाही; यास्तव गोष्ट आपूर्व दिसोन अली. येक पत्र पाठवावयास अनकूल पडले नाही. बरे जे वडिलास उचित दिसे ते करितात. वडिलाची भेट व्हावी हा हेत विसेशात्कारे आहे. जरी वडिलाची आज्ञा जाली तरी भेटीस येईन तीर्थरूप बया तेथे आली आहेत आपण सर्व प्रकारे वडील तेथे आहेत. विस्तारे लिहिल्यानी उपराध दिसोन येतो. तीर्थस्वरूप राजश्री काका साहेबंहि या प्रांती येणार यैस वर्तमान आहे. वडिलास विदित व्हावे यास्तव लिहिले असे सा हे विनती.

¶*Ramraja's letter to Tarabai offering to visit her, if permitted to come. He adds that Sambhaji of Kolhapur was arriving at Satara.*

No. 104] [*July 1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना

व ता राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती उपरी. अंताजी सिवदेव पुसेसावलीस आले. चिमणाजी बापूजी व उदबा रहिमतपुरावर आहेत. त्यास यास सा कोसाचे अंतर. फौज याजपासी थोडकी. लोक आद्याप येऊन जमा जाहाले नाहीत. अंताजीपंतानी प्रतिनिधीस लेहून पाठविले की, आपण जमावसुधा पुसेसावलीस आलो म्हणून लेहून पाठविले.

---

१ कोल्हापूरकर संभाजी.

त्यावर प्रतिनिधीनी लेहून पाठविले की, खामाखाय रातीचा छपा घालून मोडणे आम्हीहि येथून कुमक करितो. यैसे प्रतिनिधीना लेहून पाठविले. त्यास चिमणाजी बापूजी याचे सामान थोडके. राऊत जमा जाहाले नाहीत. स्वामीनी पथके आम्हाकडे पाठविली त्यास चिमणाजी बावाकडे पाठवितो. ती साफ जात नाहीत. फौजेखेरीज कामकाज होणे कलतच आहे. चिमणाजी बापूजीस लेहून पाठविले की, तुमची फौज जमा जाहाल्याखेरीज त्याजवर न जाणे. मागारे चौ कोसावर येऊन राहाणे. अगदी फौज जमा होईल, मग जायाचा विचार करणे म्हणून लेहून पाठविले आहे. अंताजीपंताच्या मनात खामाखाय येऊन पडावे, हा विचार बलकट आहे. उदबानी तो धसी नेऊन घातले. चिमणाजी बापूजीची फौज थोडकी. लोक आद्यापि जमा जाहाले नाहीत. येथून लोक पाठवावे तर ते माने, पाष्टे आमचे कांही ऐकत नाहीत. स्वामी जे लोक पाठवितात त्यास आम्ही येथून माघारे स्वामीकडे पाठवितो. चिमणाजी बापूजीची पत्रे आली आहेत ती बजिनस सेवेसी पाठविली आहेत. त्याजवरून श्रुत होईल हे[+] विज्ञापना.

¶*Purandare's clerk Ramaji Mankeshwar writes to the Peshwa about the warlike preparations of the Pratinidhi.*

No. 105] [*July 1750*

श्री.

पुा सेवेसी विज्ञापना. राजश्री रघोजी बावानी काल मजला बोलाऊन नेऊन सांगितलें कीं, श्रीमंताजवल राजश्री रामाजी माणकेस्वर यानी सांगितलें कीं, येमाजीपंताबाबत ठाणी रघोजीबावा राजश्रीजवळ व मातुश्रीजवल मागतांत. त्यासाठीं हातरोखा करून घेतला आहे म्हणून सांगितल्याचें वर्तमान आइकले. तर सदरहू ठाणी घेऊन हुजूर द्यावीं म्हणून राजश्रीनी बलात्कारे हातरोखा आम्हांजवल द्यावयास लिहिला, परंतु आम्ही कांही घेतला नाहीं. तुम्हाजवळच आहे. कदाचित श्रीमंताचे चितांत याविषीं विकल्प येईल यास्तव हा मजकूर श्रीमंतास तुम्ही लेहून पाठवणे. श्रीमंताचे मनोगतासिवाये आम्हांस तिलप्राये वर्तणूक करणे नाहीं. अवघ्या फौजेस आम्ही निरोप दिल्हा. आजपर्यंत तीन लक्ष रुपये फौजेस बसले. सांप्रत निरोप दिल्हा. दीड दोन हजार फौज राखून ठेविली आहे. आठां चहूं दिवसानीं येथून निघोन पुणियास जाऊ. श्रीमंताची भेटी घेऊन

+ पत्र रामाजी माणकेश्वराचें?

आज्ञेप्रों त्यांचा निरोप घेऊन जाऊन वर्तणूक करूं. अतःपर आपण दुसरे दैवत जाणत नाहीं असे बोलिले. बऱ्हानजी मोहिते व सिदभट व कोनेरपंत इतके ते समईं होते. विदित जालें पाहिजे, सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*A letter from Satara to the Peshwa reporting Ramraja's intention of visiting the Peshwa at Poona.*

No. 106] [*5-8-1750*

सुा ईहीदे

राजमंडल

सा॥ राजश्री पंतप्रधान

माहे रमजान छ १३ रोज

खास दस्तके

राजमान्य राजश्री बालाजी पंडित प्रधान यासी की स्वामीची स्वारी पुण्यास होणार. ऐसियास मागे वाडे आहेत व शाहर आहें त्याची रखवाली जाली पाहिजे; ऐसीयास तुमची फौज येथ आहे ती ठेविली पाहिजे; यास्तव हे पत्र सादर केले असे तरी आपणाकडील लोकास लेहून पाठऊन येथे राहून रखवाली करीत ते करणे. स्वामी मावारे आलियावर त्यास निरोप देतील टाकोटाक उतर पाठवणे. खामखा त्यास लेहून पाठवणे खा॥ सुज्ञ असा.

१

¶*Ramraja writes to the Peshwa advising him to post military guards for the protection of Satara during the writer's absence at Poona, whither he was proceeding.*

No. 107] [*7-8-1750*

सुा ईहीदे

राजमंडल

सा॥ राजश्री पंत प्रा॥

माहे रमजान छ १९ रोज फेरीस्त

खास दस्की पत्रे.

राजमान्य राजश्री बालाजी पंडित प्रा॥ यांसी आज्ञा कीं मौजे फुरसंगी ता॥ हवली प्रा॥ पुणें येथील पाटीलकीविसी आमथे व हरफले या दोघांचा पेसजी कजिया

लागला होता ते समई कैलासवांसी माहाराजा राजश्री आबासाहेब यांणी ल्हूजगांस व पांढरीस हुजूर आणोन गोतमुखे इनसाफ सनास आणून श्रीकृष्णचे दिव्य दिल्हे. दिव्यमुळे व गोतमुखे हरफले खोटे जाहले. कामथे वडील खरे जाहले. ये(से) होऊन कागदपत्र जाहले आसतां हली हरफले तुम्हाकड जाऊन फिर्याद होऊन मौजे माारची पाटीलकी आमानत केली म्हणौन हुजूर विदित जाहले. यैसियास पूर्वी कैलासवासी माहाराज राजश्री आबासाहेबी इनसाफ गैरवाजबी केला नाहीं आणि हली यैसे जाहलिया त्याच्या मनसुबी शब्द लागतों या गोष्टी तुम्हासहि उचित नाहींत. इनसाफ जाहलियावरी मागती त्याच्या बोले पाटीलकी आमानत करावीसीं नाहीं. सुदामत निवडिले आहे त्याप्रो कामथे यांस पाटीलकीचे दुमालपत्र करून चालवणे छ १९

रमजान सु॥ ईहीदे खमसैन मया आल्फ खाा सूज्ञ आसा.

¶*Ramraja deprecates the Peshwa's interference in the dispute between Amthe and Harpale which had been finally decided by Raja Shahu.*

No. 108] *[8-8-1750*

श्री

विनंती. सेवक रामाजी माणकेस्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १६ रमजान सौम्यवासरपर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून येथास्थित असे विशेष. पत्राचीं उतरें व दरबारचें वर्तमान अलाहिदा पुरवणियांवरून विदित होईल. राा रायाजीपंतानी आजी रात्रीं येऊन अर्ज केला कीं, पल्हस अंताजी सिवदेव यानी मारून ताराज केले. अंताजीपंताची दोघेचौघे माणसें पडलीं, जखमी जालीं, असें सागितलें. प्यादेजंवादे[1] पाठवावे असे बोलिले. विदित जाले पाहिजे. आजी राजश्री राणोजी भोसले यांचे घरास गेले होते. त्यानी येक घोडी व मंदील व मंदिलाचे जामेवार व किमखाप व पदक जेगा, जसे अनकूल होते तसे, नजर केले. त्याजवरी तेथून येऊन राा गोपालराव नीलकंठ खानवीलकर यांचे घरी जन्माष्टमीचा उत्छव आहे. त्यांचे घरास गेले. त्यानी येक पोशास(ख) शक्तीनरूप नजर केला. तेथून आपल्या माहालांत आले. विदित जाले पाहिजे सेवसी श्रृत होये, हे विज्ञापना.

¶*Ramaji Manakeshwar to the Peshwa, describing the activities of Antaji Shivdeo.*

---

१ प्यादे शिपाई.

No. 109] [*11-8-1750*

सुा ईहीदे

राजमंडल

सा राजश्री पंतप्रधान

माहे रमजान छ १९ रोज वद्य
सप्तमी मुा पाडली खा पत्रे.

तीर्थस्वरूप मातुश्री दर्याबाई यासी पत्र की तुम्ही पत्र पो ते आज सणवारी रेवडीवर आसता पावले लेखनार्थ आवगत जाहला. आपण यावयाचे केले हे उतम आहे. येथे यावे, मातुश्री आईसाहेबाचे समाधान करवावे, राजश्री प्रधानपंत याचेहि लक्ष मलवावे म्हणजे सर्वहि गोष्टी उतम आहेत म्हणोन. लिा ऐशीयास आपण पत्रापूर्वीच सकलहि आर्थ ध्यानात आणून श्वार जाहलो आहो. आज पाडलीस घाट उतरोन आलो. उदैक निरापार रविवारी होऊन मजल दर मजल तेथ येण होईल. वरचेवर आपणास पत्रे लिहित असता न पावली म्हणोन न येत याजवरून अपूर्व वाटत. रात्रदिवस निजध्यास आपला लागला आहे. भेटीहि लौकरीच होईल कलावयास्तव लिहिल असे म्हणून खा हे विनंती.

१

ता बाबुराव

¶Ramraja's letter to his sister Daryabai Nimbalkar giving her a programme of his tour to Poona, and accepting her advice in his dealings with Tarabai and the Peshwa.

No. 110] [*11-8-1750*

सुा ईहीदे

राजमडल

सा राजश्री पंतप्रधान १

माहे रमजान श्रावण मास
तेरीख १९ रोज वद्य सप्तमी मदवार
मुा पाडली. ३

फेरीस्त खास दस्तकी पत्रें.

राजश्री मुधोजी नाईक निबालकर यांस की दोन च्यार पत्रे पाठविली असता न आला व तुमचे सरदहून दोन वेल

राजमान्य राजश्री भवानी शंकर पंडित राजाज्ञा यासी की साताराहून आले यांपासून वर्तमान कलत नाही

स्वारी गेली तरी इदवर आला नाही. उदैक निबूतचे मु॥ भेटीस येणे. खा॥ बहुत काय लिहिणे १

ता॥ आपाजी रघुनाथ खेरोजी पाटील को॥ कोरेगाव यांसी आज्ञा केली ऐसीजे राजश्री हैबतराव भवानी शंकर सुभेदार प्रां॥ मजकूर यांची साल-गु॥ दस्ताचा यैवज व पहिली बाकी द्यावी. त्यापैकी ब रा भगवतजी तरी पत्रे जातील येतील. खबर वाडियांत पावती करीत असणे व उदाजी चव्हाण व अताजी सिवदेव कोठ आहेत ते लिहिणे खा॥ सूज्ञ असां.

१

तं॥ आपाजी रघुनाथ.

¶*Ramraja's letters to Mudhoji Naik Nimbalkar and Bhavani Shankar Rajadna from Padli.*

No. 111] [*13-8-1750*

सु॥ इहीदे

राजमंडल

सा॥ राजश्री पंतप्रधान

(रु. नं. १७२६) माहे रमजान छ २१ रोज
वद्य अष्टमी सोमवार
मुं॥ जेजूरी खा॥.

१ रामचेद्र मल्हार सेणवी पाटील निमे मोकदम मोहरपै[1] व राणोजी जगदले पाटील निमे मोकदम माघाड[2] मौजे दौड ता॥ पाटस प्रां॥ पुण यांसी आज्ञा कैली ऐसीजे. राजश्री येकोजी बीन येसाजी भोसले सेडगावकर याचे बाप बाबाजी भोसले याणी घोड्याचे चोरीचे तुफान मौजे मजकुरावर ठेऊन निमे पाटीलकीचा वाद सांगितला त्यावरून मौजे मजकूचे मोकदम कैलासवासी माहाराज राजश्री शाहाजी माहाराज यापासी फिर्याद गेले. त्याणी इनसाफ पाहाता बाबाजी भोंसले खोटे जाहालें, तेव्हा तुम्हास पत्र करून दिल्हे; त्याउपरी फिरोन कैलासवासी माहाराज राजश्री थोरले माहाराज राजश्री सन्निध फिर्याद गेले. त्याणी मौजे मजकूरचे मोकदमास आणून ते पत्रे पाहून बाबाजी भोसले यास ताकिदी दिल्ह्या. त्याउपर कैलासवासी माहाराज राजश्री आबासाहेब याच्या कारकीर्दीत जगदले मोकदम

---

* १ पुढला, वडील. २ मागचा, कनिष्ठ.

याणी निमे मोकदमी वडीलपण पाटीलकी मोहरप रामचंद्र मल्हार सेणवी यांस विकिली. त्याची बजिनसे राजपत्र व येसाजी भोसले सेडिंगावकर याणी फारिखतं दिल्हे की च्यार ढया (डोया?) घोड्याचा वाद सांगितला तो लटिक जाहला. याउपरी पाटीलकीसी कजिया नाही म्हणून पत्र दिल्हे, ते मनास आणिता त्याचा कइया मौजे मजकुराकड काही नाही. तुम्ही आपले वतन अनभऊन सुखरूप राहाण. छ ६ रमजान सुा ईहिदे खमसैन मया अलफ खा वतन अनभवणे.

¶*Ramraja's letter to Ramchandra Malhar about the Patilki-vatan of Dound.*

No. 112] [*13-8-1750*

सु॥ इहीदे

राजमंडळ

सां राजश्री पंत प्रधान

माहे रमजान श्रावण मास

बीता

१/९

तेरीख २१ रोज वद्य अस्टमी सोमवार मु॥

जेजुरी फेरिस्त खास दस्तके

रवाना पुणे.

मातुश्री आईसाहेब यास की वडिलाचे दर्शनास बहूत दिवस जाहाले. पुढे कितेक राज्याभाराचा विचार कर्तव्या; यास्तव निघोन साताराहून अज छ २१ रमजानी जेजूरीस आलो. उदैक वडिलाचे पाये पाहावयासी मुहर्त आहे यास्तव येत असो. खास दस्तके हे विनती

१

अज सोमवारी जेजूरीस दाखल जाले. उदैक पुणियास स्वामी येतात तुम्हास कलाव म्हणून लिहिले असे म्हणोन

१ राजश्री प्रंतप्रधान यासी की रामाजीपंत लिहितील त्याजवरून कलल.

१ मातुश्री बया

१ राजश्री माहादाजी आंबाजी

१ राजश्री विष्णु विश्वनाथ

१ राजश्री शामराव नागनाथ

९

६

ता॥ सताजी दलवी दि॥ मुरजेनसी

रवाना सातारा

राजश्री विस्टल (विठल?) राव बकसी यासी स्वामीचा मुकाम आजी इदुवारी जेजूरी जाला. उदेक पुढ होईल. स्वामीच अगमन होई तोपर्यंत शहरची वगैरे रखवाली उतम रितीन कर्ण. वरकड वर्तमान लिहित जाणे. वाडियांत वर्तमान प्रविस्ट कर्ण म्हणोन पत्रे

१ .....
१ राजश्री भवानीपंत
१ राजश्री चितामणराव
१ सेखमिरा
१ राजश्री प्रतिनिधी
१ राजश्री आंबाजी अनंत
१ राजश्री खंडेराव बापोजी
१ राजश्री मोरोपंत बकसी

८

ता॥ विस्टलराव बकसी

¶*Ramraja writes from Jejuri to Tarabai intimating his desire to meet her the next day. Similar letters are addressed to others.*

No. 113] [*18-8-1750*

सु॥ इहिदे

राजमंडल

सा॥ राजश्री पंत प्रधान
माहे रमजान उर्फ श्रावणमास
तेरीख २६ रोज वद्य त्रयोदसी
मंदवासर म॥ को॥ पणे.

फेरिस्ते खास दस्तकी पत्रे:—

रवानगी सातारा

५ तुम्ही विनंतीपत्रें पाठविलीं तीं पावलीं लिहीला मार विदित जाला. वाडियाचा चौकी पाहारा करून बहुत खबरदारीने राहाणे. पुणे दाखल जालियाचें वर्तमान पेसजी लिहिलेच आहे. येथील गुते उरकोन सत्वरीच येणे होईल. जाणिजे म्हणून पत्रे

१ अजम सेखमिरा खा॥ बहूत काये लिहिणे
१ चिंतामण सिवदेव खा॥ बहूत काये लिहिणे
१ खंडेराव बापूजी खा॥ बहूत काये लिहिणे
१ भगवंतराव सांळोखी खा॥ बहूत काये लिहिणे
१ भवानीशंकर राजाज्ञा खा॥ सुज्ञ असा.

५

[या पुढे इतर किरकोळ दस्तके बार.]

¶ *Ramraja's letters to Shekhmira and others at Satara from Poona.*

No. 114] *[18-8-1750*

राजमंडळ

सा॥ राँजश्री पंत प्रधान

माहे रमजान छ २६

रोज षष्ठी त्रयोदसी मदवार.

(मुा॥ पुणे फेरिस्त खा॥)

राजश्री मुधोजी नाईक निवाळकर * * अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रती उपरी तुम्ही पत्र पा॥ ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहाला दर्शनास यावयाविसी लिहिले ऐशिया उजूर काही नाही परतु आवरोध आला आहे म्हणोन लिहीले ते कलले. ऐशियास आवरोधहि दूर जाहालाच आसेल. श्वामी पुण्याहून कूच केलिया उपरी मागती त्याच मार्गे यणार. तुम्ही आपले जमावानसी निरावरी दर्शनास येणे खा॥ बहूत काय लिहिणे

१

राजश्री माधवराव कदम यासी तुम्ही श्वामीचा निरोप घेऊन गेला त्यास आद्यापवरी श्वामी दर्शनास न आला. याउपर हे गोष्ट अपूर्व दिसोन अली तर हे आज्ञापत्र सादर केले असे तरी आपले जमावासुधा पत्र दर्शनी पुण्याचे मुकामी येणे. खो बहुत काये लिहिणे

१

राजमान्य राजश्री फतेसिग भोसले यासी तुमचेविसी कितेक विनंती करणे ते राजश्री प्रधानपंत याणी केली ते श्वामीनी ध्यानात आणून सातारा पावले तुमचेविसी दुसरा आर्थ श्वामीच्या ध्यानात नाही तुम्ही कोणेविसी संशय न धरणे. दर्शनोतर श्वामी उतम करितील. येविसी विस्तारे राजश्री प्रधानपंत लिहीतील त्याजवरून कलल त्याप्रो वर्तणूक करणे. खा॥ सुज्ञ असा

१

राजमान्य राजश्री जगजीवन पंडित प्रतिनिधी यासी माहादजी पाटील मौजे बवलेकर हा सरकारात हुजूर चाकरी करीत अस्ता तुम्हाकडील कमावीसदारानी त्याच्या लेकास धरून कोलीयाचे ठाणेयात नेऊन आटकाव केला म्हणोन हुजूर विदित जाहाले तरी पाटील माराच्या लेकास आटकावयास प्रयोजन काय याउपर पाटील माराच्या लेकास सोडावयाची आज्ञा करून हे

राजश्री रघूजी कदमराव यास तुम्ही अद्यापि श्वामीच्या दर्शनास आला नाही हे गोष्ट उतम न केलीत. याउपर आपल्या जमावासुधा पुण्याच्या मुकामी हुजूर सत्वरे येणे. वहुत काये लिहिणें.

¶*Ramraja's letters from Poona to Mudhoji Naik Nimbalkar, Fatesing Bhosle, Jagjiwan Pratinidhi and Madhaorao Kadam.*

आज्ञापत्र सादर तुम्हास केले आसे. तरी ठाणे मजकुराहून आणून हुजूर रवाना कर[illegible] येविसी फिरोन बोभाट येऊ न देणे. खा सुज्ञ[illegible]

No. 115] [*13-9-1750*

श्री

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसांवियांसी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीयों फतेसिंग भोंसले रामराम विनंती. उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असिलें पाहिजे विशेष. अपण पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. राजश्री रामचंद्र वावाजी आपणापासून आले. यांनी कितेक अपली वचनें श्नेहाचीं सांगितलीं त्यावरून श्रवण होऊन परम संतोष जाला. यैसियासी आपल्या श्नेहाची जोडी करावी हा आमचा दृढनिश्चय आहे. यांत कांहीं संशय नाही. हे दौलत व आम्हीं आपले आहों हा भरवसा आपणास असों द्यावा. राजश्री चा मुकाम त्रिपुटीवरी[1] जाला आहे. हे कूच करून सातारियासी गोलियावरी आम्ही सत्वरीच येतों. परस्पर भेटीचा योग होईल तो सुदिन आहे. वरकड राजश्री रामचंद्रबावाजी लिहितील त्यावरून कलेल. रा छ २२ सवाल. राजश्री सदासिवपंत यांचा मुकाम त्रिपुटीवरी जाला आहे. राजश्री बाबूराव सामराज त्यांकडे पाठविले आहेत. राजश्रीचा मुकाम अमच्या मार्गावरी, याकरितां दोन दिवस गुंता पडिला. त्यास तेथील विचारहि अपणास कलल्याच असेल. यास्तव जे लिहिणें तें आम्हांस ल्याहावे; त्यासारिखा विचार केला जाईल. कलले पाहिजे. +आमचा हेत फार आहे, आपले भेटीनंतर जेसे सांगाल तेसे वर्तावे. यात जे आपले विचारास येईल ते लिहावे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶(+*Fatesing Bhosle's own hand from here.*) *He writes to the Peshwa offering complete submission to the latter's wishes and dependence upon his judgment. This letter proves how cleverly the Peshwa and Sadashivrao managed to detach Fatesing Bhosle from Ramraja.*

---

(1) 8 miles east of Satara.

No. 116] [*23-9-1750*

श्री

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसांवियांसी.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्रीों फतेसिंग भोंसले रामराम विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असिलें पाहिजे विशेष. आपल्यापासीं करार जाला त्याप्रमाणें आम्ही स्वार होऊन पुणियास येत होतों. त्यास राजश्रीचा मुकाम त्रिपुटीवर जाला. तेथून कूच होऊन पुसेंसावली[1] नजीक येऊन उतरले. हें वर्तमान आपणास लिहिलेंच होतें. त्यावरून आपलीं पत्रें राजश्री भाऊस आलीं. येथूनहि राजश्री बाबूराव व आपणाकडील राजश्री रामचंद्र बाबाजी यांस लस्करांत पाठविलें होतें. तेथें बोलीचाली होऊन राजश्री भाऊ कुरलियास[2] आले. त्यांची भेटी होऊन त्यास घरास नेलें. तदोत्तर ते अम्ही मिलोन राजश्रीचे भेटीस गेलों. आपल्या लिहिल्याप्रमाणें मुख्यांची भेटी जाली. मग लस्करातच राहिलों. पुण्यात करार जाला त्याप्रमाणें विल्हे लाविलों म्हणून बोलिले आहेत. आमचा सर्वस्व भारआभार आपणास आहे. वारंवार ल्याहावें यैसें नाही. येविसींचें वर्तमान राजश्री भाऊनी आपणास लिहिलेंच असेल. पुढे आमचा कार्यभाग विल्हे लागोन सर्वप्रकारें आमचें साहित्य होये ती गोष्टी केली पाहिजे. वरकड राजश्री रामचंद्र बाबाजी लिहितील त्यावरून कळों येईल. रा॥ छ २ जिलकाद. सर्व प्रकारे अमचे अगत्ये आपनास आहे. जे आपनास उतम दिसेल ते राजेश्री भाऊस लिहावे. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Fatesing Bhosle informs the Peshwa of his interview with Ramraja and of his readiness to fall in completely with the Peshwa's plans.*

No. 117] [*29-10-1750 ?*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी,

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रीौ खंडोजी जाधवराऊ दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल ताा छ ९ जिल्हेज जाणऊन गोसांवी यानीं आपुलें निजानंदलेखन लेखयास आज्ञा केली पाहिजे विषेश. आपलें पत्र पूर्वी आले कीं, जमावसुधा भेटीस येणें; त्याजवरून तमाम लोकांस बोलाऊन समजावीश नालबंदी देऊन तयारी करून भेटीस यावें या विचारांत होतों. त्यास

१ औंधनजिक. २ पुसेसावलीनजिक.

प्रस्तुत श्रीमंत मातुश्री आईसाहेब गडावरून खालतीं उतरली. तमाम सरदारांस पत्रें पाठविलीं आहेंत कीं, भेटीस येणें. त्यास हा कालपावतों आपणास तों पत्र आलें नाहीं; परंतु येणार म्हणऊन वर्तमान यैकिलें. त्यास त्यांच्या चितांत आमचें सर्व प्रकारें वैश्यम्यच आहे. गोसांवियासींहि विदित आहे. आणि आमचा कायावाचामनें कृतनिश्चये आहे कीं, जें कर्तव्ये तें आज्ञेप्रमाणें करावें. याजकरितां सेवेसी विनंती लिहिली जाते कीं, तिकडील बोलाऊं आलें तर जावें कीं किंवा कैसी वर्तणूक करावी हें आज्ञा होईल त्याजप्रा वर्तणूक करून. तिकडील धणीपणाचा विचार आहे. याजमधें जैसी आज्ञा होईल त्याजप्रा वर्तणूक करून. यानंतर गांडापूरच्या बाबर्ताचे त्वष्ट विषेशात्कारें त्यानी लाविलें आहे. आम्ही येथून कारकून पाठविला. यैवज रा येशवंतरायानी परभारें पागेस वगैरे देवविला यैसें कितेक प्रकारें सांगितलें, परंतु तें यैकेत नाहींत. फारसा अतिशयेच आहे, याजकरिता विनंती लिहिली जाते कीं, गोसांवियानीं येक आज्ञापत्र रा दिनकरपंत व रा माहादाजी नाईक यांजला जासुदासमागमें परस्परें पाठवावें कीं, च्यार गोस्टी सांगोन गोसांवियांची त्यांची भेट होये तोंपावतों तकूफ करीत यैसें केलें पाहिजे. स्वामीची त्यांची भेट जालियावर मग जे आज्ञा होईल त्याजप्रा वर्तणूक केली जाईल. तर जासु—(अपूर्ण).

¶*Khandoji Jadhao informs the Peshwa how Tarabai was troubling him and seeks his protection.*

No. 118] [*12-11-1750*

राजमंडल

सुा ईहिदे

२ सा राजश्री पंत.

प्रधान माहे जिल्हेज कार्तिक
मास २३ रोज इंदुवार
मु॥ बलंवाडी का नाझरे

फेरीस्त खास दस्तके पत्र.

राजश्री बऱ्हानजी मोहिते यास की, जवलक्याचें ठाणियात हुजू * * * * ठेवि.....तुम्ही.....तेथ ठेऊन.....केला हुजूर पा * * * देणे, सांगोल्याचे ठाणि-

राजश्री येकोजी भोसले यास की तुम्ही सांगोलियात राहिला ते अद्याप आला नाही. याउपरी पत्रदर्शनी स्वार (हो)ऊन येणे. खा बहुत काये लिहिणे

याचा बदोबस्त उतम प्रकारे करणें. दा * * * * गला दारुगोली सामान ठाणियात करणे * * * फी सातारियास जा * * * त तोवर याव * * * * * * सातारियास.....लेहून पाठवितील ते * * .....पाहून उस्तवारी करणे खाा बहुत काये लिहिणें. १

ताा कुसलसिंग चोपदार.

राजश्री विठोजी मोहिते यांस की तुम्ही सांगोलियात राहिल ते अद्याप आला नाही, याकरिता हे आज्ञापत्र सादर केले असे. तरी तुम्ही हुजूर येणे. खाा बहुत काये लिहिणें.

१

राजश्री सदासिव चिमणाजी यांस की आष्ट्याचे ठाणे थोरातास ताकीद करून देवणे म्हणून स्वामीनी रुबरू सांगितलच होत. त्यास आगोटीपर्यंत ठाणे थोराताचे असो द्यावे यैसे म्हणतात म्हणोन विदीत जा * * * * राम.....तेव्हा राा बालाजी पंडित व राजश्री (माहादाजी) आंबाजी याजवल स्वामीनी भाषण केले जे, येसाजी भोसले कु * * (भो)सले उभयेता * * मामल्याचा वंदोबस्त स्वामीनी करण त (स) करितील याच्या मा * * * * गोष्ट कोणी * * * राा गोविद.....
.....
स्वामीचा करार * * * * असता ठाणे द्यावयाचा अनमान दिसोन आला.

ताा कुसलसिंग चोपदार माळजीराव मामूणंकर मुा जवल यास की, मौजे मजकूरचे ठाणे राजश्री बऱ्हानजी मोहिते याचे स्वाधीन करणे(चे) आहे. तरी तुंम्ही माारनि(ले)(याचे) स्वाधीन ठाणे करून * ज घेऊन तुंम्ही लोकशुधा हुजूर येणे. साा येणे छ * छ *

ताा कुसलसिंग चोपदार

राजश्री गोविद खंडेराव यासी की आष्ट्याचे ठाणियाचा मजकूर आगोटीपर्यंत न द्यावा यैसा विचार तेथ जाहाला आहे. पुण्यामध्ये राजश्री बालाजी पंडित व राजश्री माहादाजी आंबाजी याजवलहि स्वामीनी भाषण केले, अष्ट्याचे ठाणे स्वामीस परिछिन देवावे म्हणून आरंभापासून स्वामी बोलत असता आष्ट्याचा माारास गईगुदर होऊ लागली. तेव्हा तुंम्ही काही राा सदासिवपंत यासी न * यावरून स्वामी(ची)(म)र्जी राहात नाही. (स्वामी) सातारियास जात नाहीत. आष्ट्याकड जाणे जरूर जाहालें. तुंम्ही लोक कारभारी; स्वामीनी ऐकाव आणि आष्ट्याची गोष्ट आगोधर सोडविली असता न ऐकावी. थोराताचे तुम्हास अगत्य प(हि)लेपासून आहे. य * * * * सली या उभतास सरजाम अगदी थोरातास देवावा म्हणजे सर्व सिधीस गेले. मग स्वामीचे मर्जीचे

तेव्हा स्वामी सातारियास जावयास प्रयोजन काये? सर्व गोष्टी तुमच्या ऐकाव्या आणि आष्ट्याची गोष्ट आरंभी सोडविली असे. खाा सुज्ञ असा प्रयोजन तुम्हास काये आहे? स्वाा बहुत काये लिहिणे.

१

¶Ramraja's letters to Baranji Mohite with reference to the settlement arrived at Sangola and the question about the post of Asta.

No. 119] *[26-11-1750*

छ ९ मोहरम

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी,

विनंती. उपरी, राजश्रीचा वृत्तांत दिनचर्येंचा वरचेवरी लिहिलाच आहे. आज इंदुवारचे वर्तमान तर कालचें प्रमाणेच आहे. आम्ही सर्वांचा म्हणोन निरोप दीपपर्याये[1] आईसाहेबास सांगोन फरीदखान व चिंतो विनायक गडावर पाठविले होते. मेटापर्यंत गेले. वरते सांगोन पाठविले. वरून हाक मारून येकानी सांगितले की मातुश्री व राजश्री निजेले आहेत तुम्ही माघारे जा म्हणताच उतरून खाली आले. वरते चेतले देखील नाही. वरील गडकरी याचीहि चालणा करून पाहिली, परंतु ये घटकेपर्यंत विचारात नाहीत. खालून जागा-जागा नाकेबंदी करावी असा मजकूर केला होता. तान्हाजी सावंत याचे लोक वाडियात आहेत, त्यांस बाहेर घालवावे, वाडियाची बंदोबस्ती करावी, यास्तव काल रात्री लोक व लक्षुमणपंत व दौलतराव यास पाठविले असतां दरवाजे दिल्हे. प्रातःकाली निघतो बोलले. रात्रीचा विशये म्हणोन आम्ही बाहेर चौक्या ठेविल्या. प्रातःकाळी आम्ही सारे जण देवढीस गेलो. त्याणी दरवाजे न उघडले. जबरदस्ती करावी तर लौकिक फटकळ, यास्तव उगेच राहिलो. तान्हाजीकडील कारकून वरता जाऊन त्यानी नानाप्रकारें मातुश्रीजवल गिला केला. राजश्रीनी एकाबराबर सांगोन पाठविले कीं तुम्ही चौकी उठवा, एकाबराबर आला की नका उठऊं. खंडोजी पोस्ती वगैरे गीर्दीचे लोकहि त्यांचाच पक्ष करितात. संध्याकालपर्यंत कोंडावे म्हणून आम्ही करीत असतां न जाले. राजश्री तर वरते जाऊन फसले. खालील माणसांची गत याप्रकारची. चौक्या बसवाव्याच तरी दुराग्रहाचे डाई पडते. न ठेविल्या तर वरते साहित्य जाते.

---

१ दाप=दाब.

ऐसियास स्वामीचा विचार येविसीचा कसा आहे, येथे आम्ही कसे करावे तें परिछिन्न आम्हास कलेल त्यासारखे येथे करणे ते करावे म्हणोन आम्ही उगेच आहो. जसी आज्ञा होईल तसी वर्तणूक करून उत्तरे सत्वर पाठवावी. राजश्रीनी आम्हास व त्रिवर्ग कारभाऱ्यास किल्यावरून बहुत चोरून भवानी मर्धा याजबराबर विडे व दालिंबे पाठविलीं. मला खालते उतरोन न्यावयाची तजवीज करा ऐसे ग्लानतेने सांगसांगु पाठवितात. याचा विचार काय करावा? दुसरे वर्तमान गडकरी तमाम आपलाली मुलेमाणसे किल्यावर नेत चालले आहे. सबब आमचा वचक धरून नेऊं म्हणोन मानितात. आम्ही येथे शहराचा व दोही वाड्याच्या सदरेच्या बाहेरील बंदोबस्त करावाच; चौक्या ठेवाव्या, गडावर माणूस जाऊयेऊ देऊ नयेत येसे करावे किंवा इतक्या खटपटीत पडू नये? आपण मात्र आपले जागा खबरदार बंदोबस्त असावे. कसकसे होते ते पाहावे. हे दोन्ही विचार उचित अनुचित कोणता कसा करावा येविसी ल्याहावे. दोन्ही गोष्टीस फौजेचे बल आमचे पुर्ते असिले पाहिजे. याची तजवीज करणार स्वाम समर्थ आहेत. येथे खर्चास यैवज अगदी नाही. जो यैवज जमाव कर्ज मिलते तो यैवज लस्करात रवाना होतो. येथे कर्जहि मिलत नाहीत. कदाचित दाहापाच कोठे मिलताते दुव्होत्रा दिढोत्रावाचून मिलत नाहीत. या-प्रकारचे वर्तमान शहरात जाहाले आहे. बरकड कोणेविसी येथे कोणाही येकाचां इतबार वाटतो येसे नाहीं. हे गारूड किल्याचे वगैरे काय आहे हे ईश्वर जाणे. आईसाहेब केवल कैलासावर गेली आहेत. राजश्रीजवळ दोनच्यार पोरगे इतके मात्र आहेत. चंचुप्रवेश दुसऱ्या माणसाचा होऊ देत नाहीत. आईसाहेबाची राजकारणे चौकडे आहेत. कागदपत्र येतात जातात. राजश्रीची बुधि येका नेटाचीच पुर्ती असल ती तर काहीबाही करतो. राजा काही तिखट काही पोचट, क्षणभर विश्वास क्षणभर अविश्वास. किल्यावरून येक निरोप राजे सांगून पाठवितात की माझ्या वाड्याचा बंदोबस्त तुम्ही करा. येक निरोप मागती सांगून पाठवितात लोकाच्या सांगितल्यावरून की चौकी नका ठेऊ. आहे तसेच असूं द्या, ऐसेहि सांगून पाठवितात. सारांप विश्वास कोणता धरावा. आम्ही सांगत होतो की तुम्ही किल्यावर जाऊ नका. न यैकले. वर्तें गेले ते फसले. सारांप येका धोंबटे[1] सरल विश्वास ठेऊन कारभार करते करून घेते तर सर्व चांगले होते. करून दाखविणार दाखवितें. असो; येविसीचे किती

---

१ धोंरण.

ल्याहावे. असो; तूर्त राजे अडकले आहेत. ग्लान भाकितात. खालते कसे तरी येऊत. खावंद आहेत. हे तो केले पाहिजे. ही गोष्ट स्वामीनी केलीच पाहिजे. उतर पाठवावे हे विनंती.

¶*Purandare, Peshwa's agent at Satara, informs the Peshwa that Ramraja has been lured into the fort and kept in confinement by Tarabai. All the doors are strongly guarded and none is allowed to enter. The King is vacillating and does not know his own mind. Orders are solicited from the Peshwa as regards the steps to be taken to meet the emergency.*

No. 120] [*23-11-1750*

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना
व ता॥ राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. उपरी, स्वामीनी लिहिले की, राजश्री गडावर गेले ते कसे गेले म्हणून लिहिणे. त्यास पालखीत बसोन दाहा पांच माणसानिसी गेले. वरी जामदारखाना थोरले बाईचा होता तो उघडून त्यातील कडदोरा, सेरपेच, दोन कंठ्या, यैसे काढून आणिले. श्रीचे दर्शन घेऊन खाले उतरले. राजश्रीची[+] माणसे गडकऱ्यानी फार येऊ दिल्ही नाहीत. हे विनंती.

¶*Purandare reports to the Peshwa how Ramraja actually got into the fort and what articles he took away with him from the Jamdarkhana of the senior queen.*

No. 121] [*Nov. 1750 ?*

श्री

राजश्री पंतप्रधानं गोसांवि यांसी.

श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रौ खंडोजी जाधवराऊ दंडव विनंती. उपरी, येथील कुशल जाणऊन गोसांवियानीं आपुलें निजानंदलेखन लेखयास आज्ञा केली पाहिजे विषेश. आपलें पत्र आलें की, सरंजामसुधां भेटीस येणें. त्याजवरून तमाम आम्हांकडील लोकांस बोलाऊं पाठविलीं आहेंत. कोणी आले, कोणी येणार. ते आलियावर त्यांची समजावीशनालबंदीचा निकाल करून येथील बंदोबस्ती करून दीपवाली जालियानंतर

+ पत्र नाना पुरंदऱ्याचें.

सेवेसी येऊन पोहचतों. यानंतर चिरंजीव हैवतराऊ यांजला पत्र गोसांवियांचें आले आणि तिकडून राजश्री फतेसिंगबाबांचीहि पत्रें आलीं कीं, सत्वर स्वार होऊन येणें. यैसियास आमचा विचार गोसांवियांचे कुटुंबीचा जें कर्तव्य ते आज्ञेप्रमाणें करावें. याजनिमित्ये चिरंजिवास सेवेसी पाठविलें आहे. विनंती करणें ते रूबरू करितील. यैसियास यानीं तिकडे जावें येसीच आज्ञा जाली तरी यांजला रवाणा सत्वरीच करावें कीं लौकर येऊन पोहचतील आणि त्यांची रवाणगी करून आपण सामानसुधां सेवेसी येऊं. अगर स्वामींस यांजला आपले सेवेसी ठेवावयाचें असिलें तरी तैसीच आज्ञा करून रवाणगी करावी कीं ते आलियावर त्यांचें सामान आपलें सामान येथास्थित करून सरंजामसुधा सेवेसी येऊं. वरकड कितेक अर्थ चिरंजीव सेवेसी निवेदन करिता विदित होईल. विषेश काये लिहिणें, लोभ असों देणें, हे विनंती

मोर्तब
सुद.

¶*Khandoji Jadhao to the Peshwa, offering to join him with his forces.*

No. 122] [*1-12-1750*

छ १९ मोहरम. नकल.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी.

विनंती. उपर, राजश्री संभाजी राजे याजकडील मजकूर आजी छ १२ मोहरमी प्रातःकाळी दरबारी जाला, तो आलाहिदा पुरवणीत लिहिलाच आहे. यैशास ठाणियाचा व त्याचे मुलकात पैका घेतला असेल त्याचा व फौज लुटली, या तिही मुद्याचा मजकूर तीर्थरूप राजश्री नाना आगमन होये तोंवर न करावा. इतुकेंच आजीचें प्रसंगी घडलें. राजश्री व्यंकटराऊ व मानाजी पायेगुडे याचे आगमनाचा वेध दूर जाला नाहीं. त्यास आणावेंच आणावे. यैसे आजीचे प्रसंगी जाहाले आहे. परंतु घडले न घडले गोस्टीचें शास्वत मानावे असा विचार नाही. क्षणभंगूर विचार आहे, तो स्वामीस विदितच आहे. दरबारी जे समई जे वर्तेल ते स्वामीस लिहून पाठवावेंच लागले, यास्तव लिहिले आहे. विदित जाहाले पाहिजे. शास्व(व)त नाही. दरबारी जेसमई वर्तमान होते तेच आम्ही लिहितो. कलले पाहिजे. सेवसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*A news-letter of the affairs at Satara and the unsteady way of Ramraja.*

No. 123] [*11-12-1750*?

रा॥ छ २२ मोहरम

श्री

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब
साहेबांचे सेवेसी.

विनंती. सेवेसी सेवक गोपाल कृष्ण कृतानेक प्रार्थना विज्ञापना. ता॥ छ २२ माहे मोहरमपावेतों साहेबांचे कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित आसे. हकीकत: बावडा सोडल्यावरी दरबारीहून कशाला जाहाला[1]. त्यावरी वण पा॥ सिरपूर प्रांत चांदे येथें कुटुंबसहवर्तमान आहों. या प्रांती येऊन जीवमात्र आपला वाचविला. रोजगारामुळें कर्जदार बहुत जालो. आजपर्यंत राजश्री रघोजीबावा भोसले यांचे सरकारी चाकर होतों. अवंदां बेरोजगार घरीं आहों. कर्जदाराचे धरणीपारणी आहेत. सेवकाचा वगवसिला कोण्ही नाहीं. स्मरण चरणाजवल व्हावें; या पदार्थे विनंती सेवेसी लिहिली आहे. हेत येक वेल चरण पाहावे; परंतु येथून येणे होत नाहीं. याजकरिता रा॥ रघोजीबावास आज्ञापत्र सादर जालियाने येणे होईल. सर्व वर्तमान श्रुत केलियावरी जे आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक सेवक करील. बहुत दिवस आस्था माहाराजाची धरिली ते ईस्वरे सार्थक केली. याउपरी आज्ञा करणार साहेब धणी आहेत. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*The writer requests Tarabai to order Raghuji Bhosle to restore him to his former possessions.*

No. 124] [पो॥ *20-12-1750*

छ १ सफर.

श्री.

पु॥ तीर्थरूप राजश्री नाना ता॥ राजश्री
भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. उपरी. सांगोल्याचे मुकामी आपण केला कारभार त्याच बंदावर हा कालपर्यंत कारभारियांस सार्माल घेऊन कारभार करीत आहो. राजश्री गडावर आहेत, परंतु कारभार कांही तटला नाहीं. कां कीं, राजश्रीचे लक्ष आपलेकडे आहे तेच आहे, त्यांत कांही खतेरा[2] नाहीं. यास्तव हुजरातचा कारभार बारीक-

---

१ दरबारांतून आमचेवर गहजब झाला असा भाव. २ संशय.

मोठा जसा जे समई प्राप्त होतो तसा करावा लागतो. हुजरातीस दुसरा रोजमरा द्यावयास आरंभ करून कांही वाटणी जाली, कांही होणे आहे, तेहि देऊ. वाटणीस यैवज आपण लोकांकडे करून बंद बांधून दिल्हा आहे तोच लोकांकडून यैवज वसूल करून आणून वाटणी केली. परंतु आपलेकडे यैवज हुजरातचा राजश्री फतेसिंगबाबाबाबत पनास हजार पाऊण लाख रुपये तूर्त द्यावे; त्यापैकीं पनास हजार मार्गसीर्षांत द्यावयाचे आपण लस्करांत नेमिले आहेत. त्यासिवाये दर माहेचा यैवज देणे आहे, त्यांत आम्ही कांही दिल्हे नाहीं. किरकोल सेंपनासाची चिठी आली तर देत असतों. मातवर यैवज कांही दिल्हा नाहीं. कारभारी यैवजासाठीं आमचे रूबरू कांही म्हणत नाहीं. परंतु मागे पुढें आम्हाकडे यैवज थारेला[1] असतां आम्ही देत नाहीं; खावंदगिरी करून लोकांकडील मात्र यैवज वसूल करून आणितों, हे बोलावयास जागा होतो. तेंहि असो; परंतु राजश्रीचें लक्ष आपलेकडे निक्षूण असतां त्याचा पैका त्याचे राज्यभारास न द्यावा यैसें काये आहे ? तर येतद्विषईंची काये आज्ञा ती लिहिली पाहिजे. पैका[+] कांही दिलाच पाहिजे. आम्ही सारा कारभार करितो आणि आम्ही पैका न द्यावा हे उत्तम नव्हे. जर कर्ता राजश्रीचे लक्ष आमचे जागाचे सुटते, तर मग पैका का द्यावा, सहजेच होते. यास्तव खावंदगिरी आपल्याकडे, कारभारहि आपल्याकडे, यास्तव चालविलेच पाहिजे. स्वामीची आज्ञाहि पैका द्यावयाची मला होती, परंतु पैकाहि नवता व अताहि नाहींच, यास्तव इकडे तिकडे करून वोढून चालविले. आता पैका दिल्हा पाहिजे. थोडाबहुत दिल्हाने काम चालणार नाहीं. उतर पाठवावे, हे विनंती.

¶*Purandare asks funds from the Peshwa to pay the current expenses of the King.*

No. 125] [*16-12-1750*

छ २ सफर.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनंती. उपरी, आजी छ २७ मोहरमी राजश्री स्वामी प्रातःकालीच पालखींत बसोन खालते यावयाचे उद्येषे चालिले तों गडकरी जमा जाले. राजश्रीची पालखी दरवाज्याआसपास आली. गडकरी आडवे जाले. कोठें जातां म्हणून राजश्रीस बोलिले. राजश्री बोलिले खालतें जातों. गडकरी बोलिले आईसाहेबांचा हुकूम नाहीं, आम्ही जाऊ देणार

---

१ राहिला.

+ येथून पुढील अक्षर नाना पुरंदरे याचे.

नाहीं. यैसे बोलून बलात्कारें राजश्रीची पालखी माघारी फिरऊन नेली. इतकें वर्तमान आजी जालें. ×राजे उर्मटपण करून येत होते, परंतु गडकऱ्यानी दवाऊन माघारे नेले. हे विज्ञापना.

¶*Nana Purandare reports how Tarabai prevented Ramraja going back from the fort of Satara to the town below.*

No. 126] [*18-12-1750*

छ २ सफर.

श्री

तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी अपत्यें त्रिंबक सदाशिव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल ता॥ छ २९ मोहरमपर्यंत स्वामीच्या आसीर्वादेंकरून येथास्थित असे विशेष. केसरकराकडून सरदेशमुखीचा इजारा सिरवल वगैरे मावलें येथील राजश्री पंतसचिव यांजकडे आहे. त्यास सदरहू मामलियापैकीं ता॥ कर्यात मावल आपणाकडे आलें. तेथील सरदेशमुखीचा मजकूर पंतासी कसा काये पुणियांत बोलीचालीत आला तें न कले. हुजराती यैवजाच्या चिठ्या केसरकराकडे जाल्या. त्यानी पंतावर चिठ्या केल्या. पंती कर्यात मावलचे सरदेशमुखीचा गुंता धरला आहे. मल्हियांत मजुरा द्यावी अगर आपले सरकारांतून यैवज देऊन आमची निकड वारावी म्हणतात. तर पंताचा आपला तह कर्यात मावल घेतलें तेव्हां कसा काये सरदेशमुखीच्या मजकुराचा जाला असेल तो लेहून पाठवावा. तदनरूप जाबसाल करूं. दिनच्यर्येंचें वर्तमान अलाहिदा पुरवणियांवरून विदित होईल. +सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Purandare enquires as to what the actual terms of settlement were between the Sachiv and the Peshwa regarding the rights of Maval.*

No. 127] [*21-12-1750*

छ २ सफर.

श्री

पु॥ तीर्थरूप राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, दाभाडियांचे आपले रहस्य जाले. दुसरी गोष्टी, घोरपडियास वगैरे लोकांस मातुश्रींची पत्रें गेलीं होतीं त्याची उतरें आलीं. त्यांचा आगमनाचा

× पत्र नाना पुरंदऱ्याचें. + येथून पुढील अक्षर त्रिंबक सदाशिवाच्या हातचें.

विचार बनत नाहीं. येणेकडून मातुश्रीचा मनसबा हमवार जालासा दिसतो. गडावर गडकरी किलबिललेसे दिसतांत; मातुश्रीस म्हणतांत कीं, तुमचा व राजश्रीचा येकविचार जाला तर आम्ही तुमच्या आज्ञेत आहों. राजश्रीचा तुमचा येकविचार न होये तर आमची घरे नाहाक कां बुडवितां? आम्हांस काये ती आज्ञा करा. देखली बुधी करूं यैसे म्हणत आहेत. त्याजवरून मातुश्रीनी राजश्रीकडे येकचित करून घ्यावयास्तव मध्यस्त रीतीनें बोलून पाहिलें. राजश्रीचा विचार कांही दिलखुलासा हातास न येसा जाणोन बोलीची सांड केली; परंतु वरचेवरी सांगावयास सिकवावयास, माया ममता कांही भयेप्रदर्श व कांही हित-शत्रुत्व सांगतच आहेत. चालेल तितक्या प्रेत्नास आलस होत नाहीं. राजश्री-जवल मातुश्रीचे विश्वासू नारूकाका व सुभानजी तात्या, हे दोघे निरंतर आहेत. खालील वातमी राजश्रीजवळ कोणाची कांही येईल जाईल त्याची खबरदारी राखतच आहेत. फाटे लाकूड वगैरे सामान गड्डावर नित्य जातच आहे. +सेवेसी श्रुत, होये हे विज्ञापना.

¶*Tarabai fails to gain the confidence of Ramraja.*

No. 128] [*Date of receipt 21-12-1750*

छ २ सफर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, राजश्री गोपालराव माहादेव यांचा कारकून गडावर गेला होता. त्याजवळ मातुश्री व मातुश्रीचे कारभारी बोलिलें कीं, गोपालराव म्हणजे प्रतिनिधीचे मुताल्लीक. त्यांजकडे आमचा घराऊ कारभार पिठामिठाचा. त्याणी आमच्या लगामी असावें; तें न करितां पेशव्यांचे घरास व गोविंदरायांचे घरास कारभारास जातांत हें काये? परसरामपंतानी राज्यांत श्रमसाहास केले, त्यास प्रतिनिधी प्राप्त जाली. त्याजमागें श्रीपतराव जाले. त्याजवरी त्याचे भाऊ दादोबा प्रतिनिधी होते. त्यांची काढून त्यांचे भावाचे[1] मूल आणून त्यास प्रतिनिधी दिली हा कोण विचार केला? दादोबाचा उछेद कां केला? दादोबास आणून प्रतिनिधी द्यावी लागते असे राजश्रीस जाऊन पुसोन येणे, म्हणून मातुश्रीनी आपले कारभारी राजश्रीकडे पुसावयास पाठविले. त्यांनी

+ येथून अक्षर नाना पुरंदरे याचे.

१ भवानराव.

राजश्रीस पुसिलें. राजश्री बोलिले, दादोबा मजला मारावयास जपत होता म्हणून पेशवियांनी त्यास धरिलें. प्रतिनिधी त्याची काढून मुलास दिल्ही इतकें जाणतों. या उपरी आपण येथें आहे. तुम्ही वडील आहां; खातरेस येईल तसें करा. मुलाचा करार राखाया[1] दादोबास आणून प्रतिनिधी द्या. मजला काये पुसतां, असें बोलिले. यां प्रकारचे खेळ होत आहेत. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Wranglings between Ramraja and Tarabai. The former feels he is quite helpless.*

No. 129] [पो॥ *21-12-1750*

छ २ सफर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, पुराणीक व भिवजी कांसुरडे वगैरे मातुश्रीचे कारभारी याणी विचार करून गडच्या हवलदाराकडे जाऊन, पांच सातसें लोक घेऊन खाली उतरावें; आम्हांवर व गोविंदराव वगैरे कारभारी यांजवर दंगा करावा; गडावर घेऊन जावें, असा मनसबा केला होता. त्यास हवलदारानें हिरमोड केले कीं, हे गोष्टी कामाची नाहीं. ते तुम्हास आटोपणार नाहींत. तुमचे हातीं लागणार नाहींत. विनाकार्यें खंपीप[2] व्हाल आणि रिकामा दंगा शहरांत होईल. हे गोष्टी कामाची नाहीं, असें बोलून त्यांचा मनसबा मोडून वारापाणी केले. विदित जाले पाहिजे. ×मागती खाली येऊन दंगा करावाच हे मसलत घडत आहे. सिधि जाहलियावर कसे होते पाहूं, हे विनंती.

¶*Purandare reports to Nana how Tarabai tried to capture Purandare but failed.*

---

१ 'मुलाचा करार राखाया' ह्याचा अर्थ, बरोबर लागत नाहीं. + येथून अक्षर नाना पुरंदऱ्याचे.

२ खपीप = फजीत. × येथून अक्षर नाना पुरंदरे याचे.

No. 130] [पो॥ *21-12-1750*

छ २ सफर.

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व तथा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, राजश्री चिमणाजी बापूजी व म्हालोजी मुंठ गेंडेयाचे पश्चमेकडे बनसीपुरीचे महल्याचे[1] उतरेस राहिले आहेत. त्यास चिमणोबानी आज येऊन वर्तमान सांगितलें कीं, स्वामीचे घराकडे रातबिरात येणे पडलियास, मार्गी सेरताटीतून लोक चौकीदाखल वसले आहेत. दुसरे, गेंडेयाजवळ एक चौकी व म्हारदरेयात एक चौकी गोटानजीक आहे. ऐशियास जर याप्रमाणे असलियास असे दिसते कीं, इकडे आम्हावर दंगा करावा, त्या समई आमची फौज आम्हाजवळ पोहचो न यावें, यास्तव बसविलीं आहेत माणसेंसे वाटतें. त्यास आम्ही तर निमे लोक गोटांत व निमे वाडेयात चौकीस याप्रो ठेऊन खबरदार आहोच. परंतु खामखा याप्रमाणें ठीकठाक असिल्यास त्याचा मुलाहिजा काय आहे? यास्तव त्याचे चौकसीस राजश्री रामाजी माणकेश्वर व चिंतो विनायक रात्रीचें चिमणाजी बापुजीचे गोटात पाठविले आहेत. जर गोटास चौक्यादाखल पायचें लोक असल्यास अनयासेच त्यांचे पारपत्य होईल. विदित व्हावे यास्तव लिहिले असे. वांधारीचें लोक मावळे आईसाहेबानी ठेविले आहेत; त्यास, राजश्री गोपाळराऊ याजकडील कारकून, स्वार, व लोक देऊन जाऊली व्याघ्रगड सुभ्यात रवाना करविले. त्याणी आम्हाकडील कारकून मागितला तोहि दिल्हा आहे. हे जाऊन तमाम मुकासी लोक यास जमा करतील. जो न ये आणि आईसाहेबाकडे जमाव करून आला असेल, अथवा येईल अगर त्याचे सनदेनी गांव खेडी बंद करून राहील, त्याचे पारपत्य करतील. वर्धनगडकरियानी चिमणगाव, पुसेगाव, खातगूण, इसापूर वगैरे गावच्या सनदा आईसाहेबांच्या नेऊन गावकरी धरून नेले. यास्तव राजश्री गोपाळराऊ याणी त्याजवर राऊत पाठविले आहेत. तेथेहि कटकट होईल. हे वर्तमान कलावे यास्तव लिहिले असे. स्वामीनीहि याचा विचार मनन करून काये ते आज्ञा केली पाहिजे. आमच्या[+] घरावर्ती थोरली वाघधोंड आहे. तेथे चौकी आज पंचविसा माणसाची आईसाहेबाकडील बसली आहे. दिवसे दिवस चौक्या पुढे आणतात, हे विनंती.

¶*Tarabai prepares to fight with the Peshwa.*

---

१ महला, A division of a town. + येथून अक्षर नाना पुरंदरे याचें.

No. 131] [पो॥ *21-12-1750* ?

श्री

पुा॥ तीर्थरूप राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, बांधारीचे मावले लोक मातुश्री आईसाहेबानी येथें आणवि-ल्यावरून प्रस्तुत जे जे आले त्याची यादी अलाहिदा पाठविली आहे, त्याजवरून विदित होईल. +सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Purandare sends a list of the Mawle fighters collected by Tarabai.*

No. 132] [पो॥ *21-12-1750*

छ २ सफर.

श्री

पुा॥ तीर्थरूप राजश्री नाना स्वामीचे सेवेसी विनंती. उपरी, सेखमिरा व फरीदखान यांचा खिजमतगार अजमत याचा राबता गडावर आहे. सेखजीचा मजुरा उभयेताकडे सांगावयास जात असतो. त्याजवरून राजश्री बापूजीबावानी फरीदखानासी संदर्भ केला कीं, अजमत बराबर आईसाहेबांस सिपाई सरदारांचे नांवे अर्ज सांगोन पाठवावा कीं, कारभारी यांस कारभारसंमंधे गडचा दरवाजा मना केला आहे. असो. सरदार, सिपाई लोक, साहेबांचे चाकर; यांस खावंदांचा मजुरा दो चौ दिवसां येकवेल तऱ्ही व्हावा. दोघे चौघे आजी दोघे चौघे उद्यां, असें करून कोणी आजी कोणी उद्यां, यैसे येऊन मजुरा करून खालीं यावयास प्रत्यवाये काये आहे ? यैसा विचार करून अजमतीस गडावर मातुश्रीकडे पाठऊन दिल्हा. त्याणे जाऊन सदरहूप्रो अर्ज केला. तेव्हां मातुश्री प्रथम बोलिली, बरे; सिपाई सरदार लोक थोडथोडे मजुरियास आलियास चिंता काय आहे ? कां न येत ? असे बोलिलीं; मागती बोलिलीं, आपल्या कारभारियांस पुसोन सांगतो, म्हणून बोलून पुराणीक व भिवबा व उपाध्ये बोलाविले. त्यास पुसिले. ते बोलिलें, हे काय काम करितां ? त्यांस कां येऊ देतां ? कोणाचें कांही काम नाहीं. कोणाचे मजुरियाचा कांही तट पडला नाहीं. कोणास येऊं देऊं नये. असे त्याणी संमत दिल्हावर मातुश्रीनी अजमतीस

+ पत्र नाना पुरंदऱ्यांचें.

सांगितलें कीं, त्यांचे काये काम? आम्हास ठावके आहां, अरधे इकडे, अरधे तिकडे, असे बोलिलीं. याप्रो मजकूर जाला सेवेसी निवेदन व्हावे यास्तव लिहिलें आहे. +सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Tarabai's intrigues against the Peshwa.*

No. 133] [*1750?*

श्रीभवानी प्रसन्न

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
त्रिंबकपंत नाना स्वामी गोसावी यांसी.

सेवक येमाजी सिवदेऊ कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष. राजश्री दादोबा कैलासवासी याचा आमचा स्नेह कोणे रीतीचा होता, ते लोभ ममता करित होते, तेहि तुम्हास दखल आहे. त्याप्रमाणें राजश्री महादजीपंत बाबाहि ममता लोभ करित आले. यैस असतां कालगतीमुळे कोणाच्या सांगणीवरून त्याच्या मनात विप्रयास येऊन आमच्या ठाई अवकृपा धरली. तेणेकरून आमचे अवघे आनहित होऊन आमच्या सवसाराचा आवघा नाश होऊन आम्हास देशांतर प्रात जाहाले. आम्हापासून काही आपराध जाहला नाही. यैस असता आम्हावरी निष्ठुरता धरावी हे थोर लोकास उचित नव्हे. याजउपरि त्याणीं आम्हांवरी दया करावी हे त्यास विहित आहे. आम्ही ब्राम्हण, आमचा नाश करावा यैस नाही. तुम्हीहि त्यास लेहून, त्याचे चित सदये होऊन आम्हांवरी दया करीत तो विचार आपण केला पाहिजे. तुम्हीहि दरबारी होता. आम्हापासून काये अंतर पडले हे तुमचे चित तुम्हास साक्ष असल. दुसरी गोष्टी राजश्री बाबांनी[1] तुमचा आमचा हात येक करून दिल्हा. राजश्री माहादोबानी आम्हांवरी अवकृपा करून निराआपराध लोकाचे सांगित-ल्यावरून करून आमची गत यैसी करावी हे त्यास युक्त नव्हे. ज्यानी अवकृपा केली त्याणीच दया करून आमचे बरे करावे, हे त्यास उचित आहे. प्राणा-पावेतों गोष्टी आली. हे ईस्वरास मानणार नाहीं. याजउपरि आपण त्यास लेहून त्याचे चित्त सदये होऊन आम्हावरी कृपा करून आमची बरी गोष्टी होय तो विचार आपण केला पाहिजे. लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Yamaji Shivdeo writes to Nana Purandare, requesting him to have him reconciled to Mahadoba Purandare.*

+ पत्र पुरंदऱ्याचे. १ मल्हार तुकदेव. २ (?)

No. 134] [*1750 ?*

नकल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
चिमणाजीबावा स्वामी गोसांवी यांसी

सेवक येमाजी शिवदेऊ नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करविले पाहिजे विशेष. श्रीमंत राजश्री पंतप्रधान यांनी राजश्री उदाजी चव्हाण हिंमतबाहादर याच्या साहित्यास फौजेसहवर्तमान आपल्यास देऊन आमचे पारपत्याची आज्ञा केली आहे म्हणऊन वर्तमान ऐकिले; तरी आमचें पारपत्य व्हावयासी बाकी राहिली आहे यैसे नाहीं. प्राण रक्षण करून येथे श्रीमंताचे चिंतन करून आहों. येथे राहाणें आमचे हातीं आहे यैसे नाहीं. श्रीमंतहि दया करून राहो दिल्हे आहे म्हणऊन आहों. काही पारपत्य करावयाचे अवशिस्ट असेल तर आम्ही ब्राम्हण ; श्रीमंतांचे इच्छेनें पारपत्यहि आमचें होईल. आणि ऊर्जितहि होईल. यैसे असतां चव्हाणास आमच्या पारपत्याची आज्ञा करून साहित्य करावे यैसे काये आहे? या प्रसंगात तुम्ही थोर लोक येऊन पडिलां आहां, यामुलें आम्ही बहुत समाधानरूप आहो; तरी श्रीमंतास येविसीं लेहून श्रीमंतांची छाया आम्हावर होऊन तुम्हास येश ये ते केले पाहिजे. येविसीं बहुत काय लिहावे ? तरी तुम्ही थोर विवेकी आहा. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Yamaji Shivdeo to Chimnaji Bapuji, a Sardar of the Peshwa, asking him to use his influence with the Peshwa on his behalf.*

No. 135] [*26-12-1750 ?*

श्री.

विनंती. उपरी, येथील कुशल ताा पौष शुध्द १० बुधवार मोकाम नजीक जरंडा सुखरूप असो विशेष. आम्हास येऊन पावणा महिना जाहाला, येकहि पत्र न आलें. आम्ही दोन चार पत्रें पाठविलीं ती पावलींच असतील. तरी तिकडील सविस्तर वर्तमान लिहून पाठवित जाणें. इकडील वर्तमान तरी श्रीमंतांचे आज्ञेप्रमाणें चौकडील चौक्या व आंतील राजकारण कार्याकारण रक्षूण राहिलो आहों. येकादसीस श्रीकृष्णेच्या पाण्यावरी मुकामास गेलों. सतरुसीस जमा जाहले आहेत ते तैसेच जात आहेत. आम्ही आल्यापासून स्वारी-

सिकारी बंद आहे. पायेउतारा कांहीं राऊत चोरीनें कुडाल खोरे वगैरे येकदोन पाठीमागे जात आहेत. तेथे मात्र उपसर्ग जाहला. त्याखेरीज कोठें बाहेर निघत नाहींत. यापुढें होईल तें पाहावें. सप्तरुसीतील ग्रहस्त आसीर्वादवचनें बहूत देतात. परंतु निदर्शनास कोणतीहि गोष्ट येत नाहीं. ईश्वरसत्तेनें घडणें ते घडो. चालणेस अंतर किमपि नाहीं. फलदाता इश्वर आहे. राजश्री श्रीपतराव शामजी यास वाताचा उपसर्ग जाहला होता; याकरितां च्यार दिवस राहिले होते. हली येथें आलें. श्रीमंताकडे येणार. त्यास येथें कार्य होते या * * * ठेवून घेतले आहेत. वर्तमान श्रीमंतास विदित करून त्यांचे आज्ञापत्र पाठऊन द्यावे. तुम्ही दरबारचा कार्यभाग उरवून घेऊन यावयाचं करणें. दिवसगत न लावणें. बहुत काय लिहिणें, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*This letter gives an account of the disorder which had broken out at Satara owing to the despatch of forces to that place to restore order.*

No. 136] [*Dec. 1750 ?*

श्री

सेवेसी विज्ञापना. करवीरवासी यांस आणावयास विठल बयाजी गेले होते. यावयाचा सिधांत जाहला होता, परंतु स्वामीचे अश्वसनाखेरीज आलियानें परिणाम नाहीं याकरितां परभोरी पत्रें स्वामीकडे गेली, हे वर्तमान सप्तरुसीस आलें. त्यावरून उभयेताचे चितास न आलें; ही येक गोष्टी. दुसरी गोष्टी सांगोन पाठविलें जे दोनसें माणूस गडावरी आपलें द्यावें; दोनसे माणूस राजश्रीच्या चौकीस. याप्रमाणें ठिकाणास येऊन ठिकाणी बसल्याउपरी निघोन येतों. त्याप्रमाणें एकिल्यावरी गोष्टी विलंबावरी पडली. फौजाहि येऊन दाखल जाहाल्या. पौष मासहि प्राप्त जाहाला. यामुळें येणें राहिले. गेले ग्रहस्त माघारे आलें. स्वामीच्या फौजेचा दबाव बसला. स्वारीसिकारी बंद जाहाली. नित्य शाहारांत गलबला होतो, आतां येतात उद्यां येतात. चहूंकडील मार्ग राहिले. दाणागला जात नाहीं; याप्रमाणें जाहालें आहे. त्याजवरून बावाजी जाधव याणीं सांगोन पाठविलें जे याप्रमाणें जाहालिया राजश्रीस व मातुश्रीस मारून आपण मरतो; अपकीर्तीस कारण होतां हे गोष्टी न व्हावी. मागें पाच सात वर्षें दादोपंत वागत होते; त्याणीं दोहीकडील चित रक्षून राहिले होते. आतां नवीन प्रसंग न व्हावा. या विचारें सांगोन पाठविलें त्यांचे उतरहि पाठविले आहे.

नवीन प्रसंग होणे तो तुम्हांकडूनच जाहाला. याकरितां हे गोष्टी घडणें जाहली. समर्पक गोष्टी जाहलिया श्रीमंतांस लेहून आज्ञा होईल तेणेंप्रमाणें वर्तणूक होईल म्हणऊन सांगोन पाठविले आहे. उतर आलियावरी सेवेसी श्रुत होईल हे विनंती.

¶*This letter describes the condition of things at Satara as regards Chhatrapati Ramraja and Tarabai. Sambhaji of Kolhapur was expected to come to Satara but he did not arrive.*

No. 137] [*29-12-1750*

श्रीलक्ष्मीकांत

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. आज्ञांकित गंगाजी गोपाळ कृतानंत सां नमस्कार विज्ञाप्ति. येथील कुशल पौष शुद्ध त्रयोदसीपर्यंत स्वामीच्या कृपाकटाक्षेकरून चंद्रपुरी येथास्थित असो विशेष. येथील वृत कित्येक राजश्री वेंकाजी मोरेश्वर यानी सेवेसी लिहिलें आहे त्याजवरून कळों येइल. कितेक विचार लेखनात येत नाहीत. निमित्य राजश्री येजमानानी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी राजश्री मैराळ नारायेण पाठविले आहेत ते स्वामीच्याहि शेवेसी येऊन सादंत निवेदन करतील त्याजवरून ध्यानास येईल. विशेष काये लिहिणे. सर्वकाळ आज्ञापत्रीं सांभाळ-करावयासी स्वामी समर्थ आहेत. चंद्रपूरचे वर्तमान, दो चौं दिवसात निर्गम होऊन सैन्यसहवर्तमान येजमान गंगातीरास सत्वरच येतील. स्वामीच्या प्रत्यो-त्तराची मार्ग प्रतिक्षा करीतात. प्रत्योत्तर येईल तदनुसार वर्तावे हा येजमानाचा पुर्ण निश्चये आहे हे विज्ञाप्ति.

¶*Gangaji Gopal to Bhausaheb, saying that Mairal Narayan has already been deputed to the Peshwa by Raghuji and that Raghuji himself would soon be reaching the Godavari after having first settled the affairs at Chanda (Chandrapur).*

No. 138]

श्री

पुरवर्णी विज्ञात जे. राजेश्री अंताजी सिवदेव याणें येथून मुख्यास नेणेस जागा जागा राऊत माणसे नेमून ठेविली आहेत. मुख्य व सौ बाई उभयेता नित्य सिकारास नदी व बागबागपाईस रोज उनामधें बाहेर निघणेस राबिता केला आहे. हमेपा माषे व हरणें याची सिकार खेळतात. श्रीशंकरभारती स्वामी

चिकाडीस गेले. त्यास मुदाम दोघे हुजरे देऊन जलदीने बोलाविलें. किनिमित्य तर मातुश्री ताराबाईकडोन याच्या पायावर हात ठेऊन क्रिया घेणार. याकरीता स्वामीसहि सतरसीस पाठवावे. अथवा पफतपूर्वक यांचे नावचे पत्र मातुश्री पावे यैसा विचार. रा॥ धाकटे नाना कडोन राघोपंत नामे कारकून ताराबाईकडील हुजरे बा॥ घेऊन आला आहे. त्यास पुरसीस केलिया म्हणतों की नानानी राज्याकडील जोड्या मागून घेऊन आपणा समागमें देऊन बातनीस येथें पाठविलें आहे. हेच वजिनस ताराबाईकडीलसें पुरतें अढलले. गोविंदरायाकडीलहि संदर्भ येथें ऐकीला जातों. परंतु निकड मातुश्रीची जबरदस्त दिसती. मुख्य व बाई उभयेतांहि जाणार हेहि ऐकतों. कोणते वेलेस जातात न कले. मनसबा बाहेर निघत नाहीं. घरामधे दम खाऊन पोख्त होतों. याचा विश्वास येकंदर नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञात.

¶*The letter gives information regarding the arrangements made for taking Sambhaji to Satara. Men are also deputed to bring the Shankaracharya.*

No. 139] [*30-12-1750*

श्री

आज्ञाधारक आनंदराव गिरिधर त्रिकाली सास्टांग नमस्कार विज्ञापना. छ ११ सफर मोकाम करविरी खावंदाचे पुण्यप्रतापें सेवक क्षेमरूप असे विशेष. इकडील वर्तमान रा॥ विसाजीपंतासमागमें फौज व हातरोखे मुख्यानी देऊन सामानगडास ठाणें बसवावयास काल येथून रवाना केलें. मानाजी पायेगोडा फौजसुधा त्याच रोखेस उतरले असेत. सामानगड ठाणे हातास आल्यावर आणखी मुदरगड वलभगड देणार म्हणोन मुख्यानी आज्ञा केली, तो दरबारचा सविस्तरपूर्वक व्रतांत अगदी दखलगिरीने रा॥ केशवरायानी सेवेस लिहिला आहे. दुसरें वर्तमान उडतें यैकतो जे, मातुश्री ताराबाईकडोन हुजरे कागद घेऊन आले होते. त्याचा मजकूर पूर्वी रा॥ रामराजे तीर्थरूपास कैद केलेसमई तुम्हासच राजी स्थापिले होतें. सांप्रत तोच प्रसंग घडला आहे. सत्वर आले पाहिजे. तुम्हाखेरीज अधिकारी नाही. अगत्यरूप येणें, आपले राज्य करणें. असे कागद पाहून मुख्यानी त्या गोस्टीस डोल दिल्हा असतां सौभाग्यादिसंपन्न बाईनी सांगितले जे, मातुश्रीस पूर्वीपासून तुम्ही बहुतसा प्रत्योपकार केला, तो ध्यानांत आणून हा मनसबा करणें. रामराजा सारखें तुम्हासहि सतरसीमधें उभयतांस कोंडून दावा उगवितील. दोनी राज्यें जिवंत असिजेपावतों करतील. दूरवर दिष्टी देऊन हरयेक मनसबा करणें म्हणोन सांगून मनसवा मोडला यैसं यैकतों. येथें बहुताच्या

मुखें वलगना या मजकुराची आहे. सिवाजी थोराताची फौज मालजी सिंदा हे अगदी लस्करास सामानगडास गेले. मुरारराव घोरपडा सोंडूरावर आहेची खबर आहे. नवाब नासरजंग व पठाणामधें कजी होऊन फितूर होऊन पठाण व फिरंगी येकत्र होऊन लडाई जाली. अबदूल मजीदखानाचे लेक अबदूल करीम याचे हातचें तीर दोन नवाबास लागले. बाहदूरखानाचे हातची बंदुखेचा गोला येक लागून (न) वाब लडाईंत ठार जाले. इदायेत मोजदीनखानास हैदराबादेच्या सनदा पूर्वी आल्या होत्याच. सनदास फर्मानवाडी करून सनदां घेऊन कुल दक्षणचा सुभा हिदायेत मोजदीनखानास पठाणानी ठराविला. याचप्रमाणे अबदूल मजिदखानाने पत्र लेहून मुख्यास पाठविले आहे. कर्नाटकामधें फितूर जाला यासाठी मुरारराव घोरपडा मागारा कर्नाटकांत जाणार हेहि खबर आहे. येथून मुख्य व सौा बाई यांची स्वारी तोरगलास होणार म्हणोन आवाई आहे. यैकले वर्तमान सेवेस लिहिले आहे. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Anandrao Giridhar writes to the Peshwa how on the offer of Tarabai Sambhaji consented to proceed to Satara and how Jijabai prevailed upon him to cancel his plan by bringing home to him the intriguing nature of Tarabai who would imprison him and conduct the administration both at Satara and at Kolhapur.*

No. 140 [*4-1-1751*

श्री

श्रीमत तीर्थरूप राजमान्ययाविराजित
राजश्री स्वामी राजश्री स्वामी वडिलांचे
सेवेसी.

आपत्ये अंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणावर मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना कीं पौष्य वद्य चतुर्थी प्रातःकालपर्यंत प्रसंगीचे वर्तमान तर शेनापति इंडीस आहेत. आरब व हरजी घारे व सिदीचें सामान आवचें पायदळ माणूस मिळोन पंधराशेंपर्यंत फौज व घरपागा व सिदी व कांही कांही सिलेदार मिलोन उतम मध्यम मिलोन पांचशेपर्यंत. परंतु गायेकवाडाची वार्ता आयेकोन समाधान दिसते. परंतु चितापासून हर्षामर्ष करावा हा हेत दिसत नाहीं. उभयेतां मिलोन येकांती विचार कीं हर्षामर्षांत कांहीं उतम नाहीं, परंतु इतका लौकिक करावा हे नवते. लौकिक त्यांचा जाला की थोरास थोर समयास रक्षितात. कांहीं न्यूनपूर्ण तर कीं कांहीं कोन्हाचे फितव्यात आसो; तर हा प्रसंगपावेतों तो विचार तर आम्हांपासून जाला नाहीं. ताकपीर

साहित्य होते ते आले. शैन्यास येथे कांहीं फौज फार नाहीं. लौकिक वार्ता तर गाईकवाडासमागमे तोफगाडी पांचसाहा आहेत व बानाचे उंट बावीस आहेत. दारूगाडिया पंधरावीसपावेतों आहेत व बारा हजारपावेतों फौज व पायेदल दोन हजारपर्यंत आहे. लोकवार्ता आहे, परंतु दरबारची वार्ता तर याप्रमानें नाहीं. दारूगोली सामान व पायेदल व फौज सरंजाम चांगला आहे; हे वर्तमान दरबारी आहे. मातुश्रीकडील वर्तमान काये येते त्याप्रमाने वर्तणूक करावी, हा विचार याचा आहे. रोजमुरा वडिलानी पाठविला व शेला व पागोटे पाठविले ते पावले. घोडीस तट्टास बेगमीस काही नाही. हिशेवहि वडिलांचे चरणापासी पाठविला आहे. दाणियास बेगमी नाही. पोटाची वेगमी जाली आहे. हिशेब वडिलानी पाहोन आज्ञा केली पाहिजे. वसिला तर चरण आपले आहेत. इतर कोन्ही नाही. याविषईं विनंती मान्य केली पाहिजे. उधार देत नाहीत. मागील भरणा जाला. अनमान करितात. परंतु वडिलाचे आसिर्वादे करून. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना. पुढेहि प्रसंगी वर्तमान होईल ते शेवेसी, हिशोब शेवेसी पाठविला. उतर पाहिजे, हे विज्ञापना.

¶*Antaji Vishvambhar gives details of Senapati Yashvantrao Dabhade's movements.*

No. 141] [पो *9-1-1751*

छ २१ सफर.

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी,

विनंती. उपरी, येथील वर्तमान वरचेवरी लिहितच आहो. गडकरी बोलो लागले आहेत. मातुश्रीची व राजश्रीची मध्यस्ती करीत आहेत की, उभयेतानी येक व्हावें आणि आपला राज्यभार चालवावा. नाहीतर आम्हास काये ते सांगावें. त्यास मातुश्री म्हणतात की, आपले विचारे जे कर्तव्य ते करावें. राजश्री म्हणतान की, आपण जे कर्तव्य ते राजश्री प्रधानपंताचे विचारें आपला कारभार करून मातुश्रीस सांगत जाऊ. परंतु पुराणीक वगैरे पाचसात असामी आहेत ते दूर करावें, याप्रों मजकूर आजदोन रोज होत आहे. दुसरे गडकरी बोलतात की, राजश्री नानाकडील रामाजीपंत वगैरे दोघेतिघे वरते घ्यावें. त्याचे हातून बोलवावें ऐसेहि आहे. होईल ते लेहून पाठविले जाईल. काल चिमणाजी

बापूजी याणी लस्कराजवल चौक्या बसल्या आहेत म्हणोन सागितले होते. त्याची चौकसी करून पारपत्य करावें म्हणोन रामाजीपंत व चिंतो विनायक पाठविले होते. याणी जाऊन चौकसी केली. परतु कोठे काही ठिकाण नाही. सारे वारापाणी जाले. मग माघारे आलें. राजश्री गोपालराऊ याजकडील लोक व राऊत मेढेखोरियात पाठविलें. त्याणीं तमाम तिकडील चौकसी पाहून पारपत्य करावे. त्यास कासुर्डे व पारटे हे मेढेखोरयातील; यास्तव भिवजीस मुंगला लागोन त्याणी येथे माणूस ठेविले होते त्यापैकी दोन चारसे माणूस तिकडे रवाना केले. असे कललियावर गोपालराऊ याणी आम्हाकडील (राऊत) मागितलें. त्याजवरून सेंभर राऊत आम्हीहि दिल्हें. जरी भलते गोष्टीस त्याणी उरमडून गोष्ट सांगितली तर पारपत्य करितील. ऐशियास आम्हा सर्वांचे मते याउपरी असेच जागजागा करावे. आईसाहेबांचे पत्रास मान नाही असे जालें म्हणजे सर्वहि हतवीर्य होईल. गुंज मोडेल. साराच मनसबा सिधीस जाईल असे जाले. त्याजवरून याप्रमाणे करीत आहों. जो मातुश्रीचा कागद घेऊन गेला असेल त्याचे पारपत्य करतो. आम्ही येथेंहि खबरदार आहों. काही चिंता नाहीं. स्वामीचे पुण्य समर्थ आहे. येथे आम्हाजवल सामानहि थोडे बहुत आहे. उगेच टुकडे मोडून आम्ही बसावे यात जीव काय आहे ? गडकरी, आईसाहेब नरम येत असे व्हावयास अगाध नाहीं. जेथे जेथे गडकरी उतरल, ज्या गावावर रोखेपत्र येतील ते माघारे लावले, चाल्ह दिल्हे नाहीत, म्हणजे सहजच नरम होतील. राजश्रीचे लक्ष सर्वप्रकारे स्वामीचे ठाई. आईसाहेबांचे कारभारी पुराणीक, भिवजी, नारोजी, राजश्रीला म्हणतात की, आईसाहेबाचे विचारे कारभार करा. राजे परिछिन म्हणतात की, माझे कारभारी नाना खालते आहेत. त्यासिवाय मी कांहीं करीत नाही. याप्रो साफ नेटाने बोलतो व आम्हास प्रत्यह सांगून पाठवितो की, माझी गत अतःपर काय करता ? खालता बंदोबस्त केला तर येथे नरम पडतील येसे सांगून पाठवितो. राजा आपले लगामासिवाय नाहीं. स्वामीची मात्र आज्ञा परिछिन्न यावी, म्हणजे इतक्याच सामानाने बाहेर बंदोबस्त करितो. गडकरियाकडेहि सुत्रे आहेतच. जसजसे पडेल तसतसे करतो. परंतु काही गडकरियास हमवार केले पाहिजे. मग जसजसे पडेल तसे करू. उगेच येथे मलमलित बसून काय ? राजश्रीला सांगून पाठवितो की, चिंता करू नका. साहेबाचेच यावयाचे तलासांत आहो. त्याजवर सुखी राहतो. परंतु मागती काही होईनासे जाले म्हणजे घाबरा होतो. कसेहि असो, परंतु राजश्री आपला बरा. पुराणीकाचे, भिवजीचे पाया पडून कारभारात मिळावे. आईसाहेबाची मर्जी संपादावी. राजा हलका (पा) डवा हे तो सहसा करू नये. मग

काही तरी * * हे पुर्ते स्वामीनी मनन करून ल्याहावे. आम्ही तो येथे अतःपर थोडा थोडा वंदोबस्त करतो. मग काये होईल ते होऊ. असे करता गडकरी कसे हजारा दो हजारानसी चालून आले तर जुजतो. अधी तो गडकऱ्याच्याने येवतच नाही. पुरता दवाव स्वामीचा आहे. स्वाम का उपेक्षा करतात? राजा स्वामीचे ठाई लक्ष धरतो. मी त्याचा याप्रो साफ आईसाहेवाजवल वोलतो. आणि त्याचा खालता यावयाचा विचार कसा न करावा? याचे उतर पाठवावे, हे विनंती.

¶*Purandare writes that he is dealing firmly with Tarabai's armed resistance.*

No. 142] [*16-1-1751*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान साहेवाचे सेवेसी विनंती. आज्ञाधारक महिपतराऊ कवडे दंडवत विनंती. येथील क्षेम तागाईत छ २८ सफर मुकाम नजीक रणाईचे परगणे डांगरी साहेवांच्या कृपावलोकनेकरून सेवक लोकांचे वर्तमान यथास्थित असे विशेष. दमाजी गायकवाड यानी केवळच शुध सांडिली. बहुता प्रकारे वलगना करून मुलूक लुटीत चालिला. साहेवांच्या प्रतापे पुढे यावयाचा संशय धरून माघारां चालिला होता; परंतु मागती काये मसलत केली न कले. फिरोन धुले कसविियाचा शिवार चारून नाश केला आणि तापी तीरी थालनेर परगणियात गेला. आता रोख चोपडे वऱ्हाणपुरावरी जावयाचा आहे. केवल फौजेच्या वलें त्याने अनीत आरंभिली. आम्हापाशी खासगत फौज व साहेवाची पथके मिलोन आडीच तीन हजार जमा जाले. परंतु ते फौज भारी, दाहा पंधरा हजार आहे व वरचेवरी देशीहून लोक येतात. वदंता लस्करात की राजश्री रघोजी भोसले व हे येक होऊन गंगातीरे येऊन पुढे देशास यावे यैसे वर्तमान हें वोलतात. साहेवांच्या प्रतापे आम्ही पिछ्यावर आहो. आणखी पाच हजार फौज सरस साहेव पाठवितात नामी तर हा फंद याच प्रांतीं विल्हेस लागतां. याजकरिता सविस्तर सेवेसी लिहिले असे. केवल सलुख जैसा राजश्री सेनापतीनी केला त्याप्रमाणे येथे वर्तणूक नाही. पुढे मनसवा वोलीत वहुतसा वोलतात त्या गोष्टी लिहिता पुरवत नाहींत. सूचनार्थ सेवेसी विज्ञापना लिहिली असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Mahipatrao Kavde reports to the Peshwa the boastful movements of Damaji Gaikwad.*

No. 143]



श्रीमंत तीर्थरुप राजमान्ये याविराजित
राजश्री स्वामी वडिलांचे शेवेसी.

राजश्री स्वामी वडिलांचे शेवेसी, अपत्यें चरणरज अंताजी विश्वंभर करद्वये जोडून चरणांवर मस्तक ठेवून शिरसाष्टांग नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना कीं, तागायत माघ शुद्ध द्वितीयापावेतों मुक्काम तलेगांव कुशल असो. यानंतर प्रसंगींचें वर्तमान विक्रमसिंग हजारी पागा संगमनेरीहून संभर उत्तम घेऊन आला. शेनापतीचें सामान घर साहित्य हजारपावेतों जालें व लक्ष्मण जाधव सतरुसीस गेला आहे; वार्ता कीं, कांहीं द्रव्य आणावें कलले. पाहिजे. बाहेरुनहि कांहीं जमाव येणार हेहि वार्ता आहे. बाहेर निघणार हे सत्य आहे. आपणांपासी साहित्य एक चवकडा राहिला आहे. जासूद कांहीं मागें परतोन येत नाहींत. येथें मिलकत नाहीं यामुलें अनमान करितात. आपणहि पौर्णिमा जालियावर दिवस आठ जालिया-वर येणार. येथें देणेदार यानें श्रमी केले आहे. पौर्णिमा जालियावर वायेदा केला आहे. दिवसा उठोन यावे तर येऊं [illegible] नाहीं. यास्तव रात्रौ यावे लागेल. चरणांपासीं विनंती करून. त्यांचे त्यास पावतें करावें. रात्रौ शेनापति निघाला तर जासूद चार सात जोडिया होत्या; त्या पैकीं दोन जोडे राहिले आहे. एक जोडी खेडतळावरून कूच जालें तेव्हां एक पाठविल्या. बाकी चिखलीच्या तलावरून आले नाहींत. राहिले. उत्तम जीवदार चवकस मानूस राहतें. आजी रोगी म्हातारे येतें ते हि राहिलीं. कलले पाहिजे. याप्रमाणें प्रसंगीं वर्तमान आहे. परंतु बाहेर निघोन कोंठ जाणार हें कलत नाहीं. कितेक दिवस लागतील हे न कले. परंतु बाहेर निघतां हे तहकीक आहे. दुर्गाबाई लग्नास चिरंजीवांस घेऊन जाणार. उत्तम घोडे, उत्तम मानूस मागत होती. दिधले नाहीं. जीन, खोगीर, साहित्य गुत्त रुपें होत आहे. बारगीरहि एकांती मिलाले आहेत. निदानच्या समयास अजुरदार करून पाठवावे, तर तूर्त कांहीं अजुरा मागेल तर कोठून द्यावा? हिशोबहि चरणांपासी पाठविला. उत्तर कांहीं न आले. श्रीमंतांनीं (अपुरें).

¶*Antaji Vishvambhar gives news from Talegaon of Dabhade's movements and preparations.*

No. 144] [*January 1751*

श्री

राजश्री बालाजीपंत गोसावी यांसी.

अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्ये श्रीो महिपतराऊ कवडे दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे. यानंतरी तुम्ही पत्र पाठविले ते पावले. लिहिले वर्तमान कलो आले. त्यास आम्ही खानदेस प्रांते जतीचे कामाकरिता गेलो होतो त्यास तिकडे गाईकवाड आला. राजश्री बापूजी बाजीराऊ फौजसुधा तिकडे आले आणि गाईकवाडाचे आमचे युद्ध-प्रसंग जाहाला. तो सातारेयाकडे तलेगावपावेतो आला आहे. त्याजमागे फौजसुधा आलो आहो. देसी धामधूम बहुत मांडिली आहे ऐसे वर्तमान आहे. तुम्ही लिहिले कीं आम्हास काये ते उत्तर पाठवणे. ऐसियासी हे चाकरीपुढे आम्हास काही सुचत नाही. तुम्हास जैसे कलेल ते करणे. आम्ही स्वामी कार्याबरी गुंतलो. हे चाकरी धणियाची आधी करणे लागते. खानदेशचे काम टाकून खावंदाच्या आज्ञेवरून याजसमागमे आहो. निरोप देत नाहीत. सर्व मामलती तैश्याच राहिल्या. बहुत काये लिहिणे, लोभ असो दिजे हे विनंती.

सेवक अंबाजी देवाजी सां नमस्कार. लिा परिसीजे हे विनंती.

¶*Mahipatrao Kavade writes about his pursuit of Damaji Gaikwad.*

No. 145] [*26-1-1751*

श्रीशंकर

श्रीमंत माहाराज राजश्री नानासाहेब साहेबाचे सेवेसी.

ऽ अज्ञाधारक भिकाजी नाईक वांकडे दरजागा कमलालये कुर्निशात विनंती. उपरी, येथील कुशल ताा छ ९ रबिलावल जाणून महाराजाचे कृपेकडोन येथा-स्थित असे विशेश. आज्ञाप्रमाण वातर्नीचे वर्तमान तरी नवाबाचे जासूद भागा-नगरीहून राजश्री माहाराव जसवंत निबाळकर यासी इनायेतनामे छ २७ सफरी कमलालयासी घेऊन आले. त्यास छ १ रबिलावलीं प्रतिउतर देऊन रवाणा केले. इनायेतनामे राााचे नावें व रोा माहादाजीबावा व पुत्राचे नांवे व डौलामियाचे लेकाचे नांवे पत्रें आलीं. माार जे आपण डेरे दाखल जालों. तुम्हीआपले बफौजनसी येऊन दाखल होणे. छ २७ सफरीं राा राजे विठलदास यांची सून सासूबाई व त्यांचे नातु दादेराव व पुतन्या संगमनेरीहून शाहर हैदरावादेस जावयासी आले. त्यां-

समागमे पंचवीस स्वार व गाडदी पंनास वगैरे उंट कारखानियाचे चालीस होते. तेथे रोानी दोन रोज ठेऊन त्याची मेजवानी वस्त्रेंपांघुरणे करून समागमें आपले स्वार ५० देऊन वाटे लाविले. छ १ रबिलावलीं मंगळवारी स्वार होऊन गेली. त्यानंतर छ ५ रबिलोवलीं रााा समुदायेयुक्त श्रीदेवीचे उछवाकरितां देवीपासी डेरे देऊन राहिले. चर्चा की उछाव जाल्यानंतर येवनाकडे जावयाची वार्ता आहे. यावरी पाहावें. सेवेसी माहाराजांचे श्रुत व्हावे. विशेष काय लिहिणे हे विज्ञापना.

¶Bhikaji Naik Vakade informs the Peshwa that the Nizam has issued instructions to Nimbalker and other Sardars asking them to join forces with him in his march towards the Peshwa.

No. 146] *[1-2-1751*

छ २० राालौवल.

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना व राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. उपरी, काल छ १६ रावलीं किल्यावरून तोफा गोले घालून आमच्या, गोविंदरायांच्या व गोपालरायांच्या वाडियावर लागू केल्या. दाहापांच मारल्या. येक गोला गोविंदरायांच्या वाडियावर पडला. येक हैवती सोनाराच्या घरावरी पडला. येक गोला गोविंदरायाजीच्या वाडियावरी पडला. आमच्या वाडियावरी चालीपंनास धोंडे ढकलले, परंतु वाडियावर लागू जाहालें नाहींत. आज येवतेश्वरास हजार हशमीं लोक आले. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापि.

¶Letter from Satara to Poona, announcing that the guns of the fort have opened fire upon some houses in the town.

No. 147] *[3-2-1751*

पौ छ २० रबिलोवल.

श्री.

तीर्थरूप राजश्री नाना व ताा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

अपत्यें त्रिंबक सदाशिव कृतानेंक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ १७ रबिलोवल रविवार प्रातःकालपावतो यथास्तित असे विशेष. दादोबा येथें मंगलवारी वर्तें आले. त्या दिवसापासून येथील दिनचर्येंचे वर्तमान

रोजचे रोजचे सुतरस्वाराबो व डांकेबो व रिकिबदाराबेा सारे लेहून पाठविले आहे त्याजवरून सर्व अर्थ ध्यानांत येऊन उतरे पाठवावयाची आज्ञा करावी; परंतु अतःपर येथें काही बाकी रांहिली नाहीं. मग उगेच सुचले ते सेवेसी लिहितो—

येक प्रकार असा आहे कीं आईसाहेब खावंद. राज्य त्यांचे. आपण चाकर लोक. खावंदासी अभिमान कुरा करण्यास करावा? खातरेस मानेल त्यास मोडूत व खातरेस मानेलं त्यास उभे करोत्. दादोबा उभा करोत. हा प्रतिनिधी गोपाळराऊ योजूनात कां? जी आईसाहेब करतील त्यास अनुमोदन द्यावे, दिल्हे ते खावे; सुखरूप असावे, अभिमान धरू नये. मग तीं कांहीतरी करोत. आपण इतके खोलींत पडू नये. हाहि येक प्रकार पडमरूपणाचा थोडासा आहे.

चवथा प्रकार असा आहे कीं, शाहू माहाराज मरतेवेलेस काय काय बोलले होते? सखवारबाई बोलली कीं या राज्याचा खावंद संभाजी राजा. हे नवे उभे केले आहे हे खूल आहे. संभाजी राज्याचा चाकर म्हणवील तो इमानी. त्याचे बरे होईल. या खुलाला हाती धरून बसवील, ही गादी ह्या धन्याची त्यास देईल, त्यास बरें होणार नाहीं, हे साफ सती निघतेवेलेस बोलली. स्वामीसहि स्मरण असेलच. त्यास सखवारबाई राजा शाहू ईश्वररूप व स्वामीचे ठाई दुसरा भाव त्यांचा कदापि नवता.

दुसरा प्रकार, हे राजश्री आईसाहेबानी दाखविले खरे. परंतु त्याचे लक्ष स्वामीचे ठाई. मग कसाः तरी वेडा वाकडा असो. आईसाहेबी दादोबाचे पारपत्य गतवर्षीपासून करावे हे सांगत होती. ती * * * संभाजी राज्यास आणून हे (राजश्री) हे दादो * * * * * साहेब काय काय * * * ती ते अगदीं विसरून दादोबा अ * * करून स्वामीसी विरूध्द वाढविले. दादोबाला शत्रु येक स्वाम व दादोबाहि शत्रु स्वामीचा. तेव्हा आईसाहेबाची इमानाची शीमा जाहाली. आता राजा तुमचा तुमचा म्हणतो यास्तव दोन महिने लागोत चार महिने लागोत. आटा बंद करून चौक्या बसवाव्याच. जोर पोहचाऊन राजा खालीं आणावाच. आईस हमवार करावी. दादोबा मागती ठीक ठेवावे. हाच तह करावा. दुसरे करू नयेच. हा येक प्रकार कुरूपाचा व केले सेवटास न्यावयाचा व आपले करावयाचा आहे. त्यात कोणता उत्तम?

तिसरा प्रकार असा आहे कीं मातुश्री काय करतील ते करोत, आपण आपले मुलकात राहावे, जबरदस्त

परंतु ते वेलेस स्वामीला चौघानी भर देऊन त्याचे यैकू नये असे करून हे खूल उभे केले. बरे इतकेहि करून स्वामीनी जे जे केले त्याचे फल या झांडास येरंड्याचे फळें आली. म्हातारीने इमान सोडून पाठी लागली. वाकी ठेविली नाही. राजाहि होय न होय "ह्या गोष्टी फुटल्या. अतःपर वाकी कोणती. अता जे असेल ते असो. संभाजी राजा आणावा. शाहू माहाराजाचे गादीवर बसवावा. सारे खुशालहि होतील डागहि * * * * नाही. मग आईसाहेब वर्ती काय करतील ते पाहतो. यात फार गोष्टी आहेत. संभाजी राजे आणले तर मग कुणाच्याने काही होत नाहीं. सुखरूप खालीं असावे. मग कोण-कोण आईसाहेबाचे समंतात मिळतील ते कलतच आहे. सखवारबाई जीतसती आपली खावंद आई. तिने सांगितले ते केले. काही बेमानी नाही. बरेच होईल. म्हातारी बेमान. अवक्रिया केली तिचे फल तीस जाहाले. व स्वामीनेहि हे कर्म सखवारबाई राजा याचे न यैकले. ते वेळेच्या गोष्टीचे स्मरण स्वामीस असेल; कसकसे लोकानी चढ दिल्हा त्याचे फल हे स्वामीस जाहाले. कसे तर इतके स्वामीनी केले. त्याचा सेवट हा जाहाला. आपले आपल्यासच प्रतिबंधक जाहले. तेव्हा असे जाणावे की आपल्या खावंदाचे आज्ञेप्रो असावे, याचे यैकू नये दरमाहा देऊ नये. तुलाजी आंगऱ्यासारख चाकर व्हावे. आपण घाटाखाली याचे माणूस येऊ देऊ नये. आपण वर्तें येऊ नये. उगेच नावास चाकर मात्र म्हणा(वे) मगहि इकडे * * (पाहिजे) ते करोत. मग जर यानी जोर करून बलावत चालली तर वर्षामहिन्या संकट पडेल. याचे प्रकार फार आहेत. स्वामीचे ध्यानांत येतीलच. परंतु आपण जबरदस्तीने आपले मुलकांत असावे. हमेश सावधच असावे. हाहि प्रकार येक तुंदपणाचा आहे.

येथें जबरदस्तीने करावे असे असेल तर इतके प्रकार केले पाहिजेत. पुन्हा येमाजीस धरावे. मोठ्या गडावर ठेवावे. कासेगाव नाझरे येथे हजार फौज ठेवावी. नाझऱ्याचा काशेगावचा मुलूख लुटावा. गमाजी जागचे ज़ागाच ठेवावे. बाहेर खुले पोल यास उदाजी करून हमवार करवावे. येथे दोन हजार हशम व हजार फौज आणखी पाठवावी म्हणजे इतक्याच सामानावर मावल्याची खबर घेऊन येथे चौग * * * * बसऊन महिन्या पंधरा दिवसात बोलावितो. दादोबाचे तिकडील बल मोडत चालले. मग येथे निर्माल्यच जाणावा. गडकऱ्यांची मुलेमाणसे धरावी. जबरदस्तीने राहावे. मग होणे ते होईल. परंतु दादोबाची गुंज सारी तिकडील

न येकले, ते वेलेस आणखी बुध्य धरली, त्याचेच हें फल येते हे पुर्ते समजावे. आता बाकी कोणती राहिली. मातुश्रीने इमान कोणता धरला? जोवर त्याचे इमान तोवर आपलाहि दुसरा विचार नवता. आता त्यानीच इमान सोडून आपले पाठी लागली. दुसरा मनसवाच त्याचा नाही. मग आपले इमान काय ठेऊन? आपल्याकडे काही नाही.

मोडली पाहिजे. जिकडे मावले जमा जाहाले आहेत तिकडे हजार पाचशे बरकंदाज मावले आपल्या कडील घालावे. रोज उठवण्या आणावे म्हणजे या मावल्याचे उडाण फुटेल. संशय नाही. मग हा किला व आईसाहेव आम्ही पाहून घेतोच आहों. हा प्रकार लौकर केला तरीच उतम. मुरारजीस-हि लिहिणे ते ल्याहावे. बातमी ठेवावी.

आणखी येक प्रकार. म्हातारी पुरी कपटी. संभाजी राजाकडे सूत्रे खेलतच आहे. पाहील, पाहील आणि ह्या राजश्रीस ठिकाणी पुर्ती ठेवील. संभाजी राज्यास आणील. मग ही आपल्यास जड जाईल. एविसीचे धरबंदास अलस असला न पाहिजे. मग हेंहि गमावले, तेहि गेले. दादोबा मातोश्री येक, संभाजी राजे दादोबा येकच आहेत. किल्यावर संभाजी राजे आले, मग सारी येक, आपणच निराळे असे होईल. त्यास आपलें सूत्र आपण करून करावे. हा येक प्रकार आहे. परंतु इतकेहि केले पाहिजे.

जे सुचले ते लिहिले आह. या पर्यायाखेरीज दुसरा प्रकार नाहींसाच वाटतो. स्वामीनी कोणता प्रकार उचित तो ल्याहावा त्या प्रमाणे करू. वरकड येथील मराठे सोयरेधायरे व किरकोल याचे द्वामुपान सारीच आहेत. ज * * * * वानी आणखी जाहाली तर येथे करावयाचे अगाध नाहीं. कासेगावा-कडे गमाजी बलावत चालले. येथे आणिक सामान येईनासे जाहाले, तर मग येथे जड पडेल. आणखी येक मनसबा आहे, कसा कीं, स्वाम मातबर शहास गुंतले तोच मनसबा करावा. येथें इतक्या खटपटीत तूर्त न पडावे असे असले

तर मग आमचे राहणे येथे कामाचे नाही. तिकडे बोलावावे. येथे च्यार माणसे मात्र ठेवावी. मग काही तरी होऊ. उत्तर लौकर पाठवा हे विनंती.

¶*This important document will be very helpful in determining the situation that developed at Satara on the death of Shahu, owing to the intrigues of the Peshwa on the one hand and of Tarabai on the other. The struggle for succession between the various parties and the subsequent stability of the situation are points which have not yet been clearly set down in history owing to lack of sufficient information. This document summarises the main points and discusses the various pros and cons which will clear the situation to a great extent. Gopalrao mentioned in the first paragraph appears to be Khandekar who was for long managing the affairs of the Pratinidhi.*

No. 148] [*7-2-1751*

श्रीशंकर

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विनंती प्रार्थना यैसिजे. येथील क्षेम ता छ १९ माहे रबिलोवल मुकाम कारंजे लाडाचे जाणून साहेबांचे कृपाआवलोकनेकरून येथास्थित आसो विशेष. राजश्री रघोजीबावास पत्र कासिदाबाार पत्र पाठविले. त्या पत्री लिहिले कीं पुढे महत्कार्ये योजून आले आहे त्या अविलंबेकरून सत्वर यावे आणि मागाहून रा लंबोदर धुंडिराज तेहि रवाना केले आहेत तेहि तेथे येतील. ते पत्र पावलियानंतर या प्रांतीची कितेक कामे होती ती. जे महकुफ करावयाची ते केली आणि सध्य करावयाची तें त्वरेणे करून कूचदरकूच वराडातून नांदेडच्या रोखे येतात आणि साहेबी लिहिले होते कीं आपण शाहगडाच्या रोखे येतो तुम्ही त्वरेणे येणे. त्यासी हे येथून सोलापूरपावेतो जातात. तेथे कुल माहालोमाहालचे जमीदार व मोगलाकडील आमील येणार आहे. हा लातूरकर भुरामिया व आकोलेकर तमाम येणार आहेत. त्याचा बंदोबस्त करून राजश्री कृष्णाजी गोविंद वराडचे सुभेदार त्यास सोपून वासिमावरून नांदेडाकड येतात. त्यासी राजश्री लंबोधरपंत आज आस्तमानी येऊन दाखल जाले. त्यासी साहेबाची पत्रे राजश्री बावास होती ती दाखविली आणि बोलले कीं आपण सिध आहेत. आम्ही चाकर लोक आम्हास काही उजूर नाही. या चौपांचा दिवसात इकडील कार्येभाग संपादून सत्वरच चालतो. त्यासी काल छ १८ आठरावे रोजी मातुश्री आईसाहेबाकडील हतरोखा व हुजरे दोघेजन आले. त्यापत्री परिश्विन लिहिले कीं आपण तुम्हास दोनच्यार पत्रे लिहिले त्यास तुम्ही हा कालपरियेंत नाही तर पत्रदरशनी फौजेसहवर्तमान सत्वर येणे. त्यासी ते पत्र आम्हास दाविले आणि बोललें कीं आपला प्राणहि गेला तर

आपण तिकड जात नाहीं. जेव्हां पेशवियांची आज्ञा होईल ते समई जाऊ. नाहीं-तर आपण काहीं दुसरे जाणत नाहीं. मग यामुळे आपले वाईट व्हो अथवा बरे हो. आणि साहेबांची पत्रे वरचेवर येतात. त्याजवरून बहुतसे उतावलीने कामकाज करीतात कीं जलदीने जावे व राा लंबोदरपंतास राजश्री बाबानी पुसले कीं आम्ही तर ज्याप्रा़ो राजश्रीची पूर्वी निःकपट चाकरी केली त्याप्रा़ो राा पेशवियांची करूं. मग आम्हास जेवायासी देत अथवा न देत. ज्याप्रा़ो मोगलापासून आपल्या मुलुकाचा बंदोबस्त करून घेतील त्याप्रा़ो आमचा करावा आणि पेशवियानी बसून तमाशा पाहवा.

¶*Vyankatrao Moreshwar assures the Peshwa of the support of Raghuji Bhonsle. Bhonsle he adds, though repeatedly solicited by Tarabai to hurry up to her assistance, has turned a deaf ear to her entreaties and will stand by the Peshwa through thick and thin.*

No. 149] [*10-2-1751*

श्री

आज्ञाधारक आनंदराव गिरिधर त्रिकाली साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ २४ रबिलावलपावेतो खावंदाचे कृपाकटाक्षें करविरीं सेवक क्षेमरूप असे विशेष. इकडील वर्तमान मुख्य करविरी मोकामी आहेत. राा विसाजीपंत व केशवराव या उभयतांची रवानगी मुद्याप्रमाणें करारमदार करोन उभयेतां येथून गेल्यावर मुख्य खुषवख्त आहेत. येथून तह जालाचे सविस्तर विसाजीपंत व केशवरायांनी सेवेस निवेदन केला असेल. राजश्री नारायेणराव घोरपडे व मानाजी पायगुडे वाडीहून मागारे येऊन चिकोडीकरावर शाह देऊन अठा कोसाच्या मफासल्याने राहिले होते. यमाजीपंताने लस्करास येऊन वहिरववाडी घोरपड्यांचा पुरातन गांव यास देऊन रिफाकतेस पांचसे प्यादा व दोनसे राऊत बराबर विरपंणा व अंबंणास देऊन लस्कर दर्डीपर्लीकडे आपल्या सरहदेपार करून वेळगांवानजीक दोन कोस लस्कराचा मोकाम करविला आहे. कितूर व सांधें व सवणूर वगैरे प्रांतात जाणार. कांपळचा किलाचे सनदा जाल्या आहेत. जोर[1]तलबी जागा. तैसेच त्या प्रांतासहि जाणारसे ऐकितों. राा मुरारराव घोरपडा सोध्यास येणार आहेसी खबर आहे. राजश्री नारायणरायांसही कागद लिहिले होते की उभयेतां सामील होऊन सोधे विदनूरची खंडणी द्यावी यैसा मतलब लिहिला आहे. परंतु चिकोडीकर सामील आहेत याकरितां मुरारारायास तिरस्कार देसकाचा आहे. चिकोडीकरास तंबी द्यावी याकरितां मनसवा. नारायणरावजीच्या सामना न व्हावें ऐसेही येथे

---

१ जोरतलबी = मद्दूर; पुण्ड.

वर्तमान आहे. आजऱ्याचा जिल्यांतील खेडे महाकाव म्हणून ठाणे घेतले. वेळगावचा किल्याचे अनुसंधान ठाणे घ्यावयाचे लस्करास आले आहे याकरितां गेले म्हणूनहि येथें वर्तमान आहे. किला वेवारीस सिबंधी खाले किलेदार वेजार जाला आहे कांही द्रव्य घेऊन किला द्यावा हे तहकीक आहे. परंतु चिकोडीकराचा फितवा आहे. किला जवरदस्तास लागल्यानें आपणांस उपसर्ग होईल म्हणून येमाजीपंत किलेदारास सांगू पाठवितो कीं लागेल ते द्रव्य आम्ही पुरवितों तुम्ही किला न देणे, वेढा दिल्यानें जुजणे ऐसे फितूर करतों. किलेदार हुकेरीच्या ठाणे करिता चिकोडीची निसवत किलेदारास जरूर लागली आहे. या प्रसंगी महिना पंधरा दिवस मोर्चे चालविल्यानें किला येईल. दुसरे वर्तमान मातुश्री ताराबाई-कडील च्यार जोड्या जासूद व राघोपंत नामें कारकून येथें गुप्तरूपें बातनीस राहिले आहेत. कारकूनास पुरसीस केल्यानें म्हणतो कीं राा धाकटे नानानीं येथे पाठविलें आहे. जासूदाचा पोध केला जे सरकारचे नाईकीतले नव्हेत. जासूद म्हणताहेत की आम्ही ताराबाईकडील; धाकटे नानानी च्यार जोड्या मागून घेऊन बातनीस येथें पाठविलें आहे. कारकूनहि याचप्रमाणे बोलताहेत. मतलब कांही कळत नांही. याखेरीज ताराबाईकडील; हुजरे कागदपत्र घेऊन वरच्यावर मुख्यास पोहोचाऊन जाब घेऊन जात असतात. राा दादोबा व अंताजी सिवदेव याकडील संदर्भहि लागला आहे म्हणोन वर्तमान आहे. ताराबाईनीं लिहिलें आहे कीं राजेश्रीस कैद करोन ठेविले आहे; तुम्ही येणे. सरथें तुम्हांस जुपून(?) आपण निखालस राहूं तुमचे राज्य तुम्ही पाहून घेणे, ऐसे निश्चयरूप पत्रे आली आहेत. यास मात्र धीर नाहीं. अविश्वास याच्या पदरी आहे, याकरितां संदर्भ घेऊन आज उदियां पाहूं म्हणतात, ऐसा मनसबा जालाची मूसे[1] फुटली आहे. निश्चयेरूप वर्तमान वाडियांती(ल) बाहेर निघत नाहीं. दादोबाकडील संदर्भ विशेष दिसतो. नवलगुंददाचा देसाई जायपा सिदगिरीस देवास आला होता त्यास भेटीस बोलाऊन गावांत जागा देऊन ठेऊन घेतले आहे. पांचशे प्यादा व पंनास राऊत आहेत. येऊन आठ दिवस जाले अद्यापि निरोप नाहीं. कोणत्या मतलबास जमाव ठेऊन घेतला आहे की नकळे. देसकानें निरोप मागितल्यानें आज उदिया म्हणोन अटकाविले आहे. तिसरा मजकूर बर्तासिराळेकर देशमुख देसपाडेचा मतलब आहे कीं सिराळ्याची जागीर एसाजी भोसल्याच्या मुलास चालणार की नाहीं; यास्तव ठाणे श्रीमंतास व्हावे म्हणजे नांदणूक सूखरूप होईल. सांप्रत थोराताचा गरगषा लागला आहे. ठाणे यास जिरणारही नाहीं. श्रीमंताच्या हातरोख्यावर ठाणे श्रीमंतास द्यावें ऐसा मतलब अढळणेंत आला आहे. थोडे

---

१ मूस = बातमी.

बहुत राऊत आज्ञापत्र देशमुख देसपांड्यास आल्याने ठाणे देतील ऐसे त्याच्या निसबतच्या लोकाच्या मुखें ऐकितों. सेवकाचें वर्तमान सेवक येथें बातनीस राहील, या करतां मुख्यास समाधान नाहीं. दर्शनास येतो म्हणून सांगू पाठविल्यानें उद्यां परवां म्हणोन मोघम सांगू पाठवितात. राजश्री केशवरायापासी मुख्यानीं आज्ञा केली की आपणास बातनीचें काम नाहीं ऐसा कितेक उश्रामा[1] सेवकाचा केला. येथे महागाई, खर्चासहि पुरत नाहीं. रोजमरा येऊन साडेतीन महिने जाले सेवकास येऊन तेरा महिने जाले. घोडे व माणूस ब्राम्हण रोज रुपया खर्चास लागतो. अज तागाईत दोनसे रुपये कर्ज जाले पुढें कर्जही मिळत नाहीं. सनगेही नाहींत. घरची बेगमी यंदा कांहीच न जाली. खावंदानी घराऊ म्हणोन मागें रुपये ५० पंनास पाठविले ते येथें कर्जास गेले. जासूदजोड्याहि टिकत नाहीं. त्यासहि रोजमरा होऊन च्यार महिने जाले. पोटास नाही या करितां दोन जोडा आल्या आहेत. मागें दोन जोड्या विनंतीपत्र घेऊन सेवेस गेल्या त्या दोन महिने जाले. अद्याप फिरल्या नाही. सेवकापासीं जासूद नाहीसे जाले. खावंद अन्नदाते मायबाप जाणून एकनिष्टेनेंचा करितो. जाले वर्तमान सेवकानें आपला अहवाल पायास जाहीर केला आहे. येथें खर्चास कर्जहि मिळत नाहीं. निवेदन जाले पाहिजे. ऐकिले वर्तमान सेवेस लिहिलें आहे. श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶Anandrao Giridhar to the Peshwa writing about the affair of Chikodi in which Ghorpade, Paygude and Sambhaji of Kolhapur were concerned and also of the affair of the Deshpandes of Shirale. The writer also speaks of the communication received by Sambhaji from Tarabai requesting him to visit Satara and take over the administration, Ramraja having been imprisoned by her.

No. 150] *[14-2-1751*

श्री

राजश्री बालाजीपंत प्रधान
गोसांवी यासी

ऽ सकलगुणालकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष:—गोसांवी यांनी पत्र पाठविले तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. पा खंदार येथें घांसदाणियाचा उपसर्ग न द्यावा म्हणोन लिहिले. ऐशियास गोसांवी यांचा निरोप घेऊन येतेसमई समक्ष बोलणे त बोलिलोंच आहो. त्यामध्यें अंतराय जाला नाहीं. जीवनमाफिक जें घेणे तें

१ उश्रामा केला = टोमणा दिला.

घेतलें. गोसांवी यांस विदित व्हावें याजकरितां लिहिलें असे. वरकड अर्थ राजश्री व्यंकटराव मोरेस्वर लिहितील त्यावरून कळों येईल. रा छ २८ माहे रबिलावल सुंज्ञाप्रति विशेस काये लिहिणे. कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

[शिक्का रघोजीचा.]

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle writes to the Peshwa that not much ghasdana was levied on Khandar.*

No. 151] [*15-2-1751*

श्रीशंकर

व्यकोबा

सेवेसी विनर्ती. आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विनंती प्रार्थना यैसी जे. येथील क्षेम ता छ २९ माहे रबिलावल शुक्रवार मुकाम आकोले साहेबांचे कृपेकरून येथास्तित आसो विशप. येथील वर्तमान तर साहेबाची पत्रे साडणीश्वाराबाार जे राजश्री रघोजीबावा सेनासाहेबसुभा यासी पाठविली व राजश्री लंबोदर धुडिराजला पत्र लिहिले होते, त्या पत्रावर दाखला टाकला होता. त्यास ते दोन पत्रे राजश्री बावानी वाचून पाहिली. त्याजवरून बहुत संतोश पावले. त्या पत्रांत कितेक मजकूर लिहिला त्याचा बयाज वरचेवर करीत गेले. आईसाहेबांचा मजकूर तों जो साहेबी लिहिला तो याणीहि सांगितला. येथें तमाम सरदार जे आहेत तितकियांसी पत्रे आली आहेत. भिवजी कासवटे यांच्या मारफर्ताची राजश्री त्रिबकजी भोसले व राजश्री पिराजीनाईक निंबालकर व आनंदराव वाघ व आणिक कितेक सरदार कराडे वगैरे तमाम फोडाफोडी माडिली आणि पत्र लिहितात की, तुम्ही राजश्री रघोजीबावा येतील त्यांजबा तुम्ही येणे, आगर त्याजला पेशवियाचे आगत्य आहे ते न आले तर तुम्ही उठोन येणे. तुमचं ऊर्जित केले जाईल. तर तुम्ही सत्वर येणे म्हणून पत्रे आली आहेत. त्याजवरून राजश्री बावानी आनंदराव वाघ यांस कबिले नागपुरास वाटे लावले त्याजसमागमं वाघास रवाना केले. व पिराजी नाईक निंबालकर हे रुसून बसले होते कीं, आम्हास आज्ञा देणे. त्यासी त्याची समजाविसी हर तजविजीने करून ठेवले. व राजश्री रघोजी भोसलें यांसीहि पत्र आले आहे. त्यासी रघोजीबानी यैसी खबरदारी केली कीं, कोन्ही जुमस[1] खाऊ सकत नाही. येणेप्रों बंदोबस्त

---

१ भीति.

केला आहे. व साहेबी दाभाडियाकडील उलेख लिहिला. त्यासी आज तागाईत त्याजकडील काही पैगाम या कागदपत्रीहि आले नाही. आणि यांच्या चितांत काही दुसरा आर्थ नाही व याणी परिश्विन सांगितले की, आपल्या चितांत काही विकल्प आसल तर आपणास राजश्री कैलासवासीचा शपत आसे व श्री ची शपत आसे. मग यामुले श्रीमंताचे बरे ते आमचे बरे, त्यांचे वाईट तेच आमचे वाईट, याप्रो शपतपूर्वक गोष्टी सांगितल्या. त्यासी येथे काही गुंता राहिला नाही. मजल दरमजल साहेबाकड येतात. याजविसी कोन्हे गोष्टीचा द्वइताचा विचार न आणिला पाहिजे. हे साहेबखेरीज तिलतुल्य नाहीत. जे पहिले भा(षण) केले होते तेच आहे. त्याजमध्य आंतर नाही व राजश्री त्रिवकजी भोसले याणी फारसी रुसून गोष्ट सांगितली की, फुकाचे आम्हास पत्रहि लिहिले नाही. त्यासी स्वामीनी त्यासी पत्र लिहित जावे, म्हणजे त्यांचे समाधान होत जाईल. ते साहेबांच्या सेवेत येकनिष्ट आहेत. हे विज्ञापना.

¶*Vyankatrao Moreshwar gives to the Peshwa some idea as to how Tarabai was trying to win over Raghuji and other Sardars to her side. Raghuji however—he further writes—is quite firm in his assurance to the Peshwa to stand by him.*

No. 152] *[15-2-1751*

छ ३ रमजान.

श्री भवानी प्रसन्न.

सेवेसी विज्ञापना ता॥ छ रमजानपावेतों स्वामीचे कृपेकडून वर्तमान येथास्थित असें विशेष. सातारियाकडील दिनचर्येचे वर्तमान तरी बन्हानजी मोहिते मध्यस्तीस पडलें आहेत. को * * * पाटणकर, बाबूराव भोसले, येसाजी देवकाते सारें बन्हानजी बावाकडे येउन खलबते (करतात). बाबाजी जाधव येकटे मात्र उरले त्या * * * ते मन्हाटे देखील इकडेच मिलालें आहेत. परदेसी मात्र दाहा वीस आहेत. आईसाहेबाजवल वीस पंचवीस माणूस इतके मात्र उरले आहे. येक दिवस पाणी बंद केले होतें. मग सांगून पाठविलें जे आम्ही पाण्याविणें मरावे कीं कायें ? तेव्हा पाणी सोडिले. दुसरा मजकूर आईसाहेब राजा नव्हे म्हणतांत. याजमुले बन्हानजी मोहिते फिरले आहेत. राज्य बुडतं. सारें मन्हाटे आसतां यैसा प्रसंग होतो म्हणून सर्वास सांगून पाठविलें. त्याजवरून दोन तीनसे मन्हाटे जाऊन बन्हानजीबावाच्या घरी वसतात. आजी उद्या बन्हानजीबावा मोहिते जाऊन आईसाहेबाजवल जाऊन

अतिशये करणार जें आमच्या पोरी तुम्ही दिल्ह्या आणि आता राजा नव्हे म्हणता! तेव्हा आम्हास सारें मन्हाव्यास मारून टाकणे; नाहीतर पोरी मारून टाकणे, यैसा अतिशये करणार. भोवत्या चौक्या बसल्या आहेत. दाणापाणी बंद जाले आहें. बाकी काही राहिली नाही. वन्हानजीबावा आजी उद्या निकर्स करणार. बाबाजी जाधव न यैके तर त्यास मारावें यैसा विचार जाला आहें म्हणून बातमीचे वर्तमान आले तें स्वामीस विदित व्हावें म्हणून सेविस्तर सेवेसी लिहिले आसें. ऐकिलें वर्तमान लिहिले असें. पुढें होईल वर्तमान ते सेवेसी लिहिले जाईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A news-letter from Satara to the Peshwa reporting how Barhanji Mohite grew desperate on Tarabai's refusal to give the powers of kingship to Ramraja and how he wanted to decide the issue once for all.*

No. 153] [*16-2-1751*

छ १४ सालाखर.

श्री

आज्ञाधारक आनंदराव गिरिधर त्रिकाली साष्टांग नमस्कार. विज्ञापना जे. छ ३० रबिलावलपावेतो करवीरी सेवक क्षेमरूप असे विशेष. काल सेवकास दरबारास बोलाऊन राा विसाजीपंताचे पत्रें बहुत सेवकास निकडीने मागितली. यैसियास पत्रें विसाजीपंतास इचलकरंजास रवाना केली म्हणोन बाहना सांगितला. उपरांतिक इचलकरंजास माणूस पाठवित होतें. परिछिन विनंती केली कीं पत्रें फाडून पुरेजे केलें परंतु पत्रें न दिल्ही. बजिनस पत्रें मातुश्री ताराबाईकडें पाठवावी. साा मजकूर अढलला यास्तव दस्तावेज न दिल्हा. अद्यापि मुख्यानी पत्रासाठी निकड लाविली आहे. ताराबाईकडील व दादोबा व अंताजी सिवदेव याजकडोन राजकारण भारी लागले आहे. यासहि माया लागली आहे. यानी रदबदल टाकिली जे रामराजास मारावे म्हणजे आपण येतों. यैसियास मातुश्रीनी करार रामराजास मारावयाचा केला आहे. वर्तमान येतांच येथून आद्रष्यरूपें सतरिसीस जाणार. ताराबाईकडील व दादोबाकडील सिंद्याच्या व भीमराव याजकडोन विशालगडचं राजकारण लागलें आहे. आजकालचा मजकूर विपरीतसा अढलला. इकडील अगदी गड किलें व मनसबा श्रीमंताकडेस लागला म्हणोन हर इलाजें यास फांसी पाडायाचा मजकूर मातुश्री केला आहे. आजउदियाच जाणार असेंहि यैकतों. आठा दिवसाची अवध आहे असेंहि यैकतों. निश्चये कलत नाही. समक्ष सेवकास बोलताहेत की श्रीमंताची ममता

लागल्यावर दुसरें राजकारण करोन काये नफा ? तुम्हासहि आढलतें, असें भाषण करितात. श्रीमंत दूर प्रांतास गेले, अस्यामधें यास फासी पाडावें म्हणोन पुरता मनसवा केला आहे. रामराजास मारावयासहि चुकणार नाही. मारावयाचा करार करोन आजी उदिया बोलावणार. या उभयेतासहि ठिकाणी ठेऊन यावत जीवपावतों मातुश्री राज्य करणार. आपणा मागे काही हो सा अर्थ योजिला आहे. श्रीमंताकडे याकडील मनसवा लागलाचें दुख मातुश्रीस जाले आहे. यांच्याहि चिताने होषा[1] खादला आहे. आठा पंधरा दिवसांत श्रीमंताचे आगमन जाल्यानें अजवर केला मनसबा हातास लागतो. नाही तर मुख्य सतरसीस जाणार जाणार जाणार. आढलेले वर्तमान जिव्हाल्याचें विदित केलें आहे. याचा विश्वास येकंदर नाही. घडीस येक मनसवा करतात. घटके घटकेचे बोलणे विपरीत आढलते. याच्या बुधीस आयुष्य नाही. पत्र बजिनस ताराबाईकडे पाठवणेचा सिधांत केला होता परंतु पत्र त्याच्या हातास न गेलें. सांडश्वार परभारे वाडियांत जाऊन मुख्यास पत्रे दिल्ही. यावर सेवकास बोलाऊन लाखोटा न फोडता स्वाधीन केली. पत्राचे पारायेण करोन सेवकाच्या स्वाधीन केल्यावर मागती हा मनसवा केला. हरयेक पत्रें परभारे मुख्याच्या हस्तगत न व्हावीसी ताकीद जासुदास जाली पाहिजे. याचा प्रसंग बहुत विपर्यास आहे. समक्ष बोलण्यात काहीच अंतर दिसत नाही. कर्तुत्व अलाहिदेंच आहे. सतरसीस जाणेचें सिधांतसे ऐकतों. यावर खावंद अभिज्ञ सागर. येथील विचार आढलला तो सेवेस निवेदन केला आहे. श्रीमंताचे आगमन या प्रांतास त्वरेनें जाल्याने उतम. येतद्विषई मुख्यानींहि पत्रे सांडश्वारा बराबर लिहिली आहेत व सेवकाकडोन लिहविले आहे. ममता राखून राजकारण करिताहेत अथवा पांच च्यार हजार फौज याच्या आसपास राहिल्यानें राजकारण टाकतील. रा नारायेणराव व मानाजी पायेगुडे दूर बेलगाव प्रांतास गेले. शाहपुरची पेठ मारली म्हणोन अवाई आहे. हे येथून कोणे वेलेस जाताहेतसें कळणार नाही. येथून गेल्यावर कळेल. याकरिता जासूद जोडी दु:खणें पडली होती तेच जलदीने आज पासोन दाहा रोजाच्या करारानें रवाना केली. करारास पोहचल्याने इनाम पावतील. सांडश्वार पाचवे रोजी येथें दाखल जाले. रोज चालीस कोसाची मजल केली होती. पायेची माणसास दाह रोजास पोहचेणाचा वाईदा आहे. आजउदिया आणखी नाजूक ल्याहावे तर जासूद नाही. पाच जोड्या हजूर आल्या आहेत. येथें उजराहि मिलत नाहीं. येथील अजुरदाराबराबर कागद पाठविता न ये. रोजमरा देऊन च्यार महिने जाले. कर्जहि मिलत नाही. घरचीं मुले माणसें

---

१ अवसान.

उपवासी श्रमी होतात. सेवकास येथें दोनसे रुपये कर्ज जालें. बातनीविषईं मुख्य सेवकावर कोपिष्ट आहेत. दुसरें वर्तमान सिरालेंकर देसमुख देसपांडे ठाणें श्रीमंतास द्यावेसा मतलब दिसतों. दोन च्यार हजार फौज वारणेंवर यांची वाट राखून राहिल्यानें ठाणेहि हातास लागेल. रा॥ मुरारराव घोरपडा ताराबाईकडें येणार येसी वदंता आहे. आढलले व यैकिलें वर्तमान सेवेस निवेदन केले आहे. श्रुत होये हे विज्ञात.

¶*Anandrao Giridhar requests the Peshwa to speed up the affairs in the Karnatak and return post haste towards Satara as Sambhaji seemed likely to take advantage of his absence to go to Satara and to capture the throne by doing away with Ramraja.*

No. 154] *[18-2-1751*

श्री

तीर्थरूप राजश्री नाना वडिलाचे सेवेसी आपले बापूजी बाजीराऊ कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ता॥ फालगुन शुध ४ मु॥ बाहादुरपुरा प्रां॥ खांनदेश सुखरूप असो विशेष. वडिलीं आसिर्वाद पत्र छ २९ रबिलावलेचें पाठविले तेथें आज्ञा की रो॥ बलवंतरायांसमागमें फौज पाठविली आहे; पावली असेल व फिरंगोजी पोवारहि बिडीहून रा॥ केला आहे, येऊन पोहचल. त्यास रो॥ सोनजी भापकर व रो॥ नाईक सिवरात्रीस येउन पोहचले. तदोतर दुसरे रोजी कूच करून घाटाखाली आलो तो दमाजीने कूच करून बराणपुरचा रोख धरला. त्यास्तव दरकूच मु॥ मजकुरास आला तो तोहि अमलनेराजवल तीनि कोस नीट आम्हाकडे आला आहे. तेव्हा काही मागील फौजेची वाट पाहता न ये; यास्तव कूच करून नीट त्यावर चालून जातो. त्याचा आमचा तफावत सात कोसाचा आहे. कवडे व हरिपंतहि सामील याच मु॥ जाहले. त्याची आमची फौज तो बराबरच जाहली आहे. परंतु इकडे लोक भारी भारी आहेत, याप्रा॥ काही तिकडे नाहीत. वडिलास कलावे. वडिलाचा पुण्यप्रताप समर्थ आहे. काही चिंता नाही. आम्हीहि सारे नऊदाहा हजार जमा आहो; काही थोडे नाही. याउपरी ईस्वर समर्थ आहे. स्वामीचा प्रताप समर्थ आहे. काही चिंता न करावी. सातारियास तीन हजार फौज ठेविली; उतम आहे. येणेकरून लोकास याप्रांती आधार जाहला. वडिलाप्रति विशेष काय लिहू? लोभ करावा हे विज्ञापना.

¶*News-letter by Bapuji Bajirao Retrekar to the Peshwa, giving details of the movements of Damaji Gaikwad.*

No. 155] *[27-2-1751*

श्री

पुरवणी श्रीमत राजश्री पंतप्रधान
गोसावी यांसी

दंडवत विनंती. उपर, छ ११ जाावलीं दों प्रहरां रावळांचा निरोप घेऊन स्वार जालों तेथोन गोसावी यांच्या लस्करचा तळ कोस ५ व पुढे आणी कोस ५ येकूण दाहा साईकाळी कोतेपर्लास राहिलो. छ १२ रा शुक्रवारीं प्राथकाळीं कूच केले ते नागर करणुलास आठ कोस येक प्रहर ऊन टाळून साईकाली नदी-तिरीं लस्करचा तळ होता त्या तळावर नव कोस म्हणजे सत्रा कोस चाललों. ते दिवसीं नवाबसाहेबाच्या लस्कर(चा) मुकाम कुसूमपेठेवर आम्हापासून सा कोस होता. छ १३ मंदवारी कूच करून लस्करास जात असतां लस्कर कूच होऊन पुढें पांच कोस गेलें. आम्ही नदीतीरीहून कूच करून आकरा कोस पडकलच्या मुकामीं लस्करदाखल जालों हे विनती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa giving the places and dates of his halts in his journey.*

No. 156] *[February 1751*

श्रीशंकर

पुा श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे शेवेसी विनंती. सातारियाकडील वर्तमान तर कालच राजश्री नानाची पत्रे आली, त्याणी लिा कीं मावले येवतेश्वरी जमा जाले होते, त्याजवर फौज पा. त्यास खबर कलली म्हणून ते पलत होते. हजार दोन हजार आहेत यैसीं आवाई होतीं. त्यास रा चिमणाजी बापुजीचे लोकांसी गाठ पडली. से दीढशे माणूस जखमी व ठार केले. त्याची गुंज मोडली. दुसरे वर्तमान श्रीमातुश्री आईसाहेबीं करवीरवासी यांसी संदर्भ केला. ते पायउतरा निघोन सातारियास येणार. अंताजी सिवदेव राजश्री दादोबा त्या राजकारणांत आहेत. करवीरवासियाचें मानस कीं, वर आहेत त्यास ठिकाणीं लावणे म्हणजे आपण येतो. याणीं उतर केले कीं तुम्ही आलेत म्हणजे सर्व तुमचे, याप्रा बातमीं बितम. सिदोजी थोराताची दोन तीन पत्रे आली त्याच्या नकलाच आम्हाकडे पा. आम्हींहि सावधता केलीच आहे; तथापि ईश्वरीइच्छा न कले ऐसे लिा. राजश्री नारायेणराव तात्या व मानाजी पायेगुडे हेंहि फौजेसह-वर्तमान कोल्हापुराजवल आहेत. त्यासहिं खबर सिधोजी थोरात याणीं

पोहचाविली ऐसेहि लिा आहे. गुरुवारी गेले सतमीस करवीराहून राजेश्रीं निघणार यैसे लिा होते परंतु आजपर्यंत वोभाट जाला नाहीं. सत्या मिथ्या न कले. मातबर साहासाची गोष्ट आहे. घडे न घडे पाहावे.. यंदा विचित्र विचित्र ज्या गोष्टीच्या कल्पना नाहीत त्याच गोष्टी घडतात. ईश्वरी चरित्र विचित्र आहे. हशम दीढ हजार पाा म्हणून आम्हास वारंवार सातारियाहून लिा येते. येथे लोकाचा भरणा नाहीं. हडसर घेतली तेथे पांच सातशे माणूस गुंतले. आणिक लोक आणविले आहेत. आले म्हणजे च्यार पाचशे पर्यंत निदानी सातारियास पाा देऊ. पैक्याविसीं वारंवार लिहितात. आम्हास येते समई पनास हजार रुपयाची मात्र आज्ञा होतीं, तो विचार आणिकच होता. आता सारी फौज सातारियासच राहिली, तेव्हां पनास साठ हजार रुपये दरमाहा लागतील म्हणून राजश्री नाना लिहितात. तूर्त तर चालीसपनासपर्यंत पाा. पुढे आज्ञा होईल त्याप्राा वर्तणूक करूं. नवे हशमीं माणूस आणविले आहे. हजार पाचशे ठेऊ. सेनापतीजवळ आरब वगैरे स्वार आहेत. आज्ञा जाली तर तेहि चाकर ठेऊ; परंतु आरबाची बोली भारी पडेल. परंतु बंड मोडेल. सविस्तर मजकुराची पत्रीं आज्ञा करावीं हे विनंती.+

¶*Trimbakrao Pethe, who appears to have been ordered to keep an eye upon the military situation at Satara, warns the Peshwa about the preparations afoot there.*

No. 157]

श्री .

पुाा सेवेसी विज्ञापना. शहरातील वर्तमान तर नित्य शहरात चोऱ्या होत आहेत. तस्कराचा उपद्रव बहुत जाला आहे. शहरचे लोक अवघे रात्र जागत आहेत. काल माहोलीहून ब्राम्हण येक व दोघी बायेका येत होत्या, त्यास पव्हईजवलच्या वोढ्यापासी चोरटियानी लुटून बायेकांच्या वेण्या कापून. ब्राह्मणास तरवारेचे जखम लागोन, त्याची वस्तभाव कुल घेऊन गेले. या प्रकारचे वर्तमान होत आहे. शहरचे लोक डायांडोल[1] जाले आहेत. अंताजीपंताचे आवाई निमित्य व शहरात कोणही खावंद नाही याजकरिता, शहर गडबडलं

+ सबंध हस्ताक्षर त्रिंबकराव पेठे यांचे. १ डायाडोल, मूळ शब्द डावाडोल = धाबरलेला.

आहे. जे आम्हांकडे पुसावयास येतात त्या(स) आम्ही धीरभरोसा देतच आहों. परंतु सरकारची फौज येथें थोडी आणि अंताजीपंत फार जमावानिसीं समीप आला, या मुलें कांही बेदील घाबरेहि लोक आहेत.

¶*News-letter from Satara to the Peshwa, communicating to him the disturbed condition prevailing at Satara on account of Antaji Shivdev's parties moving about.*

No. 158] *[1751 March or later*

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत छ २१ * * पावेतों * * स्वामीचे कृपे करून येथास्थित असें विज्ञापना. मातुश्रींनीं बाबाजीस व त्याच्या कारभाऱ्यास नेऊन बहुत फजीत केलें. "मी सागत्ये तें ऐकत नाही. भलतेच मनसबे करितां म्हणोन फजीत पडतां. याउपर पेशव्याचें राजकारण सुरूं करा. त्यावाचून परिणाम नाही! याउपर न करा(ल) तर परिछिन होण्यास कारणें जरूर(?)" त्यास बाबाजी बोलिला कीं, येव्हांच आपण बोलणार नाहीं. विचारें विचार बोलेन, म्हणोन जाबसाल केला. त्यावर एकदोन रोजांनीं बाळाजी केशव हणमंतराऊ आम्हाकडे आले. बोली जाहाली. त्यांत सिद्धांत कीं, ज्याप्रमाणें पहिला * * तिवावर स्वामीवर दिल्हा होता त्याप्रमाणें द्यावा राज्यास नि * * मातुश्रीच्या हुकुमाप्रमाणें * * *
बाबूजी नाईक बाबाजीचें ण * * *
केशव हणमंतराऊ कृष्णाजी * * *
पानरूप चालवावें. स्वामींनीं * * *
राज्याचा बंदोबस्त करून सर्वांस वर्तवावें. कर्णाटक स्वामींनीं घेतलेंच आहे. याप्रमाणें स्वामींनीं केल्यावर त्याचा गुताच नाहीं. याप्रमाणें मजकूर होतो. त्यास करार जाहला तर आजपासून बाबाजीनें आम्ही बसोन कारभार करावा लागेल. स्वामी येत तोपावेतों लाख दीड लाख रुपये खर्चास लागतील, तें आपणांस देणें लागतील. सालमजकुरीं देवढीकडील वगैरा गाव जप्त केले आहेत, ते सोडावें लागतील. प्रतिनिधि खाजगीच्या गांवास उपसर्ग देतात, तो मना करावा लागेल. सर्वस्व स्वामीच्या हवालीं केल्यावर बंदोबस्त दृष्टीस पडोन अनभवास आले पाहिजे. या प्रमाणें करावयाचें असिलें तर पैक्याची * *

[illegible]रान यास गाव * * * च्यार रोज वेढून लवाड्या करीत * * * पुर्ते फजीत पाडावें असें [illegible]चारांत असेल तर, तशीच आज्ञा जाहाल्यास गोड मात्र बोलोन नादीं लाविती; इतक्यांत स्वामीची स्वारी देशास येईल. बाबूजी नाईक आपणांकडे मनसबा करतात, त्याचेच मध्यस्त आम्हाकडे बोलतात. याउपर यामध्यें कांहीं त्राण राहिलें नाहीं. याची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. बाबूजी नाईकाचा हत्ती मकणा प्रतिनिधीनें नेला होता तो तेच रात्रीस गावांत न जातां रानांत कोंडून ठेविला तेथेंच मेला. सेवेसी श्रुत होय, हें विज्ञापना.

¶*This appears to be a letter to the Peshwa from his agent at Satara. When the Peshwa had very nearly established his ascendency all round, Tarabai in this letter is seen making terms with him for a reconciliation and for securing at least the management of Satara affairs.*

No. 159] [*2-3-1751*

छ १९ रबिलाखर

श्री

राजश्री सदासिवपंत गोसावी

यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशाललेखन करीत आसिले पाहिजे विशेष. राजश्री पतप्रधान याणी आपणास यावयाविसी दोन तीन पत्रे पाठविली व हाली पत्र पाठविलें त्याचे प्रतिउतर सविस्तर लिहून पाठविले आहे त्यावरून आपाणास सकलार्थ (क)

[सिक्का] लो येईल. त्याचे चितात आपण यावें यैसे असलें तर आपणास व राजश्री मल्हार होलकर यास पाठवावे. त्याचे व आपले पत्र आले म्हणजे आपण सिध आहो. रा छ १४ रबिलाखर. राजेश्री पतप्रधान यास लिहिले आहे त्याजवरून कलू येईल. बहुत ल्याहावे तर आपन सुज्ञ आहेत. या पत्राचा जाब सत्वर पाठविला पाहिजे. त्यासारखी वर्तणूक करू. बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनती.

मोतब
सुद.

¶*Raghuji Bhonsle requests Sadashivrao to despatch letters to him and to Malharrao Holker. He writes that he will be coming immediately on receipt of the letter.*

No. 160]

छ ८ राालाखर

ेतच आहों.

समीप

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यांसी

-॥ ७

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापधरिष्ठाभिधान निरंतरभगवदसंधान सावधान श्नो माहांराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनती उपर. येथील क्षेम ताा १७ राखर जाणोन निजानंद लेखन कीजे विशेष. आमचे वर्तमान यापूर्वी मुजरद कासदाबराबर विस्तारें पत्र आपणांकडे लेहून पाठविलें आहे. पावलें आसल. सांप्रत लस्करचें नवल विशेष वर्तमान रााा वगाजीपंती लिहिलें आहे. आपणांस नवाब सलाबतजंग बाहादर यानीं खजाना आणायास हैदराबादेस रवाना केलें आसे. आपलें सैन्य कोठे आहे हें कृपा करून लेखन जाल्या, साकल्य आवगत होईल विशेष. कृपा वर्धमान कीजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalker informs the Peshwa that he has been deputed by Salabatjung to Hyderabad to bring money.*

No. 161] *[8-3-1751*

श्री

श्रीमंत राजश्री.....पंत प्रधान साहेबांचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक महिपतराऊ कवडे कृतानेक दंडवत विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १३ रबिलाखर पावेतों मुकाम कसबे सायेंगांव परगणे राजदेहर साहेबांचे कृपावलोकनें करून सेवकाचें वृत येथास्थित असे विशेष. साहेबीं आज्ञापत्र सादर केलें; तेथें आज्ञा की, राजश्री बापूजी बाजीराऊ यांसी सामील होऊन त्याचे आज्ञेप्रमाणें वर्तणें म्हणऊन आज्ञापत्रीं सेवकास आज्ञा केली. त्यास मशारनिलेची आमची भेटी छ.....सफरीं बाहादुरपुरा येथील मुकामीं जाहाली. दुसरे दिवसीं गाइकवाडावर चालोन गेले. युध्य जाहालें. ते प्रसंगीचें जाले वर्तमान त्याणी सेवेसी लिहिलें असेल, त्याजवरून सेवेसीं श्रुत होईल. हे विज्ञापना.....

¶*Mahipatrao Kavde gives the Peshwa news about the battle with Damaji Gaikwad.*

No. 162] *[12-3-1751*

श्री

तीर्तस्वरूप राजश्री.....नाना स्वामी वडिलाचे सेवेसी

आपत्ये बापोजी बाजीराऊ कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाइत फालगुण वद्य ११ मुकाम खांमगांव[1] प्रगणे पुणे सुखरूप आसों विशेष. वडिलाकडे पांच पत्रे पाठविलीं त्याचें उत्तर येकहि न आले; की, कागदहि पावले नाहीत, हे काही कलत नाहीं. इकडील वर्तमान तर गाइकवाड व सेनापति यैसे वालकीवर आहेत व आज मंगळवारीं कोठे मुकाम करील हे पाहाव. ते आम्ही दो कोसांचे अंतराने राहातो. आमचे वर्तमान तर फौजेने केवळ सत्व सोडले; इलाज नाही. जुंज करावयास्तव जावे आणि सामानें बांधावी तों तडका पळूं लागतात. त्यास कोठपर्यंत धरु? धरच धरीत नाहीत यैसी गत जाहली आहे. मुलूक आमच्याच लोकानी तडका लुटला. पलून जातात तेच गाइकवाड याचे म्हणून लुटतात. म्या एकट्याने कोठपर्यंत करावें? सर्वांही मिलोन येक चितेकरून ताकीद करावी ते होत नाही. भरण्याच्या सरदाऱ्या! त्याने कोठे कार्य ज़ाहालें की काय? या फौजेस गांव मात्र मोडावयास सांगावे! असो. याउपर जे होईल ते लिहून पाठऊन देईन. अद्यापपर्यंत जुने लोक कोणी आले नाहींत. याउपर जमा होतील. बहुत काय लिहूं? कृपा करावी हे, विज्ञापना.....

¶*Bapuji Bajirao Retrekar writes to the Peshwa an account of his pursuit of Damaji Gaikwad.*

No. 163] *[10-3-1751*

श्री

सेवेसी जगजीवन धोंडदेव सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तरी, काली शनवारीं रात्रौ आम्ही दमाजी गायेकवाड याचे लस्करांत गेलों. तेथें गोलियाउपरी दमाजीचे लोकांनी आपले गोटामध्यें येऊन दाणा वैरण केली व आपणाकडील फौज संडी उभे राहिले होते तेही आपले गोटी जाऊन राहिले. दोन्ही फौजा थंड जाहलियावर आम्ही दमाजीचे रावटीनजीक जाऊन खबर घेतली. चोपदार येऊन भेटिला. त्यासी कितेक प्रकारें विनवणी करून * च्या हाती सांगोन पाठविलें. फिरोन * चोपदार येऊन आम्हास घेऊन गेला. त्याची आमची भेटी जाहली.

---

१ ता. शिरूर.

मातुश्रींचे पत्र दिलें. त्याणी वाचून पाहिलें. कांही प्रातिउतर न दिल्हे. कांहीं बोलिले नाहीं. मग आम्ही दोनच्यार गोष्टी विचाराच्या बोलिलों. उपरांतिक त्यांणी प्रतिउतर दिल्हे कीं हा समय सौरसपणाचा नसे. तुम्ही उठोन जाणे. आम्ही नवरे जाहलों, आंगास हळद लाविली आहे; नवऱ्याही तयार आहेत. परंतु लग्न समय आला नाहीं. ऐशा कितेक गोष्टी उन्मतपणाच्या बोलिला. फिरोन मागती आपणच पुसों लागला जे, मातोश्री तो सिहीगडास पळोन गेली आणि पत्र लिहावयास कारण काय? तुम्ही येथील काजकारभार कैसा आहे व तजवीज काय आहे या बातमी करिता आलेत. तुम्ही सूखरूप बातमी घेऊन जाणे; मातुश्रीस सांगणे जे आम्ही आपले दारीं तोरण बांधिले आहे. तोरणाचा पदर तुमची फौज तोडणार. याजकरितां पत्राचे उतर देत नाहीं. ऐसें पष्ट सांगोन आम्हास सांगितले कीं तुम्ही लस्करांतून निघोन जाणे. त्याजवर आम्ही त्याचे लस्करांत दोन प्रहर रात्रपर्यंत होतो. बातमी विचारे विचार घेतली. राजश्री बापू व कवडे वगैरा लस्कर आपणाकडील आहे. परंतु या फौजेस तो कांही जुमस खात नाही. आपले फौजेस सलावत वैसली आहे. एकाएकी त्याजवर जावत नाहीं. आपले लोकाचा दम आपण काली पाहिला. दमाजी गायेकवाड याने फौज आपली पांच टोळ्या केल्या वितपसील.

१ खासा दमाजी
१ खंडेराव गायेकवाड
१ जयसिंग गायेकवाड
१ गंगाजी गायकवाड याचा पुत्र
१ जगजीवन पवार.

५

एकूण पांच फौजा निराळिया करून जुझावे; वरकड आपले खबरदारीनें बहुत रवेसीनं बंदोबस्तीने आहे. आजी रविवारीं प्रहरा दिवसास कूच करून ढमढरे याचे तळेगावानजीक सिरगव्हाण गावावर मुकाम जाहला आहे. आपली फौज अद्याप तळावर आहे. आपले फौजेचे मुकामच आहे. उदैक कूच करणार आहेत. दमाजी दरमजल करून सातारियासी जात आहे. पुणियासी दाखला व्यावा म्हणोन सेनापती व जगजीवन पवार या उभयताचे मानस आहे. परंतु दमाजी बोलिला जे पुण्यास जावयाचा मनसबा मागे राहिला. आता पुण्यामध्ये जाऊन काय करणार? ज्या गोष्टीकरिता जावें ती गोष्टी हातची गेली. ऐसे भाषण परस्परे होत आहे. परंतु विश्वास नाहीं. आणि दोन मजला पुढें गेला म्हणजे सर्व अरिष्ट पुण्य क्षेत्रीचे गेले! राजश्री पिलाजी जाधवराव याजकडील सांडस्वार कागद घेऊन दमाजीस

आला. त्या पत्रामध्यें मजकूर काय लिहिला नकळे. परंतु कारकून तोडजबानीने सेनापतीस विदित करितां आपण ऐकिलें कीं तुम्ही सातारियासी न जाणे. तळेगांवी फिरोन जाणे. मग आम्हास कळेल त्या प्रमाणे पुढें विचार मनास आणूं. तुम्ही सातारियासी गेलेत म्हणजे बहुत श्रमामध्यें पडाल. ही गोष्टी उतम नसे. पंतप्रधान तिकडून येतील. त्याची तुमची खराबी होईल. आम्हास कळेल त्या प्रमाणे तुमचा त्याचा बीद बसऊन देऊं ऐसे सांगितले. त्यावर त्याणी उतर दिल्हे जे, आम्हास तुम्हावाचून दुसरे कोण आहे? परंतु आऊसाहेब शापतपुरस्कर पत्रें पाा त्याजवरून जाण लागते. येमाजी सिवदेव याचा पुत्र लस्करांत आला आहे, तोही पत्र घेऊन आला आहे ऐसे त्यासी सांगोन पाठविले. साडस्वार दीड प्रहर रात्रीस सुभेदाराकडे निघोन गेली. पत्र लिहिलें आहे त्यातील अभिप्राय कळला नाहीं. आपण त्यासमई त्याजसमीप होतो. जाहले वर्तमान सेवसी लि॥ आहे. तुम्ही राऊत पाठविले परंतु ते सारे उठोन गेले. तरी त्यासी ताकीद करून सत्वर रवाना करणे. ताकीद बरी करून पाठवणे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. छ २२ रााखर रविवार दोनप्रहर दिवस.

¶*Jagjiwan Dhonddeo informs the Peshwa how he approached Damaji Gaikwar with the letter of Tarabai and about the defiant attitude adopted by the latter. Incidentally the condition and arrangement of Damaji's forces are described by the writer. The army, he says, has five divisions led by five different commanders. Pilaji Jadhao wrote to Damaji dissuading him from going to Satara, but Damaji persisted in going on account of the written pledges that he had received from Tarabai.*

No. 164] *[12-3-1751*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बलवंतराव गणपत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपर. येथील वर्तमान तााा छ २४ रबिलाखरपावेतो मुकाम खांबगाव येथे स्वामीचे कृपेकरून यथास्थित आसे. राजश्री बापूकडे पाा त्यास बापूबरोबर जाऊन बापूचे मर्जीनरूप सेवा करीतच आहे. गायेकवाड दरमजल सातारियास जातो. येक जुज पूर्वी जाले. त्यावर दुसरे जुज करावे येविशई बापूचे व आम्हाकडील सोनजी भा [प] कर, माहादाजी नाईक यांच्या मनात फार आहे. परंतु मातबर सरदार दों दों हजारा फौजेचे धनी आहेत त्याजवल आठसे राऊत नाहीत! सामाने घालून जुजास उभे राहावे तेव्हा बरोबर देखील येत नाहींत! तेव्हा लोक

माघारे पलतात. ये गोष्टीस इलाज नाहीं. बापूचे कोणी यैकत नाहीं. परंतु त्याजपासून अंतर पडते यास इलाज काय आहे? सातारियांहून राजश्री नाना तीन हजार फौज घेऊन सिरवलावर आले आहेत. छ मजकुरी तेहि येऊन पोहचतील. उदैक जुज होईल. येवेलेस खामखा गायेकवाडाचा मोड होईल. लोक चांगले बापूकडे येकंदर नाहीत. च्यार पथके आम्हाबरोबर चांगली, त्यात मात्र माणूस चांगले आहे. आणि पहिल्या जुजातहि त्यानीच बाजी राखली, नाहीतर सारेच निघून गेले. बापू बारा रावतानी आम्हाजवल आले, तोपर्यंत आमचे गायेकवाडाचे जुज होतच होते. डावे बाजू निघून गेलियावर आम्ही सांवर बसऊन सावकास आलों. ते दिवसापासून बापू लोकास रागेहि भरतात, पाया पडतो, परंतु ठीक पडत नाही. डोईजड सरदार यामुले इलाज नाही. वरकड वर्तमान बापूनी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. होईल वर्तमान ते सेवेसी वरचेवर लिहीत जाईन. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Balvantrao Ganpat Mehendale to Peshwa: sends news of Gaikwad's movements.*

No. 165] [*14-3-1751*

.....चे लोक मुलूक लुटितात लस्करचा बंद उडाला; कोण्ही कोण्हास पुसत नाहीं; सरदाराचा जफ्त फौजेवर नाहीं; मार्ग देखील चालत नाहीं; ज्याच्या मनास येईल त्याने लुटावें यैसा प्रसंग आला आहे. फौज देशांत आली. लोक न पुसतां कितेक आपले घरोघर गेले आहेत. बापूबराबर फौज थोडी आहे, परंतु चालून गेले आहेत, म्हणून जासूद सांगत होते. श्रीमंताचे प्रतापें त्यांचा कांही रेच मोडला तर उतम जालें; नाहींतर स्वामीचें आगमन होये तोंपर्यंत मोठी धामधूम होईल; ताराबाईनें मावलेहि सासात हजार मेलविले आहेत. मागतीं सिव्हगडास उपसर्ग करावा यैसे आहे म्हणून पुण्याहून लिहून आले आहे. पुण्याचें वर्तमान तर [फाटले] सर्वांचें अंतर राजश्री नाना सातारियाहून दोन हजार फौजेनसी चौक्या देखील सर्व उठऊन राजश्री बापूजीच्या फौजेत मिळाले व त्रिंबकराव मामाहि बापूकडे गेले. छ २६ माहे रबिलाखरी जासूद सोडून आले त्या दिवसीं बापू व नानांनी मसलत करून गायेकवाडाच्या गलां पडावें म्हणून गेले. जासूद बातमी घेऊन आम्हांकडें आले. बापू पत्र लिहित नाहीं. त्यांस पत्रलेखनास फावत नाहीं. लस्करचें वर्तमान जासूद जबानीं सांगत होते कीं, दमाजीचा लस्करचा तल जेथें ज्या गांवावर पडतो तेथें कांही राहात नाहीं.

व जितकें आटोक्यांत गांव येतात तेथील पाटील तावडतोव धरून आणून मारहाण करून खंडणी मनमाने सारखी रातोरात घ्यावी, पुढें चालावें. तसेंच आमचेहि फौजे-

¶*A fragmentary letter giving news of the expeditions of Damaji Gaikwad against Poona in support of Tarabai.*

No. 166] *[March 1751*

जे जाहले ते उत्तम. सातारियाची फौज बोलाविली आहे. राजश्री नानास पत्रे पाठविलीं आहे. तेहि येऊन पोंहचतील. तदोत्तर काही या फौजेस धीर पुरला तर पाहतों. परंतु घाटतोंडी सारे जमा करून येक जुंज करितों. काय करू? मागेच जुंज करतो, परंतु विलाज नाहीं. येरवी काही जखमी कोणी जाहलो नाही. सर्व शाबूत आहेत. परंतु जीवच धरीनात. काय विलाज आहे? बलेंबलें शाह मात्र आजपर्यंत राखून आलो आहो. पुणे तो तमाम राजश्री मामानी उजाड केलें. उपाय नाही. आज आमचे पुणे गाईक-वाडामुळे उजाड व्हावे हे आमच्या कपालास आले! ईश्वरे मृत्य कैसा न दिला? मी दाहा हजार फौजेच्या भरवसियावर आलो आण हे कपाल फुडे निवटले. काय करू? स्वामीनी तो करितां[1] म्हणून या प्रांते ठेविले. त्यास हे करतेपण जाहले! माजा काय उपाय? फौजेने घालविले. सर्व चित्तापासून झोंबतें तर काय फिकीर होती? ब्राम्हणी सरियाचें सुभे येत नाही. हा सातारियास जातो. याउपरी कोण सोबती होईल तो हो. नाहीतर आपण काही बडिलास शाबूत तोंड दाखवीत नाही. बरे; घडेल ते खरे. रिकामें काय लिहूं? सातारियाहून नानानीहि बराबर खंडेराव जाधव आणखीहि कितेक लहान थोर जमा करून आले आहेत. आज उदईक येतील. तदोतर होईल ते लिहून पाठवीन. हुजूरची पथके व रा॥ बलवंतराऊ आले आहेत. ते माज्या आज्ञाशिवाय नाहीत. लोक भारी होत असता स्वामी सेवेवर दिष्ट देऊन दुसरे दाखवीत नाहीत. वरकडानी तो तालच सांडला. जोपर्यंत जुंज होय तोपर्यंत सर्व आज्ञाखेरीज नव्हतें. ज्या दिवसापासून जुंज जाहले त्यापासून त्याचेच लोक त्याचे मानीत नाहीत, यैसे जाले आहे. सर्वाची दृष्ट पलायावर आहे. जमा करून तोंडास न्यावें, दिष्टीस दिष्ट जाहली, म्हणजे मागें तडक पळूं लागतात. यामुले काहीच बनोन येईनासें जाहलें आहे. याउपरी जितके जमा होतील तितकियानिसी व हुजरात व फिरंगोजी मिळोन जुंज करितों. जातीस डाग कोठपर्यंत लाऊन घेऊ? पुढें पोरासदेखील पोट भरावयास जागा नाहीसी करू की काय? जातीचा तरी

---

१ कर्ता.

येकदा झाडा देऊ मग काय होणार ते होऊ ! नाहीतर तोंड काय दाखऊं ? बारा घरचे बारा बेटीचो * मिलोन माझ्या वंशास डाग लाविला ! आज च्यार पिंडियात तो कोणी शब्द लाविला नव्हता. परंतु या समयांत या फौजेमुळे हे गत जाहली आहे. याचे परिहार करणार ईश्वर समर्थ आहे. पत्री काय लिहूं ?

¶*Bapuji Bajirao reports the difficulties of his situation in fighting the Gaikwad.*

No. 167] *[15th March 1751*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. दमाजी गायेकवाड सडी फौज करून घाट चढून विसाविसा कोसाचे मजला करीत सगमनेरास गेले. तेथें दाहाहजाराची उभाउभी खंडणी मात्र करून, जमीदारांचे जिमे लाऊन, तेथूनहि कूच करून, झोली चंदनापूरचे घांटे मजल दरमजल दावडीस गेले. मागें आपली फौजहि आठादाहा कोसाचे आंतरे होती. येथूनहि आठ जोड्या समाचारास गेल्या आहेत. येकहि फिरली नाहीं, परंतु येके ठाईं इतके लिहिले आलें आहे कीं, छ २२ माहे मिनहू सोमवारी (*11-3-1751*) भीमरेचे तीरीं निंबगांव म्हणून दावडीचे जवल आहे, तेथें गायेकवाड आहे. त्यास आमचे फौजेने मोठे काम इतके केले कीं, ज्या दिवसीं दावडीस जाणार त्या दिवसीं व पूर्व दिवसीं मजला मोठमोठाल्या करून पुण्याचे दावडीचे मध्यें आलें. तीं कोसाचे आंतरें राहिले. त्या दिवसींहि गायेकवाडाकडील फौज तयार होऊन यांचे तोडावर आली. परंतु हे आपले ठाईं मात्र खबरदार राहिले. हेहि चालून गेले नाहीत. तेव्हां गणेगांवाकडील रोख दाखऊन निंबगांवावर राहिले. पुढें सेनापतीहि तलेगांवाहून त्याचे भेटीस येणार. सेनापति व हे उभयतांहि सातारियास जाणार. जेजुरीवरून जातील यैसे पत्र येका गृहस्ताचें आलें ; छ २३ रोजीचे काल सविसवीस आले. व सातारियाकडील वर्तमान तर राजश्रीनी डेरे देऊन वर बागांत राहिले आहेत. ताराबाई सखवारबाईच्या वाडियांत राहिले आहेत. दादोबा प्रतिनिधि हवालदाराचे वाडियांत आहेत. ताराबाई दरबार करीत असतात. जे जे सरकारकून त्याचे मुताळीक सर्व जातात. कारभार होतो. खालील वाडा प्रतिनिधीचा तेथें नवे प्रतिनिधि आहेत. त्यांस

× पत्र बाजी बाजीरावाचें ?

किल्यावरून हुकूम आला आहे कीं, वाडा खालीं करून तुम्ही डेरे देऊन राहाणें, वाडा गायेकवाडास राह्यास पाहिजे, यैसें सागून पाठविले आहे, म्हणून सातारियाहून राजश्री महिपतराव सुमंत यांचे भाऊ, त्यांचे घरी वर्तमान आले आहे. आम्हांकडीलहि वर्तमान येईल म्हणजे लिहून पाठऊं. वखेडा मांडला आहे. ईश्वर आपलें साह्य करील. हें आभ्र राहतेंसें नाहीं. स्वामीचें लांबणें दूर जालें. म्हणून ज्या दिवसीं इकडें रोख होईल त्या दिवसीं यास फार कठीण पडेल. सातारें पुणेची फौज व बापूजी बाजीरायांची फौज सर्व येकत्र जालियावर यांसही त्याचा हिसाब नाहीं. परंतु लडाई देशांत पडली, फितूर देशांत स्वस्थली पडला, हें येवढें मात्र आनुचित जालें आहे. ईश्वर बऱ्यावर आहे, तर सर्व बरेंच आहे. राजश्री मल्हारजी होळकर वजिराकडें गेले, वजीरहि वाहेर निघाले, यैसे वर्तमान आहे. गाजुदीखानाकडील स्तब्ध आहे. कांहीं जलदी नाहीं. त्याहीमध्यें पठाण मारले. पूर्ववत आपले भाऊ कायम जाले म्हणून वर्तमान कलल्यियावर ते इकडे येणारहि नाहीतसें दिसतें. पहावें. सांप्रत वर्तमान इतकें आहे; पुढें होईल तें वरचेवर लेहून पाठऊं. पुण्यांतहि गडबड फार जाली म्हणून येक साहुकार कृष्णदास म्हणून आहे त्यानें मात्र सांगितलें. आणखी कोठें लिहिले नाहीं. आमचे जासूदहि गेले आहेत. आजीउदियात येतील. आधींच बापू सत्वर जबाव देत नाहीत. त्याहीमधें * चलकुची करतां जवाबास फारच विलंब लागतो. असो; आमचा उपाय काय? येईल तेव्हां ल्याहावें. हे विज्ञापना.

¶*News-letter to the Peshwa who was in the Hyderabad Dominions, regarding the movements and doings of Damaji Gaikwad.*

No. 168] [*17-3-1751*

श्री

श्रीमत राजश्री पत प्रधान गोसावियांसी

ऽ अखडितलक्षमीअलकृत राजमान्ये श्रीो माहाराव जानोजी जसवत निबालकर कृतानेक दंडवत विनती उपर. येथील कुशल जाणोन गोसावियाणी स्वकुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. कृपा करून छ १९ राालाखरचे पत्र पाठविले ते छ २५ माहे मिनहूस उतम काली प्रविष्ट होऊन लिहिला अर्थ तपासिले अवगत जाहला. पत्र येत नाहीं. वर्तमान कलत नाही. कोठे आहांत म्हणोन अज्ञां. तर हजूर यावयाविसी इनायेतनामे अले. याजकरिता छ २२ राालाखर बुधवारी लस्करात येऊन मुलाजमत हसल केली. नवाब कोन्हीकडे गेले हे वारंवार ल्याहावे म्हणोन लिो तर गदवालकर व देवदुर्गवाले न अले म्हणोन त्यास शाह द्यावा

याजकरिता छ २९ रालाखर मगलवारी पाच कोस कुचे करून भीमातीरास मुकामास आले. हेहि स्तलचा निर्वाह जाहल्यावर अदोंनी प्राती जाणार. दुसरी चर्चा की हैदराबादेकडे होणार. अद्याप सिधात नाही. सारौश जसा मनसुबां पडतो तसा विचार करितात. सिधात कोणताहि ठरला नाही. हे सविस्तर वर्तमान वकील व बातमीचे कारकूणहि रावलास लिहीत आसतील, परतु यैकिले वर्तमान कलावे म्हणून आम्ही लिो असे. दरमजल कृष्णातीरास येऊन राजश्री माहादाजीपत बाबासमागमे फौज देऊन रवानगी केली म्हणोंन दया करून लिो अवगत जाहलें. आपण येशस्वी आहेत आपल्या कृपेकरून तेहि येशच संपादून येतील. तिकडील वर्तमान जरूर राजश्री खिजमतरायास वरच्यावर लिहीत असावे म्हणून आज्ञा. तर आपल्या आज्ञेप्राा लिहिजेल. बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa informing him of the movements of the Nizam in the South towards Adoni. The writer wishes success to Mahadaji-pant in his expedition in the South whither he is sent by the Peshwa.*

No. 169] [*After 17-3-1751*

श्रीव्यंकटेश.

विनंती उपरी. करवीरवासी यास भोज घेऊन दिल्ही. इतकियांत पुणियाहून राजश्री त्रिंबकरावमामा यांची पत्रें आलीं. राजश्री दमाजी गाईकवाड याचे व आपले फौजेचें जुंज जाले. मावारे सारिले. सडा होऊन सातारियास पुण्यावरून येतो. तुम्ही रातीचा दिवस करून येऊन पोहचावें. पाठीवर राजश्री बापूजी बाजीराव आहेत. परंतु या फौजेचा वहमा राहिला नाही. सर्वानी मिलोन त्यास जरब द्यावी, यैसे लिहिले. तसेंच राजश्री नानाही लिहिलें की, सातारा सोडिला, बापूस जाऊन मिलतो, तुम्ही सिताबीनें यावे, यैसें लिहिलें आले. उपरांतिक च्यारच्यार गांवच्या मजली करून राजश्री नानास सामील जालों. कोरेगावास सदाशिवगडच्या मुकामीहून आलों तों गाईकवाडाच्या फौजेचा व याचा मोकावला जाला. स्वामीच्या पुण्येंकरून लुटून पस्त केला. सडा शहरच्या आश्रेस गेला. त्यावर वर्षप्रतिपदेचे दिवसी कूच करून वेण्येवर राहिलों. याउपरी स्वामीच्या पुण्येंकरून त्यास नतीजा पावविलों. साहेबाकामास चुकत नाही. ये विसीचें वृत्त राजश्री नाना आपणास लिहितील त्यावरून श्रवण होईल हे विनंती[+].

¶*Narayanrao Ghorpade writes about the battle with Damaji Gaikwad.*

+ नारायणराव व्यंकटेश घोरपडे याचें पत्र.

No. 170] [*19-3-1751*

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री वालाजी पंडित प्रधान
गोसावी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो रघोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. गोसावी यानी पत्र पाठविलें तें पावले. लिहिले वर्तमान अवगत जाहाले. अविलंबे यावे म्हणोन लिहिले. ऐशियास मजल दरमजल धोब्रीपेठेवरी येऊन दाखल जालो. सीघ्रतच येऊन पोहचत आसो. वरकड कितेक वर्तमान राजश्री गंगाजी गोपाल दिवाण व राजश्री लंबोदर धुंडिराज यासमागमे सागोन पाठविले आहेत. हे सांगतील त्यावरून कलेल. रा छ २१ रबिलाखर. सूज्ञाप्रति विशेस काये लिहिणे. कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनती.

[येथें अस्पष्ट शिक्का.]

मोर्तब
सुद.

¶*Raghoji Bhonsle informs the Peshwa that he has started as per his instructions and has gone as far as Dhobipeth.*

No. 171] [*23-3-1751*

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ६ जावलपर्यंत स्वामीचे कृपेकरून सुखरूप असो विशेष. दोनच्यार पत्रे सेवेसी पा ती पावलीच असतील. प्रत्योतराची सेवकास ल्याहावयाची आज्ञा जालिया आम्हास प्राविष्ट होऊन संतोष होईल. सविस्तर श्रीमंताचे पत्रीं लिा आहे त्याजवरून विदित होईल. आमचे फौजेने सातारियास गायेकवाडाचा मोड केला. कलावे बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Trimbakrao Pethe to Raghunathrao communicating news of the Gaikwad's defeat near Satara.*

No. 172] [*25-3-1751*

श्री

श्रीमंत् तीर्थस्वरूप राजमान्ये याविराजित राजश्री
नाना स्वामी वडिलांचे शेवेसी राजश्री भाऊ स्वामी
वडिलांचे शेवेसी

आपलें अंताजी विश्वंभर करद्वयें जोडून चरणांवर मस्तक ठेऊन शिरसाष्टांग नमस्कार विनंती. विनवावया प्रार्थना कीं, चैत्र शुद्ध १० दशमीपावेतों वडिलांचे आशीर्वादेंकरून मुक्काम सतरुपी कुशल आसों. यानंतर शिमगा वद्य पंचमीस राजश्री शेनापति तळेगांवींहून दीड प्रहर रात्रीं स्वार होऊन पाबळावर गेले. गाईकवाड संगमनेरा(स) होता, तो आगोदर पुढें पयेका पाठविला. आकस्मात निघाले. आगोदर तजविजींत होते. खानदेशांत जावें हा मजकूर होता. तो मजकूर राहिला कीं, जोंवर मातुश्रीचा आश्रा नाहीं तोंवर आपण कांहीं बाहेर निघत नाहीं. सर्वांनीं मिळोन तह केला होता कीं येकरूप बाहेर न निघावें. त्याहीवर हें जुंजहि जालें. हा भरवसा जाणून आकस्मात बाहेर निघाले. पाबलावर मेटी जालिया आपलीहि फौज मागून आली, वेढा जाला. मग बाहेरील आंत यास जावयास येवयास प्रयेत्न लागूं लागला. आळेगांवच्या तळावरून पायेउतारा होऊन लस्करांत गेलों. पांच रोज सजगुरें खाऊन राहिलों. सर्व विच्यार ध्यानास आणिला. रेवतजी टोंकेगांवा आले, ते कांहीं राहिले नाहींत. लुटून पस्त केलें. सालपियाचे घांटें लस्कर वरतें आले, ते दिवशीं बुनगे राहावे हा विचार नवता. ईश्वरगतीनें राहिले. आपली फौज ते दिवशीं मागेंच राहिली. दहिगांवावर मुक्काम केला. विसा कोंसाची मजल केली. दहीगांवींहून कूच केलें तें वेण्येवर मुक्काम केला. ते दिवशीं आपली फौज कृष्णातीरास आली. स्वारी करून आली होती. हेहि बाहेर निघाले. मुकाबला जाला नाहीं. मागें परतोन आले. फाल्गुन चतुर्दशीस, मागतीं आपली फौज आली. ते दिवशीं गाईकवाड व शेनापति राजेश्रींच्या दर्शनास जाणार, तों आपलिया लस्करांतून तीन बातनिया पोहचलिया कीं, फौज तयार जाली आहे. तो विचार राहून, स्वारी करून फौजेवर चालून गेले. आपले फौजेसमोर गाइकवाड व शेनापति, येके बाजूस खंडेराऊ गाइकवाड व येके बाजूस जगजीवन पवार याप्रमाणें होऊन जुंझ जालें. आगोदर आपली फौज मागें परतली. ज्या बाजूस खंडेराऊ होता त्या बाजूनें सत्तावीस राऊत निघाले. सतरुपींतले लोक व नानाहि समुदाये निघाला. मग येक क्षणभर जुंज जालें. पळ निघाला तों करंजियाचे चावडीपावेतों आपले लोक मारीत आले. शेनापतीचे नव उंट व देवपुजाहि व डेरे नेले. गाईकवाडांकडीलहि

दारु जाळली व जामदारखाना होता तो पाघुरनें उंच होतीं ते नेलीं. कांहीं वस्तभाव होती तेहि नेली. खंडेराऊ यांजकडील जामदारखाना राहिला; कांहीं दमाजीचाहि राहिला. आपलीं घोडीं लोकांचीं पंचेवीसपावेतों गाईकवाडांकडे आलीं. बुनगियांतील उंट, व वटकी, व डेरे व राहुटिया व वानियाची वस्तभाव राहिली नाहीं. याप्रमाणें प्रसंगीं वर्तमान जालें. तेंच दिवशीं फौजेसहित गावांत लस्कर राहिलें. दुसरें दिवशीं माहारदरियांत लस्कर राहिलें.....

¶*Antaji Vishvambhar gives minute details of Damaji's movements and engagements.*

No. 173] [*March 1751*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विज्ञापना राजश्री बापूजी बाजीराव यांजकडील वर्तमान तर पहिली लडाई जाली ते जाली; त्यानंतर अद्याप लडाई तों जाली नाहीं. पहिल्या लडाईतच आम्हांकडील फौजेत लोक जायां फार जाले. कोण्ही तेन[1] देत नाहीत. गायेकवाडानें गोंधळीचा तल टाकून कांसारबारीच्या रोखें आलीकडें पांचसात कोस आला. हेंहि कूच करून माघारें त्याचे आले. त्याजवरून लौकिक यैसा जाला आहे कीं, ताराबाईकडील पत्रें येऊन त्यास पावलीं आहेत. तो सातारियास जातो. आमचे फौजेसी आपणहून भांडत नाहीं. हे जाऊन गलां पडलियास भांडावें. या फौजेत आपणहून त्यांचे गलां पडावें इतकें सामर्थ्य राहिले नाहीं. आम्ही खानास कांहीं मदत फौज पाठवावयाविषीं बहुत प्रकारें सांगितलें; परंतु यास फौज देणें अनुकूल पडत नाहीं. त्याहीमधें लढाईचे वर्तमान आलियावर केवलच उगेच राहिले; न द्यावयाचे पर्याय बोलूं लागले. गलां पडलियानें कोण्ही देतोसें नाहीं. फिरंगोजी पवार यांस राजश्री हणमंतरायानी आमचे फौजेच्या मदतीस दोन हजारानसी रवाना केलें. ते अद्याप औरंगाबादेच्या आसपासच आहेत. शनिश्चरता मांडली आहे. लौकर जाऊन पाऊन पोटतिडकीनें काम करावयाचा विचार दिसत नाहीं. ईश्वर साह्य * * * प्रताप आहे. तोच सिध्धीस जाईल. * * * होणें आहे. ईश्वर बरेंच करील. सर्व गोष्टी * * लोक नामीं आहेत. सर्वास स्वामीचे वाक * * वावी यैसेंहि आहे. राजश्री

---

१ छाती.

बापूजी भीमराव सरदार हा हिमतीचा वराच आहे; परंतु आपले फौजेंत सरदार आसेत, ते मात्र खातरेंत आणित नाहीत, यैसें दिसतें. पुढें विशेष वर्तमान आलियाप्राा लिहून पाठवीन. राजश्री रघूजी भोसलें आद्याप वराडांत आसेत. येद्यपि राजश्री सिदोजी राऊत वगैरे स्वामीनी पाठविले आहेत व त्यांचीं पत्रेंहि सेवेसी लौकरच येतों म्हणून येत असतील, परंतु सत्वर निघून मजल दरमजल स्वामीपासीं पावतील तेव्हां खरें. राजश्री मल्हारबाकडील वर्तमान, जयेनगरचा तह पूर्ववतप्रमाणें करून दिलीकडें गेले, यैसेहि वर्तमान आहे. लिा आले नाहीं. वाजारी वर्तमान आहे. सैद्माखान सलाबतजंग तो स्वामीस समीप आसेत. वरचेवर वर्तमान येत असेल. खानाचे पत्राचें उत्तर पाठविलें आहे. बेगमीच्या थैल्या दोन्हीं प्रविष्ट केल्या. उत्तर आले नाहीं येतांच रवाना करितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bapuji Bajirao and Bapuji Bhimrao, two of the Peshwa's officers were facing Damaji Gaikwad on his march on Poona ; their movements are reported in this letter.*

No. 174] [*March 1751*

श्रीशंकर

(पुा) श्रीमंत राजश्री नाना व श्रीमंत
राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. इकडील वर्तमान तर सातारियाहून नित्य वर्तमान डांक बसविली आहे त्याबाा राजश्री नाना व वापू लिहून पाठवीतच आहेत. स्वामीसहि वरचेवर लिहीतच असतील. त्याजवरून विदित होतच असेल. आमची वातमी कुंपिंया, आमचे लस्करांत व सातारियांत आहे. तेथील लिहून नित्य येतें. अद्यापिपर्यंत गायेकवाडाची कही बंद जाली नाहीं. जकातवाडीचे मार्गे हुमोंडीकडे परलीकडे कही जाऊन दाणादुणा वैरणकाडी आणिते. येकदां इतके दिवसांत दोन दिवस तिकडे फौज आपली गेली होती; तेव्हांच दोन पायली दाणा पांच पाचुंदे कडबा जाला. सारें शहर व लष्कर कालवलें होतें. ती फौज तिकडे राहिली नाहीं; त्यामुळें त्यांची कही नित्य येते. दाणादुणाहि तीन सवातीन पाइली आजपर्यंत होता. चाराहि येत होता. आमचेंहि फौजेंत कोणाचा पायपोस कोणाचे पाई नाहीं; ज्याजवर पडेल त्याजवरच पडेल. त्याणें

---

१ अंतस्थ.

संभाळिली तर बरें; फजित जाला, तर तोच जाला, याप्रकारें तर इतके दिवस जाले. स्वामी आल्याची सलावत व ही ती मिळोन फौजहि मातबर सरकारची जाली. गायेकवाडाजवळ मातुश्री आईसाहेबाची फौज हशम मिळून फौज सात हजार; पैकी गाइकवाडाचे सोवती हजार दोन हजार चांगलें सामानपोश, वाकी भरती हशम दीढ दोन हजार व आरब ५०० येणेप्रमाणें सारी पुंजी आहे. स्वामीची वक्रदृष्टि जालिया पारपत्य तों सहजांत होईल; परंतु लोक सरदार वोलाऊन दिलदिलासा करून खावंदांनीं पाठीवर जोरबजोर उभे राहून निकड येकदां केलिया फारकच मजकूर होईल. गुंता किमपि नाहीं; परंतु पैकेयाचे स्वार्थावर नजर दिल्हिया पैकाहि देऊन सल्लख होईल. परंतु रदबदलीविशीं स्वामीकडील कांहीं मातवर मातंवर भीड घालतील; आ(प)ला पट होत होत वसईची गत होईल. * * * रागरंग यथाज्ञानें नजरेस येत * * * * त्याजवरून तर्कें करून लिहिलें असें. चितां(त ठेवावें). सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Trimbakrao Pethe writes to the Peshwa about the plight of Damaji Gaikwad.*

No. 175] [*30-3-1751*

श्रीव्यंकटेश

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-
आलंकृत राजमान्य राजश्री
पंतप्रधान स्वामी गोंसावी यांसी.

पोष्य नारायण व्यंकटराव कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता॥ छ १३ जोंवल पावेतो मोकांम सतरुसीं जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. स्वामीनीं छ २४ राखरचे पत्र पाठविले ते पावले. तेथे आज्ञा जें. राजश्री दमाजी गाईकवाड याचें व राजश्री बापूचे खानदेशात युध्ध जाहाले. तेथे गाईकवाड याणे येश घेतले. त्यामुले शेंर होऊन, पुढें सातारियास जाणार. याकरितां तुम्ही व राजश्री मानापा फौज सुधां राजश्री बापूकडें जाणें, म्हणोन तपसिलें लि॥. यैसियांसी पेशजीं आम्हासानिध्ध यावया-विसीं येक दोन पत्रें आलीं. त्यावरून इकडील थोडाबहुत गुंता उरकोन येक मजल आपणांकडे आलों. तों राजश्री त्र्यंबकराव याचें पत्र आलें कीं गाईकवाड कासारबारी चढोन सातारियाकडे यावयाविसी दोन च्यार मजली आला, म्हणोन बातमी आली आहे. तरी तुम्ही व राजश्री मानापा फौजसुधां पत्र पावतेंक्षणी निघोन येणें. त्यावरून छ ७ जमादिलावलीं सातारियास दाखल जाहालों. आम्ही

यावयाचे आगोधर येक दिवस राजश्री नाना पुरंधरे याचें व गाईकवाड याचें युध्ध वेण्यातीरीं जाहालें. तेथें स्वामीच्या पुण्यें करून गाईकवाड याचा मोड होऊन शहरांत मोडून घातला. बाजारबुणगे आगदीं लुटले. प्रस्तुत गाईकवाड शहरात मोर्चेबंदी करून आहे. येंविसीचें वृत्त राजश्री नाना पुरंधरे स्वामीस लिहितील त्यावरून विदित होईल. आम्हांकडील लोकांचे व माहाराजाकडील हुजुरातीचे व गाईकवाड यांकडील लोकाचे सुकुरवार पेठेंत युध्ध जाहालें ते दिवसीं, आम्हांकडील लोकांनी वरीसी खस्त केली. याचें वृत्त, राजश्री नाना लिहितील त्यावरून विदित होईल. बहुत काये लिहिणें, लोभ असों दीजे, हे विनंति.

¶*Narayan Vyankatrao Ghorpade reports the fighting with Damaji Gaikwad.*

No. 176] [*March 1751*

श्री

विज्ञापना, दावडीपासींच सेनापति येऊन भेटले. सेनापति समागमे घेऊनच गणेगाव सिकरापुराहून, तलेगांवावर ढमढेरियाच्या गेला. जेजुरीस जाणार. तेथें येक दोन मुकाम करून, तेथून सातारियास जाणार, यैसे वर्तमान यैकिले. निवगांव म्हणून पत्री लिहा आहे, ते तलेगांवापासीं ढमढेरियाच्या भिमरेवर आहे. कलावे, सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Damaji Gaikwad meets Dabhade.*

No. 177] [*7-4-1751*

श्री

आज्ञाधारक आनंदराव गिरिधर त्रिकाली साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ २१ जमादिलोवल मोकाम करवीरीं स्वामीच्या पुण्यप्रतापे सेवक क्षेमरूप असे विशेष इकडील वर्तमान रा दादोबाचा कबिले व पाच सात हती व पागा तमाम खार-खाना, पाचसें स्वार येकायेक छ १६ तेरखेस तीन प्रहर रात्रीं करवीरास येऊन शहरानजीक पदमालेवर उतरोन सौ बाईसाहेबास सांगू पाठविले की, श्रीमंताचें लस्कर मुरडोन विज्यापूर प्रांतास येतात. आम्ही धरले जाऊं. याकरिता तुमच्या आश्रयास आलों. आम्हांस आपणानजीक आश्रये पनाला वगैरे स्थली देऊन ठेवणें. मुख्यास पूर्वसूचना नव्हती. चिमणाजी बापू, सुभानजी सूर्यवंसी याच्या पारपत्यास दोन हजार फौजेनसी वारणेवर आहेत. याकरितां सेवकास बोलाऊन आज्ञा केली की, दादोबाचा कबिला आला आहे तर तुमची फौजेस बोलाऊन आमची फौजहि सामील होऊन त्यांस लुटावें. यैस आज्ञा केली.

टाकोटाक बोलाऊ सांगितल्यावर चिमणाजी बापू यास चिठी लेहून फौजेस बोलाविलें. राजश्री करवीरवासी स्वामींनी सेवकाहजूर दादोबाच्या कबिल्यास कोंडाजी भोसल्या हातीं सांगू पाठविलें कीं, श्रीमंताचें आमचा लक्ष येक असतां तुम्हास ठेऊन घेणें युक्त नव्हे. तुम्ही कलेल तिकडे सीघ्र जाणें. यैस साफ सांगू पाठविल्यावर धांस धीर न पुरतां येथून तत्समईं कूच करोन सूर्योदयास कागलास जाऊन राहिले. चिमणाजी बापूस मुख्यानींहि चिठी लिहून पाठविली होती. दादोबाचे कबिले विशालगडास जाणार हेहि अवाई समजोन हजार बारासें राउतानसी चिमणाजी बापू विशा(ल)गडची वाटेने, पनाला डावा घेऊन रानोमाल येणेस विलंब लागला. छ १८ रोजी प्रहरास येऊन सोला कोसाची मजल होऊन करवीरास दाखल जाले. येथें वर्तमान आलें की, कबिले चिकोडीपार होऊन आबदुल मजितखानाच्या मुलकास गेले. चिमणाजी बापूस रो विसाजीपंत व बालाजीपंत सेवकानेहि सागोन पाठलाग करणेस येथून रवाना केले. खर्चास विसाजीपंती दोन हजार रुपयेदेखील कर्ज करोन दिल्हे. थोराताचा गाव येथून आठ कोस कोगनोलीस जाऊन राहिले. समागमे विसाजीपंतहि गेले होते. कबिले मजल दरमजल चिकोडीपलीकडे गेलियावर यानी कोठवर पाठलाग करावा ? म्हणौन फिरोन माघारे करवीरास येऊन पुनः सिराल्याकडे फौज गेली. कबिले इकडे येताना चिकोडीस दोन रोज राहिले होते म्हणे. चिकोडीकराने खबर मुख्यास अथवा विसाजीपंतास न पाठविली यावरून हरकत येमणांने केलीसी जाली. मागारे जातानाहि आपली फौज देऊन सरहदपार केले. दुसरा मजकूर येसवंतराव गाईकवाड सतरसीस पाठविला होता. मागून मुख्या पत्रे लेहून हुजरे रवाना केले होते. ते गोपालरायाच्या लोकास आडळून वसंतगडी हुजरे नेऊन वसवून, चिठ्या हिरोन घेतल्या. मागाऊन येसवंतराव गाईकवाडहि आले. येऊन आठ रोज जाले. मुक्कांस व सौ बाईस वस्त्रे मातुश्रीची आणिलेत म्हणोन यैकतो. शफतपूर्वक बोली होऊन बेलभंडार घेऊन आलेत. हे सविस्तर राा विसोबानी सेवेस लिहिले आहे. सेवेस विदित होईल. याचा मनोगत सतरसीस जाणेचा फारसा आहे. नाही म्हणवत नाही. गडकरी याचाहि भेद अलाहिदा यास शफतपूर्वक बोलाविले आहे. हेहि अतुर आहेत. राा विसोबासी बहुत ममतेकडोन न जाणेचा अर्थ भाषणामधे दर्शवितात. परतु इतबार नाही. हरयेकाचे मुखे जाणेचा निश्चये यैकिला जातो. वरकड अंतरबाहे राानी लिहिला आहे. सेवकास आढलले व यैकिले वर्तमान सेवेस लिहिले. श्रुत होये हे विज्ञापना.

Anandrao Giridhar, the Peshwa's agent at Kolhapur, sends news of the attitude of King Sambhaji, his friendship for the Peshwa, and his refusal to shelter the Pratinidhi's wives, who thereupon sought shelter at Savanur.

749

No. 178] *[31-3-1751*

श्रीनिवास.

सेवेसी-विज्ञापना विनंती. येथील क्षेम चैत्र वदि प्रतिपदा रविवार दोन प्रहर मो। लस्कर नदीतीर नजीक कांडलूर संगम येथास्थित आसे. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविलें ते राजश्री राव वजारतमाहा यांकडील बावाखानासमागमें व सरकारच्या स्वारासमागमें आजी याच समई पाऊन सविस्तर आर्थ अवगत जाहाला. स्वामीचा मुकाम गद्वालापासी आजी होणार, यांस सत्वर घेऊन येणे म्हणून निरोपिलें त्यावरून व त्यांसहि पत्रे होतीं, त्याप्रमाणे स्वामीचें दर्शनाचा योग त्वरेनें व्हावा तर तुम्हीहि येक मजल पुढें उदईक चला; तिकडोन श्रीमंतांचें आगमन होऊन सीघ्र भेटी होतील, यैसें सांगतांच राजश्री राव वजारतमाहा बोलिले कीं, येथें मार्ग पाहण्यापेक्षा आणखी येक मजल उदईक कूच करून पुढें येतों. आम्हांस परम उत्कंठा त्याचे भेटीची यैसे बोलिले. उदईक यांचें कूच आहे. येक मजल येथून नदीतीरेच येऊन मुकाम करितात. तिकडून स्वामीचें आगमन होऊन भेटीचा योग कोणे ठिकाणीं, कोणे दिवसीं, हे निश्चयात्मक आज्ञा करावी. उदईक तो कसा योग घडेल ? परवा व्यतिपात म्हणतात. यांत जेव्हा स्वामीचा यांचा भेटीचा योग तोच सुमुहूर्त. परंतु यांस सुमुहूर्तें दर्शन घेतलें पाहिजे. याउपर जसी स्वामीची आज्ञा. यां कडील बातमी सातारियाची आली, त्याचे वर्तमान दमाजी गायेकवाड सातारियास पावले. मेढ्यावर राहिले होते. राजश्री नाना व बापू बाजीराव समस्त स्वामीकडील सेना वडुथावर आहेत. जुज जालें. दोहीकडील लोक जायां जाले. कायेम होऊन मागती जुजास सित्थ आहेत. फाल्गुन बहुल चतुर्दसी शुक्रवारीं जुज जालें. फार सरस लोकीं मेहनत केली. प्रताप स्वामीचा. खुद सेनापतीवर जखमा, दमाजीसहि जखमा चिल-खतावर, म्हणून सांगत होते. सेवेसी विदित व्हावयास्तव लिहिले असे. तेथें सविस्तर वर्तमान आलेंच असेल. तैसेच सातारियाहून मातुश्रीकडून तो पंत्रावर पत्रे व करवीरची पत्रे वरचेवर येतात. सर्व आर्थ दर्शनाअंती विदित होईल. यांचे लक्ष स्वामींच्याच ठाईं पूर्ण आहे विज्ञापना.

The letter describes a skirmish between Damaji Gaikwar and Nana (Purandare) and Bapu Bajirao at Vaduth near Satara.

No. 178A] *[1-4-1751*

श्रीगणराज

सेवेसी सां नमस्कार. कृतानेक विज्ञापना, ता। छ १६ जमादिलावल मोंकाम वेण्यातीर नजीक सातारा, स्वामीचे कृपावलोकनें सेवकाचें वर्तमान येथास्थित असें

विशेष. इकडील वर्तमान फालगुन वद्य चतुर्दसी शुक्रवारी दमाजी गाईकवाडाचे युध्य जालें. स्वामीच्या पुण्येंचकडून दमाजीचा मोड जाला. प्रस्तुत दमाजी म्हारदरियांत आहें. शाहारांतहि जागांजागा चवक्यांची वंदोबस्ती आहे. तेथें राहिला आहे तेथेंहि जाऊन बुडवावयास उसीर नाहीं परंतु येथील विचार येक प्रकार जाला आहें. येकांत येक नाहीं. येकाचा भरवसा येकास नाही. येविसींचा खुलासा सेवेसी राजश्री त्रिंबकराव मामानी लिहिला आहें त्यावरून सेवेसी विदित जालेच असेल. कहीमुलें मुलुखहि खराब जाला आणि येथीलहि गुंता सत्वर विल्हेस लागतां दिसत नाहीं. आपणहि शाहास गुंतले. तिकडील शाहा उरकला असला तरी जलदीनें यावयाचें करून आधीं आपली वंदोबस्ती करून मग जे कर्तव्य ते करावें. आजीतागाईत फारच गडबड जाली असती परंतु स्वामीचेंच पुण्येकंडून पराभव जाला. येरवी ते दिवसीं युध्य होऊन दमाजी मोडावा यैसें नव्हते; परंतु पुण्य समर्थ यास्तव होऊ आलें. आतां आपण आल्याखेरीज काम विल्हेंस लागतां दिसत नाहीं. या समयात आपण आलें तरी सारे कर्ज फेडून पुढीलहि वेंजमी होईल. आम्ही सेवक ह्या गोष्टी लेहूं नयेत परंतु आम्ही केवल सेवकच नव्हें. यास्तव सेवेसी विज्ञप्ति लिंहिली आहें. या समयांत खामखा यावें. बहुत कायं लिहिणें हे विज्ञापना.

¶*The writer (Patwardhan ?) describes to the Peshwa how Damaji Gaikwad was defeated near Satara.*

No. 179] *[2-4-1751*

छ २६ जमादिलोवल.

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्र बावा
स्वामीचे सेवेसी.

सेवक विसाजी नारायेण कृतानेक नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान चैत्र वद्य त्रितीया भोमवासर पर्यंत येथास्थित असे विशेष. अलीकडे पत्र येऊन परामृश होत नाहीं ऐसे न करावें. सदैव पत्रीं परामृश केला पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी पेशजी श्रीमंतास व आपणास लिहिलेच आहे त्यावरून श्रुत जाहालेच असेल. अलिकडील वृत तरी सप्तरूसीची राजकारणे येथे उजाड येतातच. कळणेस चुकत नाहीत. आमचे हातून जे होईल ते करीतच आहो.

मुख्य गोस्ट श्रीमंताचे आगमन जाहाल्याने सर्वही विचार उतमच घडोन येईल येविसी सविस्तर श्रीमंतास विनंती लिहिली आहे त्यावरून कलेल. बहुत काये लिहिणे कृपा निरंतर आसो दीजे हे विनती.

¶*Visaji Narayan to Ramchandra Baba, saying that the arrival of the Peshwa would clear up many of the issues at Satara.*

No. 180] [*4-4-1751*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी

०॥छ

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापधरिष्ठाभिधान निरंतरभगवदनुसंधान सावधान श्रो माहाराव जानोजी जसवंत निबाळकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम ताा छ १८ जाावल गुरुवार दोन प्रहर मुा भागानगर जाणोन निजानंद लेखन कीजे विशेष. आपणांपासून निरोप वेऊन दर मजल नवाब-साहेबांपासीं येऊन पोंहचलों. रावळी हातरोखा (रा) ज्या रघुनाथदास यांस लिहिला होता तो मजकूर मुफसल राज्याजीस सांगितला. त्यानी सर्वस्वें साहित्य करावें हे गोष्ट मान्य केली; बोलले कीं श्रीमंतीं आम्हांवर कृपा व लोभ केला तेव्हांच आपलें चित्त फार प्रशस्त जालें. आपण श्रीमंताच्या व आपल्या स्नेहांत श्री सीताराम मध्यस्त दिधला. आतां जें तुम्हीं सांगाल तें साहित्य सर्वस्वें करून. श्रीमंताचा लोभ व कृपा आम्हावर दिवसेंदिवस विशेष होयेसें केलें जाईल, ऐसी गोष्ट आधींच निश्चयात आणिली. आपला हात रोखा दिधला नवता कारण हेंच कीं राजश्री भगवंतराव राम यांची प्रतीक्षा होती, माानिले आल्यावर माानिलेस रुक्यासहित राजश्री गोविंदरावजी वकील यांसमागमें राज्याजीकडे पाठविले. राज्यार्जानी आपले हस्ताक्षरपत्र पाहून बहुत संतोश पावले. बोलले कीं, लिहिल्याहून चौगुणी कृपे करून साहित्य करितों. श्रीमंताचा बोलबाला पूर्वीच श्री ने केला आहे; आतां श्रीकृपया विशेष होयेसें करितों. तूर्त पांच हजार स्वार व मैतालब मोहिदीखान व हजार बाण व जजायेलबारदार व फौजेच्या खर्चास खजानासहित फलना म्हणजे आमच्या तैनात करून रावळांकडे रवाना करितों व रा हणवंतराव निंबाळकर यांस लिहितों कीं तुम्हीं फलानियापासि जाऊन पोहचणें. तैसेंच सैदलस्करखांजीस लिहितों की बा फौज आहमद-नगराच्या मार्गें जाणें. येवंच तुम्ही व सैदलस्करखान व हणवंतराऊ यैसे पुढें जलद पोहचावें. जर तुमचे मानस आसल तर आपणहि दरकूच सातारियास

येऊन फिरंगियाहातीं सातारा घेऊन, सा. ताराबाईस ठिकाणी लाविलों. तेथें गायेकवाडाची कथा काये? आपण यावज्जन्म जुबानी ज्यासीं जें बाललों तें श्रीकृपेने तदनुरूपच होऊन आले. श्रीमंतांस तों श्रीसीताराम दरमियान दिधला आहे, त्याचे दयेकरून श्रीमंतांचा बोलबाला आहे तो विशेष करून दाखवितों ऐसें निश्चयेपूर्वक बोलले. त्याप्रमाणेंच आवलंबे आमलांत येईल. आजी नवाब-साहेब आम्हास याच कार्यास रुखसत करायास त्रितीये प्रहरीं आमच्या डेरियास येणार. विदित होये हे विनती.

¶*Janoji Nimbalker in his characteristic figurative style informs the Peshwa that the letter addressed to Raje Raghunathdas has been handed over to him and that accordingly he has asked Mohidikhan, Hanmantrao Nimbalker, Sayyad Laskhar Khan and the writer himself to proceed to the Peshwa with their forces. Even the Nizam himself, the writer says, is coming to his camp to give him a send-off. Raghunathdas with the help of the French, hopes to reduce to subjection Satara along with Tarabai and Gaikwad.*

No. 181] [*15-4-1751*

श्री.

विनंति उपर. छ २३ जमादिलावली निरोप जाल्याचें वर्तमान लेहोन पत्रें पाठविलीं पावलीं असतील. छ २८ जमादिलावलीं यैश्वें[1](र्य न)गरीहून कुचे केले ते लोकसमूहग्रामीं मुकाम जाहला. छ २९ सोमवारीं रजकपेठवर राहिलो. छ ३० भोमवारीं पटकार पेठवर मुकाम सौम्येवारी भूगर्भनगरीं मुकाम होईल. पुढें दरमजल आपणाकडे येत असों. हळू हळू कां येतां यैसें म्हणाल तरी अद्याप ताब्रशेना झाडून आली नाहीं. बाणदार व जेजालबारदार समागमी घेऊन यावयाविसीं संकेत होंताच मुख्यानीं आपल्या श्नेहावरी द्रिष्ट देऊन अधिकोतर संजाम फौज समागमे दिधली. फौज बरोबरच आणावी किंवा एखादे स्थळीं कांहीं दिवस ठेवावी ऐसे लिो होते, त्याचे प्रतोत्तर लेख(ना)त आले नाहीं. ताब्राचे फौजेविशीं काये चितास येईल तें लेखन करावे. पूर्वी सेभर बाणाच्या कैच्याचा मजकूर लिहिल्यांत आला आहे. त्यास सरकारातून उंटाचा संजाम होऊन न आला. यास्तव पनास उंट बाण कैच्या व दाहा उंट दारू व दाहा उट सिसे येकून सत्तर ऊट आम्हासमागमी आहेत. हे मुल्लखगिरीस पाउनेदोन वरसे जाहली. चिताचा मनोदय की अंती सत्वर गावास जावे. त्यास नवाबसाहेबी रावळाकडे आम्हास रवाणा केले आहे. मार्गाचा विचार मनास आणितां देशाहून वाट आधी गावास जाऊन आपणाकडे यावे किंवा आपणाकडे

---

१ भागानगर?

येऊन मग गावास जावें येविसी जे चितास येईल आणि आम्हास लेहोन पाठवाल त्याप्रमाणें वर्तणुकेंत आणिजेल. रावळीं कासीद पाठविला तो बहुत जलद. साडे ती रोजा येथें येऊन पावला. इनाम जलद पोहोंचला म्हणून दिल्हा पाहिजे.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa, saying that he is due to arrive shortly. The delay, he says, is due to the Mogal army. He further gives details of ammunition with him.*

No. 182] *[16-4-1751*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी

यासी

•॥छ

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्ठाभिधान निरंतरभगवदनुसंधान सावधान श्रीो माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपर येथील क्षेम ताा छ ३० जावल मंगळवार जाणोन निजानंद लेखन कीजे विशेष. आमचें पत्र पावल्या आगोधरील पत्र १ व पत्रोत्तर येक ऐसी दोन पत्रें पाठविली पावली. गेलियाताा पत्र न पाठविलें म्हणोन लिहीलें. तर आपण लस्करास आल्यावर गोसावी यांच्या जासुदा समागमें पत्रें पाठविली. न पावलीं यास उपाये नाहीं. दुसरे पत्री मजकूर कीं राजश्री राजे रघुनाथदास उमदे आम्हांसी येकवर्ण श्नेह राखतात हे तुमच्या सांगितल्यावरून निश्चयास आलेंच होते. सांप्रत त्यानीं सेनेसहवर्तमान तुम्हास मार्गस्त केलें यावरून फार संतोश जाला व त्याच्या श्नेहाचा दृढभाव कळूं आला ऐसे लेखन. ऐसियासी आपण जें लिहिलें तदनुरूपच श्नेह धरितात. थोडे साहित्य समयास आल्यां फार उतम. साहित्य फारा दिवसां आल्या उपयोगी काये ? ऐसा पत्राशये. तर आपल्या मनोगतानुसार आविलंबेच येऊन पोंहचतों. पांचा लक्षा रुपयाचें वर्तमान तर राजश्री राघोपंतांच्या पदरी घातले. आपणांकडील वरातदारांस पैका पाऊन उरल्या पैकियास भाडियाचे बैल करावे तर भाडें फार मागो लागले व बैलांत शक्तहि नाहीं यास्तव लाखा रुपयांचें वोझें आम्हाकडे आले. 'आंगावर आल्यां गोणी वळी चढे दुणी' या न्यायें घ्यावेंसे जालें. राा भगवंतराव राम यांच्या स्वाधीन पऊण लाख रुा केले. राहिले ते राघोपंतानीं चालवावेसें मान्य केले. सारांश सैनेसहित व धनयुक्त सत्वर येतों. भागानगरच्या रुपयाचे वर्तमान तर आपला वकील खुदावंदखानापासी होता

त्याने परवाने आपल्या जिमे कबूल करून घेऊन भगवंतराव राम यांच्या नावें लिहून दिधलें की पैका घेऊन येतों. आटकाटचा मजकूर राज्याजीनी सांगितलें कीं शामरायानीं येथें राहावें, पैका आणवितों. रावमाानिले बोलले कीं आपणांस पत्रें द्यावीं, आपण तेथेंच जाऊन पैका घेऊ. याप्रमाणे विल्हे लाविले हे विनंती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa, saying that he will soon join the addressee with men and money.*

No. 183] *[18-4-1751*

श्री

राजश्री पंतप्रधान
गोसावी यांसी

०॥छ

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापधरिष्टाभिधान निरतरभगवदनुसधान सावधान श्नेा माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम ताा छ २ जाखर गुरुवार मुा नजीक बेदर जाणोन निजानंद लेखन कीजे विशेष. छ २५ जाखरचीं पत्रें पाठविली ते कुहीरचे मुकामी पावली. जासुदास इनाम रुा १० दाहा द्यावे व जलद यावें म्हणोन लिहिलें. तर जासूद कराराप्रमाणे न पावला. दिरंगे कांहीं येक आला म्हणोन रुा ५ पांच इनाम दिधला. यावयाचा मजकूर तर आम्हांपासीं बाणाच्या कैच्या ५० पनास येऊन पोहचल्या व पांचसे जजायेलआंदाची दस्तक आली तेहि येतील व तालब मोहिदींखान बमै पांच हजार स्वार व वीस तोफा समागमें नेमिले आहेत त्यानीहि शहरीहून कू[च] केले. आपल्या लिहिल्याप्रमाणें येऊन पोहचतों हे विनंती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa, informing him that he is proceeding to him by forced marches. The writer further says that Mohidikhan has also started from Aurangabad.*

No. 184] *[19-4-1751*

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसावी यांसी.

०॥छ

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापधरिष्टाभिधान निरंतरभगवदनुसंधान सावधान श्नेा माहाराव जानोजी जसवंत निबाळकर दंडवत विनंती उपर. येथील

क्षेम ता॥ छ २ शुक्रवार मु॥ नजीक भैलारपूर ऊर्फ पेंबर बेदरापुढें च्यार कोस जाणोन निजानंद लेखन कीजे विशेष. हस्ताक्षरमंडित आपली पत्रें तीन आली कीं आतीं सत्वर येणे. हे वर्तमान राजश्री राज्या रघुनाथदास यांस लिहिलें कीं आपणांस श्रीमती सत्वर बोलाविलें आहे दर मजल जात आसो. तैनाती फौजेचा मजकूर पनास कैच्या वाण व वीस उंट दारू गोळी आम्हांपासीं येऊन पोहचली व पांचसे जजायेलबारदार यांची तैनातीची दस्तक आली तेहि येतील. तालव मोहिदींखान पांच हजार स्वार व वीस तोफासहित शहरीहून निघाले, चालले, येतात, हे वर्तमान काल रावळाकडील च्यार युग्मासमागमे लेखन केले आसे. सारांश श्रीमल्लेखनानुसार येऊन पोंहचतो. कृपा वर्धमान कीजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa, informing him that he himself is proceeding to Satara as per his instructions and that he has written to Raghunathdas also to start with his army.*

No. 185] *[19-4-1751*

श्रीगणराज

सेवेसी गोपाल गोविंद, पुरुषोत्तम कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ३ जमादिलाखर संध्याकाल पावेतों स्वामीचे कृपाकटाक्षें सेवकाचें वर्तमान येथास्थित असें. स्वामीनीं छ २६ जमादिलावलचीं पत्रें राजश्री नानास व साऱ्यां सरदारांस पाठविलीं तीं आजींच प्रातःकालीं पावलीं. कालीं दमाजी गायेकवाड बाहेर आले होते. युद्ध जालें. तें सविस्तर वर्तमान राजश्री नानानी लिहिलें आसेल त्यावरून विदित होईल. चाकरी कोणकोणाची जाली ते स्वामीनी परस्परें आइकिलें असेल; आणि स्वामीचें आगमन येथें जाल्यावर सारें लस्कर व राजश्री नाना निवेदन करितील. कागदांत ठाणेचें संकट लिहावयाची आज्ञा करावी. तीर्थस्वरूप राजश्री रामचंद्रपंत कैलासवासीचें (वंशाचें ?) ईश्वर (वाईट ?) करणार नाहीं. येक रामचंद्रपंत गेले. आम्ही पांच सात रामचंद्रपंताचें जागां आहों; मरून बरें म्हणऊं, परतु पळून स्वामीस तोंड दाखविणार नाहीं ! बाहादुरपुऱ्यावरील जुंजी सारे लोक जमा नव्हते. आठशें होते, परंतु तेथेंहि साहेबचाकरी उत्तमच जाली ईश्वरी कृपेनें. स्वामीहि आले. येथें दमाजीसच पुसावें आणि चाकरी होऊन आली असेल त्याची पाठ थोपटावी हेंच इछितों. त्याणेंच आम्ही मारायामरायाची उमेद धरूं, उमेदीप्रमाणें सेवाहि करूं. मजला तों पत्र लिहिलें नाहीं. सर्वदां स्वामीनी सांभालित असावें. बहुत काय लिहिणें, हें विज्ञापना.....

¶*Gopalrao Patwardhan informs the Peshwa how very eager he is to serve him and how he behaved during the war with the Gaikwad.*

No. 186] *[20-4-1751*

श्री

श्रीमंत राजश्री नाना व श्रीमंत राजश्री
भाऊ स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता॥ छ ४ जमादिलाखरपर्यंत येथास्थित असें विशेष. स्वामीनी कासीदासमागमें पत्र पाठविलें ते पावले, लिहिले वर्तमान कललें. हशमी लोंक व दारूगोली व जेजाला बाण गरनाला वगैरे सामान सातारियांस पाठवणें, म्हणोन आज्ञा; त्यावरून मागेंच हशमी लोक कांहीं सातारा रवाना केलें. वरचेवर लोकाची रवानगी करीतच आहो. जेजा * * * रवाना केल्या. आणिख सामानाच्या तर्तुदेत आहो. तयार करून रवानगी करितो. साकल्य वृत साडणीस्वाराबा॥ सेवेसीं लिहिले आहे. त्यावरून सविस्तर विदित होईल. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे. हे विनंती.

¶*Trimbakrao Vishwanath writes to the Peshwa that he has sent troops to Satara.*

No. 187] *[21-4-1751*

श्री

राजश्री पंत प्रधान
गोसांवी यासीं

०॥७

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्ठाभिधान निरंतरभगवदनुसंधान सावधान श्रीो माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम ता॥ छ १ जाखर मु॥ सांकूळ जवळगें जाणोन निजानद लेखन कीजे विशेष. शुक्रवारी मिसलकुंडियाहून मल्हारीच्या प्रेमपुरी ऊर्फ पेंबरी आलो, हे वर्तमान पूर्वी लिहून पाठविलेंच आसे. काल शनिवारीं पेंबरीहून वांजरातीरीं बारा कोस मजल जाली. आजी कूच करून दाहा कोस सांकूळ जवळगियासी येऊन पोंहचलों. विदित जालें पाहिजे. सारांश आपल्या लेखनानुसार येतों. विशेष लिहिणें लिा. कृपा वर्धमान कीजे हेच विनती.

¶*Janoji Nimbalker gives a list of his halting-places during his march towards the Peshwa.*

No. 188] *[21-4-1751 ?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना तथा श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता॥ छ २ जमादिलाखरपावेतों, येथास्थित असे विशेष. स्वामींची पत्रे छ २० जमादिल्लावल्लचे येक, व छ २१ मिनहुचे, व छ २७ जमादिलोवलचे येक, येसी तीन पत्रें रवाना केली तीं छ ४ जमादिलाखरी पावोन सविस्तर वर्तमान कलले. सातारियाहून राजश्री नाना व बापू लिहीतील त्याप्रों हशम दारू गोल्या होके[1] गरनाला हें सामान पाटऊन देणें, मजल दरमजल आपणहि येत आहो म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रों सामान व हशम पाटवावयाचे ते वरिचेवरी रवाना करीतच आहों. तोफा रवाना करावयाची आज्ञा आली म्हणजे रवाना करूं. हशमात शाहाणा माणूस सारेयांस आळ्यांत (आपल्यांत ?) वर्तवी, ऐसा असावा म्हणून राजश्री दिनकरपंतासहि आज उद्या रवाना करितो. बहुत काये लिहिणे, कृपा केली पाहिजे, हे विनंती.

¶*Trimbakrao Viswanath writes that he is sending ammunition to Satara and that Dinkarpani will start within a day or two.*

No. 189] *[25-4-1751*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसांवी यासी

०॥७

श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापचरिष्टाभिधान निरंतरभगवदनुसंधान सावधान श्नो माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपर. येथील क्षेम ता॥ छ ९ जाखर मु॥ तुलजापुर जाणोन निजानदलेखन कीजे विशेष. आपण पूर्वी लिहीलें होतें कीं आती सत्वर येणे निदान येकलेच तऱ्ही आविलंबें यावे. त्यावरून ल्या.....दीड.....पाहून पाहतां दर मजल मु॥ मजकुरास येऊन पोंहचलो. खान मानिले दरकूच चालले; येतात. आफवाही वर्तमान यैकतों कीं आपण काही फौज पर्वताकडे मार्गस्त करून आपण भीमातीरें पुणियास जातात. आम्हांस तों लिहिले आहे कीं करमाळियास न जातां यावें.

१ होके किंवा हुके = बंदुकीचा प्रकार.

आपण भीमातीरें जातात यास्तव दुग्धा निर्माण जाली कीं आम्हीं करमाळियास जाऊन यावें कीं न जातां यावें हे लिहावें व आम्ही यणें तर कोणत्या मार्गें यावें व खान माानिलेस कोणत्या मार्गे बोलावावे किंवा कोठें ठेवावें हे विस्तारें लेखन जाल्या, तदनुसार वर्तणूक केली जाईल. विशेष लिहिणें हेच विनती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa, saying that he has learnt that the Peshwa is proceeding to Poona by the Bhima river. The writer therefore could not decide whether he should go to Karmala or not. He asks for definite orders.*

No. 190] *[26-4-1751*

श्री

आज्ञाधारक आनंदराव गिरिधर त्रिकाली सास्टांग नमस्कार विज्ञापना. छ १० जमादिलाखर खावंदाचे पुण्यप्रतापें सेवक क्षेमरूप असे विशेष. इकडील वर्तमान मातुश्री ताराबाई व दादोबा व गाइकवाड व गडकरी याकडोन बेलभंडार व इमानप्रमाण वस्त्रें व जवाहिर याच्या मुद्याप्रमाणे करार अगदी होऊन आला आहे. मातुश्रीचा कारकून यास नेणेचे मोहर्संलेस नेहमीच आहे. राजारामास मारावे, गडचे हवालदाराचा लेक यापासीं गाहण राहवयाखेरीज आणखीं याच्या चितानरूप जे जें असेल तेहि उगवणी करावी म्हणौन आतुरता. मा(तु)श्रीस यांस पाषाणास नेणेची बहुत आहे. यैसियास यानीं विसोबा व शेषोनारायण श्रीमंताकडे रवाना केले आहेत. तो सबब मातुश्री वगैरे संदर्भिकाकडोन आमची निशा चितानुरूप जाली असतां तुम्हास नकलत जावें तरी तुमच्या करारास अंतर पडेल. याकरितां श्रीमंताकडोन त्वरेनें हेच कार्य मनोभिष्टीचें होऊन आले तर उतम. नाहींतर आपण पाषाणास जावें, हा निश्चय करून क्षेपनिक्षेप श्रीमंतासी जाबसाल शेषोपंतानें करावा अथवा प्रसंगानुरूप पाषाणाच्या राजकारणाची निशा आमची असतां हेहि टाकून श्रीमंताचे ममतेस अंतर पडेल म्हणोन येहर्सान[2] निदर्शनास आणावें. येणे करितां आपणास श्रीमंत सिघ्र राज्य प्राप्त करितील. सनरसीचा तह हर्गीज[3] होत नाहीं. दमाजी गाइकवाड व दादोबा वगैरे लोकानीं यास लिहिलें कीं मातुश्री समागमें इतकेहि जीवावर उदार होऊन खपून जाऊ. परंतु तह करीत नाहीं. पुराणिकाचा आग्रह फार करून नासाडीवर आहे. दमाजीस कोंडू(न) लस्कर लुटतील अथवा दमाजी धरोन

---

१ मसलतीस. २ कृपा, उपकार. ३ बिलकूल.

न्यावें, शहरहि लुटावें, गडास मोर्चे लाऊन वरघसामहिने शहराभोवती पनास हजार फौज ठेऊन, श्रीमंत बहुत आग्रह करतील तर निदानी राजारामास मारोन दोनच्यार असाम्यानी जहर घेऊन मरावें. परंतु तह न करावा यैसे परिछिन भाषण अपवादाचे जिव्हालसुद येथें मातुश्रीनी सांगोन पाठविलें कीं निमित्य यास विश्वास बसून याचें आगमन त्वरेनें पापाणास व्हावें. याप्रकारें मातुश्रीनी कितेक प्रकारे यास भरी घातले आहे. याचें चित गंतव्यास उद्विग्नहि आहे. मातुश्रीचा इतबारहि नाहीसा शपोपंज[1] जाला आहे. यांच्या करारास येक मात्र मुख्यास घाताचे वाकीस मातुश्रीच्या चितातील भावगर्भ याच्या आगमनास राजारामाचा नाश करावा तर दुही तुटली. श्रीमंतानीं ममता करवीरवासीकडे लाविली. अनायासें त्यास हे गोष्ट इष्टप्रातास येईल आण क्रित्रीम भाव आपल्या पदरी पडेल. यास्तव मातुश्री हे कर्म अवलंबित नाही. गडकऱ्यांच्या मनांत श्रीमंतासी आपण फारच मवासी केली. आपलें पारपत्य श्रीमंत कालकाला करितील हा निश्चये समजोन मातुश्री व राजाराम आहेतच. करवीरवासीसहि हरइलाजे आणून वंदीत येके ठाइ अवघे राजे ठेवावे म्हणजें श्रीमंतास मनसवा भारी पडेल, याकरिता निर्नासिक व गडकरी व गाईकवाड फंद करोन यास पापाणास खामखा न्यावें म्हणोन भगीरथ प्रयेत्न करितात. हेहि पुनाः येसवंतराव गाईकवाड रवाना करणार याच्या निशेप येईल तो उपाये करावा. परंतु यास उचलोन पापाणास न्यावे म्हणोन वरच्यावर रोज बरोज पत्रें व कारकून यांचे झट लागलेच आहे. शेपोपंत श्रीमंतासी क्षेपनिक्षेप जाबसाल पुसावा की सीघ्र श्रीमंतास इकडे आणावें. अथवा यास पुण्यास न्यावें. सिका करावा. दोनी राज्यांत याची मुद्रांकित पत्रें प्रेशावीं हाच निश्चये श्रीमंतास पुसावें. सीघ्र हा मजकूर श्रीमंत करितील तर उतम; नाहींतर आपण पापाणास जातोंसें स्पष्ट बोलावें. श्नेहभावहि यांत निदशर्नास येतो. येणे करितां येहसानहि श्रीमंतावर होते या भयें कडोन आपली श्रीमंत आपली मनोभीष्टहि सिधीस नेतील. असे कितेक मनसबे योजून सिरोपाव देंऊन पाठविले आहेत. येथें लौकिकामध्यें हा मन(स)बा द्रिष्टीस आला कीं पाषाणा-कडील निश्चयात्मक राजकारण टाकून श्रीमंतासी ममता राखून बोलाविले आहे. अगदीं इकडील बंदोबस्तेचा येख्तियार श्रीमंतास देणार. श्रीमंतहि यास राज्य प्रात करणेस इकडे आग(म)न श्रीमंताचे होतें यैस आबालवृध असेच भाषण करतात. परंतु याचे चितवृत अगदीं लक्ष मातुश्रीच्या संधर्भावर आहे. अगदी क्रित्रीमभाव. या पासोन कोणती विद्या क्रितमाची गेली नाही. कदाचित

---

१ संकट.

श्रीमंताचे आगमन इकडे जाल्याने भेटीचे ठाईं बहूत सावध होहून भेटावें. मातुश्रीची येतराजी व यांची सरफराजी समानच आहे. यासी लटके धातु-पोपणाचे पत्रे वस्त्रें पाठऊन यांचप्रमाणें दूरदूरच्या ममता राखून गडकिले वाकीस राहिले ते घेऊन आज उदिया मनोभीष्ट सिधी होईल म्हणौन कार्य करावे. यापासी येऊन मुजरा करोन वस्त्रें घेऊन याचे म्हणविल्यानें लुतफ[1] नाहीं. याचें बुधीस-आयुष्य नाहीं. घटकेघटकेस मनसबे अलाहिदे. परंतु इतकेहि अनिष्टाचे कदाचित हाहि मनसबा श्रीमंत करितील तर प्रकृती वितरिक्त पुरूष लगामी लागेल यांत संशये नाहीं. प्रस्तुत मातुश्री ताराबाईच्या मतें बाबूजी नाईकहि या राजकारणांत आहेतसें जनवार्ता आहे. येथें याच्या पाषाणास जाणेंच्या उत्कंठतेस सौ बाईचा जिव्हाल्याचे भगवंतपंत म्हणौन आहेत त्यांकडोन बाईस सांगऊन पाषाणास जाणे न होय ते करणेस, मनसबा चोरणेस सांगितले आहे. तर श्रीमंताची * * त्याचें नांवें येक पत्र श्रीमंतानी स्वहस्ताक्षरें स्नेहभावममतेचा मजकूर सारांश मुख्यांचे जाणें सतरुसीस जाणें न होय ते करणें. पुढे कितेक स्नेहवादाचा मजकूर बाईस श्रुत करणे म्हणोन लिहिले पाहिजे. तमाम कारकुनापेक्षा भगवतपंत इतबारी आहेत. त्यास सेवकहि सांगतो की तुम्हावर श्रीमंत बहुत कृपावंत आहेत. पुढें कार्यामुळे तुमची सरफराजी होईल. श्रीमंतानी थोडा बहुत उपचारें करोन लिहिलिया त्यांस विस्वास बसेल. मातुश्री राजसबाई दुःखणें येऊन अवस्था फार कठीण जाली आहे. आज उदिया प्रयाण करणार आहेत. मुख्य सौ बाई व उमाबाई रात्रदिवस मातुश्री सनिधच असतात. गोदाने देखील दिली. वर धाप लागली आहे. अंतकाल समीप आला आहे. याकरितां राजे परमश्रमी आहेत. त्याच्याहि शरीरास सावकाश नाहीं. वाडियांत राबता नाहीं. कारबार अगदीं बंद जाला आहे. मातुश्री आजउदिया परलोकास जाणार. घटके दोन घटकेवर अवघ जाली आहे. बाजीराव बावडेकर याचे दोनतीन गाव यानी ठाणी घेतली. यास वावड्यामधे हजार बाराशे हशम पाचशे राऊत जमा जाले आहे. आजउदिया करवीरावर स्वारी करोन पेठा जाल्याव्या म्हणतात. यांचेहि दोन च्यार खेडी मारोन अग्नसंस्कार करोन लुटोन पस्त केली. बखेडा करणार फार म्हणोन ऐकतों. मुख्यानी सांगो पाठविले कीं मुबादल्यास दोनतीन खेडी देतो. सलुख करोन राहणें. स्वारी न करावी. बावडेकर म्हणताहे की आपली ठाणी दिल्याने सलुख. हेहि इरसेस पडले आहेत. ठाणी देत नाहीत. सिरालेकर पार्वतीबाईकडील देवजी सुभानजी सूर्यवंशीचा भाऊ

---

१ मेहेरबानी.

अद्याप ताराबाईकडील राजकारणांत आहे. हे पार्वतीबाईस ठाऊक नाहीं. सिरालेकरास बुडऊ च्याहतेत, यैकिले व आढलले वर्तमान सेवेस कचे वर्तमान लिहिले आहे. श्रुत होय हे विज्ञात.

¶*This is an important letter which appears to be addressed to the Peshwa by his informant at Kolhapur. It reveals intrigues within intrigues for setting aside Ramraja and placing Sambhaji on the gadi. There was another intrigue of Tarabai with Sambhaji to remove the Peshwa from power with the help of Damaji Gaikwad and the Pratinidhi. More information is necessary before any definite assertion can be made to clear up the complicated situation. Matushri Rajasbai mentioned in the letter as being on her death bed must be the mother of Sambhaji, wife of Rajaram the 1st. There is no mention of her having died any time before this.*

No. 191] [*27-4-1751*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ११ जाखर पर्यंत स्वामीचे कृपे करून सुखरूप असो विशेष. काल गायेकवाड शरण येऊन भेटलियाचे वर्तमान श्रीमंती लिा. बहुत संतोष जाला. स्वामीचे सेवेसी मागेही पांच सात पत्रे पा परंतु कृपापूर्वक उतर न आले; तर ऐसें न करावे. सेवकावर कृपा करून सर्वदा पत्रद्वारे सांभाल करावा उचित असे. बहुत काये लिहिणे, कृपा करावी हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath congratulates Raghobadada on the submission of Damaji Gaikwad.*

No. 192] [*29-4-1751*

श्री

राजश्री पंतप्रधान

गोसांवी यांसी

०॥७

श्रीमत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापधुरिष्टाभिधान निरंतरभगवदनुसंधान सावधान श्नो माहांराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती उपर येथील क्षेम ता छ १३ जमादिलाखर मुा लादऊचा डोहो जाणोन निजानंदलेखन कीजे विशेष सांप्रत रा नागोराव यांच्या पत्रावरून आवगत जालें की रा दमाजी

गायेकवाड यानीं आपली मुलाजमत घेऊन कृपास्नेह संपादून घतला, एकून समाधान जालें. आपण श्रीकृपेकरून येशार्थी आहेत. याउपर तालव(?) मोहीदीखान मोगलाई फौजेसहित मागें चाललें येता यानीं आपणांकडे यावें न यावें येविषई काये तें त्यांस लिहावें व आम्हींहि कोणत्या मार्गें यावें येदर्थीहि काये तो लेख केला पाहिजे हे विनंती.

¶*Janoji Nimbalker congratulates the Peshwa on his success in the battle with Damaji Gaikwad. He further asks for orders whither he and Mohidikhan should proceed.*

No. 193] *[1-5-1751*

श्री

राजश्री पंतप्रधान गोसावी यासी.

०॥ श्रीमंत सद्गुणनिधान कृपाविधान प्रतापवरिष्टाभिधान निरंतर भगवदनुसंधान सावधान. स्नो माहाराव जानोजी जसवंत निंबाळकर दंडवत विनंती. उपर, येथील क्षेम ता॥ छ १५ जाखर जाणोन निजानंदलेखन कीजे विशेष. पत्र पाठविले पावलें. लिहिले कीं घराऊ कार्यास सायासे थोर थोर मजलीनी यावें विलंब लावणे व बोलावणे घेणे विहित नाहीं. ऐसियासी आपण निकडीने बोलाविल्यास नवाबसाहेबी तातडीनेच रुखसत केले. सेनाकदंबेसह अविलंबे येत असतां रावळाच्या प्रतापासीं व आम्हासी स्पर्धा नसतां तुमच्या प्रतापानें आमच्या परामर्शास न येऊन ईर्शा मनांत आणिली कीं नवाब साहेबाकडील साहित्य जाल्यानें नवाबसो येश विभागी होतील म्हणून कैवाड करून गायेकवाडास आणोन रावळास[1] भेटविलें. हे वर्तमान आम्ही व आमच्या लोकांनी कानीं ऐकतांच दो वरसाच्या प्रवासाच्या श्रमांनीं व थोर थोर पेणे[2] करून येणे या सीणांनी सर्वाच्या शरीरसदनी वस्ती केली. बहुवासर आविसर इच्छीत होतो की एखाद्या तऱ्ही युध्य प्रसंगीं श्रीमत्संगी आसोन सेनासागराच्या तरंगाचे कवतूक पाहावें. श्रीस हेंच याचीत होतां तो योग घडोन आला तों तुमच्या प्रतापवेशानें आवेशानें आमच्या आशेस विफळ केले. सत्वर येणे म्हणोन आपण स्वमुखें सांगितलें व याहून पहिले तकरार लिहिलें म्हणोन वहिले येत असतां प्रतापाने आम्हांस वंचून आपणच कार्य केलें. पुढे तऱ्ही दुसरियाचे श्रम विफल न करी ऐसी

---

१ रावळ म्हणजे पेशवा व त्याचा प्रताप यांचें रूपक या आलंकारिक पत्रांत आहे. गायकवाड-स्वारीच्या काळचें पत्र. महाराव निंबाळकर निजामाचा सरदार. २ पेणे = मजली.

त्यास ताकीद करावी म्हणोन रावळास लिहावे तर तो रावळाचेहि ऐकतां दिसत नाहीं. जे काम आपण मनावर धरितात ते काम तो आपणच करितो तो ताकीद केल्यास कसा उगा राहील व रावळांची अगर आमची वाट कसा पाहील? यास्तव त्याची नालीश लिहिल्यानेंहि सार्थक नाहीं. सारांश कष्टी होऊन युध्य दृष्टी न पडलें. तुमच्या प्रतापानें आम्हासी अशी प्रतारणा केली, बरें. ईश्वर उत्तरोतर त्याच्या प्रतारणेची बुद्धि व शक्ति वृद्धि करूं हें विनंती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa, saying that he was proceeding to him by forced marches as per his orders but he had to cancel his journey owing to the joyful tidings that he received of the Peshwa's success over the Gaikwad. The writer regrets that he lost the opportunity of serving the Peshwa.*

No. 194] [*5-5-1751*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना व श्रीमंत राजश्री

भाऊ स्वामीचे सेवेसी.

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ १९ जाखरपर्यंत स्वामीचे कृपेकरून सुखरूप असों विशेष. सांडीणस्वारावा आज्ञापत्र आले तेथे आज्ञा कीं इंदुरीस व दावडीस हशमी माणसांची चौकी पाटवणे की त्याणी जाऊन आतील वस्तभाव बाहेर जाऊ न द्यावी. मागाहून रा गोपालरायाकडीलहि पाचशे स्वार पा. त्यास आज्ञेप्रा कालच च्यारशे माणूस हशमी दोहो ठिकाणी रवाना केलें. गणाजीराव बुरूडकर वसईहून आरमारी सें सवासे माणूस घेऊन आले होते त्यावा आणीक शंभर माणू(स) देऊन त्यास दावडीस पा. रा माधवराव पाटणकर यांजवा येथीलच हशमी लोक दोनशें देऊन इंदुरीस पा. त्यास सांगीतलें कीं तुम्ही कटकट कजिया सहसा येकंदर न करणे. दरवाजियाचे सुमारे तफावतीने राहून वस्तभावेची चौकसी करणे; मागाहून राऊतही पा. त्यास आज जाऊन पोंहचतील. त्याउपर वर्तमान येईल ते सेवेसी लिहून पा. बारकाईने शोध करावा. आंत खजाना वस्तभाव कांही आहे कीं नाहीं म्हणून आज्ञा, त्यास येक दोवा शाहाण्यास बारकाईनेहि शोध करावयास सांगितला आहे वरचेवर थोडा शोधहि घेतला. त्यास इंदुरीत तर बहुधा काहीं नाहीं. दाभाडियानी वस्तभाव होती ते जवलपास मातबरांचे आसरेयांस लांवविली. दावडीतील लांबली नाही, परंतु किती काये हा शोध पुर्ता लागला नाही. काल आरब रवाना केला तो येथे आला. आज

बहुधा भेटीस येईल. पूर्वी हजार तां देणें खर्चास म्हणून आज्ञा आली आहे, त्याप्रा्ा देऊन तूर्त येथेच आपले जवलच ठेवितो. वहुत काये लिहिणे, कृपा करावी, हे विनंती.

¶*Trimbakrao Vishvanath intimates to the Peshwa that he has sent troops to guard the properties at Induri and Dawadi, belonging to the Dabhade and the Gaikwad respectively.*

No. 195] *[10-5-1751*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना व श्रीमंत राजश्री भाऊ स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक त्रिंबकराव विस्वनाथ कृतानेक सा्ा नमस्कार विनंती. येथील कुशल ता्ा छ २४ जा्ाखरपर्यंत स्वामीचे कृपेकरून सुखरूप असों विशेष. साडीणस्वारांबा्ा पत्र पा्ा ते पावले. तेथे आज्ञा कीं, राजश्री दमाजी गायेकवाड रा्ा गोपाळरायाबा्ा रवाना केले तर त्यांस जागा रा्ा मल्हारराव होलकर याचे वाडियांत द्यावीं. वाडियाच्या भिती ठेंगण्या आहेत त्या उंच कराव्या म्हणून आज्ञा. त्यास येक पत्र येविसी आगोधर आले कीं, आवजी कवडे याचाच वाडा तयार करणें; त्याजवरून तो जागा ठीक केलाच आहे. दोघा तिघा बंधूस निजावयास जागा व बसावयास व स्वयेपाकास येसी सोयकर आहे. अटकरहि आहे. मागे पुढे चौफेर चौकीचे लोकास छपरे घालून, नेहमीच जागा ही सिध जाली. विचारे करून पाहाता आटोपसार सर्व प्रकारे उपयोगी हीच आहे. आजच गोपाळरायाचे पत्र आले कीं, उदईक आपण येतों. त्यास इतके अवकाशांत मल्हारवाचे हवेलीची जागा तयारहि न होय. इमारत जा्ाहि फार. प्रज्यन्य कालचे दिवस, आसपास त्याचे माणसास निवारा नाहीं. फक्त येकटे मात्र घर. चवकीचे लोकांस तर आश्राच नाहीं. जागाही आफाट; भिती ठेंगण्या. आश्रा करीन म्हटल्यास सोय नाही आणि अवकाशहि नाहीं; येसे जाणोन आवजी कवडे याचेच हवेलीत जागा देऊ. कलावे म्हणून लिहा. असे. राजश्री सेनापति उमाबाई वगैरे चतुवर्गास रा्ा बाबूजी ना्ा याची हवेली सिध करितो. ती जागा त्यांचे सोईची आहे. गवताचे गंजातील जागा करावी म्हणून आज्ञा, त्यास चौफेर च्यार दिवाली मात्र आहे. आत घर नाही आणि वैरणीचे तमाम गंज जागा रिकामी नाहीं. यास्तव न केली. सविस्तर विदित व्हावे म्हणून लिहा. असे. बहुत काये लिहिणे. कृपा करावी हे विनतीं.

¶*Trimbakrao Vishvanath informs the Peshwa that he is arranging the houses of Awaji Kavde and Babuji Naik respectively for the confinement of Damaji Gaikwad and Yashwantrao Dabhade at Poona.*

No. 196] [*9-6-1751*

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. ताा छ २३ जाखरपर्यंत सुखरूप आसो विशेष. सातारियास पुराणिक आदिकरून कितेकास निर्बंध जाला. राजेश्री लौकरीच खाली उतरणार, ऐसीं कितेक वर्तमाने तहकीक लिाा येतात. आम्हास तर काहींच कलत नाहीं. विना स्वामींनीं लिाा खेरीज आम्हास कलणार कोठून ? आणि खरेहि वाटत नाहीं. तर आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय हे विनंती.

¶*Trimbakrao Pethe asks news of the happenings at Satara fort.*

No. 197] [*1751 ?*

श्रीशंकर

विनंती जे. याणी राजश्री येकोरपूर्वकाविसी बहुत प्रकारें सांगितलें कीं, तुम्हीं लिहिणे कीं, त्या ग्रहस्तास आपले कोणते सुख आहे ? यैसें आसोन त्याजलां कारभारांत आणावें आणि समागमें फिरवावें हे कांहीं उत्तम नाहीं. आपल्या आस्तन्यामधें आग ठेविली आहे कीं, हा ग्रहस्त आला तों इतकियामधें घरांतच फुट केली. मग पुढें काये होईल हें कळत नाहीं. . केवल शकुणीचा लेखा आहे; तर त्या गृहस्थांस बहुत माफजतीने ठेवावे कीं, दुसरियाचा रीघ न होये. व राजश्री दकोरपूर्वक पर्वतावर जे गेलेत, ते कोन्हाच्या विचारें गेले आहेत ? त्याच्या मनसुबियाखेरीज कांही गेले नाहींत. यैसें आसोन तुम्ही त्याजला ज़वल केले आहे तर हें कामाचें नाहीं. आम्हीं जोंपरियेंत आलों नाहीं, तोंपरियेंत त्यांची तजवीज करणें. यैस्या ठिकाणी ठेवावें कीं जेथे दुसरियाचा उपाये नाहीं. सिवाये, दुर्ग हे दुर्गांत ठेवले तर त्यांसीच मिलोन जातील आणि फिरोन गोष्टी सांगतील यैसा यांचा प्रादुर्भाव आहे. जें कलले तें कलावें म्हणून सांगितलें. त्यासी सेवेसी विनंती लिहिली आहे. श्रुत होय हे विज्ञप्ति.

¶*Letter to the Peshwa, advising him not to trust Yamaji Shivdeo.*

---

१ यमाजी शिवदेव.

२ दमाजी गायकवाड.

No. 198]

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक मोरो सिवदेव सास्टांग नमस्कार सेवेसी विज्ञापना यैसीजे. श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब यांचे आज्ञापत्र आलें, त्याजवरून समस्तानी त्यांजकडे रवाना केलें, तेणेंप्राा जाऊन दर्शन घेतलें. त्यास श्रीमंत मातुश्री आईसाहेब याणी कितेक आज्ञा करून पत्रें दिल्हीं तीं बजिनस स्वामीचे सेवेसी रवाना केलीं आहेत. तरी पत्रार्थ ध्यानास आणून कर्तव्य विचार करणार स्वामी समर्थ आसेत. सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Moro Shivdeo to the Peshwa, sends letters by order of Tarabai.*

No. 199] [*1751 ?*

श्री

पुा तीर्थरूप राजश्री नाना व ताा राजश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

विनंती. आजी गुरुवारी धनाजी थोरात याची पत्रे वालव्याहून आली, तीच बजिनस स्वामीकडे पाठंविली आहेत त्यावरून कलेल. आम्हीं बातमीत आहो. स्वामीचे पुण्य समर्थ आहे. काये चिंता आहे ? येथे मजवल लोक म्हणावे तर चालीस पन्नास आहेत. कलले पाहिजे. हे विनंती.

¶*News about Dhanaji Thorat sent to the Peshwa.*

No. 200] [*6-5-1751*

श्री

आज्ञाधारक आनंदराव गिरिधर त्रिकालीं सास्टंग नमस्कार विनंती. छ २० माहे जमादिलाकर खावंदाच्या प्रतापें सेवक क्षेमरूप असे. विशेष, इकडील वर्तमान कालपरवां समरुसीहून मातुश्रीनीं एक कारकून मुदामी मुख्याकडें पाठविला आहे. पत्रे लिहिली आहेत जे, आजवर तुम्हास बोलावितां बेजार जालो. खातिरजमेप्रमाणें इमान प्रमाणहि पाठविलें. अद्याप आगमन जालें नाहीं. किनिमित्य ? सांप्रतकाली तरी त्वरेनें येणें. सहसा सुस्ती न करावी, यैसी बहुत ममतेची पत्रे पाठविली. त्यास यानी कारकुनासी बोले कीं राजारामास

मारावयाचे जाले म्हणजे येतो. त्याचा जाब कारकून म्हणतो जे त्यास मारल्यावर तुम्ही श्रीमंताकडेंच गेलात म्हणजे काये करावें? यैसियास तुम्हास द्रिस्टीने पाहिल्याखेरीज तें कार्य उरकत नाहीं, यैस साफ बोली जाली. मुख्यानी पहिल्या कारकुनाबराबर पत्रें मातुश्रीस लिहून याचप्रमाणें पाठविलीं, व इमान-प्रमाणहि पाठविलें कीं त्यास मारणें म्हणजे आम्ही येतों. दोनच्यार रोजांत येसवंतरावहि पाठवणार म्हणोन यैकतों. तथापि यांच्या गोस्टीवरोन हे काम केलें. तरी श्रीमंत तेथे असतां यांचे गंतव्य होत नाहीं. यांच्या चितांत हरकसे इमानप्रमाण देऊन यास ठिकाणीं लावावें. जाणे चितापासोन नाहीसे यैकतों. दुही मात्र तोडाविसा भाव दिसतो. प्रस्तुत षेषोपंत श्रीमंताकडे पाठविला आहे. त्यांचे पत्र याच्या चितानुरूप येत नाही. बोलून गेल्याप्रमाणें कार्यभाग होऊन यांची निशा होत नाहीं. याकरिता डावाडोलसे असमाधान आहेत. श्रीमंताहीं त्वरेने कोणी येक मातबर पाठऊन यांस बोलाऊन न्यावे, याची मनोभिष्ट सिघ्र सिधीस न्यावी, हेच उत्कंठा फार जाली आहे. सेवकासहि सांगू पाठविलें कीं षेषोपंताकडोन जाब येत नाहीं. मनःपूर्वक श्रीमंतानी शेषोपंतास आज्ञा करोन आपली खातिरजमा होये तो प्रसंग करणेंस तुम्ही लिहिणें म्हणोन सांगू पाठविलें. सांप्रत अंतरबाह्य दिसूं येत कीं श्रीमंताच्या मांडीवर उसें दिले आहे. यैसच दर्शवितात. दमाजी गाइकवाड लुटलाची खबर हरिपंत, राा तात्याचे दिवान, यानी सविस्तरपूर्वक लिहिलियावरोन बहुत संतोष जालें. गुजरातचा कजिया तुटला. वरेंच जालें, म्हणोन फारच संतोष. समरसीचा तह न व्हावा हेच नवस व प्रस्न. हरयेकांसी मनसबाचा डोल कसा दिसतो म्हणोन तजविजा हमेषा करीत असतात. अद्या(प) अपणाकडील मनसब्याचा गोस्टी शेषोपंतासी न बोले. त्याचे उतर काहीच जिव्हाल्याचं न आले. याकरिताच उदास आहेत. अगदीं लक्ष श्रीमंताच्या बोलावण्यावर यानी ठेविला आहे. मातुश्रीकडील संदर्भ तो वरच्येवर लागलाच आहे. यांस हरकसेहि समरसीसी न्यावे, म्हणोन वासना मातुश्रीची आहे. अंगरियाकडील पत्रे आली होती. त्याचा जाब लिहिला कीं, आम्ही श्रीमंताखेरीज मातुश्रीकडील राजकारण करीत नाहीं. येसच साफ लिहोन पाठविले. पुण्यामधें कोणी येक राजपुत्र आणून यांकडील प्रसंगास आणून ठेविला आहे, म्हणोन यांस सांगि(त)ले आहे. त्यास यानी मुदाम माणसें पाठवून त्याचें वर्तमान आणविलें. आवजी कवड्याच्या वाडियांत ठेविला आहे. तो वीस बेवीस वर्षाची उमर आहे म्हणोन द्रिस्टीने पाहून येऊन यास माणसानी विदित केले. त्यास हे यैकून म्हणता इतकी राजाराम ताराबाईनी कैदेत ठेविला याकरिता त्याच राज्यास दुसरा धणी पाहिजे. यासाठी श्रीमतानीच

आणवून ठेविला आहे. तस्मात आम्हासी लटकें धातुपोषण बोलतात. नारो-व्यंकटेशा[1]च्या जबानी क्रियापुरस्सर सांगो पाठविले तेहि लटकेच. आपणास राज्य देणेच असतें तर आजवर सुस्ती न करते. दुही न तोडता दोनीं राज्यें राखावी, हाच मनसबा श्रीमंताचा यांत संदेह नाहीं. आम्हासी पत्रार्थी अथवा मध्यस्ता-करवीं दर्शविता तो आपये अगदीं लटका, म्हणोन उदासन पक्षेच बोलत असतात. सारांश श्रीमंतानी त्वरेने बोलावावे, हाच आपये. सिदोजी नाईक व अंतोबा यांची भेट होऊन रुकसत जाली. येकदोन रोजांत तेहि येणार. मियाखानाकडोन काही कार्य न जाले. येथे मियाखानास मुख्यानी निषेद रघोजी भोसल्याच्या राज्यकारणाकरतां फारच केला. त्याचे वजन काहीच नाही. या दरबारी त्याची आसामी लटीकवादाची आहे. जाबाकरितां येकदोन रोज अटकाव जाला आहे. आज उदिया जाब आल्यावर येथून येकदोन रोजात खावंदाकडे येणार आहेत. यैकिले वर्तमान सेवेस निवेदन केले आहे. श्रुत होय हे विज्ञप्त.

¶*News-letter from Anandrao Giridhar to the Peshwa at Poona, communicating to him the plans and intrigues going on at Kolhapur and the help that Tarabai asked from Sambhaji, the condition on which he offered it, viz., doing away with Ramraja, the implicit faith which Sambhaji had in the Peshwa and the rumour that the Peshwa had secured a boy with the intention of placing him on the Satara throne are some of the important items in the letter.*

No. 201] [*16-5-1751*

श्री

राजश्री पतप्रधान गोसावी यासि

ऽ श्रीमंत अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रीो माहाराव जसवंत निंबालकर कृतानेक दंडवत विनती. उपर, येथील कुशल ताा छ १ माहे रजब मुकाम दरजागा कमलालये जाणून गोसावी याणी स्वकीये कुशल लेखन करीत असावे. याउपर कृपा करून कासिदासमागमे छ २४ जालाखरचे पत्र पाठविले ते छ २९ जाखरी प्रविष्ट होऊन लेखनार्थश्रवणे बहुत संतोश जाहला. राजश्री राजे रघुनाथदास याच्या विचारें तीन लक्ष रुपये तुम्ही करारात आणिले असता शामराव यानी कबूल न करून परवाने घेऊन गेले त्यास परतोंन माघारे आणवितो रुपयाचा निकाल इकडच करून देवावा म्हणोन पत्रार्थ. यैसीयांसी राजश्री *(रा)ज्याजीचे नावे येक पत्र पाठऊन द्यावे की लोकांचे स(मजा) विसीस खर्चास पैका पाहिजे

---

१ घोरपडे.

म्हणून फलानियास म्हणजे आमचे नाव यास समक्ष सागितले होते की खर्चास यैवजची वोंढ आहे सध्या पैका देवावा म्हणजे निकडीस कार्यावर पडल. त्यास शामराव पर(वाना) देऊन पाठविले तिकडील पैका लवकर येणार नाही शामरावास फिरोन आणवितो पैका इकडच दो वाईद्यास करारापा्ा देवावा याप्रमाणे येक पत्र राज्याजीचे नावे व येक पत्र आमचे नावे यैसी दोन पत्रे पाठऊन देणे म्हणजे आम्ही आपले पत्र राज्याजीस दाखवून जाहला मनसुभा महकूफ करून यैवज। इकड प्राप्त होये हा विचार निछेयात आणिजेल. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Janoji Nimbalker to the Peshwa requesting him to send a letter to Raje Raghunathdas asking him to arrange for the payment of three lacs of rupees to which he had agreed.*

No. 202] [*July 1751*

श्री.

राजश्री पंतप्रधान गोसांवी यांसी.

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित वन्हानजी मोहिते दंडवत विनंती. उपरी: येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. राजश्री वेंकाजीपंत याजहातीं आपण पत्रें पाठविलीं त्यांत आज्ञा केली जे: श्रीमंत मातुश्री आईसाहेब याणी खाली उतरायाचा मजकूर पहिला जाहाला तो सर्व तुम्हास अवगत्य आहे. प्रस्तुतहि सर्व मजकूर सविस्तर यादींत लिहिला आहे व सांगणे तो सांगितला आहे. तरी सातारियास जाऊन सर्व प्रकारें मातुश्रींची व माहाराज स्वामींची निशा करून ज्यात दुसरा विचार चितांत न आणिता खाली उतरून राजभार चाले ते करणे म्हणौन लिहिले. त्यास आम्ही अपले अज्ञप्रमाणे जावें तर येथील विचार मातुश्री आईसाहेब यांचे व माहाराज स्वामी यांचे चितसुद येक दिसोन येत नाहीं. हुजुरे पत्रें घेऊन आलें त्यांत आज्ञा आम्हास येणे. त्याच्या नकला पाठविल्या आहेत. हुजुरे येथें येऊन बैसले आहेत. आपली आज्ञा होईल तेणे प्रमाणे वर्तणूक करू. बहुत काये लिहिणे, कृपा लोभ असो दीजे, हे विनंती.

वन्हानजी मोहिते याचा शिक्का.

मोर्तब सुद.

¶*Burhanji Mohite writes to the Peshwa about the disagreement between Ramraja and Tarabai.*

No. 203] [*12-8-1751*

छ १२ सवाल

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेस आज्ञाधारक आनंदराव गिरिधर त्रिकाली सास्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ १ शवालपावतो येथास्तित असे विशेष. सप्तरसीकडील राजकारण सित्थ होऊन मातुश्रीचे भेटीस स्वामी येणार हे सित्थांत याणी यैकोन पूर्ववत द्वंद घडेल. हे यांणी चितामधें आणोन गड किलेचे बंदोबस्ती करणेस पनाला व पावनगडास आलीं आहेत. पेशव्यांही आम्हांसी शफतपूर्वक बोलोन विस्वास गोऊन मातुश्रीकडेंच परिणामी तन देऊन आम्हास हलकें पाडलें म्हणोन बहुत श्रमीं आहेत. गडचे लोक आहेत त्यांपासोन आणक्रिया घेतात. पनालेस मातुश्रीचा संशये फितवा करतील अथवा ऐक्य जाल्यानंतर पनाला घेऊन देणेस मातुश्री स्वामीस आग्रह करतील, या करितां पूर्वीच बंदोबस्ती करीतात. सौ. उमाबाई मातुश्रीची भाची त्यांचा अगत्यवाद पूर्वीपासोन कैदेंतून उमाबाईस काहडावें हे वासना ताराबाईची आहेच. याउपर ते गोस्ट स्वामीकडोन घडणें आगाध नाहीं. या संशयांत सौ. जिजाबाई फार करोन आहेत. श्रीमंतावर माहाराज फार रुष्ट आहेत. जिजाबाईस म्हणतात जें तुमचे विद्यमानचें पेशव्यांकडील राजकारण परिणामी फलास आलें. तुम्हासी शफतपूर्वक बोलोन विश्वास तुम्ही त्याचे ठाईं ठेऊन भेट आम्ही नलगे म्हणत असतां, सिरोलास आम्हास नेऊन पेशव्यांसी भेटून त्याचे हाती आमचा हात देऊन आम्हास भरवसा देऊन मातुश्री ताराबाईकडील संदर्भ घडणार तोहि तुमचे भरवशावर तोडोन ताराबाईसी आम्हांसी कार्यवाहीपण दाखऊन सेवटी सर्व गोस्टीने दोनीकडें हलकें पाडोन भ्रस्ट केले. या उपरी राजकारणास ठाव नाहीसा जाला. दोन खेडी आहेत तेहि राहोन अन्नास संदेह तुम्ही पाडोन वकर[1] गमावला म्हणोन जिजाबाईचे व माहाराजाचें नित्य कलह आरंभला आहे. मध्यस्तांवर माहाराजांची येतरांजी सांगता पुरवेना. राजश्री भगवंतपंत आपल्या घरांत जाऊन बैसले. वारणासीस जाणेचे योजनेंत, हे वर्तेमान ऐकिल्या तागाईत सेवकांसी माहाराज नीट बोलत नाहीत. रागामधेंच आहेत. सरखेलीकडील राजकारण दोन दिवस मोकूब[2] जाले आहे. या दिवसांत कारकुनाकडोन विश्वास राहिलासा दिसतों. मनसबे अगदी राजनीतीचे. गंगी व नींगू म्हणौन कुणबिणी वर आहेत. खलबत त्यांसी सुखश्रमाचे करितात. दामाजीपंत दामोदरपंत कसब्याचे हवाल्याचे आहेत. त्याजवरी किंचित विश्वास

---

१ वकर = प्रतिष्ठा, आब.

२ रहीत.

दिसतो. माहाराजहीं या गोस्टीवरोन राजकारण यैकल्यापासोन शरीरेंकडोन क्रश जाले आहेत. चितामधें खेद आला आहे. मुखश्रीवरी वरचेश्व कांही दिसत नाहीं. अंतर्यामी फार श्रमी आहेत. स्वामीची व मातुश्रीची भेट जाल्यानंतर काये घडेल पाहवें. योजना काये करतील, यास्थली टिकाव होईल न होईल, कलेना. ऐकिले अढलले वर्तमान सेवेस निवेदन केलें आहें. श्रुत होये हे विज्ञात.

¶*Anandrao Giridhar reports to the Peshwa the communications going on between Tarabai and Sambhaji. He further writes that Sambhaji was wroth with Jijabai who tried to secure the co-operation of the Peshwa whose attitude completely belied all hope of securing the Satara gadi.*

No. 204] *[6-2-1752*

पा॥ छ ३ रबिलाखर

श्रीभवानी प्रसन्न

सेवेसी विज्ञापना. ता॥ छ १ रबिलाखर गुरुवासर स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. यावयाविसी सेवकास आज्ञा नाही. या संकोचेकरून राहणे जाले. फौज जी स्वामीनी स्वाधीन केली आहे ती वरचेवरी रवाना करीत आहो. चिरंजीव गमाजीचेहि पत्र आले जे, कारकुनाची व राजश्री दाजीपंत याची गाठी घालून देऊन निघोन येतो. येविसी कोणी सेवेमधे चर्चा करील जे, गमाजीचे येणे होणार नाहीं. तरी स्वामी आमचें जीवन; स्वामीची आज्ञा जाली असतां निमित्य करून राहील हे गोष्टी कल्पांती घडणे नाही. सत्वरीच स्वामी-संनिध येऊन दाखल होईल, येविसी अंतर पडणार नाहीं. सेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Yamaji Shivdeo to the Peshwa, offering his willing help.*

No. 205] *[1-8-1752*

पौ॥ छ २ सवाल.

श्री.

यादी किले येणेप्रों हा कालपर्यंत मोगलाकडील घेतले. सुा॥ सलास खमसैन मया व अलफ.

मल्हारजी होलकर याणी घेतले:

१ किले चांदवड.
१ किले इंद्राई.
१ किले राजदेहर चांदवड परगणियात आहे.

बालाजी बाजी केतकर दिमत विठल सिवदेव

१ किले रवला
१ किले जवला

२

१ किले धोडप. (फाटले.)
१ किले कनरा.
---
२ याणी घेतला १.

१ किले मार्कंडा. (फाटले.)

६

किले कांचना निाा विठल सिवदेव १.

किले अचला बहिरजी बलकवडे याणी घेतला १.

किले सोनगड निाा कृष्णरावमामा १.

किले पेमगिरि नारो आपाजी याणी घेतली १.

१ किले
१ किले देहर

२

दामोदर माहादेव याणी रामसेज किला घेतला १.

किले कर्नाळा रामाजी माहादेव याणी घेतला १.

[पत्राच्या मागील बाजूवर.]

तेरीज येकंदर.

	आज.	उत्तम.	मध्यम.	कनिष्ठ.
चांदवड	१	१	०	०
इंद्राई	१	०	१	०
राजदेहर	१	०	१	०
घोडप	१	१	०	०
मार्कंडा	१	०	०	१
जवलाखला	२	०	०	२
हणमंत्या	१	०	०	१
हर्ष	१	१	०	०
देहर	१	०	१	०
अचला	१	०	०	१
रामसेज	१	१	०	०
पेमगिरि	१	०	१	०

	आज.	उत्तम.	मध्यम.	कनिष्ठ.
कर्नाला	१	१	०	०
सोनगड	१	०	०	१
कांचना	१	०	०	१
	१६	९	४	७
कनरा	१	०	०	१
	१७	९	४	८

¶*This useful list mentions which forts in the Deccan were captured from the Nizam upto the year 1752.*

No. 206] [*15-11-1752 ?*

पो छ १० मोहरम.

श्री

श्रीमंत राजश्री राँऊ स्वामीचे सेवेसी

पोश जिवाजी नानाजी साष्टांग नमस्कार विनंती. उपर, वर्तमान ऐसे जे, श्रीमंत राजेश्री बाबूजी नाईक स्वार होऊन श्रीमंताकडे गेले. सांगाते स्वार हजार आहेत. यावर येथे बाबूजी नाईक होते, तेव्हां राजश्री आबाजी नाईक म्हनो लागले कीं, काही लोक ठवावे आणि काही थोडेबहुत कामकाज करावे. त्यासी बाबूजी नाईकी जाब दिधला की जैसे इतके दिवस जाले तैसे आवदाचेंहि साल पाहावे, आनि मोगलाचे कैसे होते हेहि कलेल; ऐसा विचार करोन मग स्वार जाले. ते नरसीपुरावर दोन मुकाम करोन कार्तिक शुद्ध ९ स कुचे करोन गेले. राजश्री आबाजी नायेकास आईसाहेबांची च्यार पाच पत्रें आली कीं, सत्वर येणें. त्याजवरून आबाजी नाईक कार्तिक शुध ९ स कुचे करोन सतरुसीस गेले. सांगाते राऊत पाऊनसेक आहेत. ऐसी हाकिगत आहे. यावर पुढं जे आज्ञा लिहून पाठवाल त्याप्रमाणे केले जाईल हे विनंती.

¶*Jivaji Nanaji to Vishwasrao—news sent from Satara about Babuji Naik and his brother.*

---

१ विश्वासराव ?

No. 207] *[21-11-1752*

श्री

सेवेसी विज्ञापना. सेवकाचें वर्तमान छ १४ मोहरमपावतों स्वामीचे कृपें-करून येथास्थित असें विज्ञापना. बाबूजी नाईक आबाजी नाईक यांचें वर्तमान पूर्वी शेवसीं लिहिलें होतें. त्याअलीकडे आबाजी नाईक बारामतीस जाऊन बाबूजी नाईक यांस स्वामींकडे रवाना केलें असे. बाह्यात्कारें करून आपण ताथोड्या किल्ल्याखालीं आले. मातुश्रींनीं सनद पाठविली कीं, नाईकाचे कबिले ठेवावयास किल्ला देविला आहे. त्यावरून हवलदारानें कबूल केलें. किल्लेकरी लोकांस वस्त्रें देऊन किल्ला आपले लगामीं लाऊन घेतला. इतक्यांत बाबूजी नीरानरसिंपूरपावतों जाऊन पुढें जातों अशी आवई चालून कूच दरकूच ताथोड्या खालीं आला. एक मुकाम तेथें केला. प्रतिनिधीस सातारा समजावीस करावयास आणिलें होतें. पवईपलीकडे डेरे देऊन राहिले, पंधरा रोज मजकूर घाटत होता. निदानीं यांचा त्यांचा बनाव बसला नाहीं. द्वादशीस रात्रीस प्रतिनिधीस बातमी आली कीं, बाबूजी नाईक किन्हईवर येतो. म्हणोन येमाजी पंतांनी किन्हई-हून लिहून पाठविलें त्यावरून प्रतिनिधि रात्रीचे सावध राहून त्रयोदशी(स) प्रातःकाळीं कूच करून मातुश्रीस न पुसतां किन्हईस गेले; तों दोन प्रहरां बाबूजी नाईक तिकडून आले. परस्पर वचक खाऊन दोन घटिका तटोन राहिले. येमाजी-पंत नाईकास म्हणों लागलें कीं, तुम्ही पलीकडून जावें. आमच्या गांवावरून जाऊं देणार नाही. परस्पर बोली फार जाहली. नाईकासंमागमें तीनशें राऊत निवडक होते. प्रतिनिधीजवळ पांचशेंपावतों आहेत. नाईक आड खाऊन याच वाटेनें जाईन म्हणोन झुझांस तयार जाहले. मग यांनींच दरम्यान भले लोक बोलून परस्पर भेटी जाहल्या. दोन घटिका बसले होते. त्यावर नाईक दोघे भाऊ सातारा आले. मातुश्रीची भेट झाली. कृष्णाजी नाईकाचे बागे-अलीकडे उत्तर भागीं डेरे देऊन राहिले आहेत. समागमें राऊत आले. तीनशें मागाहून, काल च्यारशें आले. एकूण सातशें राऊत अवघे आहेत. मोठ्या धमकेच्या गोष्टी सांगतात. आणखी स्वार व पायीचे लोक चाकर ठेवणार. प्रतिनिधीस येमाजीपंत पेशव्यांकडून आलें, त्यांनीं बिघडून टाकिलें. आपला हुकुमांत वर्तत नाहीं; त्यास उत्तमप्रकारें नाईकांकडून हकदार करावें. निदानीं प्रतिनिधि नाईकास द्यावी. परंतु पेशवे प्रतिनिधि एक जाहले. यांस खामखां मोडावें. येमाजीपंत सांपडले तर अटकेत ठेवावे, हें एक वर्तमान. दुसरें नाईकास सुमंतपद द्यावें. आबाजी नाईक राजाज्ञा देऊन, याचे हातून राज्याचा बंदोबस्त करवावा. तिसरें वर्तमान मुराजी घोरपडे आणविले आहेत. ते

आले तर यांचा त्याचा, एक हात करून दहावीस हजार फौज ठेवून कर्नाटक दोवांस देऊन दक्षणेस रवाना करावें. असे तीन मनसब्याची बातमी बोलतात. नाईक कूच दरकूच स्वामींकडे येतात, अशी आवई घालून जलदीनें सातारां आलें. कबिलास जागा केली. तस्मात कांहीं मोठी दुराशा यांनीं दाखविली. त्यांनीं पाहिली तरच आले आहेत. स्वामींची स्वारी दूर जाऊं दिलही. स्वामी शहास गुंतले. महिना दोन महिने लागतील, असा अवकाश पाहोन रिकाम्या राणी उपद्व्याप करावयाचा मनसवा करून आले आहेत. प्रतिनिधीजवळ आठाचहूं रोजांनीं दोन हजार फौज जमा होईल. परंतु त्यांत माणूस चांगलें नाहीं. सरदार उमदे म्हणावे तर खासा आणि येमाजीपंत वेगमीच आहे. आपले फौजेचा उपराळा[1] प्रतिनिधीस पोहोंचतो, तर मग नाईकांनीं उपद्व्याप काय करणें? पुण्यास पत्र पाठविलें आहे कीं, दोन हजार फौज घाटांखालें चारापाणी पाहोन ठेवावी. पांचा हजारांची येथें आवई येईल. मग नाईकांनीं काय करणें? हें न झालें तर स्वामी मोगलाच्या शाहास गुंतले तों च्यार रोज टेगा माजिवतील. धामधूम करतील. प्रतिनिधीजवळ पैका नाहीं. लोक नाहींत. * * नाईक इतिश्री करतात. फिरोन पहिल्याप्रमाणें खूळ माजतें. बाबूजीस पुसलें तर तो म्हणतो कीं, तुम्हांस जे गोष्टी प्रतिकूल तीं सहसा आचरणार नाहीं. परंतु लबाड. कारभार बुडतां बुडतां कांहींका लोकांस घेऊन बुडावें किंवा च्यार रोज लौकिक करून दाखवावा. असेंच कांहीं कूष्मांड माजलें आहे. मोड आला तो खोडून टाकला म्हणजे गुंताच वारला. शेवेसीं श्रुत होय, हें विज्ञापना.

¶*This letter explains the intrigues of Babuji Naik against Peshwa Balaji Bajirao and purports to be written to the Peshwa from Satara by his agent Purandare. The Peshwa was away settling his affairs with the Nizam, when Babuji Naik started his opposition with the help of Tarabai.*

No. 208] [*1-12-1752*?

पेा छ २९ मोहरम.

श्रीभवानी प्रसन्न

सेवेसी विनंती. सेवक अंताजी सिवदेऊ व रामाजी नाईक वाकडे कृतानेक विज्ञापना. ता छ २४ मोहरम भृगुवासर, मुकाम नजीक किणये लस्कर राजश्री पंतप्रतिनिधि साहेबाचे कृपेकरून, सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. राजश्री

---

१ कुमक.

जगजीवन पंडित प्रतिनिधि यांचा निरोप घेऊन सत्वर हुजूर येणे म्हणून आज्ञा केली; त्यास काली श्रीमंताचे कूच होऊन डेरियासी रात्री दाखल जाले. आजीचा दिवस येथे मुकाम आहे साहेबाचे आज्ञेप्रमाणें राजश्री पंत प्रतिनिधीस विनंती करून उदईक प्रातकाली सेवेसी येतो. विदित जालें पाहिजे; सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Antaji Shivdeo, the Pratinidhi's Mutalik, says he is coming the next day in obedience to orders.*

No. 209] [*December 1752?*

श्रीआई आदिपुरुष.

सकलगुणआलंकर्ण अखंडित-

लक्ष्मीअलंकृत राजमान्य

बालाजी पंडित स्वामी गोसांवी यांसी.

पोष्ये जगजीवन परशराम कृतानेक नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करविलें पाहिजे विशेष. येथील दिनचर्येचे वर्तमान जे: राजश्री अंताजीपंत याचे पत्र * * (फाटले) रोजचे आलें तेच पत्र बजिनस पाठविलें आहे. त्यावरून सकल अर्थ अवगत होईल. नाईकीं आजीच्यार महिने जे जे विवंचना करावयाची, ते करून आपल्या कत्रृत्वाची परिक्षा पाहिली; परंतु त्याच्या चित्तानरूप प्रसंग घडोन न ये. याजकरितां हा मन (सबा) योजून, या मनसबियानें राज्य लगामी लाऊन भारीपणा करून महद येश संपादावे ऐसा विचार योजिला आहे. त्यास राजश्रीस मातुश्रीच्या नम(स्कारा)स आणून वस्त्रें देविली म्हणून ते गोष्टी * * * ल्याणांची आहे असे नाही. कर * * * * उपाय योजिला आहे. याही उ * * * * साध्यता नव्हे; तरी पुढें आणि * * काये उपाय या (यो) जतील तो पाहावा. राजश्रीस दर्शणांस आणून वस्त्रें देणे, हाहि उपाय सामान्य नव्हे. कितेकांची राजकारणें सांगितली. कितेक कर्तव्याच्या गोष्टी सांगितल्या. कितेकाच्या पारपत्याचे विचार करून महद येत्नें करून हा विचार योजिला आहे. त्यास पुढेहि आणिखी येत्नातत(च) आहेत. त्यास येविसीचे कितेक अर्थ लिहिणें तें राजश्री दिनकरपंती लिहिलेच असतील अगर लिहितील. राजश्री गणेशपंतीहि संकळीतार्थें लेखन केले आहे त्याजवरूनी हिकडील अर्थ चि * * * * उपरी तिकडील विचार व्होणे * * आगर आपल्या पराक्रमें करून आव

* * * होऊन येईल; परंतु आपण येऊन हिकडील कला * दूर करून प्रजेचे संरक्षण होये तें केलियास उतम आहे. आमचा तरी ज्याप्रमाणें आपण आम्हास पत्री लेखन केले आहे. त्याजप्रमाणें येथा(श)क्त्या वर्तणूक करीत आहो. वाई देश वगैरे * * * कात ऐवज होऊन फौजेचे संरक्षण करावे येवि (सी) प्रतिपत्रीं लेखन होऊन येते, त्यास येविसीचा तपसील लिहितां पुरवत नाहीं. दाहा वीस हाजार रूपये मेलविल्याने फौजेचे संरक्षण होते ऐसे नाही. येविसी सर्व अर्थ आपल्यास न कलेतसे काये आहे? मुख्य आपल्या लिहिल्याप्रमाणे विचार करून, आपल्या येणियाची प्रतीक्षा करीत आहो. निर्वाह करणे आपल्यासच आहे. प्रस्तुत जाली गोस्टियाचा (अर्थ) जो लिहिणे तो लिहिला पाहिजे. तदन(रूप) घडोन येईल. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*The Pratinidhi informs the Peshwa of the intrigues of Babuji Naik with Tarabai at Satara.*

No. 210] [*1-2-1753?*

श्रीआईआदिपुरूष.

सकलगुणअलंकर्ण अखंडित-
लक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री बालाजी
पंडित स्वामी गोसावियांसी.

पोष्ये जगजीवन परशराम कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीयें लेखन करविलें पाहिजे विशेष. सविस्तर अर्थ पूर्वी लिहिलाच आहे. प्रस्तुत हिकडील वर्तमान तरी, राजेश्री बाबोजीनाईक छ ८ रबिलौवली सातारियास दाखल जाले. लौकिक वार्ता जे, ज्या उदेसे गेले होतें तें कार्यें होऊन, मनोरथ सिधीस गेला नाही. काही द्रव्याची विवंचना करून आले म्हणून बाहेत्कारीं वार्ता आहे. अंतर्यामीचें वर्तमान सविस्तर कलेल. तदनंतर लेहून पाठऊन देऊं. दुसरें वर्तमान ऐकतों जे, नाईक पेठत आहेत. तेथून कूच करून खेडावरी येऊन पुढें फौलाव करून उपस्वर्ग मुलकावरी करावा, ऐसे हुजुरच्या कारभारियांच्या मनात आहेत. तेणेप्रां नाईकास प्रेरणाहि करीत आहेत. तदनरूप नाईकानी विचार केलियास येविसींची विवंचना पूर्वी आपण आम्हांस पत्रीं लिहिली आहे, तेणेचप्रमाणें घडोन येईल. आंतर पडणार नाहीं. होईल वर्तमान तें परस्परें अवगत होईल. पुढील कर्तव्यार्थ आगोंदर लिहिणें उचित नाही. राजश्री उदाजी चव्हाण यानी राजश्री संभाजी राजे यां(ची) फौज

अनकूल करून घेऊन त्याजपासून वीस हजार रुा फौज * * आपले खर्च घेऊन काटेक[1] (?) मेळऊन, मिरज प्रांत मारून, * * * केला. कराड प्रांतात येऊन धामधूम क * वी * * रून सर्देस कराड प्रांताच्या आले होते; * * * * * केडगावी मुकाम करून राहाणें प्रा * * * * * स्वामीकडे राजकारण करून निश्चयांत * * * * आहेजे. राजश्री उदाजी चव्हाण यासी * * * वा राजश्रीकडील न्यून जो अर्थ दिसोन * साहित्य आम्हीं करावें ऐसें मान्य करून * * जिला आहे. बहुधा घडोन येईल. * * * होईल अर्थ तो लेहून पाठऊन देऊं; * * * * विशालगड[2] हा जागा पुरातन * * * * त राजश्री तुलाजी आगरें यानी खुद * * * जार हशम घेऊन, चौतफी चौकिया गड बसऊन, गड हस्तगत करावा हा मनसबा योजिला आहे. येविसीची मदती करून, कोकणप्रांतें उपस्वर्ग करून, किलाचा वेढा उठवावा म्हणून प्रत्यई पत्रें येतच आहे. त्याचा उपराला न करितां, स्थल हस्तगत आंगारक करितो. स्थल कांहीं सामान्य नव्हें. ऐसे चौकडून संकटे प्राप्त जाली आहेत. पुणियाहून फौज यावी म्हणून वीस पत्रें रोज दररोज पाठवीत आहों; परंतु काये निमित्य फौज पाठवीत नाहींत तें कळेना. बहुधा आपलीच त्यास ऐसी आज्ञा आहे की काये कळेना? येकून तिकडून फौज येत नाहीं हाहि येक आर्थ प्रतिकूल आहे. ऐसी चौकडून संकटे आहेत. पुढें होईल वर्तमान दिन प्रतिदिन लेहून पाठऊन देऊ. विशालगडाविसी राजश्री तुलाजी आगरें यांसी भयप्रदर्शनयुक्त पत्र पाठविलें पाहिजे. सारांश गोष्टी, आपले येणियाची प्रतीक्षा करून मनसबा रक्षून आहे. सत्वर या प्रांती येणे उचित असे. बहुत काय लिहिणे? लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Activities of Babuji Naik, Udaji Chavan and Tulaji Angre are reported to the Peshwa by the Pratinidhi.*

No. 211] [*10-2-1753*?

श्रीआईआदिपुरुष
सकलगुणआलंकर्ण अखंडित-
लक्ष्मीआलंकृत राजमान्ये राजेश्री
बालाजी पंडित स्वामी गोसावी
यासी.

पोष्य जगजीवन परशराम कृतानेक नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणऊन स्वकीयें लेखन करविले पाहिजे विशेष. पूर्वी युध्य राजश्री आबाजी

(१) शा. रो. २३२, १-२-१७५३. (२) २५-१-१७५३, शा. रो. २२९.

नाईक याचं जालें ते वर्तमान पत्री लेखन करून..... .....
.....च आसेल. प्रस्तुत वर्तमान राजश्री (बाबु)राव सदासीव फौज-सुधा समागमे हुजरात राजश्री मानसिंग जाधव याजजवली मागून घोडा बहुमानार्थ घेऊन, त्रिपुंटीवरी येऊन मुकाम करून, छ ६ रविलाखरी चालोंन आले. त्यास आम्ही चव्हाणाच्या शहावरी दीड महिना होतो, तेथून कूच करून छ ७ रोजी चिमणगावास आलो. ते दिवसी पारपत्य करावे, तो राजश्री माहादाजी नाईक लिंबालकर व नवाब विठलराव बकसी व परशराम सिंदे चिमणगावच्या मुका[मा]स येऊन श्रीमंत मातुश्री आईसाहेब याची आज्ञा बहुता प्रकारे सांगोन नाईकाच्या बहुमानाचा आग्रह बहुत केला. त्यास केवल त्याच्या गोष्टी आमान्यच कराव्या नरी, आग्रहसा दिसोन येतो. याजकरिता कुमठे याजवरी नाईकी तिकडून यावे, आम्ही कुमठियापावेतो जावे. नाईकांची भेटीमात्र व्यावी, तेथून नाईकास निरोप द्यावा, कूच करून नाईकीं सातारियास माघारे जावे, ऐसा करार करून मध्यस्तास निरोप दिला. निरोप देतेसमई त्यांसी करार केला जे, तुमच्या आग्रहाकरितां आम्ही मान्य केले; आणि नाईकी तुमची गोष्टी आमान्य केलियास पुढे तुमचा विचार काये ? त्यास राजश्री माहादाजी नाईक यानी करार केला जे करारापमाणे नाईकी मान्य केलियास उतम जाले आणि मान्य न करीत तरी आम्ही हुजरात देखील निघोन जाऊन तुम्हास.....
.....शफतपूर्वक करून, निघोन त्रिपुटीस (ये)ऊन, येथील करार नाईकास निवेदन केला. नाईकी त्याचा विचार न ऐकतां च्यार गोष्टी हुजरातीस व नाईकास बोलून, तेच क्षणी छ ७ रबिलाखरी च्यार घटिकां दिवसा कूच करून मौजे चिंचणेर येथे जाऊन, कूल सिवार चारून मुकाम केला. सदरहूप्रा वातमी आम्हास आली. राजश्री माहादाजी नाईक *नीहि साफ लेहून पाठविले जे नाईक केला करार मानीत नाहीत. तुम्हास कलेल ते करणे ; हुजरात आम्ही निघोन जातो. म्हणून उतरे येक दोन जाली; परंतु (रा)त्री आम्ही कूच न केलं. यंणप्रा विचार * * * बहुत काय लिहिणें ? लोभ असो दीजे, * * * *

¶*Description of a fight between the Pratinidhi and Babuji Naik.*

---

१ खिंड व गांव सातऱ्यापासून ७ मैल. २ कोरेगांवापासून २ मैल.

No. 212] *[13-2-1753 ?*

श्रीआईआदिपुरुष.

पुरवणी राजश्री बालाजी पंडीत स्वामी
गोसावी यांसी.

विनंती. उपरी, येथील कुशल * * (जाणू)न स्वकीये लेखन करविलें पाहिजे विशेष. आपल्याकडील फौज घाटा खाले आली आहे. राजश्री दादोपंत बाग याणें व राजश्री म्हालोजी मुठे व राजश्री गोविंद * * ऐसे मिलोन दीड हजार फौज आहे; त्याची आमची भेटीहि दोन चौ दिवसात होणार आहे ; भेटी होईल. श्रीमंतांसनिध फौज राहिलियास श्रीमंत मातुश्रीच्या चितात विक्षेप येईल. नाईकाच्या पारपत्याचा विचार जालाच आहे ; राहिला विचार तोहि होईल ; परंतु फौज सनिध ठेविता न ये. त्यास आपले आगमन होये तो आपल्या आगमनाचा मार्ग लक्षून कालहरण करावे लागेले. त्यास फौजहि आपली बराबरी घेऊन हिंडावी लागली. जवली फौज असोन भारीपणा असला पाहिजे. उरज(कर)ता न ये. त्यास फौजेचे सरदार अनमान करतील की काये कळेना. याजकरिता आपली पत्रे सरदारास आलियास ते राहातील. तरी तिघा सरदारास तीन पत्रे नेहमी राहावयाविसी पाठविली पाहिजेत. फीरोन बल नाईकी केलें तरी * * (माग)ती पारपत्य होईल. राजश्री माहादाजी नाईक येक व * * लोक युद्धातच कराराप्रमाणें निघोन सातारियास * * गेले. त्याचा ठायी आपली उदासता जाली * * (होती) * (ते) दूर करून पूर्ववतप्रमाणे त्यांची स्थापना (होऊन ?) आम्ही लिहिलियाचे सार्थक होये ते केले पाहीजे. या प्रसंगी राजश्री सिदोजी थोरात यानी आपल्यावरी दृष्टि देहून साहासे फौजेनसी, आजी साहा महिने आहेत. राजश्री सिवाजी थोरातहि दोन महिने येथे दोनसे राऊ-तानसी होते. सेवट आपल्या कडे गेले. त्यांचे. (ऊ)र्जित आपण केलेच असेल. कदाचीत कांही चितात (अर्थ) असेल तरी सर्व प्रकारें दया करून पूर्ववतप्रमाणें * * संरक्षण केलियास ते आम्हा जवली राहिलियाचे * * * (सार्थक) होईल, हे विनंती.

¶*The Pratinidhi warns the Peshwa about the activities of Mahadaji Naik Nimbalkar and of Babuji Naik.*

No. 213] *[13-2-1753*

श्रीआईआदिपुरुष

पुरवणी राजेश्री बालाजी पंडित

स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करवणें विशेष. हुजरातीपैकी राजश्री सेखमिराजी तो प्रथम आलेच नव्हते. मोहिते, सिरके हेहि आले नव्हते. पागाहि आली नव्हती. नवे लोक राजश्री मानसिंग जाधव यानी ठेविले होते, ते व पहिले पैकीं कांही पतके आलीं होती. त्यास छ ९ रोजी भोमवारीं प्रातकाली आम्ही फौजेसहवर्तमान नगारा करून निघोन कृष्णातीरास चिंचणेर सनिध गेलो. राजश्री नाईकानी तयार होऊन, गोटास आगी देऊन, उभे राहिले. नदी उतरोन आमच्याहि फौजा गेल्या. नाईकांची फौज मोडली. हाती, निशाण, नगारें, घेतली. राजश्री आबाजी नाईकहि सांपडले. घोडी थोडी बहुत घेतली. राजश्री बाबोजी नाईक यांसी तीन जखमा लागल्या. दोन जखमा दोन हातावरी आहेत. भालियाच्या जखमा आहेत. थोडकिया आहेत. नाईक निघोन सातारियास गेले. आम्ही फौजसुधा मुकामास चिमणगांवास[1] आलो. राजश्री आबाजी नाईकहि बरावरी घेऊन आलो. त्याचीहि श्नानसंध्या जाली. राजश्री बाबुराव जाऊ(न) घरांत सातारियास राहिले. सातारियास जाऊन सातारियाच्या लोकास च्यार अधिकउण्या गोष्टी रागे करून बोलले. गोट गोडोलीवेरी[2] आहे. बुणगेयांत राऊत दोन च्यारसे जमा जाले आहेत. येणेप्रा वर्तमान काली छ ८ रोजी जाले. वरकड हुजरात व राजश्री माहादाजी[3] नाईक कराराप्रमाणें युध्यसमई निघोन सातारियास गेले. राजश्री त्रिंबकराव धायगुडे व कृष्णाजी गायंकवाड हुजूरचे निसबतीचे वगैरे कांही किरकोल से पनास राऊत युध्यसमई होते. नाईकाचे फौजेबरावरी त्याचाहि बहुमान जाला. राजश्री त्रिंबकराऊ धायगुडे याचा घरचा पुत्र फौजेत होता तो मृत्य पावला. वरकड जखमी जाले. मेले त्यांची नावनिसी कोठवरी ल्याहावीं. राजश्री उदाजी चव्हाण यांसी पत्रे आपली आली ती पाठविली; परंतु त्यांची दृष्टी आमच्या पारपत्यावरीच आहे. आम्ही त्याचा टिकाव मिरज प्रांती होऊ देतो ना. परंतु करवीरवासी स्वामी याची फौज समागमे होती, त्यांची मर्जी रक्षावी, हा आपला संकेत वारवार पत्रीं येतच गेला; याजकरितां आपला आपमान करून घेऊन, आपल्या लिहिल्याप्रमाणे चर्चा न केली. प्रस्तुते चव्हाण कोकटनूर तलेसिंग दोन ठाणियांच्या पारपत्यास जात आहेत. पुढे होईल वर्तमान ते लेहून पाठऊन

---

१ किन्हईजवळ ? २ साताऱ्याजवळ पू. २ मैल, ३ निंबाळकर,

देऊन. करवीरवासी स्वामी याची फौज आपल्या स्वस्थलास जावयाची विवचना करून पूर्वी लिहीले होते त्याजप्राा विचार करून फौज लाऊन दिली गेली आगर जाईल. चिकोडकर व राजश्री कालोजी घोरपडे चाकर ठेविले. येकून गूल फाडून चव्हाण मात्र जातीने उरले आहेत. येविसीचे वर्तमान लिहीले तरी आपल्या चितात येणार नाहीं; परंतु राजश्री संभाजी राजे यास * * * * * यास यावे हा येक मनसवा चव्हाणानी योजला * * त्याचा उपसव्हार जाला, हे विनती.

¶*Jagatjivan Pratinidhi reports to the Peshwa that he has defeated Babuji Naik and taken his brother prisoner.*

No. 214] *[2-3-1753*

श्री

अखंडित लक्षुमीआलंकृत राजमान्य राजश्री
दिनकर माहादेव गोसांवी यांसीं

सेवक विश्वासराऊ बलाळ नमस्कार. सुा सलास खमसैन मयांव अलफ. तुम्ही छ २४ रबिलाखरचीं पत्रें पाठविलीं तीं छ २९ मिनहूस दोन प्रहर दिवसास पावलीं. लिहिलें वृत्त साद्यंत विदित जाहालें. सांप्रत मातुश्रीच्या चित्तांत आलें कीं लहान माणसाचा संग्रह केल्याने परिणाम नाहीं. पेशव्यावर विस्वास टाकल्याने सर्वा सेवकास हुकुमात वर्तऊन, राज्याचा बंदोबस्त करून राज्य नांदिवितील म्हणून मध्यस्थाचें बोलणेयाचे भाव, व खर्चास द्यावयाचा मजकूर कितेक विस्तारे लिहिला तो साद्यंत विदित जाहाला. ऐशीयांस सातारियातील कारभार म्हणजे सर्व अविस्वासी व अविचारी आहे. याजमुलें त्याचा विस्वास कोणास पुरत नाहीं, व कोणाचा विस्वास त्यांस पुरत नाहीं. ते प्रेत्न करावयाचे तितके करितात; शेवटीं सर्व निफळ होतात. कोठे कांही चालेना. सर्व व्यर्थ होते, दुसरा उपाय नाहीसा होतो, तेव्हां ऐशी राजकारणे करुं लागतात. पूर्वी तुम्ही दोन च्यार वेळां याचप्रमाणें राजकारणें करून खर्चास रुपये येथून घेऊन नेऊन दिल्हे, तेव्हां बोलल्याप्रमाणें शेवटास कोठें गेलें? तें आतां कोठे जाणार आहे? खर्चास नाहींसें होतें तेव्हां ऐशीं राजकारणें करून खर्चास रुपये घ्यावें, तदनंतर पुढें जे आहे तेच आहे, ऐसे त्यांचे भाव असतां प्रस्तुत खर्चास रुपये द्यावयास अनकूल कैसें पडतें? प्रस्तुत पैका येथें नाहीं; पैक्याची वोढ आहे तें सर्व वर्तमान तुम्हांस ठावकेंच आहे. याजकरितां पैक्याखेरीज वरकड ममतायुक्त राजकारण राखोन ठेवावें. वाह्यात्कारे उदासभावे करून तुम्ही प्रस्तुत आहा तोच प्रकार

बरा आहे. पुढें तीर्थरूप स्वारीहून अलियावर जे करणें ते करतील. येविशी तीर्थरूपांनी तुम्हास लष्करातून पत्र लेहून पाठविलें तें पाठविलें आहे. त्यावरून सविस्तर कळेल. त्यापत्रांतील अर्थ व भावगर्भ सर्व चित्तामध्ये आणून त्याप्रमाणें वर्तणूक करावी हेच गोष्ट उत्तम आहे. लटके बोलावे, लटके कारकून उभा करून त्याजपासून लटक्याच कल्पना करून करावे, हे रीत कामाची नाहीं. यांत आपलें स्वरूप राहात नाहीं, व आपले मातबरीस व थोरपणास श्लाघ्यता उत्तम दिसत नाहीं. खऱ्याखुऱ्या गोष्टी असतात त्या परिणामास जात नाहीत, तेव्हा लटक्या गोष्टी परिणामास कोठून जाणार? पुढें मागे त्या गोष्टी कळतील तेव्हा मग कसे होईल? याजकरितां त्या गोष्टीत तुम्ही सर्वथी न पडणे; खरेपणानेंच जे होईल तेंच बरे आहे. तेणें करून परिणाम शुभ आहे. इतका मजकुर थोड-क्याच दिवसांवर आला आहे. फार दिवस लागतात ऐसें नाहीं. दोन च्यार महिने वाट पाहिलियाने सहजेच चित्तानरूप सर्व होऊन येतील. कांही चिंता आहे ऐसे नाहीं. जाणिजें, छ २६ रबिलाखर माघ वद्य त्रयोदशी शुक्रवार सूर्योदय.

लेखन सीमा.

¶Vishvasrao Ballal to Dinkar Mahadeo, the Peshwa's agent with Tarabai. The lady having found herself completely discomfited, proposed terms of agreement with the Peshwa, to which this letter is a reply.

No. 215] [पौ॥ *8-3-1753*

पो छ २ जाल्हौवल.

श्रीआईआदिपुरुष.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री विस्वासराव स्वामी गोसावी यांसी. सेवक जगजीवन परशराम नमस्कार विनंती. उपरी, येंथील कुशल जाणऊन स्वकीयें लेखन केलें पाहिजें विशेष. इकडील वर्तमान जें, प्रस्तुत आमचा मुकाम किले वसंतगडानजीक कृष्णातीरी आहे. छ २७ रबिलाखर मंदेवासर[1] चतुर्थ प्रहरी राजश्री * * जी मोहिते किलावरून खालें उतरोंन त ल बि डावरी आलें. उपरांतिक आमचे जा(णें) होऊन त्याच्या आमच्या भेटी जाहल्या. आस्तमानी त्यास गोटास घेंऊन आलों. वस्त्रें देंऊन

---

(१) ३-३-१७५३.

फिरोन किलास गेलें. इंदुवारी प्रतिपदेस जमावसुधा आम्हा संनिध राहवयासी लस्करात येणार यैसा सिधांत जाहला आहें. आपणास कलावें म्हणऊन लिहिलें आसे. वरकड सातारियाकडील वर्तमान राजश्री दिनकरपंत लिहितच आसतील त्यावरून कलत आसेल. प्रस्तुत वर्तमान ऐकितों जें, राजश्री बाबूजी नाईक प्रतिपदेंस मंगलस्नान करून दरबारास जाऊन पूर्ववतप्रमाणें राजश्री स्वामीस श्रीमंत् मातुश्री आईसाहेब यांच्या दर्शनास घेऊन जाऊन जनात लौकिक करून सर्व सेवकास पत्रें राजश्रीच्या नावची व मातुश्रीच्या नावाची लेहून फौज जमा करून आम्हावरी यावें हाहि उपायें चितांत आणून करणार आहें म्हणऊन वर्तमान आहे. येविसाचा तपसील राजश्री दिनकरपंत याणी लिहिला आसेल आगर लिहितील. बहुधा वर्तमान सत्य आहें. याचाहि परिणाम कोणते रीतीनें होतों पाहवा. सदरहूप्रमाणें विचार घडोन आलिया याचाहि विचार करणे लागेंल. पुढे होईल वर्तमान ते लेंहून पाठऊन देऊ. यानंतर कडेगावचे मुकामीं आसतां राजश्री दादोपंत वाग यांचे सरदार सितोले तिसा स्वारानिसी त्याजकडें जावयासी आलें. त्याची आमची भेटी कडेंगावी जाहली. त्यास राजश्री दादाजीपंत याची रवानगी फौजसहवर्तमान आम्हाकडें आपण करणार ही पत्रे आपला आली होंती. त्याजवरून सितोले यासी आम्ही ठेंऊन घेतलें. दोंन युध्यांत ते होंतें. राजश्री दादोपंतांस यावयासी दिवसगत लागली. हालीं तेहि आलें. येविसी त्यास सांगितले. परंतु आपली आज्ञा आलियाखेरीज ते आंगिकार करीत नाहीत. त्यास दोन हजार रूपये नालबंदी दिल्ही. त्याचा तगादा करीत आहेंत. याजकरितां आपल्यास लिहिलें आसें. तरी सकल आर्थ ध्यानात आणून सितोले याचा आंगिकार करून त्यास तगादा न करीत तें आज्ञा त्यास केली पाहिजें. आपलें पत्र त्यास येविसी पाठविले पाहिजे. बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*Jagajjivan Pratinidhi to Vishwasrao, son of the Peshwa. Communicates Babuji Naik's activities and intrigues with Tarabai to put down the Pratinidhi and requests that Sardar Sitole should be allowed to stay with and help the Pratinidhi.*

No. 216] [*March 1753 ?*

श्रीआईआदिपुरुष.

पुा राजश्री बालाजी पंडित स्वामी गोसावी यांसी

विनंती. उपरी, आपलीं पत्रें कडेगांवची मुकामी राजश्री घनबा मंत्री यासी आली तें त्याजकडे प्रविष्ट केलीं. त्यावरून ते स्वस्थलाहून कूच करोन आम्हाकडे

मुकाम मजकुरास आलें. भेंटी जाहाली. पंधरा दिवसपर्यंत मुकाम तेथे जाहला. उपरांतिक राजश्री उदाजी चव्हाण याजकडे चिकोडकर व घोंरपडें व पाराशर वासी याची फौज होती, तें याचें आमचें विचारें युक्तिप्रयुक्ति करून तेथें त्यामध्यें फूट करून करवीरवासी यांची फौज, त्यांची त्याजकडे गेली. चिकोडकर व घोरपडे तेंहि जात आहेत. इतुका मनसवा करून राजश्री मंत्री व आम्ही कडेगावाहून कूच करोन चिमणगावास येंऊन मुकाम केला. राजश्री मंत्री याणीहि आपणास पत्र लिहिलें आहे त्यावरून कलों येईल. बहुत काय लिहिणें, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Jagatjiwan Pratinidhi writes to the Peshwa how he and the Mantri managed to break off the following of Udaji Chavan.*

No. 217] [*March 1753 ?*

श्रीआईआदिपुरूष.

सकलगुणालंकरण अखंडित-
लक्ष्मीआलंकृत राजमान्य राजेश्री
बालाजी पंडित स्वामी गोसांवी यांसी.

पोष्य जगजीवन परशराम * * * * * विनंती. उपरी, येथील कुशल (जाणून स्वकी) ये कुशल लेखन करित असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला. राजश्री सिदोजी थोरात यासी अष्टे द्यावे यैसा करार होता. त्यास हे सर्व प्रकारें आमचें पदरीचे याचें सा * * रावें, ते गोष्टी चितापासून क * * * * * श्री उधो वासुदेव यासी फौजे * * * ऊन सूर्यवंसी याचे साहित्ये करा * * * ऊन लिहिलें त्यास पूर्वी राजश्री ये * * * * स अष्टे याचे विसी येक * * * * होती जें. आष्टी याचें साहित्य * * * * * लियानंतर दांतेगड तुमचा तुम्हा (स) देविला जाईल म्हणऊन त्याजवरून तदन्वयेच करून आम्ही विचार करून येक राऊत व येक प्यादा पाठविला नाही. श्रीमंत मातुश्री आईसाहेब याणी वीस वेळ आज्ञा केली असतां आज्ञा अमान्य करून अष्टे थोरातास यावे हाच उपाये योजिला आहें. उधो वासुदेव खानपुरी आहेत. येवीसीचा शोध करवावा. येक राऊत त्याजकडील गेला नसतां आपण शब्द ठेऊन लिहिलें त्याजवरून दिसोन आले जे. अष्टे थोरात येतीलच जें. आपली कृपा त्याजवरी आहें त्याजमुळे

आम्ही हि साहित्या * * आहों. अष्टे येईल. परंतु * * * * वा लागेल. याजकरितां का * * * * *आमचे ठाईं आसलें पाहिजे. त्याज करि * * * * लें यैसे भासतें या मागेहि आपल्या * * रें विचार करित आलों आहों. पुढेंहि * * * * विचारास वित्यास घडणें नाहीं * * * न आपण काये विचार चितांत आ * * स इलाज काये बहुत काये लिहिणे, लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Jagajjivan Pratinidhi to the Peshwa: writes of his having pacified Sidhoji Thorat, and of his being in complete agreement with him.*

No. 218] *[25-4-1753*

श्री

अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्य
राजश्री दिनकर माहादेव गोसांवी यांसी.

सेवक विश्वासराऊ बलाळ सुा सलास खंमसैन मयांव अलफ. तुम्ही छ १७ जमादिलाखरचें विनंतीपत्र पाठविलें तें पावलें; लिहिलें वृत्त सावंत विदित जाहालें. किले ताथवड्याचा मजकूर लिहिला तो कळला. ऐसियास हा किल्ला घेतलियाने मातुश्री आईसाहेबाचा पेंच पडतो. दुसरी गोष्ट राजश्री पंत प्रतिनिधीचा व तीर्थ-रूपाचा धरोबा येक विचार जाहाला आहे. तीर्थरूप श्रीरंगपटणास मसलतीस स्वारीस गेले. मागें सातारियाकडील मनसबा सर्व त्याणी संभाळून सर्व कार्यभाग केले. यामुळें आम्हांस येथें कोणे गोष्टीचा गुंता पडला नाहीं. असें असतां त्याचा किला घ्यावा, त्यास श्रमी करावे हे गोष्ट उत्तम नाहीं. त्याचा किला महिपतगड पूर्वी घेतला होता तो तीर्थरूपानी माघारा देविला, असा पदार्थ असता आता त्याचा किला घेतल्यानें तीर्थरूपांचा शब्द लागेल हा अर्थ तुमचे चित्तामध्यें येत नसेल ऐसा अर्थ नाही. सर्व अर्थ तुम्हांस कळतच आहे. याच मजकुराचें पत्र तुम्ही राजश्री बाबूजी नाईक यांजवळ लेहून दिल्हें होतें ते त्याणी हुजूर लाखोटा पाठविला. त्याचा जाबपर्याय लाऊन पत्र लेहून लाखोटा करून त्याजवळ दिल्हा आहे ते तुम्हां जवळ आणून देतील त्यावरून कळेल. जाणिजें छ २० जमादिलाखर.

¶*Vishvasrao Ballal to Dinkar Mahadev, the Peshwa's agent with Tarabai. Mentions how the Peshwa has won over the Pratinidhi and how Tarabai cannot deprive him of his fort Tathoda.*

No. 219] *[April-May 1753*

श्रीआईआदिपुरुष

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य राजश्री बालाजी पंडित स्वामी गोसावी यांसी.

पोष्य जगजीवन परशराम कृतानेक नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणऊन स्वकीयें कुशल लेखन करविले पाहिजें विशेष. सांप्रत आपणाकडून पत्रें येऊन वर्तमान कलत नाहीं. तरी यैसे नसावें. सर्वदां पत्र पाठऊन कुशलार्थ लेखन करून स्नेहाची अभिवृधि करावीं (उचित आहे). यानंतर इकडील वर्तमान तरी राजश्री तुलाजी आंगरे सरखेल याणी किले विशालगडास वेढा घातला होता. येदनिमित्य फौजेसहवर्तमान आंबेयाच्या घाटाने शयाद्रीखाले उतरोन वेढा उठविला. सन्मुख युध्य जाले नाही. पाचसाहा हजार मनुष्य होते. दहशतीनेच पलोन गेलें. उपरांतिक राजापुरानजीक जाऊन मुकाम केला. फौजेमुलें काही मुलूक उध्वंस जाला. तदनंतर आंगरे याणी कारकून व मातबर ग्रहस्त बोलीचालीनिमित्य मध्यस्तीस पाठविले. कितेक स्नेहाभावाच्या व ममतेच्या गोष्टी सांगोन पाठविल्या. इकडील लडे होते ते कबूल केलें. पूर्व-मर्यादेप्रमाणें वर्तावें येसा सिधांत जाहला. उभये पक्षी भेटी व्हाव्या येसा त्याचा मनोदये होता. येदनिमित्य ते राजापुरास आले. आमचेहि जाणे तेथे होऊन ते स्थलीच भेटी जाहल्या. चार पाच रोज मुकाम तेथे होता. परस्पर बहुमान वस्त्रें होऊन संरश्य जाहला. त्यास विजेदुर्गास जावयासी निरोप देऊन आम्ही कूच करोन शयाद्री चढोन मजल दरमजल, सिरालें, आष्टें वालवें, या तिहींच्या मधें कृष्णातीरास येऊन मुकाम केला आहें. आपली येणियाची मार्गप्रतीक्षा करीत आहों. प्रस्तुत आपला मुकाम कोणे स्थली आहे, काये वर्तमान? आपली भेटीची उत्कंठता बहुत लागली आहें. आगमन कोणत्या रोकें होणार, आम्ही कोणत्या रोकें यावें, भेटीचा योग कोणे स्थली घडावा, हे सावंत लेखन करून पाठवावें. तदन्वये विचार होऊन येईल. सावंत उभयेता बंधु यामधें ग्रहकलह उत्पन्न जाहला आहे. त्यास राजश्री रामचंद्र सावंत याचे सर्व प्रकारे अवश्यक आहे. रा॥ जयेराम सावंत आंगरे यांच्या कश्यपी लागोन त्याची मदत घेऊन उत्पात करावयासी प्रारंभ करीत आहेत. त्याच्या पारपत्यास्तव राजश्री दादो माहादेव वाव यासी घाट उतरोन कुडाल प्रांते जावयाविसी लिहिलें. यैसियांसी राजश्री तुलाजी आंगरे सरखेल याची आमची भेटी जाहली. तेसमई येविसी त्याचे आमचें भाषण जाहलें. जयराम सावंत याचा कैपक्ष न करावा यैसा त्याणी आम्हापासी करार केला. हाली आपली पत्रें वाव माारनिले यासी

आलियावरी आंगरे यासी पत्रें पाठविली होती त्याचे प्रत्योतर आले. त्याची तालीक व रा दादोपंत यासी व राजश्री गणेश बलाल यासी पत्रें आंगरे याची आली तेच बजिनस त्याणी आपणाकडे पाठविली आहेत. त्यावरून सविस्तर कलों येईल. आपण लिहिल्यावरून माारनिलें फौजेसमवेत कोकणप्रांते उतरत होते. त्यास आम्ही आपलेसनिध राहऊन घेतलें. यासी कारण तरी प्रज्यन्यकाल समीप आला. पाऊसामुलें फौज सडून हैरान होईल. कोकणातील प्रजन्याचा मजकूर आपणास विदितच आहे. त्याहिमधें आंगरेयाजकडून त्याचे साहित्य न व्हावे येसा करार जाहला. यावरून माारनिलेस खालें उतरों दिल्हे नाही. सावंत यासीहि पत्रें पाठविली आहेत. आणि त्याच्या शहावरी लस्कराचा मुकाम केला आहे. इकडे सावतांवरी शह व इकडे आपल्या भेटीच्या विचारामधें येसे दोन्ही विचार योजून मुकाम केला आहे. त्याच्या पारपत्याविसी अगाध आहे यैसे नाही. भेटी जाहलियानंतर पश्चयांत प्रजन्य काल निवारण जाहलियावरी त्याचा बंदोबस्त येथास्थित कर्तव्य तो करावा. केलाच पाहिजे. प्रस्तुत कांहीं पाईचें हशम लोक रवाना करून दबाव पडोन कलह निवारण होये ते करावे. याचा विचार आपणास कलतच आहे. बहुत काये लिहिणें, लोभ असो दीजे. हे विनंती.

¶*Jagajjiwan Pratinidhi informs the Peshwa how he went to the rescue of Vishalgad which was being invested by Tulaji Angria, how he met the latter and befriended him, and how the dispute between Jayram Sawant and Ramchandra Sawant was being adjusted.*

No. 220] [*18-5-1753*?

श्रीआईआदिपुरुष

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत

राजमान्य राजश्री बाळाजी पंडित स्वामी गोसावी यांसी.

पोष्य जगजीवन परशराम कृतानेक नमस्कार विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करविले पाहिजे विशेष. सांप्रत आपणाकडील पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तरी ऐसें न व्हावें. सदैव पत्र पाठवून स्नेहाची अभिवृधी होय ते गोष्टी केली पाहिजे. यानंतर इकडील वर्तमान तरी अगोदर मौजे सरुडसा गाव येथील मुकामीहून पत्रें लिहून पाठविलीं होतीं ते प्रविष्ट होऊन सविस्तर अवगत जाहलेंच असेल. प्रस्तुत सबेआष्टे[2] येथें सेनेसहवर्तमान श्रीकृष्णातीरानजीक अकलखोप येथें मुकाम आहे. यैसीयासी आपली भेटी व्हावी यैसे मानस बहुत आहे. बहुत दिवस जाहले भेटीची उत्कंठता जाहली आहे. येदं-

---

१ दामले, शा. रो. २३८, २७-२-१७५३. २ सवाई आष्टें.

निमित्य पुढें कृष्णातीरी * * * आपल्या आगमनाचा मार्ग लक्षित आहों. तरी भेटीचा योग सत्वर घडोन येई ते गोष्टी करावी हें उचित असे. सध्या आपला मुकाम कोणे स्थलीं आहे, काये वर्तमान, पुढें कोणत्या रोके आग * * * आम्ही कोणे ठिकाणी यावे, भेटीचा योग कोणे स्थली घडावा, सकल अर्थ लिहून पाठवावा. तदनुसार विचार कर्तव्य तो केला जाईल. वरकड सविस्तर अर्थ राजश्री गणेश वल्लाळ याणी लिहिला आहे त्यावरून कळों येईल. पूर्वी आपण चिरंजीव राजश्री त्रिंबकराव यासी भेटीचा (सं)केत सांगितला होता, त्यावरून त्याणी आम्हास लिहून पाठविले होतें. त्यास भेटीचा योग (घडो)न येई ते केलियानें उतम असे. भेटी होई(ल तो सु)दिन असे. पर्जन्य काळ * * * * लष्कर पाठविणार सर्व आपण * * * * असोन प्रातास येणे सत्वर * * * ही उत्तम अर्थ जसे पुढेहि * * * * विल्हेस लागणें तर सत्वर स्वदे * * * विचार केला पाहिजे. बहुत काय लिहिणे, लोभ असों दीजे, हे विनंती.

¶*Jagajjiwan Pratinidhi asks the Peshwa where and when he can come for an interview.*

No. 221] [*18-5-1753 ?*

श्रीआईआदिपुरुष

सकलगुणआलंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य राजश्री बालाजी (पंडित स्वामी गोसावी यांसी)

पोष्यें जगजीवन परशराम कृतानेक नमस्कार विनंती. येथील कुशल जाणून स्वकीयें लेखन करविलें पाहिजे विशेष. राजश्री यमाजीपंत मसुरीं फौजसुद्धां होते. त्यास आपलें आगमनाचा संनिध विचार ऐकोन त्यास संनिध यावयाची आज्ञा केली. त्याजवरुनी तेथील बेहबुदी करून स्वार प्यादे ठेऊन छ १४ रजबी आकलखोपचे[1] मुकामी येऊन दाखल जाले. येथील अर्थ वरचेवरी राजश्री येमाजीपंत यांसी आज्ञा करून लेखन केलेच आहे. त्याजवरुनी सर्व आर्थ अवगत जालेंच असतील. पुढे नवलविशेष वर्तमान होईल तें आपल्यास लिहिलें जाईल. प्रस्तुत कृष्णातीरी फौजसहवर्तमान आहो. आपल्या लिहिल्याप्रमाणें विचार घडोन येईल. सारांष गोष्टी जे आपण जो विचार करतील त्या विचा * * * आहो. दुसरा अर्थ किमपि नाहीं. वरकड वर्तमान राजश्री कृष्णाजी जिवाजो यानी निवेदन केलेंच असेल. हल्लीं चिरंजीव राजेंश्री त्रिंबकराव यांसी लिहिले

---

१ तासगांवजवळ.

आहे ते निवेदन करी * * * तं होईल. बहुत काये लिहिणें, लोभ असो * * * विनंती.

¶*Jagajjiwan Pratinidhi assures the Peshwa that he is in full accord with and ready to follow the lead of the latter.*

No. 222] *[16-3-1754*

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे

सेवेसी.

विनंती. सेवक रामचंद्र बसवंत कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. स्वामींची आज्ञा जाली कीं, राजश्री दमाजीवावा गायेकवाड समसेरबहादुर यांची चाकरी सोडून घरी वसावें. त्याजवरून आपलें गावांस आपण जातों. आपण त्याची चाकरी करणार नाहीं. अंतस्तेंहि त्यांसी कागदपत्र पाठविणार नाहीं. कोणासीं फंदाफितवा मिळोन करणार नाहीं. सातारियांस मातुश्री आईसाहेब यांजकड जाणार नाहीं. पुढें कालक्षेप चालणें त्यांस स्वामींच्या पायांपासीं येऊन आज्ञा होईल त्याप्रा वर्तोन कालहरण करूं. अंतर करूं तर सरकारचे गुण्हेगार. हे लिहिलें सही. कृपा केली पाहिजे, हे विज्ञापना. सुरु आर्बा खमसीन मया आलफ छ २१ माहे जमादिलोवल बिा ओं.

¶*Ramchandra Basavant, Diwan of Damaji Gaikwad, was won over by the Peshwa, to whom he gives this undertaking not to undertake any intrigues with Tarabai or the Gaikwad.*

No. 223] *[25-6-1760*

सुा ईहीदे सितैन

राजश्री सरकार महाराज •

मातुश्री आईसाहेब

माहे जिलकाद ऊर्फ आशाढ मास

सां राजश्री पंतप्रधान सुा

शाहूनगर नजीक किले सातारा.

तेरीख ११ रोज

चिटनिसी व

फडनिसी

गडनिसी

---

१ बिकलम ॐ

चिटनिसी पत्रे बार

राजश्री त्रिंबकराव विस्वनाथ यासी पत्र जे. माहादाजी गदाधर आमात्य मार्ज. याजकडे सरंजाम हुजरून चालत होता ते मृत्य पावल्यावर त्याची स्त्री उमाबाई यासी त्या सरंजामापैकी निमे सरंजाम हुजरून करार करून दिल्हा त्याप्रो चालला. त्यास वारिल्यावर त्या सरजामाचे आधिकारी दीर राजश्री मल्हारराव नारायण पुतणे अनंदराव जगनाथ हे उभयेता आहेत. त्याकडे करार करून द्यावया निश्चय तुम्ही हुजूर आसता करून राजश्री पंतप्रधान यासी आज्ञापत्र सादर होते. त्यास ते मुल्हकगिरीस जावयाचे गडबडेत होता यामुले प्रसंग तैसाच रा या राज्याचे उभारणीस्तव आरभी गदाधर पंडित याही श्रमसाहस बहुत प्रस्तुत त्याचे पुतणे व नातू हे उभयेता साहेब कामा योग्य [अपूर्ण]

¶*An incomplete letter from Ramraja to Trimbak Vishvanath Pethe Shahunagar regarding the Saranjam of Mahadaji Gadadhar.*

No. 224] [23-5-1



श्री

तीर्थरूप सौभाग्यवती मातुश्री

काकूबाई वडिलांचे शेवेसी.

आपत्य माधवरायाचे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल तें वैशाख वद्य ४ मुा टोके वडिलांचे आसीर्वादेंकरून यथास्थित असे. यानंत आपण पत्र पाठविले तें पावले. वर्तमान विदित जालें. तीर्थरूपांची शरीर-प्रकृत जी आहे तीच आहे. आम्हास आज्ञा जाली, तुम्ही सातारां जाऊन नवा राजा व(सऊ)न येणे. त्यास येथें राहों न देत. बहूतच आग्रह ; याजकरितां रविवारीं पंचमीस स्वार होऊन, तीर्थरूप राजश्री दादासाहेबांकडे जातों. तेथें जसी आज्ञा करितील, त्याप्रमाणे करूं. आपणास विदित व्हावे. आपणाकरितां सौभाग्यवती बाई गंगातीरी राहातात असा प्रकार आईकतो. आपणास विदित होईल. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Young Madhavrao writes to Parwatibai that the Peshwa has asked him to proceed to Satara and instal a new King on the Throne.*

स्वाम
यांच
आप
नाहं
साहे
येउ
गुए
खम
¶
by
in

REFBK-0004478